३३५

# महाराष्ट्रातील पुरातत्व

६१
२

संपादक :

हसमुख धीरजलाल सांकलिया

मधुकर श्रीपाद माटे

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ, मुंबई

# महाराष्ट्रातील पुरातत्त्व

संपादक

हसमुख धीरजलाल सांकलिया

मधुकर श्रीपाद माटे

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ

ऑक्टोबर १९७६

© महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई

प्रकाशक :
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई

मूल्य : १८ रुपये

मुद्रक :
नाना डेंगळे
साधना प्रेस,
४३०–३१ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

# प्रास्ताविक

साधारण तीन-चार वर्षांपूर्वी एका सभेच्या वेळी अशी सूचना करण्यात आली कि महाराष्ट्रात आजपर्यंत जे पुरातत्त्वविषयक कार्य झाले आहे, त्याचा थोडक्यात परिचय करून देणारा एखादा मराठी ग्रंथ तयार व्हावा. या कामाची जबाबदारी डेक्कन कॉलेजनेच उचलावी असे स्वाभाविकच सुचविण्यात आले. मी माझ्या सर्व सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून एक योजना तयार केली. पुरातत्त्वाच्या विविध क्षेत्रात प्रत्यक्ष संशोधन करणाऱ्या इतर विद्यापीठांतील तज्ज्ञांना लेख लिहिण्यास पाचारण करावे असेही ठरले. आनंदाची गोष्ट अशी की यांपैकी प्रत्येकाने आमची विनंती मान्य केली व आपापल्या क्षेत्राविषयी निबंध पाठविले. या सर्वांच्या सहकार्यानेच प्रस्तुत ग्रंथ तयार झाला व त्याला प्रामाण्य प्राप्त झाले आहे. या सगळ्यांचे मी आभार मानतो.

हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाने उचलली. यासाठी मंडळाचे व विशेषतः मंडळाचे अध्यक्ष माननीय तर्कतीर्थ लक्ष्मण-शास्त्री जोशी यांचे आभार मानावयास हवेत.

पुस्तकाचे मुद्रण साधना प्रेस, पुणे यांनी फार सुबक करून दिले आहे याचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावयास हवा.

ऑगस्ट ३०, १९७६

ह. धी. सांकलिया

लेखक :

(१) प्रा. ह. धी. सांकळिया,
निवृत्त संचालक व प्रमुख, पुरातत्त्वविभाग, डेक्कन कॉलेज, पुणे ६
(२) प्रा. शां. भा. देव,
प्रमुख, पुरातत्त्वविभाग, डेक्कन कॉलेज, पुणे ६.
(३) डॉ. म. श्री. माटे, पुरातत्त्वविभाग, डेक्कन कॉलेज, पुणे ६.
(४) डॉ. श. न. राजगुरू, ,, ,, ,, ,, ,,
(५) डॉ. जै. दा. अन्सारी, ,, ,, ,, ,, ,,
(६) डॉ. ग. गं. मुजुमदार, ,, ,, ,, ,, ,,
(७) डॉ. म. के. ढवळीकर, ,, ,, ,, ,, ,,
(८) डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी, प्रमुख, इतिहास-विभाग, डेक्कन कॉलेज, पुणे ६.
(९) डॉ. सौ. शोभना गोखले, पुरातत्त्वविभाग, पुणे विद्यापीठ, डेक्कन कॉलेज, पुणे ६.
(१०) डॉ. गो. बं. देगलूरकर, प्राचीन इतिहास व संस्कृती विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
(११) डॉ. प्रभाकर देव,
(१२) सौ. माधुरी इंगळगावकर, ग्रंथालय-सहाय्यक, ग्रंथालय, डेक्कन कॉलेज पुणे ६.

# निवेदन

आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांत, त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठ-स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे, हा मुख्य उद्देश लक्षात घेऊन, साहित्य-संस्कृती मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा महाकोश, वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला, आंतरभारती-विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत केल्या आहेत.

२. मराठी भाषेला विद्यापीठीय भाषेचे प्रगल्भ स्वरूप व दर्जा येण्याकरिता मराठीत विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयांवरील संशोधनात्मक व अद्ययावत माहितीने युक्त अशा ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसाराने मराठी भाषेचा विकास होईल ही गोष्ट तर निर्विवादच आहे, पण मराठी भाषेचा विकास होण्यास आणखीही एक साधन आहे आणि ते साधन म्हणजे मराठी भाषेत निर्माण होणारे उत्कृष्ट वाङ्मय हे होय. जीवनाच्या भाषेतच ज्ञान व संस्कृती यांचे अधिष्ठान तयार व्हावे लागते. जोपर्यंत माणसे परकीय भाषेच्याच आश्रयाने शिक्षण घेतात, कामे करतात व विचार करतात तोपर्यंत शिक्षण सकस बनत नाही. संशोधनाला परावलंबित्व राहते, व विचाराला अस्सलपणा येत नाही. एवढेच नव्हे तर, वेगाने वाढणाऱ्या ज्ञानविज्ञानापासून सर्वसामान्य माणसे वंचित राहतात.

३. वरील विषयांवर केवळ परिभाषाकोश अथवा पाठ्यपुस्तके प्रकाशित करून विद्यापीठीय स्तरावर अशा प्रकारचे स्वरूप व दर्जा मराठी भाषेला प्राप्त होणार नाही. सर्वसामान्य सुशिक्षितांपासून तो प्रज्ञावंत पंडितांपर्यंत मान्य होतील अशा ग्रंथांची रचना व्हावयास पाहिजे. मराठी भाषेत किंवा अन्य भारतीय भाषांमध्ये विज्ञान, सामाजिक शास्त्रे व तंत्रविज्ञान या विषयांचे प्रतिपादन करावयास उपयुक्त अशा परिभाषा-सूची किंवा परिभाषा-कोश तयार होत आहेत. पश्चिमी भाषांना अशा प्रकारच्या कोशांची गरज नसते. याचे कारण उघड आहे. पश्चिमी भाषांत ज्या विद्यांचा संग्रह केलेला असतो त्या विद्यांची परिभाषा सतत वापराने रूढ झालेली असते. त्या शब्दांचे अर्थ त्यांच्या उच्चारांबरोबर वा वाचनाबरोबर वाचकांच्या लक्षात येतात, निदान त्या त्या विषयांतील जिज्ञासूंना तरी ते माहीत असतात. अशी स्थिती मराठी किंवा अन्य भारतीय भाषांची नाही. परिभाषा किंवा शब्द यांचा प्रतिपादनाच्या ओघात समर्पकपणे वारंवार प्रतिष्ठित लेखांत व ग्रंथांत उपयोग केल्याने अर्थ व्यक्त करण्याची त्यात शक्ती येते. अशा तऱ्हेने उपयोगात न आलेले शब्द केवळ कोशात पडून राहिल्याने अर्थशून्य राहतात. म्हणून

मराठीला आधुनिक ज्ञानविज्ञानांची भाषा बनविण्याकरिता शासन, विद्यापीठे, प्रकाशन-संस्था व त्या त्या विभागांचे कुशल लेखक यांनी मराठीत ग्रंथरचना करणे आवश्यक आहे.

४. वरील उद्देश ध्यानात ठेवून मंडळाने आपला बहुविध वाङ्मयीन कार्यक्रम आखला असून, शास्त्रीय व वैज्ञानिक विषयावर प्राणिसृष्टी, वनश्रीसृष्टी, ग्रहगती सिद्धान्त, अंतरीक्षदर्शन, धर्मरहस्य, सूक्ष्मज्ञान, आकाशदर्शन, ॲटलास इत्यादी विपुल ग्रंथरचना केली आहे. मंडळाने आजवर आरोग्यशास्त्र, शरीरविज्ञान, जीवशास्त्र, आयुर्वेद, गणित, ज्योतिषशास्त्र, भौतिकी, सांख्यिकी, स्थापत्यशास्त्र, वनस्पतिशास्त्र इत्यादी विषयांवर ३५ दर्जेदार पुस्तके प्रकाशित केली आहेत.

५. प्रस्तुत, " महाराष्ट्रातील पुरातत्त्व " हा सर्वांगीण परामर्श घेणारा लेखसंग्रह त्या त्या विषयातील सुप्रसिद्ध विद्वानांनी लिहिला असून, प्रा. ह. धी. सांकलिया व प्रा. म. श्री. माटे यांनी संपादित केला आहे. आजपर्यंत महाराष्ट्रात झालेल्या पुरातत्त्वीय संशोधनाचा थोडक्यात आढावा घेऊन महाराष्ट्राच्या इतिहासपूर्वकालीन संस्कृतीचा मागोवा घेण्यास उपयुक्त अशी माहिती करून देणारा हा ग्रंथ आहे. मंडळाच्या शास्त्रीय ग्रंथमालेत हा ग्रंथ प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

वाई : आश्विन १०, शके १८९८,
विजयादशमी,
२ ऑक्टोबर, १९७६

**लक्ष्मणशास्त्री जोशी**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ

# अनुक्रमणिका


१. महाराष्ट्र-भौगोलिक आणि भूशास्त्रीय पार्श्वभुमी
—श. न. राजगुरु १–१३

२. प्रागैतिहासिक महाराष्ट्र
—ह. धी. सांकलिया १४–३८

३. महाराष्ट्रातील ' महापाषाणीय ' संस्कृती
—शां. भा. देव ३९–४८

४. महाराष्ट्र इतिहासाची रूपरेषा
—म. श्री. माटे, गो. त्र्यं. कुलकर्णी ४९–६२

५. " प्राचीन ऐतिहासिक " काळाची संस्कृती
—म. के. ढवळीकर ६३–६९

६. मध्ययुगीन संस्कृती
—ज. दा. अन्सारी ७०–७४

७. कला व शिल्प—प्राचीन कालखंड
—म. के. ढवळीकर ७५–८७

८. कला व शिल्प–मध्ययुग, पश्चिम महाराष्ट्र
—म. श्री. माटे ८८–९६

९. कला व शिल्प–मध्ययुग, मराठवाडा
—प्रभाकर देव ९७–१०२

१०. कला व शिल्प–मध्ययुग, विदर्भ
—गो. बं. देगलूरकर १०३–११०

११. कला व शिल्प–इस्लामी व मराठेशाही काल
—म. श्री. माटे १११–१२७

१२. महाराष्ट्राची ' अभिलेख ' संपदा
—शोभना गोखले १२८–१७३

१३. महाराष्ट्रातील प्राचीन नाणी
—म. के. ढवळीकर १७४–१७८

१४. महाराष्ट्रातील पुराण–अवशेषांचे जतन
—ग. गं. मुजुमदार १७९–१८५

१५. पुरवणी १८६–१८७

१६. पारिभाषिक शब्दांची सूची १८८–१९२

१७. सूची १९३–२०८

१८. संदर्भ वाङ्मय
—माधुरी इंगळगावकर २०९–

१९. शुद्धिपत्र

# चित्रसूची

[आकृती १ व २ ही रेखाचित्रे पृ. १८ व पृ. २६ वर आहेत. उरलेल्या सर्व आकृती ग्रंथाच्या शेवटी एकत्र दिलेल्या आहेत. मजकुरात प्रत्येक ठिकाणी आकृतींचा निर्देश करणे शक्य न झाल्याने या चित्रसूचीत चित्रानुक्रम देताना त्या त्या प्रकरणांनुसार यादी दिली आहे. शिवाय प्रत्येक आकृतीसोबत संबंधित पृष्ठाचा क्रमांकही दिला आहे.]


प्रागैतिहासिक महाराष्ट्र –

आकृती १ आद्य अश्मयुगीन हत्यारे.
आ. २ मध्य अश्मयुगीन हत्यारे.
आ. ३ वर्तुळाकार घरांचे अवशेष : इनामगाव.
आ. ४ मातृदेवता व वृषभ : इनामगाव.

महाराष्ट्रातील ‘ महापाषाणीय ’ संस्कृती –

आ. ५ महापाषाणीय शिळावर्तुळे : खापा.
आ. ६ पक्ष्यांच्या नक्षीची झाकणी : खापा.
आ. ७ घोड्याच्या तोंडावरचा दागिना : खापा.

‘ प्राचीन ऐतिहासिक ’ काळाची संस्कृती –

आ. ८ अ ) पॉसिडॉनचा पुतळा : कोल्हापूर.
आ) भांड्याचा दांडा : कोल्हापूर.
आ. ९ सातवाहनकालीन ब्रॉंझ मूर्ती : कोल्हापूर.

‘ मध्ययुगीन ’ संस्कृती –

आ. १० मध्ययुगीन घराचे अवशेष : नेवासे.

कला व शिल्प-मध्ययुग-पश्चिम महाराष्ट्र –

आ. ११ भिंतीवरील मूर्तिशिल्प, भुलेश्वर मंदिर : यवत.

कला व शिल्प-मध्ययुग-मराठवाडा –

आ. १२ शिवमंदिर : अन्वा.

## कला व शिल्प-मध्ययुग-विदर्भ –

आ. १३ शिवमंदिर : सातगाव.
आ. १४ शिवमंदिर : साकेगाव.
आ. १५ मूर्तिशिल्प, मार्कंडेश्वर मंदिर : मार्कंडी.

## कला व शिल्प-इस्लामी व मराठेशाही काळ –

आ. १६ गुजरात-शैलीचा लाकडी हस्त : श्रीगोंदे.
आ. १७ मंदिराचे शिखर, विठ्ठलवाडी : पुणे.

## महाराष्ट्राची अभिलेख संपदा –

आ. १८ ब्राह्मी शिलालेख : गास.
आ. १९ ब्राह्मी शिलालेख : पाले.
आ. २० वाकाटक राजा देवसेन याचा शिलालेख : हिस्सेबोराळा.
आ. २१ त्रैकूटक राजा मध्यमसेन याचा ताम्रपट : (१) माटवण.
आ. २१(अ) त्रैकूटक राजा मध्यमसेन याचा ताम्रपट : (२) माटवण.

# शुद्धिपत्रक

[ फक्त महत्त्वाच्या दुरुस्त्या येथे दिलेल्या आहेत. ]

| पान | परिच्छेद | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ३३ | ३ | शेवटची | (आकृती ४) | हे शब्द गाळावेत |
| ३७ | ४ | ,, | (आकृती ५) | (आकृती ४) |
| ६८ | ४ | ,, | (आकृती ९ व १०) | (आकृती ८ व ९) |
| ७९ | १ | १ | धेनुकाकर | धेनुकाकट |
| ८६ | १ | २ | जानकाची | जातकाची |
| ९० | १ | ४ | शलीची | शैलीची |
| ९५ | १ | १६ | असणारी मंदिरे | असणारे मंदिर |
| १०५ | ४ | शेवटची | अमरशिला | अमलशिला |
| १०६ | ३ | २ | मर्कंड | मार्कंड |
| १२८ | १ | ३ | टॅसिलस | टॅसिटस |
| १२९ | १ | ५ | पृष्ठभूमीसारखा | पार्श्वभूमीसारखा |
| १३० | २ | १५ | सुत्तात | सुत्तांत |
| १३० | २ | १६ | अखूवरिका | अक्खरिका |
| १३१ | ३ | ५ | भागवत | भगवत |
| १३१ | | ६ | चतुरायिती | चतुरासिती |
| १३१ | ४ | १ | कुशिन्तर | कुशिनार |
| १३२ | १ | ५ | गुजरा | गुर्जरा |
| १३२ | २ | ४ | टोपरा | टोपडा |
| १३६ | ५ | ३ | ताम्रपट | ब्राँझपट |
| १४८ | २ | ६ | बल्लालाने | बल्लाळाने |
| १४८ | २ | ६ | मल्लगीस | मल्लुगीस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४९ | ४ | ७ | अपितुल | अयितुल |
| १५० | ४ | ३ | क्षहराज | क्षहरात |
| १५४ | २ | २ | पादानुध्यानतो | पादानुध्यात |
| १५४ | २ | ३ | भवतत्पाद | भगवतत्पाद |
| १५४ | ३ | शेवटची | ब १०५ | ब १५ |
| १५७ | १ | १ | मालवण | माटवण |
| १५७ | २ | शेवटची | फरतटिकनतर्गत | फरतटिकान्तर्गत |
| १५७ | शेवटची | २ | चामलक | पंचामलक |
| १५९ | २ | १ | आमोणा | आभोणा |
| १५९ | ३ | ४ | रूक्चिरखपुरनद्य कालीनपुरुष | रूचिरवपुरनद्यकालीनपुरुष |
| १६० | १ | १ | स्ववशालङ्कारभूत | स्ववंशालङ्कारभूत |
| १६० | १ | २ | सागरगम्मीर | सागरगम्भीर |
| १६० | १ | १० | यतोस्मद्वं श्यराजन्यैश्च | यतोस्मद्वंश्यराजन्यैश्च |
| १६० | १ | १९ | महिमनाश्रेष्ठ | महिमतांश्रेष्ठ |
| १६० | १ | १९ | दानाच्छेयानु | दानाच्छ्रेयानु |
| १६० | १ | २१ | घोरायु | घोरासु |
| १६३ | ३ | १ | करजवी | करजणी |
| | ५ | शेवटची | लग्नरत्नछुद्युतिरित | लग्नरत्नद्युतिरित |

# महाराष्ट्र–भौगोलिक आणि भूशास्त्रीय पार्श्वभूमी

श. न. राजगुरू

कोणत्याही प्रदेशांतील मानवी समाजाची रचना, प्रगती व त्याच्या संस्कृतीची घडण थोड्या फार अंशाने त्या भागाच्या नैसर्गिक वातावरणामुळे होत असते. साहजिकच इतिहासाचा अभ्यास भौगोलिक पार्श्वभूमीवरच करावा लागतो. तेव्हा ह्या ठिकाणी महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेची थोडक्यात माहिती दिली आहे आणि त्यांतील बदलांची नोंद कालक्रमाने घेतली आहे.

१. महाराष्ट्र भूमी–स्वाभाविक रचना.
२. भूशास्त्रीय रचना.
३. हवामान
४. जमीन आणि वनस्पती.
५. गेल्या ४०, ५० हजार वर्षांत महाराष्ट्रातील भूरचनात्मक बदल.

## महाराष्ट्र भूमी–स्वाभाविक रचना

महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ३,०३,२०२ चौ. कि. मी. आहे. उत्तर-दक्षिण आणि पूर्व–पश्चिम लांबी अनुक्रमे ७२० आणि ८०० कि. मी. आहे.

महाराष्ट्राच्या उत्तरेला गुजरात आणि मध्यप्रदेश, पूर्वेला मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेश, दक्षिणेला आंध्रप्रदेश आणि म्हैसूर अशी राज्ये येतात. पश्चिमेच्या ५६० कि. मी. लांब सीमेवर अरबी समुद्र (सिंधुसागर) आहे. महाराष्ट्राचे सर्वांत कोणते ठळक भूरचनात्मक वैशिष्ट्य असेल तर ते म्हणजे पश्चिम भागांत दक्षिण-उत्तर जाणारी सह्याद्री पर्वतांची रांग. सह्याद्रीची एकूण लांबी ६४० कि. मी. आहे; आणि सर्वसाधारण समुद्रापासून उंची ८०० ते १ हजार मीटर आहे. ह्या सह्याद्रीचा महाराष्ट्राच्या केवळ हवामान, वनस्पती ह्यावरच परिणाम झाला नाही असे तर महाराष्ट्राच्या संस्कृतीवर पण झाला आहे. कोकणातून कोठूनही पाहिले तरी सह्याद्रीचा अभंग कडा दिसतो.

सह्याद्रीमुळे महाराष्ट्राची भूरचनात्मक विभागणी अगदी पद्धतशीर झाली आहे. त्याच्या पश्चिमेला ४८ ते ६४ कि. मी. रुंदीची चिंचोळ्या किनाऱ्याची-कोकणपट्टी आणि पूर्वेला पसरलेले दख्खनचे विस्तीर्ण पठार आणि दख्खनच्या पठाराच्या उत्तरेला पूर्व-पश्चिम जाणारी सातपुडा पर्वतांची रांग आहे. सातपुड्याची महाराष्ट्रातली सर्वसाधारण लांबी २४० कि. मी. आणि उंची ६०० ते ७०० मी. आहे. ह्या दोन पर्वतांत कळसूबाई हे सह्याद्रीचे शिखर सर्वांत उंच १६४६ मीटर आहे. सातपुड्याच्या उत्तरेला नर्मदा नदी वाहते तर दक्षिणेला तापी-पूर्णा नद्या वाहतात. तापी आणि पूर्णा या दोनच नद्या सातपुड्याच्या कुशीत जन्म घेऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहत जाऊन गुजरातमध्ये अरबी समुद्रास मिळतात. ह्या उलट दख्खन पठारावरील सर्व मुख्य नद्या म्हणजे गोदावरी, भीमा, कृष्णा, कोयना, सह्याद्रीच्या कुशीत जन्म घेतात आणि पूर्वेकडे अगर आग्नेयेकडे संथपणे वाहत जाऊन शेवटी सुमारे १२०० ते १४०० कि. मी. लांब प्रवासानंतर बंगालच्या उपसागरास मिळतात. कोकणातील नद्या सह्याद्रीच्या कुशीतच उगम पावतात आणि थोड्या प्रवासानंतर ( ६० ते १०० कि. मी. ) पश्चिमेला अरबी समुद्रास मिळतात.

महाराष्ट्रातील नद्या व त्यांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील: पूर्ववाहिनी नद्यांमध्ये प्रमुख नद्या कृष्णा, भीमा आणि गोदावरी होत. गोदावरीला तिच्या उत्तर वा ईशान्य दिशांकडून मिळणाऱ्या वर्धा, वैनगंगा, पैनगंगा नद्या पण तितक्याच महत्त्वाच्या आहेत. पश्चिमवाहिनी तापी-पूर्णा एका वैशिष्ट्यपूर्ण भूरचनात्मक दरीतून वाहत जातात. पश्चिम किनाऱ्यावर वैतरणा, उल्हास, सावित्री, वासिष्ठी या नद्या समुद्राला मिळेपर्यंत २०० ते ४०० मीटर उंचीच्या पर्वताच्या रांगांना कधी भेदून तर कधी वळसा घेऊन वाहत जातात. ह्या नद्यांच्या मुखापर्यंत काही ठिकाणी ४०० मीटर खोलीच्या दऱ्या दिसतात. ह्या सर्व नद्यांवर विशेषतः मुखाजवळच्या प्रदेशात, ( दाभोळ, श्रीवर्धन या ठिकाणी ) समुद्राने आक्रमण केल्यासारखे वाटते. पश्चिमवाहिनी नद्यांचे प्रवाह काही वेळेस अचानकपणे काटकोनात वळणे घेतात. खुद्द मुंबई बेटाजवळ उल्हास, भातसा, वैतरणा वगैरे नद्या मुंबई बेटाकडे खेचल्यासारख्या वाटतात. पश्चिमवाहिनी नद्यांच्या सह्याद्री पर्वतातील काही भाग—पहिला १० कि. मी. प्रवासाचा भाग— अगदी विलोभनीय वाटतो. उगमाजवळील धबधबे ( खंडाळ्यापाशी उल्हास नदीवरचा धबधबा ), ४०० ते ५०० मीटरच्या खोल दऱ्या, ( खंडाळ्याजवळची उल्हासची दरी ) बऱ्याच नद्यांमध्ये दिसतात. या नद्यांचा पुढचा १५, २० कि. मी. प्रवास रुंद परंतु उथळ दऱ्यांतून होतो. नद्यांचा उतारही बराच कमी होतो, व नदीकाठी दोन अगर तीन उत्तर Pleistocene काळातील मंचके आढळतात. कर्जतजवळ उल्हास नदीवर, महाडपाशी सावित्रीवर आणि वाड्याजवळ वैतरणेवर अशा प्रकारची मंचके फार चांगल्या प्रकारे दिसतात. या नद्यांच्या मुखाजवळील भागही फार विलोभनीय वाटतो.

## तापी आणि पूर्णा खोरे

या दोन्ही नद्या सातपुड्याच्या पायथ्याशी पृथ्वीच्या पृष्ठभागावर भूस्तर हालचाली-मुळे ज्या खच दऱ्या तयार झाल्या आहेत त्यातून वाहतात. ह्या नद्यांच्या काठी गाळांची विस्तीर्ण मैदाने ( २० ते २५ कि. मी. रुंद ) तयार झाली आहेत. काही ठिकाणी गाळांच्या थरांची जाडी २०० मी. इतकी आहे. गाळांच्या थरांची जाडी उत्तरेकडून दक्षिणेकडे कमी कमी होत जाते. पूर्णानदीच्या काही भागात गाळाच्या अगदी खालच्या भागी अतिशय क्षारयुक्त थर मिळतात. तापीच्या पश्चिम बाजूकडील उपनद्या ( पांझरा, गिरणा इ. ) मात्र पश्चिम घाटात किंवा सह्याद्री पर्वतात उगम पावतात व काही कि. मी. ( सुमारे ६० ) पूर्वे-कडे वहात जाऊन काटकोनात वळण घेऊन उत्तरेला तापीला मिळतात. या नद्यामध्येसुद्धा एका ठराविक उंचीवर धबधबे आढळतात. तापी आणि गोदावरीच्या खोऱ्यांतील जल-विभाजकास अजंठा, सातमाळा डोंगर म्हणतात. गोदावरी आणि तापीमधील जलविभा-जकाच्या तापीच्या बाजूकडील उतार अगदी हळूहळू कमी कमी होत जातो. ह्या उलट भीमा आणि गोदावरी यांच्यामधील बालाघाट जलविभाजकाची रांग अगदी ठळकपणे दिसते. बालाघाटच्या उत्तरेकडे डोंगरांचा उतार एकदम कमी होतो. भीमा आणि कृष्णा यांमधील जलविभाजकाला महादेवाचा डोंगर म्हणतात. हे सर्व जलविभाजक सर्वसामान्यपणे पश्चिमेकडून पूर्वेकडे जातात. त्यांची उंचीपण पश्चिमेकडून पूर्वेकडे कमी कमी होत जाते. ह्या मुख्य जलविभाजकांशिवाय छोटे छोटे जलविभाजक पण आहेत. काही पूर्व–पश्चिम तर काही दक्षिण–उत्तर आहेत. ह्या जलविभाजकाच्या माथ्यावर आणि उतारावर समुद्र-सपाटीपासून ३००० ते २५००, २२००, २००० इतक्या उंचीवर पठारे आढळतात.

पूर्ववाहिनी कृष्णा, भीमा, गोदावरी ह्या नद्यांची खोरीही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कृष्णा सर्वसाधारणपणे आग्नेय दिशेस वाहते तर गोदावरी, भीमा बहुतांशी पूर्वेकडे वाहतात. कृष्णेची उपनदी कोयना ही प्रथमतः ६४ कि. मी. सरळ सह्याद्रीच्या कुशीतून वाहत जाते. आणि कोयनानगरपाशी एकदम पूर्वेला वळते. या पूर्ववाहिनी नद्यांची खोरीही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कृष्णेचे महाबळेश्वर आणि वाई या दरम्यानचे खोरे बरेचसे रुंद आणि इंग्रजी " U " ( यू अक्षराच्या ) च्या आकाराचे आहे. गोदावरी किंवा इंद्रायणी यांच्या उगमापाशीसुद्धा त्यांची खोरी पसरट रुंद, विस्तीर्ण आहेत. गोदावरी नदीवर नाशिकजवळ ६ ते ८ मी. उंच, प्रवरेवर भंडारदऱ्यापाशी ५० मी. उंच, आणि वेण्णा नदीवर महाबळेश्वरानजीक २०० मी. उंच असलेले धबधबे विलोभनीय दिसतात. या नद्यांवर काही ठिकाणी खोल १५० मी. दऱ्या आहेत; तर काही ठिकाणी या नद्यांच्या काठाला विस्तीर्ण पसरलेली गाळांची मैदाने किंवा पूर मैदाने आहेत. कृष्णेवर सांगली–मिरजपाशी, भीमेवर पंढरपुराजवळ आणि गोदावरीवर पैठण नांदेडजवळ ही अशी मैदाने ३ ते ६ कि. मी. रुंद आहेत. या गाळाच्या जमिनीची खोली मात्र ४० मी. पेक्षा

कुठेही जास्त नाही. प्रवरेवर संगमनेरजवळ गाळाच्या जमिनीची रुंदी एकदम १६ कि. मी. आहे. ह्या गाळाच्या वरच्या थरावर बहुतेक ठिकाणी काळी माती दिसते.

दख्खनच्या पठारावरच्या ह्या नद्यांची पात्राकृती (drainage pattern) बहुतांशी एखाद्या वृक्षाच्या प्रद्यालासारखी आहे. नदी अपहाराचे प्रकार काही ठिकाणी स्पष्टपणे दिसतात. हे प्रकार बहुतांशी पश्चिम घाटाच्या माथ्यावरच्या भागांतच आढळतात. पूर्ववाहिनी नद्यांचा उतार अगदी सौम्य सुलभ आहे तर पश्चिमवाहिनी नद्यांचा उतार खूपच कठीण आहे. पश्चिमवाहिनी नद्या साहजिकच आपले पात्र मागेमागे उगमाकडे रेटीत आल्या व त्यांनी पूर्ववाहिन्यांच्या खोऱ्यातील काही उपनद्या आपल्याकडे वळवून घेतल्या. गोदावरीच्या उगमस्थानात पश्चिमवाहिनी वैतरणेने अशा प्रकारचे सरिता (जल) अपहरण केले आहे. इंद्रायणीच्या उगमस्थानात पश्चिमवाहिनी उल्हास नदीने थोड्या फार प्रमाणावर सरिताअपहरण केले आहे.

ह्या नद्या क्वचितच सरळ वाहतात. बहुतेक त्या नागमोडी वळणे घेत वाहत जातात. काही ठिकाणी तर ही नागमोडी वळणे एकमेकांशी भिडल्यामुळे नदीचा प्रवाह एकदम सरळ झाला आहे. पूर्वीच्या नागमोडी वळणाचा भाग मूळ प्रवाहापासून अलग होऊन त्याचे रूपांतर एखाद्या छोट्याशा सरोवरात झाले आहे. या सरोवराला 'ऑक्सबो लेक' (ox bow lake) किंवा कुंडलकास्मर सरोवर म्हणतात. असे उदाहरण आपल्याला कृष्णानदीमध्ये साताऱ्यापासून ७–८ कि. मी. अंतरावर पाहावयास मिळते.

आज ह्या नद्यांची पात्रे पुनर्युवी (Rejuvenated) झाली आहेत. म्हणजेच या नद्या स्वतःचेच पात्र खाली खाली खणत असून त्या दोन्ही तीरांवर असलेल्या गाळाच्या अगर दगडांच्या काठामधून वाहात असतात. बऱ्याच ठिकाणी आज दिसणारी नदी खडकावरून वाहात असते व दोन्ही बाजूचे काठ मात्र १५ ते २५ मी. उंचीच्या जलौघांचे बनतात. काही ठिकाणी (तापी, पूर्णा या खोऱ्यात) मात्र नदी पूर्वीच्या जलौघावरून वाहत असते.

या नद्यांना पूर मुख्यत्वेकरून जुलै आणि ऑगस्ट महिन्यातच येतात. काही वेळेस नदीच्या पाणलोटाच्या क्षेत्रात तीन-चार दिवस सतत पाऊस पडला तर नद्यांना महापूर येतात व नदीकाठच्या भागात बरेचसे नुकसान होते. १९६९ साली गोदावरीला असाच महापूर आला व नाशिक, कोरेगांव, पैठण, नांदेड ह्या भागात पुष्कळच नुकसान झाले. उन्हाळ्यात जवळजवळ कोरड्या होणाऱ्या नद्या पावसाळ्यात एकदम फुगतात व काही वेळेस अगदी रौद्ररूप धारण करतात. अशा प्रकारचे महापूर साधारणपणे ५० वर्षांतून एकदा अगर दोनदाच येतात. महाराष्ट्रातील कमी पर्जन्य असलेल्या पूर्वेकडील भागात मान्सूनपूर्व व मान्सूननंतर होणाऱ्या वादळी पावसाने कित्येक वेळा जवळजवळ वर्षातील नऊ ते दहा महिने कोरड्या असलेल्या नद्यांना एकदम पाणी येते. पाण्याचा जोर इतका असतो की कित्येक वेळेला मोटारीसुद्धा वाहून गेल्याची उदाहरणे आहेत. अशा प्रकारचा पूर अर्थातच काही तास टिकतो. थोडक्यात म्हणजे महाराष्ट्रातील नद्या पुष्कळदा

पावसाळ्यात दुथडी भरून वाहतात तर उन्हाळ्यात जवळजवळ कोरड्याच. फक्त काही डोहातच पाणी आढळते. या नद्यांचा भू-शास्त्रीय इतिहास फारच उद्बोधक आहे. त्याचा परामर्ष पुढे आलाच आहे.

## महाराष्ट्रातली पठारे

सह्याद्रि पर्वताचा पश्चिमेकडील सरळसोट कडा, सातपुड्याची पूर्व-पश्चिम रांग, त्याचप्रमाणे निरनिराळ्या नद्यांना विभागणारे जलविभाजक डोंगर हे सोडले तर महाराष्ट्रात ठळकपणे दिसणारे भू-रचनात्मक वैशिष्ट्य म्हणजे समुद्रसपाटीपासून वेगवेगळ्या उंचीवर आढळणारी विस्तीर्ण पठारे ! या पठारामुळेच महाराष्ट्राच्या भूमीला एकप्रकारचे सोपानसदृश स्वरूप प्राप्त झाले आहे. कोकणात ही पठारे समुद्रसपाटीपासून २०, ५०, १००, २०० आणि ३५० मीटर उंचीवर आढळतात तर पश्चिम महाराष्ट्रात १३००, १०००, ८००, ७०० किंवा सहाशेपन्नास मीटर उंचीवर दिसतात. ही पठारे मुख्यत्वेकरून जलविभाजकावर आणि सह्याद्रीच्या पूर्वेला, पश्चिमेला मुख्यतः माथ्यावर आढळतात. कृष्णा खोऱ्यातले महाबळेश्वराचे पठार, भीमा खोऱ्यात भीमाशंकरचे पठार, गोदावरी खोऱ्यात दोलासने पठार, आणि इंद्रायणीच्या खोऱ्यात उगमाजवळ आढळणारे लोणावळ्याचे पठार ही देशावरची उदाहरणे म्हणून सांगता येतील; तर कोकणात मालवण रत्नागिरीजवळ आढळणारी काही पठारे, दापोलीचे पठार आणि महाडजवळ असलेले माझेरी पठार ही पठारे होत. ही पठारे कशी तयार झाली हे नंतर स्पष्ट केले आहे.

## भू-शास्त्रीय रचना

महाराष्ट्राचा बराचसा भाग लाव्हारसापासून तयार झालेल्या काळ्या अग्निजन्य ज्वालामुखी खडकांनी व्यापलेला आहे. भारतीय भूशास्त्रज्ञ याना "डेक्कन ट्रॅप" असे म्हणतात. या खडकांत सर्वात मुख्य प्रकार आढळतो तो म्हणजे "बेसाल्ट व त्याचे अनेक प्रकार" महाराष्ट्रातल्या काही भागात म्हणजे नागपूरच्या पूर्वेस, अमरावतीच्या उत्तरेस, रत्नागिरीच्या आणि नांदेडच्या दक्षिणेस अगदी वेगळ्या प्रकारचे खडक आढळतात. नागपूरच्या बाजूला डेक्कन ट्रॅपच्या आधीचे ग्रॅनाइट, शिस्ट ग्राईस, सँडस्टोन, कार्झाइट, लाइम रॉकस् वगैरे दगडांचे बरेच प्रकार आढळतात. रत्नागिरीच्या दक्षिणेस हे प्रकार तर मिळतातच पण डेक्कन ट्रॅपनंतरच्या काळात तयार झालेले, समुद्राच्या गाळापासून बनलेले खडक पण आढळतात. महाराष्ट्रात सापडणारी बरीचशी मौल्यवान खनिजे– कोळसा, लोखंड, मँगनीज, तांबे, थोडे फार सोने, चुनखडीचा दगड ही नागपूरच्या भोवतालच्या भागात मिळतात. रत्नागिरीच्या बाजूला काही प्रमाणात लोखंड मिळते. खुद्द डेक्कन ट्रॅपमध्ये मौल्यवान अशी खनिजे काहीच मिळत नाहीत. दिसायला सुंदर असे झिओलाइटचे स्फटिक आणि आकीकाचे वेगवेगळे प्रकार मात्र बऱ्याच ठिकाणी मिळतात.

डेकन ट्रॅपचे खडक हे ज्वालामुखीतून बाहेर पडलेला लाव्हा रस निवून तयार झालेले आहेत. लाव्हा रस पृथ्वीच्या कवचाला पडलेल्या कित्येक कि. मीटर लांबीच्या भेगांतून ( fissures ) बाहेर आला. काही थोड्या बाबतीत पृथ्वीच्या पोटात खोलवर जाणाऱ्या नळीवजा भोकांतून, विवरातून बाहेर पडला. उद्रेकांतून बाहेर पडणारा लाव्हा रस कि. मीटरच्या कि. मीटर अंतर लांब पसरलेला असून त्याची जाडी २० ते २५ मीटर असते. केंद्रीय उद्रेकांचे थर फार लांब पसरलेले नसतात. ते २-३ मीटर जाडीचे, वेगवेगळ्या दिशांना वेगळ्या कोनात कललेले आणि एकमेकावर वेडेवाकडे, ओबडधोबड-रीत्या रचलेले, असतात. हे पृष्ठभाग विदारित उद्रेक आणि केंद्रीय उद्रेक महाराष्ट्रात सुमारे ६० दशलक्ष वर्षापूर्वी सुरू झाले आणि थांबत थांबत ४० ते ५० दशलक्ष वर्षापूर्वीपर्यंत चालू राहिले. ज्या वेळेस लाव्हा-रसाचा उद्रेक बंद झाला त्या वेळेस बऱ्याच ठिकाणी छोटी छोटी तळी निर्माण झाली व त्यात गाळ साचत गेला. ह्या गाळात त्यावेळचे जीवाणू अश्मीभूत झालेले आढळले. अशा तऱ्हेने " इंटर ट्रॅपियन ( Inter Trappean ) जीवाश्म " मुंबई, नागपूर आणि नांदेडजवळ सापडले आहेत. डेक्कन ट्रॅप बहुतांशी सरळ समांतर असतो. एकावर एक व्यवस्थित आडवे पडलेले लाव्हाचे थर सह्याद्रीच्या कड्यावर बऱ्याच ठिकाणी पाहण्यास मिळतात. फक्त कोकणात मुंबईजवळ आणि सातपुडा पर्वतात लाव्हाचे थर किंचितसे कललेले आहेत.

डेकन ट्रॅपमध्ये विभंग अगर भ्रंशभेगा अजूनपर्यंत तरी कुठेही आढळलेल्या नाहीत. सांधेजोड मात्र काळ्या घट्ट बेसाल्टमध्ये नेहमी आढळते. या संधीमुळेच अंधेरीजवळ बेसाल्टचे सुंदर स्तंभ तयार झाले आहेत. बेसाल्टचे अनेक प्रकार गुरुस्फटी ( Porphyritic ), ज्वालामुखी ब्रेशिया ( Volcanic Bracia ) भरी कुट्टुर ( Amygdaloidal ) महाराष्ट्रात आढळतात. मुंबईजवळ याशिवाय व्हायोलाइटचे खडक पण सापडतात. दोन लाव्हांच्या थरामध्ये कित्येक वेळेस तांबड्या मातीसारखा गेरु ( Bole )चा घट्ट थर पण आढळतो.

महाराष्ट्रात डेकन ट्रॅपवर बरेच ठिकाणी आढळणारा आणखी एक खडक म्हणजे जांभा ( Laterite ) होय. हा विटेसारखा दिसतो व घर-बांधणीला फार उपयुक्त आहे. हा महाबळेश्वरजवळ समुद्रसपाटीपासून १५०० कि. मी. उंचीवर आढळतो तर रत्नागिरी, मालवण, दापोली, जंजिरा या ठिकाणी समुद्रसपाटीपासून ४००, २००, १००, ५० मीटरवर सापडतो. अमरावतीजवळ पूर्णेच्या खोऱ्यात ह्या खडकांचे अवशेष आढळतात. जांभ्यामध्ये काही ठिकाणी ॲल्युमिनियम व लोखंड मिळते. कोकणात बऱ्याच ठिकाणी ॲल्युमिनियम मिळू शकेल. जांभ्या दगडाच्या उत्पत्तीबद्दल बरेच सिद्धांत आहेत त्याचे विवेचन पुढे दिलेले आहे.

महाराष्ट्रातील आणखी एक भूशास्त्रीय वैशिष्ट्य म्हणजे डाइक अगर कार. कार म्हणजे शिलारसाने भरलेली भेग. त्यामुळे कारीचा आकार लांबच लांब भिंतीसारखा असतो दोन्ही बाजूचे खडक जर जास्त लवकर धुपून गेले तर ' कार ' आजुबाजूच्या प्रदेशापेक्षा

उंच भिंतीसारखी उभी राहते. कार बहुतकरून बेसॉल्ट अगर डोलेराईटची असते. अशा प्रकारच्या कारी पश्चिम महाराष्ट्रात, उत्तर कोकणात खूप ठिकाणी सापडल्या आहेत.

महाराष्ट्रातील नद्यांच्या काठी जो गाळ किंवा गाळांच्या थरांचे ५ मी. ते २५ मी. उंच सापडणारे तट; त्यांचा पण विशेष अभ्यास पुरातत्त्वशास्त्रज्ञांकडून गेल्या २५-३० वर्षांत बराच झाला आहे. या गाळांच्या थराच्या खालच्या भागांत बहुतकरून गोट्यांचे आणि वाळूचे थर असतात व वरच्या भागात वाळूचे थर आणि तांबडी, पिवळी, भुऱ्या रंगाची माती आढळते. ह्या थरामध्ये अश्मयुगीन हत्यारे, पूर्वीच्या प्राण्यांचे ( हत्ती, घोडे, पाणघोडे, बैल वगैरे ) अश्मीभूत अवशेष, अर्धवट जळालेल्या व अश्मीभूत झालेल्या लाकडांचे ओंडके आणि शंख शिंपले मिळाले आहेत. पुराजीवाश्माच्या अभ्यासावरून आणि काही लाकडांच्या, शंखशिंपल्यांच्या कार्बन १४ पद्धतीने वाढलेल्या वयोमानावरून असे म्हणता येईल की हे गाळांचे निक्षेप ( deposits ) साधारणपणे १ लाख ते २० हजार वर्षांपूर्वीचे असावेत. गाळांच्या ह्या थरांना Older Alluviuim ( गाळांचे प्राचीन थर ) म्हणतात. या थरामध्ये कॅल्शियम कार्बोनेटचे चुनखडीचे Concretions अगर संचित असतात. त्यामुळे गाळाचे थर घट्ट झालेले असतात. महाराष्ट्रात चुनखडीमिश्रित गाळाला (जुन्या) माण असे म्हणतात. ह्या गाळांच्या थरांचा बराचसा अभ्यास झाला आहे व त्यावरून गेल्या ४०-५० हजार वर्षांत महाराष्ट्रातील हवामान नद्यांची पात्रे, भूरचना यात झालेल्या बदलांची बरीच माहिती उपलब्ध आहे. त्या माहितीचा संकलित विचार नंतर करण्यात येईल.

## हवामान

महाराष्ट्रात हवामान विविध प्रकारचे आढळते. कोकणात समशीतोष्ण व दमट तर देशावर विषम, आणि कोरडी हवा. सर्वसामान्य तपमान २० ते २३° पर्यंत असते. खानदेश विदर्भात उन्हाळ्यात तपमान ४३° ते ४५° पर्यंत जाते तर थंडीत ४° ते ५° सें. ग्रे. च्या खाली तपमान क्वचितच जाते. महाराष्ट्रातला पावसाळा मात्र जून ते ऑक्टोबर ह्या चार महिन्यांतच असतो. साधारणमानाने पावसाळा १४० दिवस असतो व पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यापासूनच मिळतो. पावसाचे मान उत्तर-दक्षिण पसरलेला सह्याद्री आणि पूर्व-पश्चिम पसरलेला सातपुडा, अजिंठा, बालाघाट, महादेव या डोंगरांच्या रांगा ठरवितात. सह्याद्रीमुळे मोसमी वारे अडतात व त्यामुळे कोकणात आणि सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर खूपच पाऊस पडतो. दक्षिण कोकणात उत्तर कोकणापेक्षा जास्त पाऊस पडतो. ( २ हजार ते ६ हजार मि. मीटर ) सह्याद्रीच्या पूर्वेला पाऊस एकदम कमी होतो व पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्ह्यातला काही भाग पर्जन्य छायेत आल्यामुळे अगदी कमी पाऊस ५०० ते ३०० मि. मी. पडतो. या जिल्ह्याच्या पूर्वेकडील भागात परत पावसाचे प्रमाण वाढते कारण ह्या भागाला बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या मोसमी वाऱ्यापासूनही काही प्रमाणात पाऊस मिळतो. पावसाळ्यात पाऊस

चार महिने सतत कधीच पडत नाही. ४।५ दिवस संततधार की १०।१५ दिवस दडी, कधीकधी तासात १०० मि. मी. पाऊस कोसळेल तर कधी २४ तासात २-३ मि. मी. पाऊससुद्धा पडत नाही. पावसाच्या लहरीवर महाराष्ट्राचे सगळे जीवन अवलंबून असते. कधी अतिवृष्टी कधी महापूर तर कधी अवर्षण. मोसमी वारे यावयाच्या अगोदर आणि जाताना महाराष्ट्राच्या पूर्वभागात वादळी पाऊस होतो, जुलै हा सर्वसामान्यपणे सर्वात जास्त पावसाचा महिना असतो.

## जमीन आणि वनस्पती

पर्जन्यमानात पडणाऱ्या फरकामुळे महाराष्ट्रात जमीन आणि वनस्पती यात पण खूप विविधता आढळते. अतिपावसाच्या कोकणात आणि घाटमाथ्यावर तांबडी माती आढळते तर कमी पावसाच्या देशावरील प्रदेशात मुख्यत्वेकरून काळी मातीच दिसते. खानदेशात आणि विदर्भात ह्या काळ्या मातीवर कापसाचे अमाप पीक येते. म्हणून या काळ्या मातीला ' कापसाची काळी माती ' हे नाव पडले आहे. काळ्या मातीत मुख्यत्वेकरून " मॉटमोरिलोनाइट " नावाचे खनिज असते. ह्या खनिजामुळे ही माती ओली असताना खूप फुगते आणि वाळल्यावर आकुंचनामुळे तिच्यात खूप खोलपर्यंत ( १।२ मीटर ) भेगा पडतात. काळ्या मातीची जाडी सर्व-साधारणपणे १ ते १॥ मी. पर्यंत असते व हिच्या खालच्या भागात चुनखडीचे थर सापडतात. ही माती अल्कधर्मी असते, या मातीला मृदाशास्त्राच्या भाषेत " पेडॅकल " प्रकारची माती म्हणतात. ह्या मातीचे थर तापी, गोदावरी, कृष्णा ह्या नद्यांच्या काठी कित्येक वेळा ५ ते १५ मी. जाडीचे असतात. हे थर नदीने वाहून आणलेल्या गाळा-पासून तयार झालेल्या असतात. काळी माती मुख्यत्वेकरून सपाट भूपृष्ठावर आणि ज्या ठिकाणी पाण्याचा निचरा पूर्णपणे होत नाही अशा ठिकाणी तयार झालेली आढळते. ह्या उलट डोंगराच्या उतरणीवर करड्या अगर पिवळट तांबड्या रंगाची माती आढळते.

महाराष्ट्रात तांबड्या रंगाची माती मुख्यत्वेकरून जास्त पावसाच्या प्रदेशात आढळते. ह्या मातीत " केओलिनाईट " नावाचे मुख्य खनिज असते. व चुनखडीचे थर अजिबात नसतात. ही माती अम्लधर्मी असते. मृदाशास्त्राच्या भाषेत या मातीला " फेडाल्फेर " प्रकारची माती म्हणतात. कोकणात आणि सह्याद्री पर्वताच्या उतारावर ह्या मातीची जाडी कित्येक वेळा १० ते १५ मीटरपर्यंत असते. पिकांच्या दृष्टीने ही माती काळ्या मातीपेक्षा कमी प्रतीची असते. कारण पिकांना उपयुक्त असलेल्या बऱ्याच खनिजांचा जास्त पाण्यामुळे निचरा झालेला असतो. ज्याप्रमाणे मातीत विविधता आढळते त्याच-प्रमाणे वनस्पतीतही खूप वैचित्र्य असू शकते. खूप पावसाच्या सह्याद्रीच्या उतारावर आणि माथ्यावर नित्यपर्णी जंगल आहे. त्यात करमळ, नागचाफा, कोकम, रानभेंडी, जांभूळ, उंबर वगैरे मोठे वृक्ष आणि नेचे, रानकेळी, कर्दळी, रानसुरण, अशा खुज्या वनस्पती आढळतात. नित्यपर्णी जंगलात वनस्पतीचे निरनिराळे मजले आढळतात. जमिनी

बरोबर लहान रोपटी, गवते, कंदमुळे वगैरे वनस्पती, ५ ते ६ मीटर उंचीवर लहान वृक्ष, व झुडपे, २० ते ३० मीटर उंचीवर किंवा त्याहून अधिक उंचीवर मोठाले वृक्ष, त्यावर वाढणाऱ्या वेली, आणि आर्किडसारख्या वनस्पती दृष्टीस पडतात. अशा प्रकारची जंगले महाबळेश्वर, माथेरान, खंडाळा, भीमाशंकर, येथे आढळतात. कोकणात, सातपुड्यात आणि चांदा जिल्ह्यात पानझडी वृक्षांची जंगले आहेत. ह्या जंगलामध्ये बांबू, साग, हिरडा, मोह, पळस, कवठ वगैरे वृक्ष होतात. पर्जन्य छायेत येणाऱ्या महाराष्ट्राच्या पूवकडील भागात काटेरी व खुरट्या झुडुपांची जंगले व गवताळ माळराने असतात. यात बाभूळ, निवडुंग, हेंकळ, हिवर, खैर, बोर वगैरे झुडपे सामान्यपणे कुठेही पाहावयास मिळतात. तसेच कुसळ निसळ, तांबट, गोंडवळ आणि भातडी या प्रकारची गवते आढळतात.

समुद्रकाठच्या दलदलीच्या भागांत कांदळ, तिवर, मारांडी, चिपी वगैरे वनस्पती उगवतात. गेली ३ हजार वर्षे मानवाने जंगले तोडीत आणल्यामुळे आज महाराष्ट्राचा बराचसा भाग अगदी उजाड वाटतो. ह्या मानवी आक्रमणामुळे वनसंपत्ती तर कमी झाली आहेच पण वन्यपशू पण बरेचसे कमी झाले आहेत. तरस, चित्ता, गवा, रानम्हैस, सांबर, हरीण आणि वाघ असे काही थोड्या प्रकारचे वन्यपशू काय ते या जंगलातून आढळतात.

## महाराष्ट्रातील भूरचनात्मक बदल

(चाळीस पन्नास हजार वर्षांत) महाराष्ट्रांत आढळणारी पठारे, जांभ्याचे खडक, जुने Pleistocene आणि Holocene काळातले नदीकाठी आढळणारे गाळांचे थर, कोकणच्या किनाऱ्यावर आढळणारे, समुद्र गाळापासून, तयार झालेले थर, काळी माती आणि नद्यांच्या खोऱ्यांत सापडणारे काही वैशिष्ट्यपूर्व भूप्रकार, ह्यावरूनच आपल्याला गेल्या ४०–५० हजार वर्षांत झालेल्या भूरचनेतील बदलाविषयी माहिती मिळते. साधारणपणे भूरचनेतील बदल हे भूगर्भात होणाऱ्या हालचालीमुळे, हवामानात होणाऱ्या फरकामुळे अथवा समुद्रपातळीत होणाऱ्या वरखाली हालचालीमुळे होत असतात.

१९६७ सालापर्यंत, महाराष्ट्राचा बराचसा भाग हा भूविवर्तनीयदृष्ट्या स्थिर असावा अशीच बहुतेक शास्त्रज्ञांची समजूत होती. पण ११ डिसेंबर १९६७ मध्ये झालेल्या कोयना भूकंपाने ह्या समजूतीस बराच धक्का बसला. कोयना धरणांत साठवलेल्या पाण्यामुळे हा भूकंप झाला असावा असे अजूनही काही विद्वानांचे मत आहे. परंतु महाराष्ट्रात १६ व्या, १७ व्या शतकापासून भूकंप होत होते असे ऐतिहासिक पुराव्यावरून सांगता येते. कोकणच्या किनाऱ्यावर डहाणूपासून रत्नागिरीपर्यंत आणि सातपुड्याच्या पायथ्याशी उष्ण पाण्याचे झरे मिळतात. हे झरे पृथ्वीच्या कवचातील कमकुवतपणा दाखवतात. तापीच्या खोऱ्यात काही ठिकाणी Pleistocene आणि Holocene काळातील गाळांचे थर कललेले आहेत आणि त्यांना सौम्य वळ्याही पडल्या आहेत. आज दिसणारी सर्व

नद्यांची पुनरुज्जीवित पात्रे आणि मुंबईजवळ जमिनीच्या पोटाखाली १५ मी. असलेली जंगले असे दर्शवितात की महाराष्ट्राची भूमिही पूर्णतया स्थिर नसावी. सौम्य प्रमाणात का होईना अस्थिरता असावी. अर्थात अजून भूशास्त्र दृष्टिकोनातून महाराष्ट्राचा बराचसा अभ्यास व्हावयाचा आहे व त्यामुळे निश्चित मत प्रदर्शित करणे कठीण आहे. महाराष्ट्रातल्या भूमीच्या भूस्तररचनिक स्थिरपणाबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नसल्या-मुळे महाराष्ट्रात जे भू-रचनात्मक प्रकार दिसतात त्यांच्या उत्पत्तीबद्दल ठामपणे सांगता येत नाही. तरी पण खाली दिलेल्या पुराव्यावरून महाराष्ट्रातील हवामानात झालेल्या बदलांची सर्वसाधारण कल्पना येते.

महाराष्ट्रात आज जे हवामान दिसते त्याचा यापूर्वी विचार केला आहेच. महाराष्ट्रात मुख्यतः पावसाच्या प्रमाणात पश्चिमेकडून पूर्वेकडे फरक पडतो. पश्चिम घाट मोसमी वाऱ्यांना आडवतात, त्यामुळे कोकण, सह्याद्रीचा घाटमाथा, आणि सह्याद्रीच्या जवळचा पूर्वेकडील भाग यांत खूपच पाऊस पडतो व महाराष्ट्राच्या पूर्वेकडील पर्जन्य छायेत येणाऱ्या भागांत पावसाचे प्रमाण अगदीच कमी होते. महाराष्ट्रात वार्षिक सरासरी तपमानात फारसा फरक पडत नाही. हेही याआधी सांगितलेच आहे. तेव्हा महाराष्ट्रात पूर्वी झालेला हवामानातील फरक हा मुख्यत्वेकरून पर्जन्यमानाच्या प्रमाणात पडलेल्या फरकावरून समजून येईल. पावसाच्या प्रमाणात झालेला हा बदल त्यावेळचा वनस्पती, प्राणी आणि भूरचनात्मक वैशिष्ट्ये ( features ) यांच्या अभ्यासावरून कळतो.

## भूरचनात्मक वैशिष्ट्य

महाराष्ट्रातील पठारे— आपण मागे पाहिलेच आहे की ही पठारे एका विशिष्ट उंचीवर दिसतात महाबळेश्वरचे १४०० मी. उंचीचे पठारावर त्यानंतर भीमाशंकरचे ११०० मीटर उंचीचे पठार. महाराष्ट्रातील काही भागांत ( विशेषतः सातारा जिल्ह्यात ह्या पठारावर जांभ्याचा खडकच सापडतो. त्यानंतर ८०० मी. वर आढळणारे सासवडचे अगर अहमदनगरचे पठार. ह्या पठारावर जांभ्याचा खडक कुठेच सापडत नाही. ७०० आणि ६०० मी. उंच आढळणाऱ्या पठारावर बहुतेक ठिकाणी काळी माती आढळते. ही सर्व पठारे असे दर्शवितात की महाराष्ट्राच्या सह्याद्रीच्या पूर्वेकडील भागात गेल्या ३०–४० दशलक्ष वर्षांत हवामानात आणि भूपृष्ठांत बरेच फरक झाले असावेत. महाबळेश्वर आणि भीमाशंकरचे पठारावरील जांभ्याचा खडक असे दर्शवितो की हा खडक तयार होण्याच्या काळी या भागात अगदी सपाट असे पठार असावे. ह्या पठारावर वाहणाऱ्या नद्या अगदी उथळ असाव्यात. दोन नद्यांमधील जलविभाजक अगदी कमी उंचीचे असावेत आणि या पठारावर कुठेतरी मधूनच तुरळक छोट्या टेकड्या असाव्यात.

आज जसा महाबळेश्वर, भीमाशंकर यांच्या परिसरात पाऊस पडतो तसा पाऊस त्या काळी असावा त्यानंतर हवामानात बदल झाला अगर भूपृष्ठात हालचाल झाली आणि पश्चिमघाट किंवा सह्याद्री पर्वत अस्तित्वात आला. घाटाच्या पश्चिमेकडे ३०–४० लाख

वर्षापूर्वी मोठा विभंग झाला. कोकणच्या बाजूचा भूपृष्ठाचा भाग खचला अगर पूर्वेकडील देशाचा भाग उचलला गेला याच कालांत आज दिसणारी पश्चिम किनाऱ्याची पट्टी, उत्तर-दक्षिण जाणारी सह्याद्रीची रांग व सह्याद्रीच्या पश्चिम बाजूकडे दिसणारा प्रचंड कडा व पूर्वेकडे किंचितसे कललेले देशाचे पठार ही सगळी अस्तित्वात आली असावीत. त्यानंतरच्या काळात पूर्वेकडे वाहणाऱ्या नद्या आणि पश्चिमवाहिनी नद्या आज दिसतात त्या स्वरूपात स्थूलमानाने अस्तित्वात आल्या असाव्यात. पूर्वीच्या संथ आणि जवळजवळ सपाट दरीतून वाहणाऱ्या नद्या आता एकदम जोराने वाहून आपली दरी खाली खाली खणू लागल्या. एकूण सगळीकडे पूर्वीचे पठाराचे स्वरूप कमी होऊन त्याऐवजी खोल दऱ्या आणि डोंगर असे स्वरूप निर्माण झाले असावे. नद्यांचे खनन (खाली आणि बाजूला) आणि त्याचबरोबर डोंगराच्या उतारावर आणि माथ्यावर पाऊस, ऊन यामुळे होणारी झीज हजारो वर्षे चालू राहिली असेल. हळूहळू भूपृष्ठाच्या होणाऱ्या झिजेमुळे भूपृष्ठाचा उंचसखलपणा कमी होऊन भूपृष्ठाला परत पठाराचे स्वरूप प्राप्त झाले असावे. अर्थात् हे पठार पूर्वीच्या पठारापेक्षा कमी उंचीवर तयार झाले असावे. नद्या परत विस्तीर्ण पात्रांत वाहू लागल्या असाव्यात. जलविभाजकांची उंची अगदी कमी झाली असावी आणि काही ठिकाणी विस्तीर्ण पठारावर एखादीच छोटीशी टेकडी शिल्लक राहिलेली दिसत असावी. परत भूपृष्ठात हालचाल आणि हवामानात बदल झाला असावा व नद्यांची पात्रे पुनरुज्जीवित होऊन भूपृष्ठात सगळीकडे उंचसखलपणा वाढला असावा. अशा हजारो वर्षांच्या प्रक्रियेनंतर पूर्वीच्यापेक्षा कमी उंचीवर परत पठार निर्माण झाले असावे. अशा रीतीने महाराष्ट्रात आढळणारी विविध उंचीवरची पठारे निर्माण झाली असावीत. महाबळेश्वरचे पठार ( १३०० मी. उंच ) सर्वात जुने तर इंद्रायणीच्या उगमाजवळ आढळणारे पठार ( ६०० मी. ) हे त्यामानाने अगदी अलीकडचे आहे. साधारणपणे ही पठारे Eoceneoligocene ( म्हणजे ४०–४५ दशलक्ष वर्षे ) ते Early Pleistocene ( म्ह० १५ ते २० लक्ष वर्षे ) काळात तयार झाली असावीत. कोकणात आढळणारी पठारे ( ३०० मि. आणि २०० मी. ) Miocene ( ३० दशलक्ष ) ते Early Pleistocene ह्या काळात तयार झाली असावीत. ह्या पठारावर त्या काळात तयार झालेले गाळांचे थर, माती वगैरे काहीच मिळत नसल्यामुळे त्या पठारांच्या निर्मितीचा काळ निश्चितपणे सांगता येत नाही. परत हवामानातील बदलांचे अगर भूहालचालीच्या स्वरूपाची माहिती पण बरीच मिळवावी लागेल. त्या दृष्टीने सध्या संशोधन सुरू झाले आहे व पुढील काही वर्षांत आपल्याला बरीच माहिती उपलब्ध होईल आणि मग पठारनिर्मितीचा इतिहास जास्त ठाम सिद्धांतावर मांडता येईल.

ही पठारे मुख्यत्वेकरून Pleistocene काळाच्या आधीची असल्यामुळे त्या काळात झालेल्या भूरचनेतील बदलांचा मानवी जीवनाशी विशेष संबंध येत नाही. परंतु आज नदीकाठी किंवा नद्यांच्या खोऱ्यांत दिसणारी दोन अगर तीन मंचके – वेदिका

आणि त्यांच्याशी संलग्न असलेले निरनिराळे गाळांचे थर असे दर्शवितात की महाराष्ट्रातील बहुतेक नद्या सुमारे दोन तीन लाख वर्षांपूर्वी आपली स्वतःची पात्रे खाली खणत होत्या आणि त्यावेळेस त्यानी आजच्या पात्राच्या २ ते ३ मी. पासून १२ मी. खोलपर्यंत आपले पात्र खणले होते. काही नद्यांची पात्रे आजच्यापेक्षा सुमारे १ कि. मी. दूर होती. नंतर ह्या सगळ्या नद्या आपले पात्र स्वतःच आणलेल्या गाळानी भरू लागल्या. सुरुवातीला गोट्यांनी पात्र भरले पण जसजशी पात्राची उंची वाढू लागली तसतसे या नद्या त्याच ठिकाणी बारीक वाळू आणि गाळाची माती टाकू लागल्या. या पात्र भरण्याच्या काळांत नद्यांच्या पात्रांत वारंवार बदल होत होते आणि शेवटी ह्या नद्यांनी १–१॥ कि. मी. रुंद (एकेका तीरावर) आणि आजच्या पात्रापेक्षा १२ ते २० मी. उंच अशी आपली पात्रे तयार केली. वर उल्लेख केलेल्याप्रमाणे ही पात्र भरण्याची क्रिया किमान ४०–५० हजार वर्षे तरी चालू होती. अर्थात ही क्रिया खंडीत होती. काही ठिकाणी (उदाहरणार्थ धुळे जिल्ह्यात तापीच्या खोऱ्यात) गाळांच्या थरामध्ये पूर्वी तयार झालेल्या पण आता गाळांच्या थराखाली दबल्या गेलेल्या जमिनीचे fossil soils अगर "मृदाश्माचे अवशेष" मिळतात. ज्या वेळेस नद्यांचे पात्र बदलते त्या वेळेस आधी टाकलेल्या गाळाचे थरावर ऊन, पाऊस, वनस्पती यांच्या कायिक आणि रासायनिक प्रक्रिया होऊन मृदा तयार होते. त्यामुळे ज्या वेळेस पूर्वीच्या गाळांच्या थरामध्ये जेव्हा 'मृदाश्माचे अवशेष' मिळतात, तेव्हा नदीच्या पात्र भरण्याच्या क्रियेतील खंड दर्शविला जातो.

ह्या ४०–५० हजार वर्षांपूर्वी तयार झालेल्या गाळांच्या थरांच्या अभ्यासावरून असे निश्चितपणे सांगता येते की त्या काळी महाराष्ट्रात आजच्यापेक्षा २५ ते ३५ टक्के पाऊस जास्त होता. हल्लीचा पर्जन्यछायेत येणारा भाग त्या वेळेस आजच्यापेक्षा थोड्याशा जास्त पावसामुळे वनसंपन्न होता. अर्थात काटेरी आणि खुरट्या झुडुपांचेच मुख्यत्वेकरून जंगल होते. त्या वेळच्या वनस्पतींचे जे जीवाश्म नेवासा, मुळानगर आणि इनामगाव इथे मिळाले आहेत त्यात मुख्यत्वेकरून काटेरी आणि खुरट्या वनस्पतींचाच समावेश आहे. ह्याच भागात मिळालेल्या हत्तीच्या जीवाश्मावरून असे वाटते की या भागात खूप मोठ्या प्रमाणावर गवत उगवत असावे. थोडया फार वाढलेल्या पावसाचा परिणाम महाराष्ट्राच्या पश्चिम-उत्तर, आणि ईशान्य भागावर विशेष झालेला दिसत नाही कारण त्या भागातील जुन्या गाळांचे गुणधर्म आज तयार होणाऱ्या गाळांच्या गुणधर्मासारखेच आहेत. थोडक्यात गेल्या ४० हजार वर्षांत हवामानात जे काही (विशेषतः हल्लीच्या शुष्क अगर कमी पावसाच्या प्रदेशात) बदल झाले आहेत, त्यावरून असे अनुमान काढता येते की ४०–५० हजार वर्षांपूर्वीसुद्धा महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील आणि उत्तरेकडील भागात आजच्यासारखाच जास्त पाऊस होता व पूर्वेकडील भागात आजच्यासारखाच कमी पाऊस होता. युरोप-अमेरिकेत किंवा हिमालयात, राजस्थान, उत्तर गुजरात इकडे जसे हवामानातील बदल अगदी स्पष्ट होते तसे मात्र या

भागात झालेले आढळत नाही. महाराष्ट्रात जी काळी माती सगळीकडे आढळते ती साधारणपणे ताम्रपाषाणयुगाच्या आधी आणि Pleistocene काळानंतर तयार झाली असावी. गुजरातमध्ये नुकत्याच केलेल्या संशोधनावरून ही माती साधारणपणे ७००० वर्षांपूर्वी तयार झाली असावी. पण हे मध्यंतर इतके मोठे आहे की त्यावरून व्याख्या करणे चुकीचे वाटते. कारण त्या वेळेस महाराष्ट्रात आजच्यापेक्षा थोडासा जास्त पाऊस व बरेचसे दाट जंगल असावे. ताम्रपाषाणयुगानंतर मात्र माणसाने शेती आणि आणि लाकूडतोड सुरू केल्यामुळे हळूहळू कृत्रिम शुष्कपणा निर्माण झाला आहे. हवामानातील झालेल्या बदलाबद्दल असे ठोकळमानाने एवढेच सांगता येते.

कोकणातील नुकत्याच झालेल्या संशोधनावरून असे आढळून आले आहे की कोकण किनाऱ्यावर समुद्रपातळीत गेल्या ५ हजार वर्षांत बराच बदल झाला आहे. मुंबईजवळ समुद्रात तयार होणारे शिंपला– वाळूचे खडक आजच्या समुद्रपातळीपासून ३ मी. उंचीवर आढळतात. हेच खडक अलिबागजवळ चौल गावात आजच्या किनारपट्टीपासून ३ कि. मी. पूर्वेकडे आणि किंचितसे आजच्या समुद्रपातळीच्या खाली आढळतात. मुरुडला ते जवळजवळ समुद्रपातळीवर आढळतात तर रत्नागिरीला समुद्रपातळीपासून ५ ते ६ मीटर उंचीवर आढळतात. मुंबईजवळ सापडलेल्या शिंपला– वाळूच्याखडकांचे कार्बन १४ ह्या कालमापन पद्धतीने काढलेले वय सुमारे ५ हजार वर्षे येते. समुद्रपातळीतील बदलांचा पश्चिमवाहिनी नद्यांच्या पात्रावर पण परिणाम झालेला आढळतो. समुद्रपातळी वर गेल्यावर ह्या नद्या गाळांनी भरून जात तर पातळी खाली गेल्यावर ह्याच नद्या आपले पात्र खनन करू लागत. ह्या क्रियेमुळे या नद्यांच्या काठी ३ ते ५ मी. उंचीवर मंचे तयार झाली आहेत. दापोलीजवळ ८ व्या ९ व्या शतकातील बौद्ध गुंफा आहेत. त्या आज नदीच्या पात्रापासून ५-६ मी. उंचीवर आहेत. एके काळी ( म्हणजे ८ व्या ९ व्या शतकानंतर ) ह्या गुंफा जवळजवळ पूर्णपणे नदीच्या गाळाने भरल्या गेल्या ( आहेत ). आज नदीच्या पुराचे पाणी क्वचितच या गुंफापर्यंत पोचते. त्याचप्रमाणे नालासोपारा, कल्याण, अलिबागजवळील चौल ही सुमारे १ हजार वर्षांपूर्वी प्रसिद्ध बंदरे होती. आज मात्र या ठिकाणापासून समुद्र दूर हटला आहे.

भूपृष्ठातील हालचाली, हवामानातील आणि समुद्रपातळीतील बदल असे दर्शवितात की आपल्याभोवती दिसणारी सृष्टी सतत बदलत असते. मानवी मनाला ह्या सचेतन सृष्टीत होणारे बदल नेहमीच जाणवतातच असे नाही. पण मानवी जीवनावर मात्र ह्या बदलांच्या प्रक्रिया निश्चितपणे होत असतात. मानव ह्या बदलत्या सृष्टीशी कधी जुळते घेतो तर कधी त्याविरुद्ध बंड करून उठतो. सभोवतालच्या सृष्टीचा परिणाम होऊन त्या दोघांच्या संकरातून मानवी संस्कृती निर्माण होते. महाराष्ट्रात मानवी जीवनावर महाराष्ट्राच्या भौगोलिक बदलांचा गेल्या ४०-५० हजार वर्षांत कसा परिणाम झाला ते आपण पुढील प्रकरणात पाहू.

◻ ◻

# प्रागैतिहासिक महाराष्ट्र

ह. धी. सांकलिया

महाराष्ट्रातील आद्य मानव हा खरोखरच किती प्राचीन होता, या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी प्रथम आपल्याला महाराष्ट्राची प्राचीनता पाहावी लागते. याचे भूशास्त्रीय विवेचन मागे आलेच आहे. या भागाला गेल्या पंधराशे वर्षांपासून महाराष्ट्र म्हणून संबोधले जाते. आता त्याच्याही पाठीमागे गेल्यास अगदी प्राचीन कालखंडात मानवाची या भागांत वस्ती नव्हती असे काही विद्वान भूशास्त्रज्ञ व पुरातत्त्व-शास्त्रज्ञ यांचे मत आहे. त्यासाठी त्यांनी जी कारणे दाखवली आहेत, ती म्हणजे महा-राष्ट्राचे हे दक्षिणेकडील पठार अगदी प्राचीन काळी गर्द झाडींनी व्यापलेले एक निबिड अरण्य होते. आणि दुसरे कारण म्हणजे आद्य मानवाला दगडी हत्यारे बनवण्यासाठी लागणारा गारगोटीच्या प्रकारातील दगड होय. हा दगड सहजतेने उपलब्ध होणारा नव्हता. या दगडाचे अगदी सहज व सफाईदार रीतीने हत्यार बनवता येते. जगाच्या अन्य भागांत प्राप्त झालेली जी हत्यारे आहेत ती या प्रकारच्या दगडापासूनच चांगल्या प्रकारे बनवलेली आहेत. या जातीचा दगड महाराष्ट्राच्या दक्षिणेला कर्नाटकात आणि उत्तरेला गुजरात भागात मिळत असल्यामुळे आद्य मानवाच्या वसाहतीचे धागेदोरे तेथे प्राप्त होतात आणि त्या दृष्टीने विचार करता महाराष्ट्रापेक्षा तेथील मानवाचा काळ हा एक लाख वर्षे मागे जातो. त्यामुळेच प्राचीन अश्मयुगीन भारताच्या नकाशावर महा-राष्ट्राचा भाग रिकामा असलेला दिसून येतो.

महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती पाहता त्याच्या उत्तरेकडील भाग गुजरातशी व दक्षिणेकडील भाग कर्नाटक, म्हैसूर या दक्षिण प्रदेशाशी निगडीत असल्याचे दिसून येते. ज्ञात इतिहास-कालापासून म्हणजे गेल्या तेवीसशे वर्षांपासून दक्षिणेकडील लोकांचे उत्तरेकडे व उत्तरेकडील लोकांचे दक्षिणेकडे सारखे जाणे-येणे आणि स्थलांतर होत असून संस्कृतीची पण त्यांच्याबरोबर देवाणघेवाण सारखी चालू होती. या वेळी महाराष्ट्राचा भूभाग हा त्यांच्या जाण्या-येण्याचा एक मार्ग बनला होता आणि या कारणाने हा एवढा मोठा पसरलेला भूभागाचा पट्टा उत्तरेला पार इंदूरपासून ते दक्षिणेला धारवाडपर्यंत आणि

पूर्वेला चंद्रपूरपासून ते पश्चिमेला अरबी समुद्रापर्यंत मानवी वस्तीविरहित असा कित्येक काळपर्यंत राहिला होता, अशी जी समजूत झाली होती ती हास्यास्पद होती.

## दण्डकारण्य (?)

महाराष्ट्राला पुराणकाळात दण्डकारण्याचा एक भाग म्हणून संबोधत होते. तेव्हाच्या या दण्डकारण्यात मानवी वस्तीचा विश्वास ठेवण्याजोगा पुरावा द्यावयाचा म्हणजे तेथे राम, लक्ष्मण आणि सीता हे चौदा वर्षे बनवासासाठी या दण्डकारण्यात काही काळ येऊन राहिलेले होते. यात राक्षस राहत असल्याचा उल्लेख रामायणात आलेला आहे. आर्यमुनी अगस्ती ऋषी यांनी या दक्षिणेतील दण्डकारण्यात सर्वप्रथम येऊन आपला आश्रम प्रस्थापित केल्याचा पण उल्लेख आहे. अशा प्रकारे त्यांच्या आगमनामुळे नर्मदा, तापी, गोदावरी, प्रवरा, कृष्णा, वगैरे नद्या, तसेच पर्वत–शिखरे व पठारे इत्यादींना धार्मिक नावे व महत्त्व प्राप्त झाले. यावरून असे दिसून येते की, या भू–भागातील दऱ्याखोऱ्यांत अगदी प्राचीन काळीही मानवाची वस्ती होती. परंतु या विश्वासार्ह पुराव्याला कोणताही विद्वान सत्य मानायला अथवा तो असत्य आहे हे सिद्ध करायला पुढे सरसावत नाही.

गेली तीस वर्षे त्यासंबंधी संशोधनकार्य चालू आहे आणि त्यांतूनच आद्य अश्म-युगात मानवाचे हिंदुस्थानात तसेच महाराष्ट्रात आगमन झाल्याचे सिद्ध झाले आहे. दक्षिण गुजरातमधून वाहणाऱ्या कर्जन नदीच्या काठावर बसलेल्या राजपिपला या गावाजवळ अगदी सर्वात प्रथम अशा आद्य अश्मयुगीन हत्यारांचा शोध लागला आणि ही आद्य अश्मयुगीन हत्यारे गारगोटीच्या प्रकारांतील दगडापासून बनविलेली नसून ती बेसाल्ट नावाच्या दगडापासून बनविलेली होती. महाराष्ट्रात याच प्रकारचा दगड चोहोकडे दिसून येतो.

## पहिला शोध

आम्ही गोदावरी नदीच्या काठी नाशिक जिल्ह्यात नांदूर मध्यमेश्वर येथे पद्धतशीर संशोधनाला सुरुवात केली. तेथेच १९१६ साली प्राचीन काळच्या रानटी हत्तीची व पाणघोड्याची अश्मीभूत हाडे मिळालेली होती. तसेच पैठणच्या समोरील तीरावर मुंगी या गावी चालसिडोनीचे (गारगोटीचे) दगडी हत्यार पण मिळाले होते. यामुळे मानवाच्या आतापर्यंतच्या अनिश्चित मार्गाचा शोध लागण्यास मदत झाली. हे हत्यार प्राचीन मानवाच्या वसाहतीचे मार्गदर्शन करणारे हत्यार ठरले.

भारतात अन्यत्र प्राप्त झालेल्या हत्यारापेक्षा ते अगदी भिन्न स्वरूपाचे होते. त्यामुळे या हत्यारावरून आद्य मानवाशी संबंध जोडला जात नव्हता. प्राचीन अश्म-

युगीन हत्यारावर नवीन प्रकाशझोत टाकणारा खराखुरा पुरावा आम्हाला अचानकपणे नाशिकजवळील गंगापूर येथे लागला. गोदावरी नदीवर मातीच्या धरणाचे प्रचंड बांधकाम सुरू होणार होते. त्याच्या पायासाठी मैलभर लांबीचा खंदक खणलेला होता. पस्तीस फूट खोलीच्या तळभागातून ज्या गोष्टी बाहेर आल्या, त्यांतूनच ही अश्मयुगीन हत्यारे बाहेर आली. त्या हत्यारांचे साम्य गुजरात, म्हैसूर, मद्रास आणि आफ्रिका येथे मिळालेल्या अश्मयुगीन हत्यारांशी होते.

## महाराष्ट्रातील आद्य मानवाचे अस्तित्व

भूस्तराचा आणि त्याच्या विविध अंगांचा अतिशय उत्तम प्रकारचा पुरावा ५ग वरील ठिकाणी ( गंगापूर येथे ) आम्हांला मिळाला. आद्य अश्मयुगातील मानवाचे वास्तव्य दर्शवणारा तो पुरावा होता. अशाच प्रकारचा पुरावा देणारा दुसरा शोध नेवासे येथे लागला आणि त्यानंतर हळूहळू महाराष्ट्रातील अन्य जिल्ह्यांतूनही असे पुरावे हाती येऊ लागले. कोकणपट्टीतील कुलाबा व रत्नागिरी हे भाग सोडता बाकी बहुतेक सर्व महाराष्ट्रभर आदी अश्मयुगीन मानवाच्या अस्तित्वाच्या खाणाखुणा दर्शविणारी ठिकाणे आणि त्यावरून त्याच्या वसाहतीचा परिसर उजेडात आलेला आहे. परंतु हा अश्म-युगीन मानव कसा असावा हे मात्र अद्यापि उजेडात आले नाही. कारण आतापर्यंत त्याचा एकही सांगाडा कोठेही सापडलेला नाही.

## आदी अश्मयुगीन मानवाचा परिसर

भूस्तर रचना, तसेच हत्यारांचे प्रकार, तत्कालीन जंगली जनावरे ( उदा. जंगली बैल, सरळसोट लांब दात असलेले रानटी हत्ती, पाणघोडे, गवे वगैरे ) या अवशेषां-वरून आदी अश्मयुगीन मानव हा किमानपक्षी एक ते दीड लाख वर्षांपूर्वी महा-राष्ट्राच्या परिसरात वावरत असला पाहिजे असे दिसते. भूगर्भशास्त्राच्या व्याख्येप्रमाणे असे म्हणता येईल की, हा काळ म्हणजे अन्तिम चतुर्थक किंवा मध्य प्लास्टोसिन काळ असावा. या कालखंडात महाराष्ट्र धरून भारतात चोहोकडे पावसाचे प्रमाण हे सध्यापेक्षा अधिक होते आणि हवामानही दमट होते. तसेच नद्यांची पात्रेसुद्धा बरीचशी विशाल झालेली होती. नद्यांची ही पात्रे दगडगोट्यांनी आणि गाळांनी, विशेषतः उगम-स्थानाकडे जसजसे जावे तसतशी जास्त जास्त भरून आलेली दिसून येत होती. त्याचे स्पष्ट चित्र प्रवरा नदीच्या उगमस्थानाकडील भागांतील अकोला येथे, तसेच मुळा–मुठेच्या काठी पुण्याजवळ, कृष्णानदीच्या काठी वाईला, काण नदीच्या काठी भाडणे येथे ( धुळे जिल्ह्यात ), आणि वर्धा नदीवरील चंद्रपूर अशा विविध ठिकाणी दिसून येते.

## भूगर्भातील लाव्हा रसामुळे निर्माण झालेल्या भित्ती ( Dykes ) चे महत्त्व

भूगर्भातील लाव्हा रसामुळे भूपृष्ठावर ज्या भित्ती निर्माण झालेल्या आहेत त्या

आदिमानवाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्या काळात उत्तम आणि नियमित पाऊस आणि वनविच्छेदनाचे अत्यल्प प्रमाण त्यामुळे यात घनदाट अरण्य माजले होते आणि त्यामुळे वर उल्लेखलेली जंगली श्वापदे यात अगदी मुक्त संचार करीत होती यांचे निश्चित पुरावे पुण्याला तसेच नांदुर मधमेश्वर येथे पाहता आले. त्यामुळे असे गृहीत धरता येते की, आदि-अश्मयुगीन मानव हा एवढ्या मोठ्या परिसरात निश्चितपणे वावरत असावा. त्यांच्या जीवनासाठी त्याला पाणी, कंदमुळे आणि शिकार करण्यासाठी दगडी हत्यारांची नितांत जरूरी होती. पाण्याला काही कमी नव्हते. परंतु हत्यारे बनवण्यासाठी आज जसा आपणाला कच्चा माल लागतो, तसा त्याला त्याच्या हत्याराला योग्य अशा दगडांची आवश्यकता होती. तोडणे, कापणे, छिद्रे पाडणे, भोसकणे, कुटणे, वाटणे, छिलके काढणे, इत्यादींसाठी आयुधे व हत्यारे ही त्याच्या जीवनाची महत्त्वाची गरज होती.

भूशास्त्राच्या दृष्टीने उत्तरेकडील इंदूरपासून खाली कर्नाटकपर्यंतच्या ह्या महाराष्ट्राच्या भूमीवर ट्रॅप ( बेसाल्ट ) ह्या दगडाने व्यापलेला दिसून येतो, हे वर पाहिलेच आहे. हत्यारे बनवण्यासाठी हा दगड म्हणावा तेवढा योग्य नाही. त्यातील दगडाला सहजतेने हत्याराचा आकार देणे अथवा सफाईदार रीतीने याचे छिलके काढून पाती बनवणे अवघड गोष्ट होती. सफाईदार, मजबूत आणि उपयुक्त अशा प्रकारची हत्यारे क्वार्टझाईट किंवा चर्टमध्येच बनवता येतात. परंतु तो दगड सहजपणे सापडणे शक्य नसल्याने त्या वेळच्या मानवाने दगडाची उणीव कमी-अधिक प्रमाणात प्राप्त होणाऱ्या याच भागातील ( ट्रॅपमधीलच ) या दुसऱ्या एका दगडाने भरून काढली. हा दुसरा दगड म्हणजे ट्रॅप-डाईक हा होय. पारिभाषिक शब्दात त्याला कार म्हणतात. याचे वर्णन वर आलेच आहे.

ह्या ‘ कारीमधून ’ जे दगड घेतले, त्या बाबतीत पण त्याने आपली हुशारी दाखवली. हा दगड हा इतर दगडापेक्षा अधिक उपयुक्त आहे हे त्याला समजले यातच याच्या बुद्धीची चुणूक दिसून येते. त्यातूनही दगड चपटे, सपाट, अणकुचीदार, लांबट असे हत्यारे बनवण्यास सुलभ व सोयीचे असतील, असेच दगड त्याने निवडले. केवळ जुजबी ठाकठोक करून अशा दगडगोट्यांपासून हत्यारे बनवली. तसेच मोठ्या दगडापासून निघालेल्या चिपांची पण त्याने हत्यारे बनवली.

अशा प्रकारे नैसर्गिकरीत्या उपयुक्त असलेल्या ह्या साधनसंपत्तीचा म्हणजे कारीच्या शोध घेण्यासाठी त्यांना मैलोगणती वणवण पण भटकावे लागले असणार. अशी जी काही ठिकाणे आतापर्यंत उजेडात आलीत त्यापैकी महत्त्वाची ठिकाणे म्हणजे नाशिकजवळचे गंगापूर, प्रवरा नदीकाठचे नेवासे, खानदेशातील भाडणे. डांगच्या जंगलातही अशी काही ठिकाणे आहेत. अश्मयुगीन मानवाच्या वास्तव्याचा महत्त्वपूर्ण पुरावा पुण्याजवळ उजेडात आलेला आहे. मुळा–मुठा नदीच्या काठी डेक्कन कॉलेजच्या परिसरात हा सापडला



आकृती १ : आद्य अश्मयुगीन हत्यारे

आहे. नदीच्या पुरामुळे महत्त्वाचा भाग आता पार धुऊन गेला आहे. परंतु मानवी अस्तित्वाच्या निशाण्या अजूनही दिसून येतात. त्याचा वाहून गेलेला काही भाग बंडगार्डनच्या वॉटर पंपिंग स्टेशनच्या खालच्या बाजूला दिसून येतो.

आद्य अश्मयुगीन मानवाची हत्यारे व साधने याची संगती ही याप्रमाणे लावता येते. ( आकृती १ )

( अ ) आकाराने रुंद पण एका बाजूला धार असलेले हत्यार. ही हत्यारे मोठ्या दगडापासून काढलेल्या चिपापासून बनवलेली असतात. ही हत्यारे सध्याच्या आपल्या लोखंडी कुऱ्हाडीशी बरीचशी मिळतीजुळती असतात. ह्या हत्याराचा धारदार बाजूचा आकार व हत्यार हातात धरण्याचा भाग विचारात घेऊन त्याला क्लीव्हर असे तांत्रिक नाव दिले आहे. या हत्याराचा वापर विशेषतः जनावराच्या मांसाचे तुकडे करण्यासाठी आणि वेळप्रसंगी झाडे तोडण्यासाठी पण करीत असावेत.

( ब ) ही हत्यारे दोन प्रकारची आहेत. ही आकाराने साधारणतः लांबट असून एक बाजू टोकदार तर दुसरी बाजू रुंद होत गेलेली असते. आलेख काढला असता ती लंबवर्तुळाकार किंवा लंबत्रिकोणाकृती आकारात दिसतात. मध्यभागी जाड असून दोन्ही कडांच्या बाजूंना धार देण्यासाठी छिलके काढलेले असतात. त्यांना हातकुऱ्हाड ( Hand-axe ) म्हटले जाते. त्याचा उपयोग अजस्र जनावराचे शरीर फाडणे, मांसाचे तुकडे करणे तसेच जमीन खणणे या कामांसाठी याचा वापर करत असावेत. तसेच लाकूड तोडण्यासाठी वापर होत असावा.

( क ) ही हत्यारे गोलाकार किंवा लंबवर्तुळाकार असतात. ही भिंतीमध्येच नैसर्गिकरीत्या चपट्या किंवा सपाट दगडगोट्यापासून तयार केलेली असावीत. त्यांच्या कडा अर्धवर्तुळाकार दिसून येतात. त्यांना चॉपर असे म्हणतात. त्यांचा उपयोग सुऱ्याप्रमाणे मांसाचे लहान लहान तुकडे करणे, तसेच हाडे तोडण्यासाठी झाडावर चढताना सुलभ व्हावे म्हणून त्याला खाचा पाडण्यासाठी पण उपयोग करत असावेत.

( ड ) हे एक त्रिकोणाकृती हत्यार असून त्याची एक बाजू धारदार व पातळ असून दुसरी बाजू जाड आहे आणि वापरताना सुलभता लाभावी अशी तिच्या मुठीची रचना आहे.

## दगडी हातकुऱ्हाड

क्लीव्हर, चॉपर, हातकुऱ्हाड इत्यादी हत्यारे विविध आकारांत बहुतेक सर्व महाराष्ट्रभर मिळतात. या पद्धतीची जास्तीत जास्त हत्यारे नेवासे या एकाच ठिकाणी मिळाली. प्रत्यक्ष ठिकाण नेवाशाहून दीड-दोन मैल पूर्वेला आहे. प्रवरा नदीला चिरकी नावाचा एक ओढा ज्या ठिकाणी मिळतो त्याच्या संगमाजवळ जो बऱ्याच लहानमोठ्या घळीचा निर्जन भाग आहे, तेच हे ठिकाण होय. आद्य मानवाच्या वस्तीची ही जागा असल्याचे खात्रीशीरपणे दिसून आलेले आहे. संगमाजवळील नदीच्या उजव्या तीराकडे

दृष्टी टाकली, तर मध्याचा जो काही खडकाळ उघडा भाग दिसून येतो आणि राहिलेला भाग पुराने आलेल्या वाळूने झाकला गेलला आहे, तेच हे प्राचीन वसाहतीचे ठिकाण होय.

अचानक येणाऱ्या, अनियमित परंतु जोरदार पावसाच्या माऱ्याने राहिलेला भाग वाळूने झाकला गेला आहे आणि पावसामुळे त्याला उथळ अशा घळया निर्माण झाल्या आहेत. या परिस्थितीवरून हलीच्या अर्धशुष्क हवामानाची कल्पना येते. येथे वास्तव्य केलेल्या मानवाची शेकडो अश्मयुगीन हत्यारे त्याच्या अस्तित्वाच्या निशाण्या म्हणून शिल्लक राहिली आहेत. पुराने आलेल्या वाळूच्या थरात ती गाडली गेल्यामुळे ती आत अशीच्या तशी राहिली. टाकसाळीतून नवीन नाणी बाहेर कादावीत, तशी ती जशीच्या तशी बाहेर निघतात. आज हजारो वर्षे लोटली असली तरी त्यांचे नवेपण थोडेसुद्धा कमी झालेले दिसून येत नाही. त्याची टोके किंवा कडाच्या धारा आजही उपयोगात आणता येतील, एवढ्या उत्तम स्थितीत ती आहेत. त्यांच्यावर जो शेवाळी रंग आलेला आहे आणि त्यापैकी काही ठिसूळ झालेली आहेत, त्याचे कारण म्हणजे त्यांना कित्येक वर्षे उन्हापावसात उघड्यावर पडून राहावे लागले आहे हे होय.

या दगडी हत्यारांच्या संग्रहाकडे एखाद्या अडाणी माणसाची जरी दृष्टि गेली तरी त्याला सुद्धा त्यातील सौंदर्य आणि एकसारखेपणाची प्रचीती येऊन त्यालाही ह्या दगडी हत्यारांचे सहज ज्ञान होईल. ही सर्व दगडी हत्यारे कोणत्याही धातूच्या हातोड्याचा किंवा तांबे अथवा लोखंड या धातूंचा वापर न करता बनवलेली आहेत. प्रदीर्घ प्रयत्नाने मानवाने ह्या गोष्टी निर्माण केल्या आणि त्यावर त्याने आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. ही हत्यारे बनवण्यासाठी त्याने हातोड्याप्रमाणे वरवंट्यासारख्या लांब गोलाकार दगडाचा किंवा मजबूत जाडजूड हाडाचा किंवा कठीण आणि जड अशा लाकडाचा वापर केला असावा. ही हत्यारे बनवण्यासाठी जी दगडी साधने त्याने वापरली ती हलक्या प्रतीच्या स्थानिक दगडाची होती. त्यासाठी तांबडा कुरुंद वगैरे प्रकारचा दगड वापरला असणार.

शारीरिक परिश्रमांत व कौशल्यात महाराष्ट्रांतील आदी अश्मयुगीन मानव भारतातील आपल्या कोणत्याही देशबांधवापेक्षा किंवा आफ्रिका आणि युरोप येथील मानवापेक्षा यत्किंचितही कमी नव्हता. एवढेच नव्हे तर महाराष्ट्राच्या भूभागावर एकाच प्रकारच्या (दगडी हत्यारे बनविण्यास अयोग्य प्रकारच्या) बेसॉल्ट आणि ट्रॅप ह्या हलक्या प्रतीच्या दगडामधूनही त्याने तोड काढून परिस्थितीवर मात केली व आपल्या बुद्धिकौशल्याचे दर्शन घडवले.

## महाराष्ट्रातील आणि बाहेरचा मानव

महाराष्ट्रातील आद्य मानवाने हत्यार बनवण्यास अयोग्य असणाऱ्या ट्रॅप किंवा

बेसॉल्ट या दगडामधूनही चांगल्या पद्धतीने उत्कृष्ट प्रकारची हत्यारांची निर्मिती केली. खरोखरीच त्याने दगडाचा देव बनवला. शिकाऱ्याला हत्यार हेच जीवनाचे एकमेव साधन असल्याने तोच त्याचा तो देव म्हटल्यास वावगे होणार नाही.

## आद्य अश्मयुगीन मानवाचा ऱ्हास

एकाएकी या आद्य अश्मयुगीन मानवाला काय झाले याबाबत काहीही सांगता येत नाही. त्यांनी नद्यांची खोरी का सोडली असावीत यासंबंधी केवळ अंदाजच करावा लागतो. कारण नदीच्या काठी भाडणे या ठिकाणी असलेल्या नदीच्या पात्रात दगड-गोट्यांच्या घट्ट झालेल्या प्राचीन थरांत या आद्य अश्मयुगीन मानवाची हत्यारे मिळतात आणि ह्या थरांवर दहा ते पंधरा फूट जाडीचा लाल रंगाचा प्राचीन मातीचा थर आढळून येतो. अशा प्रकारच्या ह्या मातीचा थर पुणे, वाई आणि महाराष्ट्रातील अन्य बऱ्याच ठिकाणी तसेच भारतातील पुष्कळ ठिकाणी दिसून येतो. परंतु प्रत्येक ठिकाणी दगडगोट्यांच्या घट्ट थरांत आद्य अश्मयुगीन हत्यारे मिळत नाहीत. सर्वसाधारणपणे वैश्विक हवामानात व भूरचनेत ज्या वेळी फार मोठे बदल झाल्याचे दिसून येते त्या वेळीच ह्या चमत्कृतिजन्य घटना घडल्या असाव्यात. त्यावेळी झालेल्या हवामानाच्या बदलामुळे भारतातील बहुतेक नद्यांची पात्रे पुराने फुगून विस्तृत होऊन वाढलेली असणार आणि नद्यांच्या काठी जी भिंति अथवा तत्सम प्रकारची हत्यारे बनवण्यास योग्य दगडगोट्यांची ठिकाणे होती, ती गाळाखाली गाडली गेली असणार. ज्या कारी डोंगरमाथ्यावर अथवा पाणवठ्यापासून दूर असतील, त्यांचा मानवाला काहीच उपयोग नव्हता. आणि अशा तऱ्हेने या मानवाचे आणि त्याच्या जीवनाचे मुख्य अंगच नष्ट झाल्याने त्या आद्य अश्मयुगीन मानवाचा तेव्हापासून उत्तरोत्तर ऱ्हास होत गेला असावा असे दिसून येते.

# मध्य अश्मयुगीन मानव

## द्वितीय किंवा मध्य अश्मयुगाचा शोध

त्यानंतरच्या द्वितीय अश्मयुगात मानवाने जी दगडी हत्यारे बनवली त्यांच्यासाठी लागणारे दगड आद्य अश्मयुगीन मानवाने वापरलेल्या दगडांपेक्षा अगदी भिन्न प्रकारचे आहेत आणि हीच आद्य आणि मध्य अश्मयुगीन मानवामध्ये संपूर्ण बदल झाल्याची खूणगाठ आहे. येथूनच दुसऱ्या किंवा मध्य अश्म युगाला सुरुवात झाल्याची जाणीव होते.

या मध्य अश्मयुगीन मानवाची हत्यारे आद्य अश्मयुगीन मानवाच्या हत्यारांपेक्षा खूपच मोठ्या संख्येने मिळत असून चोहोकडे विखुरलेली आहेत.

## आद्य अश्मयुगीन हत्यारे वापरणाऱ्या मानवाचा वंशज असावा काय ?

हा मध्याश्मयुगीन मानव आद्याश्मयुगीन मानवाप्रमाणे लहानमोठ्या जलप्रवाहाजवळ तर रहात होताच, परंतु आता तो गर्द जंगलाच्या परिसरात तसेच डोंगराच्या व टेकडाच्या उतारावर राहू लागला. आद्य मानवाच्या दृष्टीने ही प्रगतीची वाटचाल होती. आद्य मानवाने आपल्या हत्यारांसाठी ज्या नदीतील दगडगोट्यांतून दगडी हत्यारे बनवली ते भित्तीचे दगडगोटे, भौगोलिक परिस्थिती बदलल्यामुळे नद्यांना पूर येऊन वाहून गेले. तसेच राहिलेले गाळाखाली दबले गेले आणि त्यामुळे ते दिसेनासे झाले.

हत्यारे बनवण्यासाठी त्यांना आता भित्तीच्या दगडाऐवजी दुसरा मार्ग शोधणे क्रमप्राप्त होते. ज्या दगडापासून हत्यार बनवणे सहज शक्य होईल आणि हत्यारासाठी जरूर तो टणकपणा असेल असा दगड त्याला हवा होता. कर्मधर्मसंयोगाने त्याला मार्ग सापडला. महाराष्ट्रभर पसरलेल्या ट्रॅपच्या दगडाच्या थरांतच गारगोटीसारख्या दगडाच्या मोठमोठ्या शिरा भूपृष्ठावर आलेल्या त्याला दिसून आल्या. त्या कल्पक मानवाने हा दगड आपली हत्यारे बनवण्यास सर्वथैव योग्य आहे अशी खात्री करून घेऊन त्याची निवड केली. भूस्तरशास्त्रीय परिभाषेत ह्या दगडांना गार, गारगोटी, चकमक दगड, राहूचा दगड संबोधले जाते. अशा प्रकारची दगड मिळणारी ठिकाणे त्याने आपल्या हत्यारासाठी पसंत केली.

नुकतेच आमच्या पाहणीत आलेले एक ठिकाण म्हणजे धुळे जिल्ह्यात नंदुरबार तालुक्यातील रंका नाल्याचे ठिकाण हे होय. नैसर्गिक चपट्या, सपाट दगडाचा मानवाने तेथे हत्यारासाठी वापर केलेला दिसून येतो आणि ही हत्यारे मध्यअश्मयुगीन हत्याराच्या प्रकारांत मोडतात. आतापर्यंत प्राप्त झालेल्या हत्यारांपेक्षा ही हत्यारे आकाराने खूपच लहान असल्याचे दिसून आले. हत्यारांचे प्रकार लक्षात घेता ती हत्यारे आतापर्यंत नदीच्या थट्ट, थरांत किंवा भूपृष्ठावर तसेच टेकडाच्या सपाटीवर अथवा उतारावर मिळालेल्या सर्वसामान्य हत्यारांपेक्षा भिन्न नव्हती. एवढेच नव्हे तर या प्रकारची हत्यारे महाराष्ट्रभर तसेच म्हैसूर, मद्रास, आंध्र, आसाम, ओरिसा, बिहार, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान, कच्छ, सौराष्ट्रासह गुजरात अशा अनेक ठिकाणी आढळून येतात. मुख्यत्वेकरून खुरपणी, वेधणी आणि रंधक किंवा छिद्रक या तीन प्रकारची हत्यारे तेथे दिसून येतात.

मध्य अश्मयुगीन हत्यारांचे हे प्रकार आणि त्यांचे गुणधर्म पाहिले म्हणजे अशी कल्पना होते की ही हत्यारे मानवी गरजांना पुरेशी नव्हती. या हत्यारांचा विचार करता, त्यावेळी मानवाने धनुष्य-बाणांनी शिकार केली असली पाहिजे. जनावरांची कातडी सोलणे, झाडाच्या साली खरवडणे आणि साफ करणे, तसेच काठ्यांना व लाकडांना लहानमोठी भोके पाडणे ही कामे या हत्यारांनी करता येण्यासारखी आहेत. परंतु तुकडे करणे, लाकूड तोडणे, वाटणे, कुटणे इत्यादी मोठी अवजड कामे करण्यासाठी

गंडासा, चूरकसारखी आद्य अश्मयुगीन मानवाने वापरलेल्या हत्यारांप्रमाणे मोठी हत्यारे वापरली असली पाहिजेत.

## मानव मोठ्या प्रमाणात संहारक झाला

त्यावेळचे मध्य अश्मयुगीन मानवाचे जीवन म्हणजे एक भटके शिकारी जीवन म्हणावे लागेल. त्याला हत्यारे बनवण्यासाठी लागणारे साहित्य म्हणजे लहानमोठे दगड-गोटे आता आकाराने आणि वजनाने आद्य अश्मयुगीन हत्यारांपेक्षा खूपच लहान व हलके होते. त्यामुळे या हत्यारांसह त्याला सहजतेने कोठेही वावरता येई व शिकारही सुलभपणे व अचूकपणे करता येई. त्यामुळे हा मानव गर्द अरण्यातही अगदी बिनदिक्कत जाऊ लागला. त्याच्या जीवाची जबाबदारी घेणारे आणि शिकारी जीवनात सुलभता आणणारे हे सुधारलेले टोकदार हत्यार म्हणजे धनुष्य आणि बाण होत. ह्या हत्याराचा शोध म्हणजे मध्यश्मयुगीन मानवाच्या जीवनातील विकासाचा फार मोठा टप्पा होता. विसाव्या शतकात अग्निबाणाच्या शोधाचे जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व ह्या मध्याश्म-युगीन धनुष्य-बाणाला आहे. तेव्हाचे हे रॉकेट युगच सुरू झाले असे म्हणावे लागेल. एवढी मोठी ही प्रगती होती.

आद्य मानवाप्रमाणे शिकारीसाठी मोठमोठे खड्डे खणायचे, अनेकांनी एकत्र येऊन प्राण्यांना हाकारीत त्या खड्ड्यांत पाडायचे आणि मग अगदी जवळ जाऊन शिकार करायची अशी आता त्याला जरूरी नव्हती. ती पद्धती आता मागासलेली ठरली. अशा प्रकारच्या शिकारीत मानवाची अधिक शक्ती व श्रम खर्च होत तसेच अधिक वेळ जाई आणि त्या मानाने तेवढी शिकार प्राप्त होईलच अशी खात्री नव्हती. परंतु या नवीन हत्यारामुळे कोणतेही सावज आता तो हेरून अचूक टिपू शकत होता आणि त्यामुळे त्याची शिकारी प्रवृत्ती बळावत चालली, या हत्याराने मानवाच्या अंगी धडाडी आणि निर्भयता हे गुण आले. कोणत्याही बिकट प्रसंगी हे हत्यार त्याला वाचवी आणि त्यामुळे आता तो एकटादुकटा निर्भयपणे भटकून शिकार करू लागला. गर्द जंगलातही आता तो ह्या हत्यारासह एकटादुकटा सहज जाई. आता त्याला भीती वाटेनाशी झाली त्यामुळेच की काय त्याची हिंसक प्रवृत्ती वाढत गेली. मानवी कलहातही जीवाचा संहार करण्याचे त्याला काही वाटेनासे झाले. या प्रगत शस्त्राने त्याच्या जीवनात फार मोठा विकास झाला असावा आणि तो खूप धीट झाला तरी त्याच प्रमाणात तो संहारकही बनला. असे जे काही विद्वान म्हणतात जे खोटे नाही.

## बौद्धिक कौशल्याचा विकास

ज्याप्रमाणे हत्यारे बनवण्यासाठी लागणाऱ्या दगडात बदल झाला होता त्याचप्रमाणे हत्यारे बनवण्याच्या पद्धतीमध्येही पूर्णपणे बदल झालेला होता. आता जर त्याला कशाची

जरूरी असेल तर ती बाणासाठी जी टोकदार हत्यारे करावी लागत त्यासाठी योग्य म्हणजे चपटा, सपाट दगड शोधण्याची, मग तो लांब असो की आखुड असो. तो सहजपणे फोडून त्याचे छिलके काढी आणि टोकदार व पातळ छिलक्याची बाणाची टोके व जाड कपच्या किंवा छिलक्यापासून खुरचणी, छिद्रक किंवा रंधक बनवी. आता असे दिसून येते की हा मानव शक्यतो हत्यारे बनवण्यासाठी जो दगड निवडी तो बाजूला सपाट असे. जर सपाट बाजू मिळालीच नाही तर तो कौशल्यपूर्वक त्या दगडाचा छिलका काढून सपाट बाजू तयार करी. अशा प्रकारे छिलके काढून बनवलेल्या हत्याराला धार येण्यासाठी बारीक बारीक दाते बनवी. नाविन्यपूर्ण साधने शोधणाऱ्या मानवाने आपल्या जीवनाच्या उन्नतीसाठी आपल्या बौद्धिक कौशल्याचा हळूहळू विकास केलेला दिसून येतो.

मानवी जीवनाला एवढी मोठी कलाटणी देणारा हा मानव होता तरी कोण ? आद्य अश्मयुगीन मानवाचा हा वंशज तर नसावा ना ? आपल्या या तर्कवितर्काला काहीच अर्थ नाही. कारण या प्रश्नाची उकल होण्यासाठी ह्या दोन्हीही मानवाच्या सांगाड्यांच्या सांगोपांग अभ्यासाची जरूरी आहे आणि अद्यापि महाराष्ट्रातच नव्हे परंतु भारतातही आद्य अथवा मध्य-अश्मयुगीन मानवाचा सांगाडा मिळालेला नाही. केवळ या हत्यारांवरून, त्यासाठी वापरलेल्या भिन्न प्रकारच्या दगडाच्या आकारांत आणि हत्यारामधील प्रकारांत, जो संपूर्ण बदल झालेला दिसन येतो यावरून अशी एक कल्पना सुचते की मध्य अश्मयुगीन मानव हा बाहेरून आलेल्या नवीन मानववंशातील असावा. येथील आद्य मानवाच्याच ह्या नवीन कल्पना असणेही अशक्य नाही पण संभाव्य वाटत नाही. ते काहीही असले तरी जो ह्या दोन्ही अश्मयुगीन मानवात बदल झालेला दिसून येतो तो केवळ महाराष्ट्रातच झालेला नसून भारतात चोहोकडे आणि पश्चिम आशिया व युरोप येथेही हा झालेला बदल आढळून येतो.

## द्वितीय अश्मयुगीन मानवाचा परिसर ( वातावरण )

द्वितीय अश्मयुगीन मानवाच्याकाळी हवामान बहुतांशी कोरडे होते. आद्य अश्मयुगीन कालाप्रमाणे ते दमट नव्हते. पुरामुळे नद्यांची पात्रे पण खूपच बदलली होती. त्यांनी आपल्या किनाऱ्याच्या मर्यादा सोडल्या होत्या. परंतु पात्रे विशेष खोल मात्र झालेली नव्हती. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी पूर्वीच्या काळात साचून राहिलेले दगडगोट्यांचे थर उघडेच होते आणि त्यावरून नदी वहात होती. यानंतर नदीच्या पात्रात वाढीचे व घटीचे चक्र सतत चाललेले दिसून येते. आणि या वाढीच्या व घटीच्या चक्रामुळे काही काही ठिकाणी नदीच्या पात्राची सध्याची खोली पन्नास फूट झालेली दिसून येते. अशी ही भौगोलिक परिस्थिती केवळ महाराष्ट्रातच झालेली होती असे नसून संपूर्ण भारतभर झालेली होती.

## नदीच्या पात्रांतील बदल

नदीचे पात्र वरवर पाहिले तर तिच्या पात्रात झालेले एवढे बदल आपल्या सहजासहजी लक्षात येत नाहीत. परंतु पुणे, नांदेड, पंढरपूर, कोपरगाव, नाशिक, दौंड या नदीकाठच्या लोकांना नदीच्या सामर्थ्याची निश्चितच कल्पना येईल. पानशेत धरणफुटीनंतरची पुणे शहराला व दौंडला याचा चांगलाच अनुभव आला. १९६९ साली गिरणा आणि गोदावरी या नद्यांनी आपले पुराचे उच्चांक मोडले तेव्हा त्यांच्या काठचे नाशिक, कोपरगाव, नांदेड येथे हाहाकार झाला. मध्य अश्मयुगीन मानवाला तर दरवर्षीच पुराच्या बिकट प्रसंगाला तोंड द्यावे लागे. त्या काळातील या प्रचंड पुरांनीच नद्यांच्या काठी ही उंचच उंच बारीक वाळूची व रेतीची टेकाडे निर्माण झाली आणि त्यावर बारीक गाळाच्या मातीचा थर आवरणासारखा घट्ट बसला.

## द्वितीय अश्मयुगीन मानवाची निश्चित कालगणना

हा द्वितीय अश्मयुगीन मानव केव्हा होऊन गेला यासंबंधी अगदी परवापरवापर्यंत कोणाला काहीही सांगता येत नव्हते. भूस्तर– शास्त्रज्ञांच्या अनुमानानुसार हा मानव उत्तर हिमयुगात होऊन गेलेला असावा. विज्ञान शास्त्रात जे नवीन नवीन शोध लागत आहेत त्याचा फायदा पुरातत्त्व-शास्त्राला पण झालेला आहे. किरणोत्सर्गमापन पद्धतीने मिळविले. या कालखंडातील कालगणना निश्चित करण्यात शास्त्रज्ञांनी यश मिळविले आहे. ही कालगणना वनस्पती, झाडे, हाडे, शंख, शिंपले इत्यादींच्या आधाराने केली जाते. या वस्तूंमध्ये जो किरणोत्सर्ग घटक सापडतो तो मोजला जातो आणि त्यावरून कालमान निश्चित करता येते. राहुरीजवळ मुळानदीच्या पात्रात धरणाचे पाया खोदण्याचे काम चालू होते. त्या पायात बारीक वाळूचे व रेतीचे द्वितीय अश्मयुगीन थर आढळून आले. त्यांची कालगणना केली तर ती तीस हजार वर्षे इतकी मागे जाते. आणि दुसरे उदाहरण पुणे जिल्ह्यातील इनामगावाजवळील घोडनदीच्या काठचे. तेथेही द्वितीय अश्मयुगीन घट्ट थरातील सापडलेल्या शिंपल्यांची कालगणना केली ती एकवीस हजार वर्षे इतकी आली. कृष्णा नदीवरील धोम येथील एकुणचाळीस हजार आणि गोदावरी नदीवरील पैठण येथील त्या थरांतील वस्तूंची कालगणना एकोणीस हजार वर्षे इतकी आली. यावरून चाळीस हजार ते वीस हजार वर्षांमधील काल हा मध्यअश्मयुगीन मानवाचा काल समजावयाला काही हरकत नाही.

या निष्कर्षावरून वीस हजार ते चाळीस हजार वर्षांमधील जो वीस हजार वर्षांचा काळ तो या मध्यअश्मयुगीन मानवाचा लागेल. या संपूर्ण वीस हजार वर्षांत हा मानव एवढ्याच प्रगतीवर थांबला नाही. त्याचे शिकारी व भटके जीवन अद्यापिही चालूच होते. त्याला स्थैर्य लाभलेले नव्हते. तो आपली हत्यारे व साधने यासंबंधी विकासाच्या नव्या नव्या कल्पना बांधीत असे व त्या हत्यारांत सुधारणा होण्यासाठी



आकृती २ : मध्य अश्मयुगीन हत्यारे

अखंड प्रयत्न चालू होते. आज आपण पहातो किंवा गेल्या चारपाच हजार वर्षांपासून ज्या सुऱ्या, चाकूची पाती, दाढीचे वस्तरे, भाल्याची किंवा बाणाची टोके, मासे पकडण्याचे गळ इत्यादी गोष्टी सापडतात त्यांचे जनकत्व वीस हजार वर्षांपूर्वीच्या या मध्यअश्मयुगीन मानवाकडे जाते.

## बहुविध हत्यारांची निर्मिती

त्याचा आणखी एक महत्त्वाचा शोध म्हणजे त्याने संयुक्त किंवा बहुप्रयोजन हत्यारे बनवली व त्यांचा व्यवहारांत वापर सुरू केला. लहान, लांब, गारगोटीच्या पात्याने खुरप्याची पाती किंवा गळाचे दगड बनवण्याचा प्रयत्न करी आणि ते मध्येच फुटले तुटले तर त्याच पात्याचा आणि अन्य पातळ बारीक धारदार पात्यांना लहानशा कोयत्याच्या आकाराच्या लाकडी काठीत किंवा लांब हाडात अगर काळविटाच्या शिंगांत खाचा करून बसवी व ही हत्यारे घट्ट बसावी म्हणून डकवी. प्रसंगी तो चिकण मातीचा दांडा करून त्यात बसवी व अशा प्रकारे गारगोटीच्या अनेक पात्यांना एकत्र आणून जे संयुक्त हत्यार बनवले त्याचा उपयोग बहुविध कामांसाठी, उदा. कापणे, खरवडणे, तोडणे, इत्यादींसाठी करण्यात आला. अशा प्रकारच्या संयुक्त हत्याराचे हे महत्त्व आज आपण रोजच्या व्यवहारांत समजू शकतो. हेच संयुक्त यंत्रयोजनेचे तत्त्व आज अग्निबाणां-मध्येसुद्धा उपयोगात आणले जाते. तसेच आपल्या दैनंदिन वापरातील चाकू, सुऱ्यात पण उपयोगात येते. यात आपणाला जो फरक दिसतो तो म्हणजे हत्यारामधील साहित्याचा. तो मानव दगड वापरीत होता तर आज आपण त्याच्याऐवजी विविध प्रकारचे पोलाद किंवा अन्य धातू वापरतो.

मानवाच्या भौतिक संस्कृतीच्या या प्रगतीचे पहिले दर्शन नेवासे येथे १९५५–५६ साली झाले आणि त्यानंतर महाराष्ट्रातील विविध ठिकाणी त्यावर अधिक प्रकाश पडत गेला. नागपूरजवळ अन्हन नदीच्या खोऱ्यात, धुळे जिल्ह्यातील भाडणे येथे, कान नदीच्या खोऱ्यांत इत्यादी स्थळी दुधाळ गारगोटीचे छिलके मिळतात. कोणत्या कारणाने त्याच्यात ही अशी हत्यारे बनवण्याचे परिवर्तन होत गेले हे मात्र समजून येत नाही. अशा प्रकारच्या दगडापासून तो धारदार पाती व छिन्या इत्यादी हत्यारे बनवू लागला.

## गारगोटीची धारदार पाती बनवणारा पहिला मानव

गारगोटीची पातळ पाती बनवणारा मानव राहत असलेला देश कसा असावा असे विचारले तर तो देश दमट हवामानाचा नसणार हे उघडच आहे. तेथील हवामान हे कोरडे असणार हे निश्चित. ही गारगोटीच्या पात्याची हत्यारे बनवण्याची ठिकाणे, नदीकाठची पुराने उंच बनलेली वाळूच्या थराची ठिकाणे आता उघडी पडली असल्यामुळे ही हत्यारे मिळू शकली. ( आकृती २ )

या कोरड्या किंवा अर्धशुष्क कालानंतर निश्चित स्वरूपाचा एक फार मोठा हवामानात बदल झाला आणि त्यामुळे भौगोलिक परिस्थितीतही बराच फेरफार झाला. हा बदल सर्व महाराष्ट्रभर तसेच मध्य प्रदेश, गुजरात, आंध्रचा काही भाग, म्हैसूर, मद्रास, ओरिसा, बिहार, उत्तर प्रदेश या ठिकाणी झालेला दिसून येतो.

## ताम्र-पाषाणकालीन मानव

### काळी जमीन आणि पहिला शेतकरी

महाराष्ट्रातील आद्य अश्मयुगीन मानवापासून ते मध्य अश्मयुगीन मानवापर्यंत सुमारे दीड लाख वर्षांचे मानवी जीवनाचे दुवे जोडण्याचा आम्ही जो प्रयत्न केला आहे त्यातून मानवी जीवनाची उत्क्रांती आणि हळूहळू होत गेलेली प्रगती याचा आढावा आतापर्यंत घेतला. शेतीवाडी करून व घरेदारे उभारून आता महाराष्ट्रात मानव राहू लागला. त्याला स्थैर्य कसे लाभले आणि त्याने आपल्या जीवनात कशी क्रांतिकारक प्रगती केली, ते आता पहावयाचे आहे.

महाराष्ट्राच्या बऱ्याच मोठ्या भागात काळ्या आणि तपकिरी भुरकट रंगाची जमीन पसलेरली दिसते. जमिनीचे काळेपणात रूपांतर होण्यासाठी तिच्यात कोणते गुणधर्म सामावले गेले हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. साचलेले पाणी किंवा निर्माण झालेली तळी, तसेच पाणथळ जागा, त्याचप्रमाणे झाडे, झुडपे, गवतपाला इत्यादी वनस्पतींमुळे जमिनीला काही प्रमाणात काळेपणा येतो. या काळ्या जमिनीच्या खालील थर हा बेसॉल्ट खडकाचा थर आहे. तर काही नदीकाठच्या ठिकाणी प्राचीन पिवळ्या मातीचा थर आहे. असा जर जमिनीचा खूप लांब छेद घेतला तर काळ्या मातीच्या जाडीचा थर पृष्ठभागापासून काही इंचांपासून ते तीन ते चार फूट जाडीपर्यंत असलेला स्पष्ट दिसून येतो. पिवळ्या किंवा भुरकट जमिनीपेक्षा ही काळी जमीन मगदुराने अधिक कसदार असते.

काळ्या जमिनीला योग्य प्रमाणात पाणीपुरवठा मिळाला तर त्या जमिनीत गहू, ज्वारी, बाजरी, हरबरा, कापूस, ऊस, इत्यादी मानवी जीवनाला अत्यावश्यक असणारी पिके अगदी मुबलक प्रमाणात निघतात. ज्या मानवाने ही शेतीची मुहूर्तमेढ रोवली त्याला ह्या शेतीच्या जीवनाचे सार पूर्णपणे उमगले असले पाहिजे आणि म्हणूनच त्याने शेती हा जीवनाचा मुख्य मार्ग अवलंबिला असला पाहिजे. अतीव कष्टप्रद मानवी जीवनातील भटक्या व शिकारी जीवनाची समाप्ती आणि स्थिर जीवनाची सुरुवात करणाऱ्या या आद्य शेतकऱ्याचे मानवजातीवर फार मोठे उपकार झालेले आहेत.

महाराष्ट्रातील बऱ्याच आद्य शेतकऱ्यांच्या वसाहती आता उजेडात आलेल्या आहेत. त्यांपैकी नाशिक, जोर्वे, नेवासे, चांडोली, सोनगाव, इनामगाव, दायमाबाद इत्यादी

आकृती ४



पृ. ३७

मातृदेवता व वृषभ, इनामगाव

आकृती ३



वर्तुळाकार घराचे अवशेष, इनामगाव

पृ. २९

वसाहती प्राचीन काळात काळ्या मातीच्या थरावर वसलेल्या दिसून येतात. अशीच परिस्थिती खानदेशातही प्रकाशे, सावलडा, भाडणे, बहुरुपे, बहाळ इ. ठिकाणी दिसून येते. या वसाहतींचा काळ ख्रिस्तपूर्व पंधराशेच्या आसपासचा आहे. विदर्भात किंवा मराठवाड्यात या ताम्रपाषाणकालीन संस्कृतीसंबंधी उत्खनन झालेले नाही. तरी पण तेथे यापेक्षा निराळे काही असेल असे म्हणता येत नाही. त्या काळी मानवी जीवनाच्या दैनंदिन गरजा पुरवणारी आणि काही सुखसोयी उपलब्ध करून देणारी स्वयंपूर्ण खेडी सर्वत्र होती. गावाच्या समोर नदीचे पात्र असावे अशी गावाची रचना असे. त्यामुळे घरातून नदीचे नयनमनोहर दृश्य पाहता येई. नदीचे पाणी बारमाही वाहणारे असून ते आरोग्यदृष्ट्या स्वच्छ, शुद्ध असे. गावातील त्यांची निवासस्थाने म्हणजे एक लहान खोलीवजा झोपडी असे आणि अशा ह्या लहानलहान घरांमध्ये ते दाटीवाटीने वा गटाने एकत्र येऊन वस्ती करत. ( आकृती ३ )

अशा प्रकारची ही छोटी टुमदार व स्वयंपूर्ण खेडी अगदी इतिहासकाळापर्यंत, एवढेच नव्हे तर अगदी परवापरवापर्यंत म्हणजे मोठमोठ्या शहरांची निर्मिती होईपर्यंत आणि ऐषारामी नागरी जीवनाच्या सुखसोयींचा संपर्क येऊन त्यांचा पगडा बसेपर्यंत टिकून होती.

या वसाहतीच्या जीवनाचा पाया घालणारे मानवाचे पूर्वज हजारो किंवा लाखो वर्षे पोटाच्या खळगीसाठी अहोरात्र वणवण भटकले. त्यांच्या जीवनाला तिळमात्र शांतता लाभली नाही. मानवी जीवनाची कोंडी दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या बुद्धिकौशल्याचा उपयोग केला. परंतु मानवी कल्याणाचे यथार्थ स्वप्न रंगवणे त्यांना उमगले नाही. रोजचा उगवणारा दिवस त्यांना पोटासाठी भटकायला उद्युक्त करी. शिकारी जीवनात अनेकांना एकत्र येऊन जगणे कठीण होते. त्यामुळे मानवाचे एकमेकातील नात्याचे व प्रेमाचे संबंध, कुटुंबपद्धती, समाजजीवन, समाजकल्याण या मानवी जीवनाच्या अत्यावश्यक गोष्टींपासून ते फारच दूर होते.

## पशुसंवर्धनाला प्रारंभ

शेतीच्या जीवनाची सुरुवात होताच भटक्या आणि शिकारी जीवनाला आळा बसला. मानवी जीवनाला स्थैर्य येण्यास सुरुवात झाली. शिकारी अवस्थेतील मानव जागृत होऊन विचार करू लागला. त्याला विचाराला अवधी मिळाला आणि प्रगतीच्या पथाकडे तो झपाट्याने वाटचाल करू लागला. शेतीच्या उपयुक्ततेच्या दृष्टीने वन्य पशूंना माणसाळवणे आणि त्यांच्या शक्तीचा शेतीला उपयोग करून घेणे हे त्याने हळूहळू सुरू केले. त्याचप्रमाणे पशुसंवर्धनाला सुरुवात झाली.

आजपर्यंत शिकार भाजून खात असणाऱ्या मानवाला धान्य शिजवून खाण्याची बुद्धी सुचली. त्यासाठी तो मातीची भांडी वापरू लागला आणि आपल्या जीवनाला

त्याने एक वेगळेच वळण लावले. आपल्या जीवनातील कलांचे दर्शन तो भांड्यावर रेखाटू लागला.

त्याच्या चौकस आणि शोधक दृष्टीला धातूचाही शोध लागला. दगडी गुळगुळीत हत्याराबरोबरच आता तो तांब्याची हत्यारे बनवू लागला. अशा प्रकारे एका शेतीच्या शोधापाठोपाठ त्याला पशुपालन व संगोपन आणि मानवी विकासाच्या इतर घटना पाहिल्या की पहिल्या सुधारणेच्या काळाला जेवढा प्रदीर्घ कालावधी लागला त्यापेक्षा अत्यंत कमी अवधीत मानवाला वरील सुधारणा करता आल्या आणि येथूनच मानवी जीवनाच्या इतिहासाची खरी सुरुवात झाली असे स्पष्ट दिसून येते.

## महाराष्ट्रात मानवाच्या आद्य वसाहती

आद्य अश्म–युगापासून ते शेतीवाडीच्या सुरुवातीच्या कालखंडापर्यंतच्या प्रदीर्घ काळासंबंधाने आम्ही महाराष्ट्रात आणि भारतात अनेक ठिकाणी उत्खनने केली. तरीही स्थिर वसाहत करून जगण्याची पद्धती आणि शेतीवाडीची सुरुवात निश्चितपणे कोणत्या काळापासून सुरू झाली, तसेच त्याचे मूळ स्थान कोणते, या संबंधीची निश्चित स्वरूपाची माहिती अजून प्राप्त झालेली नाही. आम्हाला जर काही आढळून आले असेल तर ते म्हणजे सिंध, पंजाब, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा, आंध्र, मद्रास, म्हैसूर, गुजरात व महाराष्ट्र या ठिकाणी शेतीची सुरुवात झाली त्याच कालात स्थिर जीवनाला ज्या ज्या गोष्टींची जरूरी होती त्यासंबंधीच्या सर्व कला, कल्पना आणि पद्धती, म्हणजे मातीची भांडी बनविण्याची कला, दगडी मण्यांचे दागदागिने बनविण्याची कला, सोन्याचे आणि तांब्याच्या धातुसंबंधीचे ज्ञान, तसेच गहू, तांदूळ, ज्वारी, कडधान्ये आणि कापूस इत्यादी पिकविण्याच्या कल्पना, कापड आणि कच्चे रेशीम बनवण्याच्या विद्या, या हस्तगत झाल्या होत्या.

या सर्व गोष्टी विचारात घेता या भागात पसरलेल्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा जनक या प्रांताच्या बाहेरून कोठून तरी आलेला असावा असे दिसते. मोठमोठ्या नद्यांच्या खोऱ्यांत या वसाहती आढळतात. तापी, गोदावरी, कृष्णा, भीमा, प्रवरा इत्यादी नद्यांच्या खोऱ्यात तर वसाहती आहेतच, परंतु वरील नद्यांच्या लहानसहान खोऱ्यात म्हणजे कान नदी, पंजरा नदी, म्हाळूंग नदी इत्यादी उपनद्यांच्या खोऱ्यांतही तत्कालीन मानवाच्या वसाहती दिसून येतात.

साधारणपणे खि. स. पूर्व दोन हजार वर्षांपासूनच आपल्या देशात, प्रांताचे आणि उपप्रांताचे वैशिष्ट्य दर्शविणाऱ्या हद्दीच्या खाणाखुणा दिसून येऊ लागल्या होत्या. तत्कालीन जीवनमान आणि सांस्कृतिक परिस्थिती पाहता त्याच्यात विशेष फरक असल्याचे दिसून येत नाही. उत्खननाद्वारे प्राप्त झालेल्या मातीच्या वैशिष्ट्यपूर्ण भांड्याच्या आकारा-वरून त्यांना सांस्कृतिक नावे दिलेली आहेत. त्या भांड्याची जडणघडण, आकार, प्रकार, बनावट व त्याचा पोत या सर्व गोष्टींचा संशोधनात्मक अभ्यास करून त्यांचे

भिन्नत्व ठरवण्यात येते. ज्याप्रमाणे जोर्वे आणि नेवासे संस्कृती, प्रकाश आणि सावलडा संस्कृती, म्हैसूर प्रांतातील ब्रह्मगिरी संस्कृती किंवा नवाश्मयुगीन संस्कृती, नर्मदा घाटीमधील महेश्वर नावडाटोली संस्कृती; या त्या संस्कृती. सर्वसाधारणपणे आपण जे सध्याचे सांस्कृतिक व भाषिक दृष्टिकोनातून प्रांत पाहतो त्या प्रांताशी आणि त्या वेळच्या संस्कृतीशी तुलना करता ते एकमेकाच्या किती जवळ आहेत हे दिसून येते. तेव्हाची महेश्वर– नावडाटोली संस्कृती म्हणजे सध्याचा माळवा प्रांत. नेवासा, जोर्वे, नाशिक म्हणजे सध्याचा वायव्य महाराष्ट्र, ब्रह्मगिरी म्हणजे म्हैसूर, कर्नाटक, इत्यादी. या विषयाचा आम्ही सूत्रबद्ध आणि सुबद्ध असा अभ्यास गेल्या दहा वर्षांपासून पुरातत्त्व शास्त्राच्या दृष्टिकोनातून करीत आहोत.

या संबंधीचा निष्कर्ष काढता ख्रिस्तपूर्व १५०० ते ८०० ह्या कालखंडात ही संस्कृती येथे नांदत असलेली दिसून येते आणि तिचा विस्तार उत्तरेला पार नर्मदा तापी नद्यांच्या खोऱ्यापासून दक्षिणेला कृष्णा, तुंगभद्रेच्या तटापर्यंत दिसून येतो. उत्तरेकडील नावडाटोली, महेश्वर येथील उत्खननात प्राप्त झालेली खापरे महाराष्ट्रात गोदावरी प्रवरा आदी नद्यांच्या खोऱ्यातील दायमाबाद, नेवासे, पैठण येथील उत्खननात जोर्वे संस्कृतीच्या खापराच्या अगोदरच्या कालखंडातील दिसून येतात. गेल्या दोन वर्षांपासून आम्ही घोड-नदीच्या किनारी इनामगाव येथे जे उत्खनन केले त्या ठिकाणी उत्तरेकडील माळवा संस्कृती व दक्षिणेकडील ब्रह्मगिरी संस्कृती यांची एवढी सरमिसळ झालेली दिसून येते की ती कशी झाली हे समजून येत नाही. विशेषतः अखेरच्या कालखंडात म्हणजे खि. स. पूर्व ६०० ते ८०० च्या काळात दक्षिणेकडील संस्कृतीची छाप पडलेली दिसून येते. आणि पुढील काळातही त्याचा जोर वाढल्याचे दिसून येते.

## मानवाचे महाराष्ट्रातील सुरुवातीचे जीवन

सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रातील मानवाच्या जीवनाच्या मूलभूत गरजांचा विचार करता त्याच्या घरादाराचा प्रथम विचार करू. या काळातील महाराष्ट्रातील खेडो-पाडीची घरे गोलाकार असून वासुदेवाच्या टोपीप्रमाणे ती वरच्या बाजूला गवताने शाकारलेली होती. ती घरे एका लहान खोलीची, झोपडीवजा होती. खाली फूट दीड फुटांवर खांब किंवा मेढी आधारासाठी पुरत असत. या मेढीच्या बाजू विणलेल्या तट्ट्याने झाकून घेत. तट्ट्या किंवा चटया स्थानिक वेलापासूनच बनवत असत आणि या चटयांवरून मातीच्या गिलाव्याने ते लिपून घेत व त्यावरून सारवत. अशाच प्रकारे घरातील जमिनी पण चापूनचोपून बनवीत. कुडाच्या मातीच्या भिंती असलेल्या झोपडीवजा खोलीत राहणाऱ्या महाराष्ट्रातील ह्या आद्य शेतकऱ्याच्या घरात तो काय काय वापरत होता याचा जरा बारकाईने शोध घेऊ या. त्याच्या झोपडीत जरा डोकावून पाहिले तर काय दिसते? प्रथम डोळ्यांत भरणारी गोष्ट म्हणजे ते भलेमोठे साठवणीचे रांजण. त्या रांजणाचे बारकाईने निरीक्षण केले तर त्याला खाली आधारासाठी

चार मातीचे पाय बनवलेले दिसून येतात. शिवाय पक्का आधार मिळावा म्हणून चार चपटे दगड पण बाजूला लावलेले दिसून येतात. खाण्यापिण्याची भांडी पाहता त्यांत काही वाडगी, कटोरे व इतर काही कंगोरा असलेली भांडी आढळून येतात. कंगोरा असलेले सरळ तोटीचे किटलीप्रमाणे जे भांडे असते त्याला धरण्यास हात ( हॅन्डल ) नसतो. ताटे किंवा थाळ्या मात्र या भागात कुठेही आढळून आल्या नाहीत.

## जोर्वे–नेवासे संस्कृती म्हणजे काय ?

'जोर्वे–नेवासे संस्कृतिची ताम्रपाषाणकालीन' वैशिष्ट्यपूर्ण भांडी म्हणून जी ओळखली जातात, किंबहुना महाराष्ट्रातील आद्य वसाहतीमधील मानवाची संस्कृती जोर्वे या नावाने ओळखली जाते त्याचे कारण म्हणजे १९५१ च्या सुमारास प्रवरा नदीच्या काठी संगमनेरजवळ जोर्वे या गावी केलेल्या, उत्खननातही अशा प्रकारची वैशिष्टयपूर्ण भांडी सर्वप्रथम उजेडात आली. त्या संस्कृतीचे कालमान जेव्हा शास्त्रीय पद्धतीने ठरले तो काळ म्हणजे खिस्तपूर्व बाराशे ते पंधराशे हा होय. ह्या भांड्याचे आगळेपण त्यानंतर महाराष्ट्रात इतरत्र झालेल्या सर्व ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या थरांत आढळून आले. नेवासे येथे मोठ्या प्रमाणात उत्खनन झाले आणि त्या संस्कृतीमधील भांड्यांवर अधिक प्रकाश पडल्यामुळे त्याला जोर्वे-नेवासे संस्कृती म्हणण्याची पद्धत पडली. या भांड्यांचे वैशिष्ट्य म्हणजे तुलनात्मकदृष्टया ही भांडी पातळ असून चाकावर बनवलेली आहेत. या भांड्यांची घडणही अतिशय उत्कृष्ट पद्धतीची आहे. विटकरी किंवा आलवणी तांबूस अशा बाह्य रंगाची असून काळ्या रंगाच्या रेषांनी त्यावर भौमितिक आकृत्यांनी नक्षीकाम केलेले दिसून येते. ही भांडी जरी आपण एकदाच पाहिली किंवा हाताळली तरी त्याचे वैशिष्ट्य आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. या भांड्याचे आणखी एक गुण-वैशिष्ट्य म्हणजे त्यांची भट्टीमधील भाजणी उत्तम प्रकारची झाल्यामुळे त्यांचा आवाज धातूच्या भांड्याप्रमाणे खणूखणू येतो. अशा प्रकारची ही इतकी सुंदर भांडी बनवताना त्या कुंभारातील कलावंत जागा होतो आणि एखादे धावणारे कुत्रे किंवा बागडणारे हरीण असे अगदी सहजपणे त्याच्या कुंचल्यातून त्या भांड्यावर उतरते. प्रसंगी एखाद्या वाडग्यावर स्वस्तिकासारखे शुभचिन्हही काढलेले आढळून येते. महाराष्ट्रासह भारताच्या अन्य प्रदेशांतही जनावरांची चित्रे भांड्यावर काढलेली दिसून येतात, परंतु महाराष्ट्राचे वैशिष्ट्य स्वस्तिकामध्ये आहे. ते दक्षिण भारतात व महाराष्ट्रात प्रथमच दिसून येते.

प्रत्येक कुटुंबासाठी जेवणाची व स्वयंपाकाची स्वतंत्र भांडी असत. कुटुंबाची सांपत्तिक परिस्थिती आणि घरातील मंडळीची संख्या यावर भांड्याचा आकडा अवलंबून असे. गहू, ज्वारी, वगैरे अन्नधान्यांचे पीठ करण्यासाठी आणि प्रसंगी दगडी कुऱ्हाडी घासण्यासाठी व धार लावण्यासाठी सपाट मोठी बैठक असलेल्या दगडात नावेप्रमाणे खोलगट असा खल वापरत. या खलात खलण्यासाठी बहिर्गोलाकृती वरवंटा वापरत.

अशा प्रकारचा खल आणि बत्त्वंटा दोन किंवा अधिक कुटुंबात मिळून वापरला जात असावा. त्यामुळे तो दोन घरांमध्ये ठेवलेला आढळून येतो. धान्याचे पीठ करण्याची पद्धत यातूनच पुढे उगम पावून त्याचे जात्यात आणि त्यापुढे गिरणीत अशी स्थित्यंतरे होत गेली.

## मृतांना पुरण्याची पद्धत

मृतांना राहत्या घरातच पुरण्याची पद्धती या कालखंडात दिसून येते. दोन-तीन मृत बालकांना एका मडक्यात पुरण्यात येई. प्रौढांनाही प्रसंगी मडक्यात पुरत. परंतु त्यासाठी मात्र अधिक मडकी लागत. एरवी त्याना तीन ते पाच मीटरचा खड्डा घेऊन पुरत. दक्षिणेकडे पाय व उत्तरेकडे डोके करून पुरण्याची पद्धत महाराष्ट्रासह दक्षिण भारतात दिसून येते. मृताशेजारी त्यांच्या सांपत्तिक परिस्थितीप्रमाणे त्याच्या वापराची भांडीकुंडी ठेवत. नेवासे व चांडोली येथे तर मृताच्या गळ्यात तांब्याच्या मण्यांची माळ आढळून आली. नेवासे येथील या मण्यांची माळ एक धागा रेशमाचा व एक धागा सुताचा अशी दुहेरी विणलेल्या दोऱ्यात गुंफलेली होती. त्यावेळी तांब्याच्या मण्यांची माळ हा श्रीमंती दर्शविणारा आणि चैनीसाठी वापरलेला दागिना समजण्यात येत असावा. कारण तांबे हा धातू तेव्हा अत्यंत दुर्मिळ किंवा दुष्प्राप्य होता. अशा प्रकारचे रेशीम आणि सूत ह्याचे संमिश्र सूत भारतात प्रथमच मिळत असल्याची नोंद आहे.

## अन्नधान्य व आहार

अन्नधान्याच्या बाबतीत सोनगाव व इनामगाव येथील निष्कर्षावरून ही झोपडीत राहणारी मंडळी आपल्या आहारात गहू, ज्वारी, तांदूळ, डाळ इत्यादी अन्नधान्ये वापरत असत, हे देखील प्रथमच उजेडात आले. वरील धान्याच्या आहाराबरोबर मिठात घालून वाळवलेले डुकराचे मांस, गोमांस, नदीवरले मासे, कासव आणि सरपटणारे प्राणी पण ते खात असावेत. त्याचबरोबर ते अल्प प्रमाणात शिकार करीत. हे काही असले तरी आता शेतीची सुरुवात करणाऱ्या या मानवाचे लक्ष पशुसंगोपन व पशुसंवर्धन याकडे वेधले गेले. डुकरे, बदके, कोंबड्या इत्यादी पशुपक्षी तो पाळू लागला. ताम्रपाषाण-युगीन जीवनपद्धतीसंबंधी जर सर्वप्रथम कोठे प्रकाश पडला असेल, तर तो इनामगाव येथील उत्खननामुळे. ( आकृती ४ )

एक लहानसे शेतीप्रधान खेडे. साधारणतः एका खोलीएवढ्या आकाराच्या शंभर एक झोपड्यांचे ते कोणते बरे गाव असावे ? त्या गावात पाचशेच्या दरम्यान लोकसंख्या असून कुटुंब स्वतःच्या उदरनिर्वाहापुरते पिकवत होते. जरूरीपुरती दगडी हत्यारे स्वतःची स्वतःच बनवी. ग्रामकुंभार गावकऱ्याच्या आवश्यकतेनुसार त्याच्या भांड्याच्या गरजा भागवत होता. खिस्तपूर्व पाचशेच्या दरम्यान जेव्हा मानवी जीवनात लोखंडाने प्रवेश

केला तेव्हा त्यावेळी दगडी हत्यारे कमी होऊन त्याऐवजी लोखंडाने व तांब्याने ती जागा घेतली. लोखंडाच्या आगमनाबरोबर घोड्याचे पण आगमन झाले. अगदी प्रथम अवस्थेत त्याचा लढाईसाठी वापर केला. दळणवळणासाठी त्यानी तेव्हा त्याचा वापर केला नाही. या दोन्ही गोष्टींची नोंद नागपूरजवळ जुनापाणी आणि टाकळघाट येथे झालेल्या उत्खननावरून प्रथमच उजेडात आलेली आहे. लोहतंत्राचा वापर व त्याचे फायदे हे त्या वेळच्या राजेरजवाड्यांनी करून घेतल्याचे दिसून येते. त्यावेळचे प्रसिद्ध साम्राज्य म्हणजे सातवाहनाचे प्रतिष्ठान, सध्याचे पैठण. आणि इतर प्रसिद्ध शहरे म्हणजे नासिक, जुन्नर, तेर, नेवासे, कोल्हापूर ही होत. व्यापारामुळे समुद्रकाठची बंदरे पण प्रसिद्धीस आलेली होती. त्यांपैकी कल्याण, ठाणे, सोपारा ही प्रमुख होत. गेल्या शतकापासून आधुनिक तंत्र-शास्त्राची सुरुवात झाली आणि तिने खेड्याच्या स्वयंपूर्णतेला धडक देऊन आघात केला. शहरापासून दूरवर असलेल्या, स्वयंपूर्णतेने जीवन जगणाऱ्या खेड्याचे हक्क त्या शहरांनी हिरावून घेतले आहेत आणि त्यांना परावलंबी करून सोडले आहे. परकीयांची आक्रमणे आणि आन्तरिक बंडाळ्या, राजे-राजवाड्यांतील वंशपरागत युद्धे यांतून ती वाचली हा त्यांचा फार मोठा विजयच मानावा लागेल.

## सांस्कृतिक संबंध

साधारणपणे ख्रिस्तपूर्व पंधराशेपासूनच प्रादेशिक भावनेचा उद्गम होऊन आपले वैशिष्ट्य दिसू लागले होते. त्याची कारणे म्हणजे भारतात चोहोकडे सांस्कृतिक संबंध, कलाविषयक प्रश्न, वंशविषयक समस्या या संबंधीची सर्वसाधारण जागृतीची भावना निर्माण होऊ लागली होती आणि या प्रादेशिक भावनेतूनच सांस्कृतिक संबंध सुरू झालेले दिसून येतात. महाराष्ट्राचे म्हैसूर, गुजरात, मध्यप्रदेश आणि आंध्र यांच्याशी ते संबंध कायमचे टिकून होते आणि त्यामुळेच शेजारच्या प्रांताला जे जे काही लागेल ते तो त्या प्रांतातून घेऊन जात असे.

त्या काळी नर्मदा तीरावर राहणारे लोक गहू, हरबरा डाळ, मूग, तांदूळ, मसूर आणि एक प्रकारची वाळपापडी व बोरे खात होते; हे महेश्वर, नावडाटोली येथे केलेल्या उत्खननावरून सिद्ध झालेले आहे आणि ही अन्नधान्ये उत्तरेकडून खाली दक्षिणेत पसरत आलेली असावीत. इनामगाव येथे फक्त गहू व डाळ आढळली. ती खानदेशामार्फत माळव्यातून आलेली असावी. सुतार-कामाची घासून गुळगुळीत केलेली दगडी हत्यारे, छिन्न्या, दगडी पटाऱ्या, मोठमोठ्या दगडी कुऱ्हाडी, तसेच मृतांना घरात पुरण्याच्या पद्धती या गोष्टी दक्षिणेकडून महाराष्ट्रात आलेल्या दिसून येतात. महाराष्ट्राचे वैशिष्ट्य म्हणूनच जर काही दाखवायचे असेल, तर ती म्हणजे मातीची भांडी. मातृकेच्या पूजापद्धतीचा त्यावेळी महाराष्ट्रात आढळ होतो. परंतु तीसुद्धा परदेशातूनच म्हणजे पश्चिम आशियातून इकडे आलेली दिसून येते. प्रकाशे येथे जळलेल्या लाकडाच्या प्राप्त अवशेषा-वरून तेथे त्या काळी खैर, सागवान, सिसम ह्या प्रकारची झाडी होती, हे सिद्ध होते.

या सर्व गोष्टी विचारात घेतल्या, की भारतात दिसून येणारी ही संस्कृती आणि तिच्याशी संबंधित अशी इतरत्र असलेली संस्कृती आणि त्यांचा विकास वा वाढ ही बाहेरच्या संपर्काशिवाय होऊ शकलेली नाही, हे अगदी स्पष्ट होते. या गोष्टीला आणखी एक दुजोरा मिळतो. १९५९–६० मध्ये नेवासे आणि १९६३ मध्ये चांडोली येथे करण्यात आलेल्या उत्खननांतून त्या ठिकाणी प्राप्त झालेले मृतांचे सांगाडे शारीरिक दृष्ट्या पाहता सध्याचे जे आदिवासी किंवा भिल्ल यांच्यासारखे वरून दिसत असले, तरी या जमातीच्या आणि ताम्रपाषाणयुगीन जमातीच्या भौतिक गोष्टींची तुलना करता तत्कालीन लोक हे सध्याच्या आदिवासी किंवा भिल्ल जमातीपेक्षा कितीतरी पुढारलेले होते हे दिसून येते.

## महाराष्ट्रातला आणि बाहेरचा मानव

गेल्या सुमारे दहा वर्षांपासून महाराष्ट्रामधील ताम्रपाषाणयुगीन कालात सांस्कृतिक बदल कसकसे होत गेले आहेत, याचे आता हळूहळू स्पष्ट चित्र उमटू लागले आहे. अश्मयुगीन कालखंडाच्या लाख ते दीड लाखाच्या प्रदीर्घ कालखंडात महाराष्ट्रातील मानव हा सांस्कृतिक दृष्ट्या बाहेरच्या देशापेक्षा किंवा लगतच्या प्रांतापेक्षा कुठेही कमी नव्हता हे यापूर्वी दाखवून दिलेले आहेच. तेच कौशल्य, तीच पद्धती, तशीच निर्मिती त्यांनी दगडी हत्यारांत दाखवून दिलेली आहे. दगडी अलंकार, शंखशिंपल्या, आभूषणे तो बनवी व वापरी. त्याची शस्त्रे व आयुधे ती गुळगुळीत दगड घासून करी.

कोणताही भाषिक किंवा सांस्कृतिक विभाग घ्या. त्यात विशेष असे सांस्कृतिक संबंध एकमेकात गुंतलेले दिसून येतात. मग त्यात काही दूरचे असतील किंवा काही नजीकचे. तसेच काही स्थानिक पण असू शकतील. ते नेहमीच संमिश्र असतात. अशा विविध प्रकारच्या संबंधांतून बनलेल्या संस्कृतीवर नैसर्गिक वा भौगोलिक गोष्टीचा परिणाम होऊन त्यातूनच हळूहळू एक वेगळे वैशिष्ट्य निर्माण होते आणि त्या प्रांताला आपण तशाच प्रकारचे विशेष असे नाव देतो. नंतर कालमानाप्रमाणे त्या नावाने तो प्रांत ओळखला जातो. यातूनच सध्याचे म्हैसूर, गुजरात आणि महाराष्ट्र हे प्रांत निर्माण झाले आहेत.

## धार्मिक कल्पना

पुरातत्त्वीय उत्खननात अनेक वस्तू प्राप्त होतात; परंतु त्यांतील बऱ्याच वस्तूंचा निश्चित अर्थ लावणे अथवा निष्कर्ष काढणे अवघड जाते. विशेषतः धार्मिक कल्पनांसंबंधी निष्कर्ष काढणे तर आणखीच अवघड ठरते. जोपर्यंत देऊळ अथवा देवालय किंवा देव्हारा अशा निश्चित स्वरूपाच्या वस्तू अगर त्यासंबंधीचे काही लिखित पुरावे प्राप्त होत नाहीत, तोपर्यंत तत्संबंधी केलेले अनुमान केवळ तार्किक स्वरूपाचे राहते.

उदाहरण म्हणून सांगावयाचे झाल्यास, सिंधुसंस्कृतीमध्ये लिंगपूजा, पशुपतिपूजा, देवीपूजा, वनस्पतिपूजा इत्यादी होत होती, असे सांगितले जाते. परंतु ही सर्व तार्किक अनुमाने आहेत. कारण मोहेंजोदारो आणि हरप्पा ही सिंधुसंस्कृतीची तत्कालीन मोठी समृद्ध केंद्रे समजली जातात आणि त्यांत एकसुद्धा देवालय अथवा देवघर आतापर्यंत झालेल्या उत्खननांतून प्राप्त झालेले नाही. ज्या काही लिंगांप्रमाणे दिसणाऱ्या दगडी वस्तू, तसेच स्त्रियांच्या ( मूर्तिस्वरूपाच्या ) आकृती प्राप्त झालेल्या आहेत, त्या सर्व संदर्भविरहित स्वरूपाच्या आहेत. एवढेच नव्हे, तर काही वस्तू गटारात तर काही रस्त्यावर पडलेल्या स्थितीत प्राप्त झालेल्या आहेत.

## वेगवेगळे आकार

लिंगांप्रमाणे दिसणाऱ्या वस्तूंत केवळ एकच वस्तू हुबेहूब लिंगाप्रमाणे दिसते. परंतु इतर, ज्यांना आपण लिंग म्हणून संबोधतो, त्या मात्र त्याप्रमाणे नाहीत. त्यांतील काहींचे आकार तर बुद्धिबळाच्या प्याद्यातील आकाराशी जुळणारे, तर काही पटाच्या खेळातील सोंगट्यांप्रमाणे वाटतात.

अशा प्रकारे जोपर्यंत देवघर अथवा मंदिर यांचा देवासह, संदर्भासह, पुरावा उपलब्ध होत नाही, तोपर्यंत अशा वस्तूंची पूजा होत होती किंवा नाही, हे निश्चितपणे सांगणे अत्यंत अवघड आहे. नेवासे येथील उत्खननात दोन स्त्रियांच्या अर्ध-भाजलेल्या मातीच्या आकृती मिळाल्या होत्या, तिथे जशी एक नंदीप्रमाणे आकृतीही मिळाली होती. तशाच प्रकारच्या बैलाची आकृती १९६१ सालच्या चांडोली येथील उत्खननातही प्राप्त झाली. चांडोलीच्या बैलामध्ये मात्र एक वैशिष्ट्य दिसून येते. त्याची तोंड असलेली बाजू बाटलीच्या तोंडाप्रमाणे आहे. तांबूस रंगाच्या शरीरावर काळ्या रंगाचे पट्टे रंगवलेले दिसून येतात. पायाखाली पूर्वी चार लहान चाके होती ती नष्ट झालेली आहेत.

अगदी अशाच प्रकारच्या बैलांची व स्त्रियांची आकृती नुझी येथे झालेल्या उत्खननात प्राप्त झालेली आहे. आणि विशेष म्हणजे त्या आकृती मंदिरांत आढळून आल्या. नुझी हे ठिकाण इराक व इराण या देशांच्या सरहद्दीवर आहे. यावरून असे अनुमान निघते, की ज्या मातृदेवीची पूजा तेथे ताम्रपाषाणयुगांत प्रचलित होती, तशाच प्रकारची पूजा पश्चिम महाराष्ट्रातही ताम्रपाषाणयुगांत प्रचलित असावी व या गोष्टीचा निश्चित स्वरूपाचा एक महत्त्वपूर्ण पुरावा इनामगाव येथील नव्या उत्खननात प्राप्त झालेला आहे.

गेल्या दोन वर्षांमध्ये इनामगाव येथे पार पडलेल्या उत्खननात सर्वात वरच्या थरातील शेवटच्या कालखंडातील घरे बाहेर काढली, ती सर्व आकाराने गोल होती. त्यांतील प्रत्येक घरात तांबूस रंगाची भांडी आढळून आली. काळ्या व लाल रंग असलेल्या खापरांची मात्र एकच वाटी मिळाली. तसेच मृत मानवाच्या घरातच बांधलेल्या कबरी पण आढळून आल्या. त्याचप्रमाणे तीन-चार स्त्रियांच्या व दोन-तीन पुरुषांच्या अर्ध-

भाजलेल्या व कच्च्या अशा मूर्तीही प्राप्त झाल्या होत्या; परंतु त्या सर्वांचा निश्चित संदर्भ हाती आला नव्हता. त्यामुळे त्यासंबंधी शंका येत होती, की कदाचित या देवदेवतांच्या मूर्ती नसाव्यातही.

## नवे उत्खनन

१९७० च्या उत्खननात असे आढळून आले, की गोल घरांच्या खाली राहणारे, त्यांच्या अगोदरच्या कालखंडातील लोक हे चौरसाकृती घरात राहत होते आणि त्यांची घरे आकाराने नंतरच्या घरांपेक्षा मोठी होती. त्यांतील एका घराचे क्षेत्रफळ तर अठरा फूट लांब व दहा फूट रुंद एवढे मोठे होते. तसेच एका घरापासून दुसऱ्या घरांकडे जाण्यायेण्यासाठी बनवलेले मार्गही आढळून आले. त्यांची घरातील जमीन अगदी उत्तम प्रकारची बनवलेली असे. एका घरांत तांब्याचे मोठाले वाळे ( कडी ) तर दुसऱ्या घरात मातीची बऱ्याच मोठ्या प्रमाणात असलेली भांडी आढळून आली.

घरातील भांड्यांची मोजदाद करता ती एकशेतीन इतकी भरली. यावरून इनामगावचे त्या काळातील रहिवासी हे सर्वांत वरच्या थरातील रहिवाशांपेक्षा अधिक समृद्ध दिसून येतात. अशाच एका घराची जमीन स्वच्छ करून तिची बारकाईने पाहणी करीत असताना डॉ. झैनुद्दिन अन्सारी व डॉ. मधुकर ढवळीकर यांना त्या घरातील जमिनीत मुद्दाम तयार केलेला एक खड्डा दिसून आला आणि अत्यंत काळजीपूर्वक त्या भागाचे उत्खनन करता त्या खड्ड्यात एक मातीची पेटी मिळाली.

मातीच्या या पेटीवर स्त्रीची एक लहान मूर्ती ठेवलेली दिसून आली आणि त्याच्या शेजारी एक मातीचा बैल पडलेला दिसून आला. यावरून असे अनुमान आहे, की तो बैलही पूर्वी पेटीवरच ठेवलेला असला पाहिजे. याचबरोबर मातीचे एक अर्धगोलाकृती कडेही आढळून आले. ( आकृती ५ )

मातीच्या पेटीचा आकार हा सर्वसाधारण लंबचौकोनाकृती आहे. त्याचे मोजमाप : लांबी बारा सेंटिमीटर, रुंदी पाच सेंटिमीटर व उंची सहा सेंटिमीटर असे आहे. पेटीचे झाकणही मातीचे असून, उत्तम प्रकारे बनवलेले आहे. त्याची दोन्ही बाजूची टोके आकाराने उंच असून अंतर्गोल आहेत. त्यामुळे झाकण व्यवस्थित बसवले तर ते अगदी घट्ट बसते. पेटीचे झाकण उघडले तेव्हा आत स्त्रीची मूर्ती असलेली आढळून आली.

आतील मूर्ती व पेटीच्या वर आढळून आलेली मूर्ती यात एक महत्त्वाचा फरक दिसून आला. वरची मूर्ती ही शिरविरहित, केवळ धडच असलेली आढळून आली. तसेच ती मुद्दाम शिरविरहित बनवलेली असावी असे वाटते. पेटीच्या वरील व आतील मूर्तींची उंची पाच सेंटिमीटर इतकी असून, इतर परिमाणे एकसारखीच वाटतात. शरीराच्या बनावटीमध्ये उन्नत उरोजाशिवाय इतर भागांच्या बनावटीला काहीही प्राधान्य दिलेले दिसून येत नाही. तोंडाचा आकार पिंडीप्रमाणे लंबगोल आहे. हात आणि पाय हे आकाराने लहान केलेले आहेत.

यावरून असे स्पष्ट अनुमान निघते, की ह्या दोन्ही मूर्ती युवतीच्या आहेत आणि या युवतींच्या मूर्तींची देवीच्या रूपाने दररोज पूजा–अर्चा होत होती. असा निश्चित निष्कर्ष काढायला आणखी एक महत्त्वाचा पुरावा म्हणजे पेटीच्या वरील बाजूला ठेवलेली अर्धगोलाकृती वस्तू. ती काही सामान्य वस्तू नव्हे, तर तरुण स्त्रीची आकृती उभी राहण्यासाठी मुद्दाम बनवलेले ते आसन असले पाहिजे. यावरून असे दिसते, की ज्या ठिकाणी ही पेटी मिळाली ते ठिकाण त्या घरातील देवघर असले पाहिजे. आणि अशा पद्धतीने आजही भारतात दररोज हजारो घरांत देवदेवतांची पूजा करण्याची प्रथा चालू आहे. सर्वसाधारणपणे पूजेचे स्थान किंवा देवघर हे स्वयंपाक घराजवळ असलेले दिसून येते. कारण घरात निश्चित स्वरूपाचे देवालय बनवणे शक्य नसते. पावित्र्य आणि सुरक्षितता या दृष्टीने स्वयंपाक घराजवळील स्थान सोयीचे असते आणि त्यासाठी आपण पूजे-अर्चेचे व पूजेचे साहित्य ठेवण्यासाठी देवपेटिकांचा वापर करतो.

अशा प्रकारच्या पेट्या सोन्याच्या, चांदीच्या, तांब्याच्या, चंदनाच्या, हस्तिदंताच्या अथवा वेताच्या किंवा लाकडाच्या पण बनवल्या जातात. जशी ज्याची ऐपत आणि श्रद्धा असेल, त्याप्रमाणे त्या बनवतात. या ठिकाणी मी माझ्या घरचेच उदाहरण देतो. आमच्या मुंबईच्या लहान घरात आम्ही वेताची पेटी पूजेचे देव ठेवण्यासाठी वापरत होतो. दररोज सकाळी त्या पेटीतून देवांच्या मूर्ती बाहेर काढून त्यांची यथाविधि पूजा-अर्चा करून त्या परत पेटीत ठेवल्या जात व पेटी बंद करून ठेवीत. अगदी अशाच स्वरूपाची प्रथा साडेतीन हजार वर्षांपूर्वी इनामगाव येथे प्रागैतिहासिक काळात चालत असलेली दिसून येते.

अशा प्रकारचे देवीचे स्वरूप हे कदाचित चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे. परंतु मानवाने स्त्रीचे स्वरूप व तिचे महत्त्व हे वीस हजार वर्षांपूर्वीच जाणले होते आणि स्त्रियांच्या अशाच स्वरूपाच्या मूर्ती हस्तिदंत, हाडे, मृदुपाषाण यामध्ये कोरलेल्या युरोपमध्ये झालेल्या पुरातत्त्वीय संशोधनात मिळालेल्या आहेत. अशा प्रकारच्या या मूर्तीचा प्रसार युरोपमधून सायप्रस, क्रीट, तुर्कस्तान, इराक, इराण, अफगाणिस्तान आणि नंतर भारत या क्रमाने झालेला दिसून येतो. दोन हजार वर्षांपूर्वी ऐतिहासिक काळातही अशा प्रकारे देवीची पुजा भारतात प्रचलित होती; परंतु इतिहासकाळाच्या अगोदरचा अशा प्रकारचा पुरावा भारतात अद्यापि कोठेही मिळालेला नाही. त्यामुळे अशा प्रकारचे खाजगी स्वरूपाचे पूजास्थान भारतात प्रथमच इनामगाव येथील उत्खननात प्राप्त झालेले असल्यामुळे त्याचे महत्त्व विशेष आहे.

□ □

# महाराष्ट्रातील ‘ महापाषाणीय ’ संस्कृती

शां. भा. देव

लोहयुगीन संस्कृतीमध्ये ‘ महापाषाणीय ’ संस्कृतीचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. भारतामध्ये लोखंडाची प्राचीनता किती असावी याबद्दल विद्वानांमध्ये दुमत होते. काही काळापूर्वी दक्षिण भारतात तरी इ. स. पूर्व तिसऱ्या शतकाच्या आधी लोखंडाचा वापर प्रचलित नव्हता, असे ब्रह्मगिरीच्या उत्खननावरून सर मॉर्टिमर व्हीलर यांनी मत बनविले होते. परंतु अलीकडे उत्तर प्रदेशातील हस्तिनापुर येथे, महाराष्ट्रात टाकळघाट येथे व कर्नाटकात हल्लूर येथे जी उत्खनने करण्यात आली, त्यानुसार लोखंडाची प्राचीनता इ. स. पूर्व सुमारे एक हजार इतकी मागे नेता आलेली आहे.

महापाषाणीय संस्कृती लोहयुगातील आहे याबद्दल शंका नाही. या संस्कृतीचे अवशेष भारतात निरनिराळ्या प्रदेशात मिळत असले, तरी प्रामुख्याने तिचे केन्द्रीकरण दक्षिण भारतामध्ये झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र हा दक्षिण व उत्तर भारतामधील दुवा असल्याने, महाराष्ट्रातही महापाषाणीय संस्कृतीची काही प्रदेशावर का होईना, छाप पडल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील विदर्भ विभागाच्या भंडारा, नागपूर, वर्धा व चांदा या चार जिल्ह्यांत प्रामुख्याने महापाषाणीय अवशेष विखुरल्याचे आढळून येते.

या संस्कृतीच्या लोकांनी मानवी दफनांच्या रचनेमध्ये मोठमोठ्या दगडी शिळांचा व फरशांचा वापर केल्याचे आढळून येते. अशा तऱ्हेच्या दफनांचे विविध प्रकार दक्षिणेत आढळून येत असले तरी महाराष्ट्रात मात्र ही विविधता दिसून येत नाही. दफन पद्धतीचे फक्त एक दोन प्रकारच महाराष्ट्रात दिसून येतात.

दफन पद्धतीमध्ये शिळावर्तुळांची रचना करण्याव्यतिरिक्त या संस्कृतीची आणखीही काही वैशिष्ट्ये आहेत. हे लोक एका विशिष्ट तऱ्हेची काळी-तांबडी खापरे वापरीत असत. या मडक्यांचा आतील संपूर्ण भाग व बाहेरील काठाचा भाग काळाभोर व चकचकीत असून, बाहेरील बुडाला मात्र तो लाल झाल्याचे दिसून येते. निमुळत्या बुडाचे गडवे व वाडगे हे आकार प्रामुख्याने प्रचलित असल्याचे दिसून येते. ही भांडी उलटी ठेवून भट्टीत भाजल्यामुळे काळी-तांबडी झाली असे कांहींचे मत आहे. ही मडकी पातळ असून

त्यांपैकी काहींवर रेषा कोरून काही वैशिष्ट्यपूर्ण चिन्हे काढल्याचे आढळून येते. अशा तऱ्हेच्या मडक्यांव्यतिरिक्त लोखंडाची विविध उपकरणे व हत्यारे, रंगीबेरंगी दगडाचे विविध आकारांचे मणी, तांब्याच्या निरनिराळ्या वस्तू व दगडी घत्ते यांचाही हे लोक वापर करीत असत. या संस्कृतीच्या लोकांची स्थिर बसतीची ठिकाणे अद्याप फारशी ज्ञात नसली, तरी वर उल्लेखिलेल्या सर्व वस्तू ते मानवी अवशेषांबरोबर दफनात ठेवीत असल्याने त्यावरून त्यांच्या रोजच्या जीवनातील वापराच्या वस्तूंबद्दलची माहिती मिळते.

वर उल्लेखिल्याप्रमाणे दक्षिण भारतामध्ये महापाषाणीय संस्कृतीची निदर्शक अशी विविध तऱ्हेची दफने आढळून येतात. यांतील काहींमध्ये मधोमध मोठमोठ्या पाच ते सात फूट उंचीच्या अवजड फरशा लावून पेटीसारखी रचना करण्यात येई. यातील एका फरशीला गोल छिद्र केलेले असून, यातून मृताच्या अस्थी, अलंकार व आयुधे; त्याच-प्रमाणे काळी-तांबडी मडकी ठेवली जात. त्यानंतर आणखी एक मोठी फरशी वर ठेवून हे संबंध दफन दगड-गोट्यांनी झाकून टाकीत. काही दफनांत या दगडी पेटीच्या शिळांचे कंगोरे जमिनीवर दिसतील अशा तऱ्हेने रचना केलेली आहे. काहींमध्ये मोठमोठ्या शिळा वर्तुळात लावून मध्यभागी उथळ खड्ड्यात अथवा शवघटात, वा मातीच्या किंवा लाकडी शवपेटिकेमध्ये मृताचे अवशेष ठेवून, त्यावर मातीचा व दगड-गोट्यांचा भराव टाकीत. या भरावात मृताची आयुधे, अलंकार वगैरेही पुरले जात. काही दफनामध्ये मोठ-मोठ्या फरशांची प्रकोष्ठ ( Dolmen ) तयार करीत, याउलट काहींमध्ये ३–४ प्रचंड शिळांवर आणखी एक मोठी शिळा छत्रासारखी अथवा टोपीसारखी ठेवीत असत. तर दुसऱ्या एका मृताच्या स्मरणार्थ एकच प्रचंड शिळा उभारली जाई.

या संदर्भात एक गोष्ट नमूद करणे अवश्यक आहे, की महापाषाणीय अवशेष व स्मारके केवळ भारतातच सापडतात असे नसून, वर उल्लेखिलेले विविध प्रकार जगाच्या अनेक भागांमध्ये आढळून येतात. या संस्कृतीचा युरोपातील काळ इ. स. पू. २५०० ते १५०० इतका प्राचीन असला, तरी भारतात मात्र तो इतका प्राचीन असल्याचे अद्याप आढळून आलेले नाही. दुसरी एक गोष्ट नमूद केली पाहिजे, की भारतात आजही मृताच्या स्मरणार्थ शिळावर्तुळे व प्रचंड शिळाखंड उभारण्याची पद्धत आसाम, छोटा-नागपूर व दक्षिणेतील कुर्ग प्रदेशातील टोळ्यांमध्ये प्रचलित आहे.

महापाषाणीय संस्कृतीचे अवशेष प्रामुख्याने दक्षिण भारतामध्ये सापडलेले आहेत. असे असले तरी या संस्कृतीचे अवशेष मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, आसाम व काश्मीरमध्येही विखुरलेले आढळून येतात. यावरून या संस्कृतीची व्याप्ती बरीच मोठी होती असे म्हणावयास हरकत नाही. एवढ्या मोठ्या प्रदेशामध्ये या संस्कृतीचा विस्तार कसकसा व कोणत्या काळात झाला याचे संपूर्ण व सुसंगत चित्र उभे करता येत नाही. मात्र दक्षिण भारतात ही संस्कृती दृढमूल झाल्याचे दिसून येते. कारण याच प्रदेशात या संस्कृतीची विविध प्रकारची दफने खूप मोठ्या संख्येने आढळून येतात. एवढेच नसून प्राचीन तमिळ वाङ्मयामध्ये अशा तऱ्हेच्या दफनपद्धतीचे, दफनकुंभांचे

आकृती ५



महापाषाणीय शिलावर्तुळ, खापा

पृ. ४३



पृ. ४३–४४ पक्ष्याच्या नक्षीची झाकणी, खापा

व शवपेटिकांचे उल्लेख आढळून येतात. या संस्कृतीच्या अशा वैशिष्ट्यपूर्ण दफनांची पद्धती दक्षिण भारतामध्ये इ. स. च्या पहिल्या–दुसऱ्या शतकापर्यंत प्रचलित होती, असे या दफनांमध्ये सापडलेल्या रोमन नाण्यांच्या व इतर रोमन वस्तूंच्या पुराव्यावरून दिसून येते. लोहयुगाच्या सुरुवातीपासून ते तहत इ. स.च्या पहिल्या–दुसऱ्या शतकापर्यंत अशा तऱ्हेची वैशिष्ट्यपूर्ण दफने निर्माण करणारे हे कोण लोक होते, याबद्दल मात्र निश्चितपणे मानववंशशास्त्रज्ञ सांगू शकत नाहीत. काहींच्या मते हे लोक तत्प्रदेशी द्रविड वंशाचे असावेत, तर काहींच्या मते हे पश्चिमेकडून समुद्रमार्गे भारतात आले असावेत.

महापाषाणीय संस्कृतीच्या वर उल्लेखिलेल्या ज्ञात माहितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील महापाषाणीय पुराव्याचे मूल्यमापन करणे सयुक्तिक ठरेल. या संस्कृतीच्या अवशेषांचा मागोवा दक्षिण भारतात अदिचनल्लूर येथे १८७६ साली घेण्यात आला. महाराष्ट्रात नागपूरजवळील शिळावर्तुळांचे उत्खनन पहिल्या प्रथम मेजर पिअर्स व हिस्लॉप यांनी केले. यानंतर १९६१–६२ साली भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने नागपूरजवळील जुनापानी येथील अश्मवर्तुळांचे उत्खनन केले. त्यानंतर १९६८–६९ व १९७१ साली नागपूर विद्यापीठाने अनुक्रमे टाकळघाट–खापा व माहूरझरी या नागपूरजवळील स्थलांच्या शिळावर्तुळांचे उत्खनन केले. याशिवाय, खानदेशात रंजाळा येथे महापाषाणीय काळी–तांबडी खापरे सापडलेली आहेत. याचप्रमाणे बहाळच्या उत्खननामध्ये या संस्कृतीचा निदर्शक असा काही पुरावा मिळालेला आहे. पुण्याजवळ भोसरी येथे या संस्कृतीचे निदर्शक असे तीन शिलाप्रकोष्ठ व दोन शिळास्तंभ सापडलेले आहेत. मात्र नागपूर, भंडारा व चांदा या जिल्ह्यांत शेकडो शिळावर्तुळे अस्तित्वात असल्याचे आढळून आले असल्याने महाराष्ट्रात तरी या संस्कृतीचा प्रभाव प्रामुख्याने पूर्व विदर्भात पडला असे म्हणणे योग्य होईल. आणि हा प्रभावदेखील, महापाषाणीय संस्कृतीच्या विविध दफन प्रकारांपैकी प्रामुख्याने शिळावर्तुळांच्याच स्वरूपात दिसून येतो.

महाराष्ट्रात आतापर्यंत या संस्कृतिविषयक जी उत्खनने व जे अन्वेषण झाले त्याचा आता आढावा घेणे इष्ट ठरेल.

## जुनापानी

नागपूरपासून सुमारे नऊ किलोमीटर अंतरावर असलेल्या स्थळी सुमारे दीडशे शिळावर्तुळे असून, हे स्थल शिळावर्तुळांचे केन्द्र म्हणून ख्यातनाम झालेले आहे. या ठिकाणाची पुरातत्त्वीय महती १८६७ सालीच ओळखण्यात आली व १९६१–६२ साली भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याने येथील तीन शिळावर्तुळांचे उत्खनन केले. १० ते १६ मीटर व्यासाच्या या वर्तुळाच्या उत्खननात मधोमध एका उथळ खड्ड्यामध्ये मानवी अवशेष ठेवल्याचा पुरावा मिळाला. या अवशेषावर सुमारे तीन फूट जाडीचा काळ्या-मातीचा व त्यावर दगडगोट्यांचा भराव टाकल्याचे आढळून येते. या भरावातच, पुरलेल्या मानवाच्या लोखंडी कट्यारी, भाले, कुऱ्हाडी, छिन्नी व पळ्या इत्यादी वस्तू टाकलेल्या

आढळल्या. त्याचबरोबर तांबड्या पृष्ठभागावर पांढऱ्या रंगात नक्षी काढलेले कार्नेलियनचे मणी, चकतीच्या आकाराचे सोन्याचे मणी व सोन्याची वळी सापडली. याशिवाय, भरीमध्ये काळी आणि तांबडी, पूर्णपणे काळी, पूर्ण तांबडी व अभ्रकयुक्त मातीची तांबडी मडकीही पुरली होती. काळ्या रंगात रेषा काढलेला व तोटी असलेला वाडगा वैशिष्ट्यपूर्ण होता. या सर्व वस्तूंबरोबरच तांब्याचे वाळे, लोखंडाचा लोलक असलेली तांब्याची घंटा व अश्ववर्गाच्या पशूचे अवशेषही पुरण्यात आलेले होते. वरील पुराव्यावरून असे दिसून आले, की मृताबरोबर त्याला दररोजच्या जीवनात लागणाऱ्या अलंकार-आयुधादी वस्तूंबरोबर त्याचा घोडाही पुरण्यात येत असे. मात्र मानवी हाडांचा व पुरलेल्या मातीच्या भांड्यांचा संपूर्णपणे चुराडा झालेला असल्याने याबद्दलचा सखोल अभ्यास करून त्यावरून निष्कर्ष काढणे शक्य झाले नाही.

## माहूरझरी

जुनापानीच्या समोर सुमारे २ किलोमीटर असलेल्या माहूरझरी येथेही अनेक शिळावर्तुळे आहेत. त्यांचे उत्खनन १९७० साली नागपूर विद्यापीठातर्फे करण्यात आले. येथील पुरावाही जुनापानीच्या शिळावर्तुळांच्या उत्खनित पुराव्यासारखाच आढळून आला. मात्र या ठिकाणी काही शिळावर्तुळे उंच टेकाडमाथ्यावर तर काही प्राचीन जलाशयांच्या शेजारी योजलेली आढळून आली. माहूरझरी येथील शिळावर्तुळांच्या उत्खननात सापडलेल्या काही वैशिष्ट्यपूर्ण अवशेषांचा उल्लेख करावा लागेल. सोन्याच्या तारेची चक्राकृती कर्णफुले, व तांब्याच्या पत्र्याचा विविध आकारांचा घोड्याच्या अंगावर घालण्यात येणारा साज; तसेच काळ्या रंगात रेषांची नक्षी काढलेली अभ्रकयुक्त तांबड्या रंगाची मडकी या वस्तू वैशिष्ट्यपूर्ण होत्या. मानवाबरोबरच घोड्याचेही अवशेष शिळावर्तुळात पुरण्याची पद्धत माहूरझरी येथेही प्रचलित होती, असे दिसून आले. माहूरझरी येथील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण पुरावा म्हणजे तेथे सापडलेले शेकडो मणी. त्यांच्या संख्येवरून प्राचीन काळात खुद्द माहूरझरी येथे मणी बनवण्याचे केन्द्र असावे असे म्हणता येईल. अशाच तऱ्हेचे, पांढऱ्या रंगात नक्षी काढलेले तांबड्या कार्नेलिअन दगडाचे मणी दक्षिण भारतातील अनेक महापाषाणीय दफनांमध्ये सापडलेले आहेत.

## टाकळघाट-खापा

नागपूरपासून ३६ किलोमीटर अंतरावर कृष्णा नदीच्या काठी टाकळघाट व खापा समोरासमोर आहेत. यातील खापा येथे जुनापानी-माहूरझरीप्रमाणेच अनेक शिळावर्तुळे, टाकळघाट येथे वसतीचे अवशेष व खापा येथे फक्त शिळावर्तुळे आहेत. परंतु अन्वेषणात या दोन्ही ठिकाणी समान स्वरूपाची काळी-तांबडी खापरे, अभ्रकयुक्त तांबडी खापरे व पांढऱ्या रंगात तांबड्या दगडावर नक्षी कोरलेले मणी सापडले. टाकळघाटच्या शिळावर्तुळांचा व टाकळघाटच्या वसतीच्या अवशेषांचा एकमेकांशी संबंध असला पाहिजे,

असा अंदाज करता आला. महापाषाणीय लोक कशा प्रकारे राहत असत, हे दर्शविणारी स्थले फारशी ज्ञात नसल्याने व टाकळघाट-खापा उत्खननात महापाषाणीय दफनांची व त्याचप्रमाणे या लोकांच्या जीवनपद्धतीची माहिती मिळण्याचा संभव असल्याने नागपूर विद्यापीठाने या ठिकाणी १९६८–६९ साली उत्खनन केले.

टाकळघाट येथे महापाषाणीय लोक कुडाच्या घरात राहत असत. चिखल थापून त्यावर चुन्याचे सारवण देऊन घरातील जमिनी तयार केल्या जात. काळ्या आणि तांबड्या रंगाची मातीची वाडगी व थाळ्या, त्याचप्रमाणे अभ्रकयुक्त मातीपासून बनविलेले घडे आणि कळशा, पराती, लोटे ते वापरीत असत. याशिवाय, काळ्या रंगात रेखाचित्रण केलेले तांबड्या रंगाचे मातीचे घडेही ते रोजच्या वापरात आणीत असत. त्यांना लोखंडाचा व तांब्याचा वापर माहीत होता, हे उत्खननात सापडलेल्या लोखंडाच्या भाला, खंजीर, बाणाची टोके, त्याचप्रमाणे तांब्याच्या बांगड्या इ. वस्तूंवरून दिसून आले. हे लोक रंगी-बेरंगी दगडापासून बनविलेल्या निरनिराळ्या आकारांच्या मण्यांचा अलंकार म्हणून वापर करीत असत. यातील काही तांबड्या कार्नेलिअन दगडाच्या मण्यांवर पांढऱ्या रंगात नक्षी केलेली आहे. असे मणी टाकळघाटच्या वसतीच्या थरात सापडले. एवढेच नव्हे, तर खापा येथील शिळावर्तुळांत व दक्षिण भारतातही अनेक शिळावर्तुळांत सापडलेले आहेत. टाकळघाट येथील महापाषाणीय लोकांनी गाई, बैल, बकरे व घोडे पाळलेले होते, हे उत्खननात सापडलेल्या प्राण्यांच्या हाडांवरून दिसून आले.

खापा (आकृती ५) येथील शिळावर्तुळांच्या उत्खननात जुनापानी व माहूरझरी येथील शिळावर्तुळांच्या उत्खननामध्ये आढळून आल्याप्रमाणेच पुरावा मिळाला. सर्वसाधारणपणे खापाच्या शिळावर्तुळांचा व्यास बारा ते पंधरा मीटर असला, तरी एक शिळावर्तुळ २३ मीटर व्यासाचे होते. वर्तुळाच्या मध्यभागी मानवाची अवशिष्ट हाडे व घोड्याचे अवशेष एकत्र पुरलेले आढळून आले. एक मीटर जाडीच्या काळ्या मातीच्या व दगडगोट्यांच्या भरावर मृताचे विविध दागदागिने व आयुधे, त्याचप्रमाणे काळी–तांबडी मडकी व अभ्रकयुक्त तांबडी मडकी पुरली गेली होती. या मडक्यांचे आकार टाकळघाटच्या लोक-वसतीच्या थरात सापडलेल्या मडक्यांशी मिळतेजुळते होते. मृताबरोबर तांब्याच्या बांगड्या, तांब्याच्या थाळ्या व त्यावरील झाकण्या; त्याचप्रमाणे लोखंडाचे भाले, कढया, तलवारी, दाभणे, कानकोरणी, राप्या इत्यादी वस्तू ठेवलेल्या होत्या. यांतील लोखंडी कुऱ्हाडी वैशिष्ट्यपूर्ण होत्या. त्यांचे पाते चपटे, आकार काटकोन–चौकोनी व वरील टोक सपाट तर कामास उपयोगी येणारे टोक बहिर्गोल व धारदार होते. अशा कुऱ्हाडी फुलीच्या आकारात बसविलेल्या लोखंडी पट्टयाने दांड्यावर बसविल्या जात. अशा तऱ्हेच्या कुऱ्हाडी जुनापानी, माहूरझरी व दक्षिणेतील अनेक महापाषाणीय दफनांमध्ये मिळालेल्या आहेत.

खाप्याच्या शिळावर्तुळांत दोन अप्रतिम अवशेष सापडले. हे दोन्ही तांब्याचे असून, त्यांतील एक उत्कृष्टपणे बनविलेली झाकणी आहे. ही झाकणी गोल बुडाची व

निमुळत्या शीर्षाची असून, तिच्या माथ्यावर चार पक्षी दाखविलेले आहेत. पक्षी फार डौलदार आहेत. (आकृती ६) अशा तऱ्हेच्या पक्ष्यांची आकृती असलेल्या मातीच्या झाकण्या आजही निलगिरी विभागात राहणाऱ्या आदिवासी जमाती वापरतात. दुसरा वैशिष्ट्यपूर्ण अवशेष म्हणजे घोडयाच्या सांगाडयाच्या मुखभागावर सापडलेला तांब्याच्या पत्र्याचा दागिना. हा घोडयाच्या मुखावर बसेल अशा आकाराचा कापलेला असून, त्यावर तांब्याचे कोन बसविलेले आहेत. हे कोन मागे लोखंडाच्या पिना लावून मजबूत केलेले आहेत. अशा तऱ्हेचा दागिना अद्याप इतरत्र सापडलेला नाही. ( आकृती ७ )

शिळावर्तुळांत सापडलेले अवशेष फक्त मानवाचे व घोड्याचे होते. इतर पाळीव जनावरे पुरलेली आढळून आली नाहीत. मानवाचे जे अवशेष सापडले त्यावरून असे दिसून आले, की यांतील काही व्यक्ती सतरा ते वयोवीस या वयोगटातील होत्या, तर काही शिळावर्तुळांत एकापेक्षा जास्त व्यक्तींचे अवशेष पुरल्याचे आढळून आले.

## पवनार

विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील पवनार हे वाकाटक सम्राटांची राजधानी प्रवरपूर असावे, असे काही विद्वानांचे मत असल्याने नागपूर विद्यापीठाने १९६७ साली येथे उत्खनन केले. या उत्खननात सर्वप्राचीन वसतीच्या अवशेषात काळी–तांबडी खापरे त्याचप्रमाणे अभ्रकयुक्त मातीची तांबड्या रंगाची मडकीही सापडली. या खापराचा पोत व आकार जुनापानी, टाकळघाट, माहूरझरी येथील वर्तुळांत मिळालेल्या तत्सम पुराव्याशी मिळता-जुळता होता. याशिवाय पवनार येथील पहिल्या वसतीच्या अवशेषात सापडलेली काळ्या रंगात रंगवलेली अभ्रकयुक्त मातीची तांबडी भांडीसुद्धा टाकळघाट व माहूरझरी येथे सापडलेल्या रंगीत खापरासारखीच होती. पवनारचे पहिल्या वस्तीचे लोकही टाकळघाट-प्रमाणेच घराच्या जमिनी चिखल थापून त्यावर चुन्याचे सारवण देऊन करीत असत. यावरून पवनार येथे जरी शिळावर्तुळे नसली, तरी येथील पहिल्या वस्तीचे लोक व टाकळघाट येथील महापाषाणीय लोक यांच्यामध्ये सांस्कृतिक साम्य होते, असे म्हणता येते.

## कौंडिण्यपूर

अमरावती जिल्ह्यात वर्धा नदीच्या काठी असलेल्या या ठिकाणचे उत्खनन १९६२–६४ साली करण्यात आले. याही ठिकाणी जे सर्वप्रथम वस्तीचे अवशेष मिळाले त्यांस महापाषाणीय असे संबोधिले आहे. या वस्तीशी संलग्न असलेल्या थरात काळी-तांबडी खापरे, लोखंडाची आयुधे, पांढऱ्या रंगात नक्षी काढलेले तांबड्या कार्नेलिअन दगडाचे मणी व अभ्रकयुक्त मातीची तांबडी मडकी सापडली. यांतील काही काळ्या-तांबड्या खापरावर कोरून रेखांकन केलेले आहे.

रेखांकन केलेली काळी-तांबडी खापरे, पांढऱ्या नक्षीचे कार्नेलिअनचे मणी, अभ्रक-युक्त मातीची व रंगविलेली खापरे, त्याचप्रमाणे काही लोखंडी अवजारे; पवनार, टाकळ-घाट व माहूरझरी येथे मिळालेल्या तत्सदृश पुराव्याशी मिळतीजुळती असल्याने कौंडिण्यपूर व पवनार येथील पहिल्या वस्तीचा कालखंड; त्याचप्रमाणे टाकळघाट–खापा, जुनापानी व माहूरझरी येथील शिळावर्तुळे निर्माण करणारे लोक एकाच म्हणजे महा-पाषाणीय संस्कृतीचे असले पाहिजेत, असे म्हणता येईल.

## रंजाळा

पूर्व विदर्भात महापाषाणीय संस्कृतीचे स्वरूप जसे शेकडो शिळावर्तुळांच्या स्वरूपात पाहावयास मिळते तसे ते महाराष्ट्रात इतरत्र पाहावयास मिळत नाही. जसजसे पश्चिमे-कडे जावे तसतसे या संस्कृतीचा प्रभाव कमी पडल्याचे प्रत्यंतर येते; परंतु या संस्कृतीचा संपर्क खानदेशातही आल्याचे दिसून येते. खानदेशात धुळे जिल्ह्यात रंजाळा येथे महा-पाषाणीय संस्कृतीची प्रातिनिधिक अशी काळी-तांबडी मातीची भांडी पूर्ण स्वरूपात सापडलेली आहेत. यात वाडगे, निमुळत्या बुडाची भांडी व स्टँड असून यातील काहींवर कोरून रेखांकन करण्यात आलेले आहे. या भांड्यांची बनावट, त्यांचा पोत, त्यांचे आकार व त्यावरील रेखांकन दक्षिण भारतात सापडलेल्या महापाषाणीय पुराव्याशी मिळतेजुळते आहे.

## टेकवडा

खानदेशातच गिरणा नदीच्या काठी बहाळ व टेकवडा ही स्थळे आहेत. यातील बहाळ येथे ताम्रपाषाणयुगीन वसतीचे अवशेष मिळाले आहेत. यातील ताम्रपाषाणयुगाच्या १ / ब या कालखंडातील लोकांनी बहाळच्या समोरच असलेल्या टेकवडा येथे आपल्या मृतांचे दफन केले. अशा एका दफनामध्ये महापाषाणीय संस्कृतीशी संलग्न असलेल्या काळ्या–तांबड्या वर्गाचे मातीचे वाडगे ठेवलेले आढळले. या वाडग्यांवर महापाषाणीय वाडग्यांप्रमाणेच कोरून चिन्हांकन केलेले आढळले. या पुराव्यावरून असे म्हणता येते, की महापाषाणीय संस्कृतीचा खानदेशात ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीशी संपर्क आला असावा.

## भोसरी

पुण्याजवळ पुणे–नासिक रस्त्यावर सुमारे चौदा किलोमीटर अंतरावर भोसरी येथे तीन शिलाप्रकोष्ठ ( Dolmen ) व दोन शिलास्तंभ ( Menhir ) असल्याचा उल्लेख आढळतो. डेक्कन कॉलेजतर्फे या अवशेषांचे जे अन्वेषण झाले त्यानुसार असा निष्कर्ष काढण्यात आला, की हे अवशेष प्रत्यक्ष दफनाचे निदर्शक नसावेत; परंतु ते मृतांचे स्मारक म्हणून उभे करण्यात आलेले असावेत. या संदर्भात हे लक्षात घेतले पाहिजे, की

सध्याचे भोसरीचे रहिवासी या शिलाप्रकोष्ठात शेंदूर लावून ठेवलेल्या दगडाची चेडोबा या नावाने पूजा करतात. सध्याच्या काळातही कुरूंबर ही धनगर जमात शिलाप्रकोष्ठ-सदृश थडग्यात मृतांना पुरून या शिलाप्रकोष्ठात शेंदूर लावलेला गोल दगड ठेवून त्याची पूजा करतात. काही महापाषाणीय दफन पद्धतींचा व प्रथांचा आढळ महाराष्ट्रातील काही जमातीत आजही प्रत्ययास येतो, ही एक मोठी सूचक गोष्ट आहे.

भोसरीचे सर्वच महापाषाणीय अवशेष शिळावर्तुळाच्या स्वरूपाचे आहेत असे मात्र नाही. यांतील एक बहुकोनी असून, जे गोल आहे त्याचा व्यास दोन मीटर आहे. शिलाप्रकोष्ठ जवळ जवळ पाऊण मीटर रुंदीचे व उंचीचे असून सुमारे अर्धा मीटर खोलीचे आहे. शिलास्तंभ दीड ते अडीच मीटर उंचीचे असून, या शिळांचा परीघ सुमारे एक मीटरइतका आहे. विदर्भातील शिळावर्तुळांशी तुलना करता भोसरीच्या अवशेषांचे वेगळेपण लक्षात येते.

## अनुत्खनित शिळावर्तुळे

उत्खनित महापाषाणीय पुराव्याचे स्वरूप काहीसे त्रोटक आहे यात शंका नाही. परंतु अद्याप शिळावर्तुळांच्या उत्खननाला भरपूर वाव आहे. कारण त्यातूनच महाराष्ट्रातील महापाषाणीय संस्कृतीचे काहीसे पूर्णचित्र उभे करता येईल.

महाराष्ट्राच्या विदर्भ विभागात खालील ठिकाणी महापाषाणीय अवशेष आहेत.

**नागपूर जिल्हा**

( १ ) बोरगाव, ( २ ) बोरार, ( ३ ) गोंडी, ( ४ ) हिंगणे, ( ५ ) जुनापानी, ( ६ ) कोहली, ( ७ ) कोराडी, ( ८ ) माहूरझरी, ( ९ ) निवडोर, ( १० ) रायपूर, ( ११ ) सावरगाव, ( १२ ) टाकळघाट, ( १३ ) वडगाव, ( १४ ) वठोरा.

**भंडारा जिल्हा**

( १ ) ब्राम्बी, ( २ ) पिंपळगाव, ( ३ ) तिलंताखैरी.

**चांदा जिल्हा**

( १ ) चकलपेठ, ( २ ) चाक विठ्ठल वाडा, ( ३ ) चारमुसी, ( ४ ) डोंगरगाव, ( ५ ) हिरपूर, ( ६ ) केळझर, ( ७ ) कुकुड–चिमडा, ( ८ ) रवी, ( ९ ) वागनाक.

वरील बहुतेक ठिकाणी शिळावर्तुळे असली, तरी भंडारा जिल्ह्यातील पिंपळगाव येथे शिलाप्रकोष्ठ, चांदा जिल्ह्यात रवी येथे शिलास्तंभ व भंडारा जिल्ह्यातीलच तिलंताखैरी आणि ब्राम्बी येथे व चांदा जिल्ह्यातील केळझर येथे शिलापेटिका असल्याची नोंद केलेली आहे.

आकृती ७



पृ. ४४ घोड्याच्या तोंडावरील दागिना, खापा



अ) पॉसिडॉनचा पुतळा, कोल्हापूर
आ) भांड्याचा दांडा, कोल्हापूर

पृ. ६८

## समालोचन

महाराष्ट्रातील महापाषाणीय अवशेषांच्या व्याप्तीवरून व त्यांच्या उत्खनित पुराव्यावरून काही ठोकळ अनुमाने करता येतात. त्यांचे समालोचन येथे करणे उचित ठरेल.

महाराष्ट्रात या संस्कृतींची निदर्शक अशी शिळावर्तुळे बहुसंख्येने आढळून येतात. ही शिळावर्तुळे नागपूर, भंडारा व चांदा या आंध्रप्रदेश व महाकोशल या प्रदेशाच्या निकट असणाऱ्या विभागातच एकवटल्याचे दिसून येते. महापाषाणीय दफनांचे दक्षिण भारतात आढळून येणारे विविध प्रकार महाराष्ट्रात फारसे दिसून येत नाहीत.

या महापाषाणीय लोकांना लोखंड व तांबे या दोन्ही धातूंचे उत्कृष्ट तांत्रिक ज्ञान होते.

हे लोक कोण होते याबद्दल निश्चितपणे काही सांगता येत नाही. कारण शिळावर्तुळांत पुरलेले मानवी अवशेष अत्यंत विच्छिन्न स्वरूपामध्ये मिळतात; परंतु मिळालेला पुरावा असे दर्शवितो, की काही शिळावर्तुळांत एकापेक्षा जास्त व्यक्तींचे अवशेष पुरले जात. यांतील काही व्यक्तींचे वय १७ ते २१ चे दरम्यान असून, काहींच्या दातांवर तंबाखूच्या अतिसेवनाने डाग पडल्याचे आढळून आले.

महाराष्ट्रातील महापाषाणीय लोक कुडाच्या घरात राहत असत. ते काळी-तांबडी, अभ्रकयुक्त तांबडी व साधी तांबडी मडकी वापरीत असत. गाय, बैल, बकरा व घोडा ते पाळीत असत. यात त्यांना घोडा जास्त प्यारा होता असे दिसते. मृताच्या अवशेषाबरोबर ते त्याचा घोडाही त्याच्या दागदागिन्यासंकट पुरत असत. ते घोड्याचा साज बनविण्यात कुशल होते असे दिसते. त्याचप्रमाणे स्वतःच्या वापराकरिता विविध रंगीत दगडांचे मणी, तांब्याच्या बांगड्या व सोन्याची कर्णफुले बनवीत असत. काही मडक्यांवरून दिसले, की काळ्या रंगात चित्रण करण्याची कलाही त्यांना अवगत होती.

या संस्कृतीचा कालखंड निश्चित करणे, टाकळघाट व कर्नाटकातील हल्लूर येथील उत्खननामध्ये उपलब्ध झालेल्या अवशेषांच्या कार्बन १४ तारखान्वये आता शक्य झाले आहे. टाकळघाट येथील मध्यवसतीचा काल इ. स. पूर्व ५५५ असा आलेला आहे. याचा अर्थ वसतीचा पूर्वकाल याहीपेक्षा प्राचीन असू शकेल. हल्लूर येथील महापाषाणीय अवशेषांचा कालखंड खिस्तपूर्व ११०५ व ९५५ असा आलेला आहे. टेकवडा येथे महापाषाणीय संस्कृतीची निदर्शक काळी–तांबडी खापरे ताम्रपाषाणयुगीन अवशेषांबरोबर मिळालेली आहेत. या संस्कृतीचा कालखंड महाराष्ट्रात इ. स. पूर्व तेरावे ते अकरावे शतक असा सर्वसाधारणपणे निश्चित झालेला आहे. हा सर्व पुरावा लक्षात घेता महाराष्ट्रात महापाषाणीय प्राचीनता इ. स. पूर्व सुमारे १००० इतकी मागे नेण्यास हरकत नसावी. या संस्कृतीची समाप्ती केव्हा झाली हे सांगता येत नाही. दक्षिण भारतात महापाषाणीय दफनात इ. सनाच्या पहिल्या–दुसऱ्या शतकातील रोमन नाणी व इतर वस्तू सापडल्याने ही संस्कृती इ. सनाच्या प्रारंभीच्या काही शतकांपर्यंत टिकून होती असे दिसते.

## संदर्भ वाङ्मय


१. दीक्षित, मो. गं.–एस्कॅव्हेशन्स् ॲट कौंडिण्यपूर (मुंबई, १९६८)

२. देव, शां. भा.–महाराष्ट्रातील उत्खनने (दिल्ली, १९६२); महाराष्ट्र : एक पुरातत्त्वीय समालोचन (मुंबई, १९७०)

३. देव, शां. भा. व ढवळीकर, म. के.– पवनार एस्कॅव्हेशन (नागपूर, १९६७)

४. इंडियन आर्किऑलॉजी– ए रिव्ह्यू १९५६-५७ व १९६१-६२

५. बुलेटिन ऑफ दि डेकन कॉलेज पोस्टग्रॅज्यूएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे १९३९-४०

६. एन्शन्ट इंडिया, (दिल्ली), खण्ड ५


□ □

# महाराष्ट्र इतिहासाची रूपरेषा

म. श्री. माटे
गो. त्र्यं. कुळकर्णी

जवळपास दोन हजार वर्षांच्या ज्ञात अशा या ऐतिहासिक काळाविषयी काही विधाने निष्कर्षरूपाने करता येतात. खास महाराष्ट्रीय अशा राजसत्तेचा प्रमुख आधार म्हणजे गोदावरी व तिच्या उपनद्या यांनी सुफलित केलेला प्रदेश. सातवाहन, यादव, बऱ्याच प्रमाणात बहमनी या सगळ्या साम्राज्यांचा गाभा म्हणजे गोदाखोरेच होय. दुसरी गोष्ट महाराष्ट्रावर पाचशे वर्षेपर्यंत कृष्णा-तुंगभद्रा व त्यांच्या उपनद्या यांनी पोसलेल्या कर्नाट सत्तांनी राज्य केले. सांस्कृतिकदृष्ट्या हा फार महत्त्वाचा कालखंड समजावा लागतो. तिसरी गोष्ट अशी, की खानदेश, नाशिक, वऱ्हाडचा पूर्वेकडील भाग, कोकण हे प्रदेश खास महाराष्ट्री सत्तेच्या अंमलाखाली सातत्याने कधीच राहिले नाहीत. राष्ट्रकूट-यादव यांच्याच नव्हे तर मुसलमानी राज्यांच्या काळातही हीच गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. खानदेश-नाशिक-उत्तर कोकण हे आपल्या अंमलाखाली ठेवण्याचा गुजरात माळवा यांचा विशेष कटाक्ष होता. वऱ्हाडचे भाग, ओडिसा वा आंध्र प्रदेश याजकडे असत. सांस्कृतिकदृष्ट्या दक्षिण महाराष्ट्र व मराठवाडा हे बव्हंशी कर्नाटकच्या सत्तेखाली असत. भौगोलिकदृष्ट्या काहीसे पृथक् अस्तित्व असले, तरीही महाराष्ट्राचे राजकीय आणि सांस्कृतिक जीवन भोवतालच्या प्रदेशाशी अतूटपणे गुंफलेले होते यात शंका नाही. केवळ प्राग् ऐतिहासिक अवशेषच नव्हे, तर इतिहासकालातील मठमंदिरे व शिल्पे याचीच साक्ष देतात.

महाराष्ट्रातील प्रागैतिहासिक काळासंबंधी इ. स. पूर्व आठव्या शतकापर्यंत माहिती उत्खननद्वारे उपलब्ध झाल्याची नोंद यापूर्वीच आलेली आहे. येथून पुढच्या चार शतकांतील महाराष्ट्र भूमी व तेथील लोक याविषयी फारसे निश्चित ज्ञान अजून झालेले नाही. आज महाराष्ट्रात समाविष्ट झालेले भूभाग व काही महत्त्वाची नगरे यांचे उल्लेख समकालीन वाङ्मयात आढळतात. ऐतरेय ब्राह्मण, जैमिनीय ब्राह्मण वा बृहदारण्यक उपनिषद् यांसारख्या उत्तर वैदिक ग्रंथांत विदर्भ कुंडिननगर तसेच भोज राजवंश यांचा

उल्लेख आहे. मात्र ऐतरेय ब्राह्मणातही गोदावरीच्या दक्षिण तीराचा प्रदेश हा वैदिक, आर्य संस्कृतीच्या कक्षेबाहेर असल्याचा अभिप्राय ध्वनित होतो हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. कौटिलीय अर्थशास्त्र, बोधायन धर्मसूत्र, सुत्तनिपात यांत दक्षिणापथाचा उल्लेख आहे, तर रामायण-महाभारत यांत दक्षिणापथ व दंडकारण्य यांचा निर्देश आहे. पौराणिक वाङ्मयात काही ' जनपदांची ' म्हणजे प्रादेशिक राज्यांची नावे आलेली आहेत. त्यात विदर्भ-वत्सगुल्म म्हणजे वऱ्हाड-वाशीम, भोगवर्धन-भोकरधन तालुका; मूलक-गोदावरीच्या काठचा पैठण नजीकचा भाग, अपरान्त-उत्तर कोकण, नासिक्य-नाशिक, गोवर्धन- नाशिक जिल्ह्याचा काही भाग, अशी नावे प्रमुख होत. प्राचीन नावे कळत असली, तरी या प्रदेशाच्या राजकीय इतिहासाविषयी जवळजवळ काहीच माहिती मिळत नाही. यानंतरचा काळ म्हणजे मौर्यांचा. आपल्या कारकीर्दीच्या शेवटी शेवटी चंद्रगुप्त मौर्याने जैन धर्माचा स्वीकार केला व तो दक्षिण देशात आला, अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. परंतु त्याने दक्षिण देशावर साम्राज्य स्थापन केले असे समजण्यास जागा नाही. तमिळ साहित्यातील काही उल्लेखांवरून बिंदुसाराने या भागावर आक्रमण करून आपले स्वामित्व प्रस्थापित केले असावे असे दिसते. अशोकाच्या शिलालेखांचा आढळ कृष्णा तुंगभद्रा खोऱ्यात काही ठिकाणी झाला आहे व या लेखात, मौर्य साम्राज्याच्या दक्षिणेकडे असणाऱ्या शेजारी राष्ट्रांचा उल्लेख येतो. ती राष्ट्रे म्हणजे चोळ, पांड्य, केरळ ही होत. यावरून इ. स. पूर्व ३०० ते २५० या काळात महाराष्ट्राचा समावेश मौर्य साम्राज्यात झाला असावा असे मानता येते. येथून पुढे महाराष्ट्र-जीवनाच्या " ऐतिहासिक " पर्वाला प्रारंभ होतो.

ऐतिहासिक कालखंडाविषयी माहिती मिळविण्यासाठी जी साधने उपयोगी पडतात ती साधारण अशी : निरनिराळ्या राजांचे वा त्यांच्या समकालीन शेजाऱ्यांचे शिलालेख वा ताम्रपट, या राजांची नाणी व कलाकृती, इतर अवशेष, पुराणे, वाङ्मय व शिवाय परकी प्रवासी व बखरकार यांचे ग्रंथ. दुर्दैवाने यांतील कोणतेच साधन समग्र माहिती देऊ शकत नाही. इतकेच नव्हे, तर वेगवेगळ्या साधनांवरून मिळणारी माहिती पुष्कळदा परस्परविरोधी सुद्धा आहे. महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या जवळपास प्रत्येक कुलाची मूळ भूमी कोणती, त्यांची सत्ता केव्हा व कोठे स्थापन झाली, त्या त्या वंशात एकूण किती राजे झाले या प्रत्येक मुद्यावर अभ्यासकात दुमत आहे. आणि या प्रत्येक मताला काहीना काही आधार मिळालेला आहेच ! या सर्व तपशिलात जाणे येथे अशक्य आहे. म्हणून पुढच्या काही पानांत, याच साधनावर आधारलेली पण मानवी इतिहासाच्या कार्यकारण भावाशी अधिक सुसंगत वाटणारी महाराष्ट्र इतिहासाची रूपरेषा दिलेली आहे.

सातवाहन कुलाचे राज्य महाराष्ट्रावर इ. स. पूर्व २२२ ते सन २२८ पर्यंत म्हणजे साडे चारशे वर्षे होते. पहिला राजा सिमुक व शेवटचा पुळुमावी ( तिसरा ) हे धरून तीस राजे होऊन गेले. जुन्नरनजीक नाणे घाटाच्या आसपास या राज्याची मुहूर्तमेढ रोवण्यात

आली. थोड्याच कालात हे राज्य गोदावरीच्या काठाने वाढत जाऊन पैठण व आसंमतातील प्रदेश त्यात समाविष्ट झाला. यापुढेही गोदाखोरे हेच सातवाहन साम्राज्याचा गाभा राहिले. या पायावर उभारलेल्या साम्राज्याने सौराष्ट्र, राजस्थानचा आग्नेय भाग, माळवा, महाराष्ट्र, इतक्या विस्तीर्ण प्रदेशाला गवसणी घातली.

या राजवंशापैकी महत्त्वाचे राजे व घटना साधारणपणे पुढीलप्रमाणे होत. मौर्यांच्या शासनयंत्रणेत एखाद्या छोट्याशा प्रांतावर अधिकारी असणाऱ्या सिमुक किंवा श्रीमुख याने इ. स. पूर्व २२२-२२० मध्ये हे राज्य स्थापिले. सातकर्णी ( प्रथम, १८९–१७९ खि. पू. ) याने महाराष्ट्र व कर्नाटक हा प्रदेश आपल्या सत्तेखाली आणला. सातकर्णी ( द्वितीय, १८३-४३ इ. स. पू. ) याने माळवा, जबलपूर या भागावर सत्ता स्थापिली. पुढील पन्नास वर्षांत सातवाहन सत्ता आंध्रदेशात पसरली व सातवाहन सैन्याने मगधावरही ( शुंग ) आक्रमण केले. याच सुमारास पश्चिम भारतात उदय पावलेल्या शक क्षत्रपांनी माळवा, कोकण, उत्तर महाराष्ट्र हे प्रांत क्रमाने सातवाहनांकडून हिरावून घेतले. इ. स. ८६ मध्ये गादीवर आलेला गौतमीपुत्र सातकर्णी हा या कुलातील सर्वश्रेष्ठ राजा होय. याने शक आक्रमणाची लाट परत फिरविली एवढेच नव्हे, तर आपल्या राज्यास नवे मुलूखही जोडले. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र हे प्रदेश त्याच्या साम्राज्यात होतेच; पण त्याशिवाय त्याने माळवा, सौराष्ट्र, कुकुर ( आग्नेय राजस्थान ) आणि अपरान्त ( उत्तर कोकण ) हे प्रदेशही मिळविले; परंतु शकांवरील हा विजय तात्पुरताच ठरला. गौतमीपुत्रानंतर लगेचच गादीवर आलेला वासिष्ठीपुत्र पुळुमावी याला नर्मदेच्या उत्तरेचे सर्व प्रांत गमवावे लागले. शक सत्तेशी काही तडजोड करण्याचाही यत्न झाला असावा. पुळुमावीचा पुत्र शिवश्री याचा विवाह रुद्रदामनाच्या कन्येशी करून देण्यात आला. कोकण व पश्चिम महाराष्ट्र मात्र शकांच्या अंमलाखाली गेले असावेत. कारण इ. स. १७४ ते २०३ या कालांत राज्य करणाऱ्या गौतमीपुत्र यज्ञश्री सातकर्णी याने कोंकण परत मिळविल्याची नोंद आहे. परंतु यावेळेपर्यंत सातवाहनांची मध्यवर्ती सत्ता अगदीच दुर्बल झालेली असावी यांत शंका नाही. केवळ पंचवीस वर्षांच्या अवधीतच या प्रचंड साम्राज्याचे विघटन झाले. सुसंघटित शासन, सधन समाज, आणि सहिष्णू धार्मिक जीवन ही सातवाहन-कालीन महाराष्ट्राची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. या कालातील शिल्प व उत्खनित-अवशेष याचीच साक्ष देतात.

यानंतरच्या काळात आज महाराष्ट्रात समाविष्ट असणाऱ्या सर्व भूभागावर राज्य करणारे असे शासन फक्त अधूनमधून दृष्टीस पडते. अन्य शब्दांत, संबंध महाराष्ट्राला एकसूत्री असे राजकीय जीवनच शिल्लक राहिले नाही. निरनिराळ्या भागांवर सत्ता चालविणारी राजकुले व त्यांचे उदयास्त अशा काही ढोबळ गोष्टींची नोंद घेणेच शक्य होते.

रजिस्टर नंबर वर्गीकरण नंबर 335

सातवाहनांच्या महाराष्ट्रावरील सत्तेला धक्का दिला तो शक क्षत्रपांनी. नहपान क्षत्रप

यांच्या अधिपत्याखाली राजस्थानचा काही भाग, माळव्याचा पश्चिम भाग, गुजरात, सौराष्ट्र आणि कालांतराने कोकण व उत्तर महाराष्ट्र हे भाग आले होते. वर सांगितल्या-प्रमाणे गौतमीपुत्राने त्याची सत्ता महाराष्ट्र, माळवा येथून तरी उठवून लाविली होती. नहपानाचा जावई उष्भदात (ऋषभदत्त) याने केलेल्या दानधर्माची नोंद महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असली, तरी तो राज्यकर्ता नसून एक यात्रिक असावा. नासिक लेखात गौतमीपुत्राने, नहपान व त्याचे पुत्रपौत्र यांचा विनाश केल्याची नोंद आहे. हे युद्ध इ. स. १०५ च्या सुमारास झालेले असावे. शकांच्या ताब्यात गेलेल्या प्रदेशात विदर्भाचा उल्लेख आढळत नाही. आणखी चाळीस वर्षांनी ही लाट परत फिरून रुद्रदामन याने कोकण जिंकले. यानंतरच्या काळात सातवाहन सत्तेच्या अस्तापर्यंत उत्तर कोकण व महाराष्ट्र यांच्यासाठी शक व सातवाहन यांची सतत स्पर्धा होती.

या अशाश्वतीचा व स्पर्धेचा फायदा तत्रस्थ अधिकाऱ्यांनी वा संस्थानिकांनी न उठविला तरच नवल. पुराणामध्ये सातवाहनोत्तर राज्यकर्त्यांची जी यादी दिली आहे, त्यात आभीर, आंध्र, गर्दभिल्ल, यवन, तुषार, शक, मुरुण्ड, मौन, किलकिल, ही नावे येतात. पैकी आभीर व शक स्पष्टच आहेत. आंध्र म्हणजे इक्ष्वाकू असावेत. इतरांची मात्र ओळख पटत नाही. इतर साधनांवरून (नाणी, लेख इ.) कलचुरि, त्रैकूटक व राष्ट्रकूट ही घराणी ज्ञात झाली आहेत.

भारताच्या पश्चिम भागांत अनेक ठिकाणी 'आभीर' जमातीची वसती होती. पैकी एक महत्त्वाचा टापू म्हणजे सध्याचे खानदेश (जळगाव, धुळे ) जिल्हे, येथे आभीर संस्थानिक प्रबळ झाले. इ. स. १८१ ते १८५ या दरम्यान त्यांच्याच साहाय्याने रुद्रसिंह याने क्षत्रपपद बळकाविले. ईश्वरदत्त या आभीर सेनानीने याही पुढे जाऊन काही वर्षे स्वतःच क्षत्रपपद धारण केले. हा आभीरांच्या स्वतंत्र सत्तेचा आरंभच म्हणावयास पाहिजे. येथून पुढे सरासरी दीड शतकाच्या कालात खानदेश व नाशिकचा काही भाग यावर आभीरांचेच राज्य होते. फक्त नावापुरतेच त्यांनी सातवाहन वा शक यांचे आधिपत्य मानले एवढेच. आभीरांचे दहा राजे झाले व त्यांनी सदुसष्ट वर्षे राज्य केले असे काही पुराणे सांगतात; परंतु हा काल सदुसष्ट नसून एकशे सदुसष्ट असावा असे मानण्याकडे आधुनिक विद्वानांचा कल आहे. याच सुमारास नाशिक जिल्ह्याच्या काही भागांत त्रैकूटक घराणे महत्त्व पावले. पाचव्या शतकाच्या उत्तरार्धातील त्रैकूटकांचा एक लेख कान्हेरी येथे व इतरत्र काही नाणी उपलब्ध झाली आहेत. हे घराणे आरंभी तरी शकांचे मांडलिक असावे. त्यांची सर्व नाणी क्षत्रपाच्या नाण्यावरून नकललेली आहेत.

सध्याचे सातारा, कोल्हापूर, सोलापूर हे जिल्हे व कर्नाटकाचा काही भाग हे "उत्तर कुन्तल" या प्रदेशात येत असत. सातवाहनांच्या उत्तरकाळात वा नंतर, येथे असणाऱ्या "राष्ट्रकूट" घराण्याने काही वर्षे राज्य केले. यांची राजधानी "मानपूर"

येथे असून, या घराण्याच्या सहा राजांची नावे ताम्रपटावरून ज्ञात झाली आहेत. हे घराणे त्रैकूटकांना समकालीन म्हणजेच चवथ्या-पाचव्या शतकातील होय.

या सर्वांपेक्षा महत्त्वाचे ठरले ते वऱ्हाडातील वाकाटक घराणे. वऱ्हाडातील म्हणावयाचे याचे कारण त्या भागावर त्यांची सत्ता बराच काळ अबाधित राहिली. कोठून आले यासंबंधी निश्चित माहिती नाही. त्यांची कालनिश्चितीही वादविषय होऊन राहिली आहे. चंद्रगुप्त ( दुसरा ) याची कन्या प्रभावती गुप्ता हिचा विवाह वाकाटक राजा रुद्रसेन ( द्वितीय ) याजबरोबर झाला व त्यानंतर काही वर्षांनी तिने मुलाच्या-वतीने व बापाच्या साहाय्याने कारभार केला ही एकमेव घटना वाकाटकांच्या काल-निर्णयाला उपयुक्त ठरण्यासारखी आहे. ( अगदी अलिकडे हिस्से बोराळा येथे डॉ. सौ. गोखले यांना आणखी एक कालोल्लेख असणारा शिलालेख मिळाला आहे. त्यासाठी त्यासंबंधीचे प्रकरण पाहावे. ) या अनुरोधाने बाकीच्या राजवटींचा काळ ठरवावा लागतो. त्यावरून राज्यस्थापनेचा काळ इ. स. २६०–७० असे समजता येते. संस्थापकाचे नाव विंध्यशक्ती. प्रवरसेन ( पहिला ) याने राज्यवृद्धी केली व त्यात विदर्भ, उत्तर कुंतल, दक्षिण कोशल यांचा समावेश केला, तद्वतच कलिंग व आंध्र यांनाही त्याने नमविले असे समजतात; परंतु या गृहिताला आधार नाही. इतकेच नव्हे, तर "उत्तर कुंतलावर" राष्ट्रकूटांची सत्ता असण्याची शक्यता लक्षात घेता हा अंदाज काहीसा अतिव्याप्त वाटतो. इ. स. ३२५ च्या सुमाराला प्रवरसेनाच्या राज्याचे चार तुकडे पडले. पुराणांच्या माहिती प्रमाणे चार स्वतंत्र राज्ये स्थापन झाली. प्रत्यक्षात मात्र पूरिका वा नंदिवर्धन येथील मुख्य शाखा आणि वत्सगुल्म येथील उपशाखा यांचेच उल्लेख अभिलेखांत मिळाले आहेत. वर उल्लेखिलेली प्रभावती गुप्ता मुख्य शाखेचीच सून होती. वाकाटकांनी सध्याच्या मध्य–देशावर आपली सत्ता बसविण्याचे जे यत्न केले त्यांच्या तपशिलाशी येथे कर्तव्य नाही. कारण येथे महाराष्ट्र देशाच्या इतिहासाचीच रूपरेषा पाहावयाची आहे. विदर्भाचा भाग वाकाटकांच्या राज्यातच होता. मराठवाड्याचा भाग वत्सगुल्म शाखेने पादाक्रांत केला असावा. या शाखेचा मूळ पुरुष सर्वसेन याचाच राष्ट्रकूट मानांक याजशी झगडा होऊन सर्वसेनाला अपयश आले. मुख्य घराण्याशी झालेल्या संघर्षात मात्र वत्सगुल्म शाखेला यश मिळाले. या शाखेचा शेवटचा राजा हरिषेण हा सर्वात पराक्रमी. त्याचा काळ हा सर्वोच्च प्रगतीचा. त्याने कुन्तल, त्रैकूटक, आभीर इतकेच काय; पण वाकाटकांचे मुख्य घराणेही नमविले. विद्या, कला, शास्त्र यांना उत्तेजन दिले. यानंतर पुन्हा एकदा महाराष्ट्रात अनेक लहान मोठी संस्थाने उत्पन्न झाली. क्वचित काही शेजाऱ्यांनीही लहानमोठ्या प्रदेशांत पायरोवा केला. कलचुरी अधिपतींनी उत्तर महाराष्ट्र व उत्तर कोकण जिंकला, तर दक्षिण कोकणावर त्यांच्याच "मौर्य" वंशीय मांडलिकांची सत्ता दृढ झाली.

पाचव्या शतकाच्या अखेरीनंतर सत्तेचे केंद्रस्थान गोदावरी वरदा यांच्या खोऱ्यातून

ढळले. ते दक्षिणेकडे सरकून कृष्णा-तुंगभद्रा यांच्या प्रदेशात स्थिर झाले. कर्नाटकातील चालुक्य व राष्ट्रकूट घराण्यांनी इ. स. च्या सहाव्या शतकापासून ते अकराव्या शतकापर्यंत महाराष्ट्राच्या बहुतेक भागावर राज्य केले. राज्याचे केंद्रस्थान पुन्हा महाराष्ट्रात आणले ते यादवांनी. पण तो थोडासा पुढचा भाग झाला.

चालुक्यांच्या राजवटीला आरंभ झाला तो बदामी येथून किंवा त्यानजीक असणाऱ्या ऐहोळ गावातून. हा भाग कर्नाटकात असून, सध्याच्या विजापूर जिल्ह्यात येतो. या घराण्याच्या लेखात त्यांनी आपला संबंध अयोध्येच्या सूर्य कुलाशी दाखविला असला, तरी प्रत्यक्षात ते कदंब राजांचे कर्नाटकातील सरंजामदार होते. या कुलाचा पहिला ज्ञात राजा जयसिंह. एकूण अकरा राजांनी मिळून सव्वादोनशे वर्षे राज्य केले. कीर्तिवर्मन् ( प्रथम, इ. स. ५६६–५९७ ) याने महाराष्ट्राच्या बऱ्याच भागावर वर्चस्व बसविले, असे काही इतिहासकार सांगत असले, तरी या भागावर कलचुरींची सत्ता होती हे विसरता येत नाही. त्यांनी "नळ" व "मौर्य" यांचा पराभव केला असला तरी त्यांच्यापासून विदर्भ व कोकण जिंकता आले नसावेत. मंगलीश ( ५९७–६१० इसवी ) याने उत्तर कोकण जिंकले. कलचुरी "बुद्धराज" याचा पराभव केला; पण तरीही त्याला उत्तर महाराष्ट्र जिंकणे शक्य झाले नाही. पुलकेशी ( द्वितीय ) याला पुन्हा कोकणावर मोहीम करावी लागली.

पुलकेशीची कारकीर्द केवळ यासाठीच उल्लेखनीय नाही. त्याने पल्लवांवर आक्रमण करून एका प्रदीर्घ संघर्षाला आरंभ केला. बदामीचे चालुक्य, राष्ट्रकूट, व कल्याणीचे चालुक्य या तीनही घराण्यांना दक्षिणेकडील पल्लव व चोळवंशाचे वैर पत्करावे लागले. महाराष्ट्र, विदर्भ, हे भाग मध्यवर्ती शासनाच्या नजरेखाली सारखे राहणे कठीण होत गेले आणि बुद्धराजाच्या उच्छेदानंतर आपल्या सत्तेच्या अस्तापर्यंत चालुक्यांनी महाराष्ट्रावर राज्य केले असले, तरी त्यांच्या मांडलिकांची सत्ता वाढतच गेली. राष्ट्रकूट हे एक अधिकार पद असून इतरही राष्ट्रकूट घराणी ज्ञात आहेत. चालुक्यांचा उच्छेद करणारे दन्तिदुर्गाचे घराणे कानडी प्रदेशातीलच होते. राष्ट्रकूटांची राजधानी प्रथम उत्तर महाराष्ट्रात असावी. गोविंद ( तृतीय ) याने ती मान्यखेटक ( सध्याचे मालखेड ) येथे नेली. राष्ट्रकूट घराण्यात एकूण चौदा राजे झाले व त्यांच्या राजवटीचा काळ २२० वर्षे इतका होतो. पहिला राजा दन्तिदुर्ग याने दक्षिण महाराष्ट्रावर अंमल बसविला. यानंतर या घराण्याच्या महाराष्ट्रावरील राजसत्तेच्या विकासाच्या पायऱ्या स्थूलमानाने पुढीलप्रमाणे सांगता येतात. कृष्ण ( प्रथम ) कोकण; गोविंद ( तृतीय ) गोवर्धन–नाशिक भाग; कृष्ण ( द्वितीय ) पूर्व-विदर्भ; व छत्तीसगड. या काळात परमार राजांनी महाराष्ट्र व कोकण यावर पुनः पुन्हा आक्रमण केले असले, तरी राष्ट्रकूटांची सत्ता अबाधित राहिली. ह्या आक्रमणांचा बंदोबस्त करण्यासाठीच कदाचित त्यांनी उत्तर भारताच्या राजकारणाकडे लक्ष वळविले. दक्षिणेकडील युद्धे सुरूच असली तरी ध्रुव, गोविंद ( तृतीय ) व इंद्र ( तृतीय ) या तिघांनी

कनौजवरील वर्चस्वाच्या लढ्यात निर्णायक भाग घेतला व उत्तर भागात एकीकडे गुर्जर प्रतिहार व दुसरीकडे पाल-सेन यांच्यात सत्तेचा समतोल ठेवून आपली उत्तर सीमा सुरक्षित राखली. उत्तर कोकण (८००–११६५) राजापुरी, दक्षिण कोकण (७६५–१०२०) बळिपट्टण किंवा खारेपाटण, व दक्षिण महाराष्ट्र (९४०–११७५) कोल्हापूर पन्हाळा अशी तीन शिलाहार घराणी मांडलिक म्हणून कारभार पाहत होती. चालुक्य जयसिंह याने दक्षिण कोकणचे घराणे नष्ट केले. इतर दोन घराणी कल्याणी चालुक्यांशी एकनिष्ठ राहिली. त्यांचा नाश यादवांनी केला.

माळव्याच्या परमार राजांची दक्षिणेकडे होत असणारी आक्रमणे राष्ट्रकूट सत्तेला शेवटी बाधक ठरली. त्यांना थोपविण्याचे काम राष्ट्रकूटांनी चालुक्य घराण्याचा संस्थापक तैलप याजवर सोपविले. या बलदंड मांडलिकाने परमार आक्रमणाला पायबंद घातलाच. पण हे करीत असताना तो स्वतः व त्याचा पुत्र जयसिंह (द्वितीय) यांनी महाराष्ट्रावरील आपली पकड पक्की केली. विक्रमादित्य (चवथा) याच्या कारकीर्दीतील चालुक्य राज्याचा विस्तार पाहिला, तर त्यात महाराष्ट्राच्या सर्व भागांचा समावेश झालेला होता असे दिसते. यानंतर मात्र चोळ व होयसळ यांच्याशी सतत चालणाऱ्या संघर्षामुळे शेजारचे परमार व गुजरात चालुक्य यांसारखे शत्रू व शिलाहार-यादव यांसारखे मांडलिक यांना मोठीच संधी सापडून त्यांनी कोकण व महाराष्ट्र या भागावरील चालुक्य सत्ता खिळखिळी केली. राष्ट्रकूटांच्या काळापासून मांडलिकपदे भूषविणारी यादव घराणी बंड करून उठली व शेवटी त्यांच्यापैकीच एकाकडे सत्ता गेली. कल्याणीच्या चालुक्य घराण्यात बारा राजे होऊन गेले आणि त्यांनी २१६ वर्षे राज्य केले.

नाशिक व देवगिरी यांच्यामध्ये असणाऱ्या "सेऊण" देशावर एक मांडलिक यादव घराणे राज्य करीत होते. या कुलातील दृढप्रहार व सेऊणचंद्र यांच्या कर्तृत्वामुळे इ. स. च्या नवव्या शतकानंतर त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. राष्ट्रकूटांनी त्यांच्याशी विवाहसंबंधही जोडले; परंतु राष्ट्रकूटांच्या पाडावानंतर यादवांनी चालुक्यांचे अनुसरण केले व त्यांच्याशीही घनिष्ट संबंध जोडले. विशेषतः विक्रमादित्य (चवथा) याला यादव सेऊणचंद्र (दुसरा) याचे बरेच सहाय्य झाले. यादवांचे महत्त्व व सत्ता वाढू लागली. केवळ सेऊणदेशाचे जहागीरदार असणाऱ्या या घराण्याच्या ताब्यात नगर, पुणे व सातारा जिल्ह्याचे भाग आले. ११७५ च्या आसपास भिल्लम (पाचवा) याने स्वतंत्र राज्य स्थापिले. चालुक्य सोमेश्वर (दुसरा) व तैलप (तिसरा) यांचा पराभव करून त्याने कल्याणीही जिंकली. दक्षिणेकडील उदयोन्मुख सत्ता म्हणजे होयसळांची. तिच्याशी झालेल्या संघर्षात मात्र यादवांचा पराभव झाला. त्यामुळे त्यांच्या मुख्य सत्तेला धोका पोचला नाही तरी दक्षिणेकडील सीमा मात्र निश्चित झाली.

यानंतर यादवांचे पाच राजे झाले. त्यात सिंघण हा सगळ्यात कर्तृत्ववान. याने नर्मदा-तापी ही उत्तरेकडील सीमा तर सांभाळलीच; पण शिवाय कोकण, देश, विदर्भ,

मराठवाडा, उत्तर कुंतल यांनाही ताब्यात ठेविले. राजकीयदृष्ट्या महाराष्ट्र व दख्खन यांचा एक शतकाचा काल शांततेचा गेला. या काळात बाहेरून उच्छेदक स्वाऱ्या झाल्या नाहीत व नाव घेण्यासारखी बंडेही झाली नाहीत. उलट यादव राजेच भोवतालच्या जवळपास प्रत्येक राजाशी भांडणे व लढाया यांत गुंतलेले दिसतात. यादव सत्तेचा पाडाव अल्लाउद्दीन खिलजी याने १२९४ ते १३०० च्या कालात केला. आणखी वीस वर्षांनी महाराष्ट्रावर इस्लामी सत्ता स्थापन झाली.

आतापर्यंतच्या कालखंडातील आर्थिक स्थिती आणि राजशासन यांविषयी थोडी माहिती द्यावयास हवी. बहमनींच्या राजवटीत या दोन्ही क्षेत्रांत, विशेषतः शासनव्यवस्थेत मोठाले बदल घडून आले; परंतु तोपर्यंत परंपरागत शासनपद्धतीच चालत आलेली होती. सातवाहन काळापासून पुढे दीड हजार वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्राचा व कर्नाटकाचा भूमध्यसागराशी मोठ्या प्रमाणावर व्यापार होता. त्यातल्या पहिल्या अर्धुकाविषयी ताम्रशासने व शिलालेख, तसेच परकीय प्रवाशांच्या लिखाणातून माहिती मिळते. पश्चिम किनाऱ्यावर ' भडोच ' हे बंदर फार मोठे. त्याच्या जोडीला सोपारा व कालांतराने कल्याण ही बंदरे महत्त्व पावली. परदेशी निर्यात होणाऱ्या वस्तूंत प्रमुख म्हणजे तलम सुती कापड, हस्तिदंत व हस्तिदंताच्या वस्तू, रेशीम, मसाले; अकीक, कार्नेलियन यासारखे मूल्यवान दगड; आयात वस्तूत रोमन मद्य, सोने व चांदी ( नाण्यांच्या रूपाने ), टिन, शिसे यासारखे धातू, काचेचे पदार्थ यांचा समावेश होई. याच्या जोडीला इमारती व चंदनी लाकूड, हिरे, माणिक, तांबे यांचीही निर्यात होत असे. आता ठाणे बंदर पुढे आले होते. परकीय व्यापाराबरोबर अंतर्गत व्यापारही मोठ्या प्रमाणावर चालत असे व महाराष्ट्रातील जुन्नर, कऱ्हाड, पैठण, तगर ( तेर ) या मोठ्या व्यापारी पेठा होत्या. बौद्ध गिरीशिल्पांत आढळणाऱ्या शिलालेखांत या सर्व ठिकाणच्या व्यापाऱ्यांनी दिलेल्या देणग्यांची नोंद आढळते. सर्व ठिकाणी व्यापाऱ्यांचे संघ ' श्रेणी ' असत. या श्रेणींना स्वतःच्या घटना व नियम असून सामान्यपणे एका एका व्यवसायासाठी एक एक संघ असे. श्रेणींचा उपयोग पतपेढ्यांसारखा होत असे. व्यापारी अथवा व्यावसायिक श्रेणींचा दैनंदिन कारभार हा शासननिरपेक्ष असून, त्यांचे स्वरूप ' शाश्वत ' म्हणावे इतके टिकाऊ होते. सामान्य माणूस अर्थातच आपली उपजीविका शेतीवर करीत होता. या काळातील कलावैभव, राजसभेचे वैभव यांची जी वर्णने तत्कालीन साहित्यात पहावयास सापडतात त्यावरून समाजातील वरचे थर संपन्न असतील असा समज होतो हे खरे असले तरी, सामान्य माणसाचे जीवन खडतर असावे असाच निष्कर्ष काढावा लागतो. शेतकीची पद्धती, संघटना वा उपलब्ध सुविधा या आजच्यापेक्षा निराळ्या नव्हत्या आणि उत्पन्न काही निराळे असेल असे समजण्याचे कारण नाही.

राजा, मंत्री, यांचे उल्लेख पौराणिक वाङ्मयात आले असले, तरी त्यांचे अधिकार, कार्यक्षेत्र यांविषयी तपशीलवार कल्पना येत नाही. शिलालेख व ताम्रशासने यामध्ये

महारथी, महाभोज, ( महा ) सेनापती, महामात्र, भांडागारिक अशा अधिकारपदांचे उल्लेख आहेत; पण येथेही कार्यक्षेत्रे कोणती याचे स्पष्टीकरण नाही. सेनापती, भांडागारिक ह्यांची कामे अर्थातच स्पष्ट आहेत; पण इतरांबाबत तशी सुस्पष्टता नाही. अर्थशास्त्र इ. विषयांवरील पुस्तकांत विविध अधिकारी, त्यांची कामे इ. माहिती दिलेली आहे; पण ती प्रस्तुत चर्चेत आणता येणार नाही. राज्याच्या शासकीय विभागांची नावेही शिलालेखात मिळतात. विषय, देश, ग्राम यांचा विस्तार किती असावा यासंबंधी काही अनुमाने काढण्यात आलेली आहेत; परंतु त्यांच्या संबंधात काही चढती श्रेणी असली, तरी ती सर्वच काळाला लागू पडत नाही. ग्रामव्यवस्था ही प्राचीन परंपरेने चालणारी असून, भारतातील इतर ठिकाणांप्रमाणेच येथेही गावातील श्रेष्ठ माणसे ( पंचायत ) रोजचा कारभार ( विशेषतः न्यायदानादी ) पाहात होते. या परंपरागत व्यवस्थेत कोणाही राजाने नाव घेण्याजोगे बदल केलेले दिसत नाहीत. ग्रामशासनाचे कार्यक्षेत्र व अधिकार शतकानुशतके चालत आलेले होते व यापुढील इस्लामी काळातही तीच व्यवस्था बऱ्याच प्रमाणात चालू राहिलेली दिसते.

## बहमनी राजघराणे

इ. स. १३४७ मध्ये अल्लाउद्दीन हसन बहमन शाह याने बहमनी घराण्याची स्थापना केली. त्याने आपली राजधानी गुलबर्ग्यास करून त्यास अहसनाबाद हे नामाभिधान केले. दिल्लीचे मुसलमान सुलतान यांची जी काही थोडी सत्ता दक्षिणेत शिल्लक होती तिचा याने पूर्णपणे नाश केला. तसेच दौलताबाद ते कर्नाटक या भागातील हिंदू सरंजामदारांनाही याने आपले अंकित केले. या घराण्याचे एकूण अठरा राजे झाले. त्यांची नावे व काल येणेप्रमाणे :—

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) अल्लाउद्दीन हसन बहमन शाह | …… | इ. स. | १३४७ ते १३५८ |
| ( २ ) मुहम्मद ( पहिला ) | …… | ,, | १३५८ ते १३७५ |
| ( ३ ) अल्लाउद्दीन मुजाहीद | …… | ,, | १३७५ ते १३७८ |
| ( ४ ) दाऊद ( पहिला ) याचा खून झाला. | …… | ,, | फक्त १ च महिना राज्य. |
| ( ५ ) मुहम्मद ( दुसरा ) | …… | ,, | १३७८ ते १३९७ |
| ( ६ ) घियासुद्दीन नंतर बंदिवासात. | …… | ,, | २ महिने |
| ( ७ ) शमसुद्दीन दाऊद | …… | ,, | फक्त ६ महिने |
| ( ८ ) ताजूद्दीन फिरूज | …… | ,, | १३९७ ते १४२२ |
| ( ९ ) शहाबुद्दीन अहमद ( पहिला ) | …… | ,, | १४२२ ते १४३६ |
| (१०) अल्लाउद्दीन अहमद ( दुसरा ) | …… | ,, | १४३६ ते १४५८ |

| | | | |
|---|---|---|---|
| (११) अल्लाउद्दीन हुमायून शाह | ...... | ,, | १४५८ ते १४६१ |
| (१२) निजामुद्दीन अहमद ( तिसरा ) | ...... | ,, | १४६१ ते १४६३ |
| (१३) शमसुद्दीन मुहम्मद ( तिसरा ) | ...... | ,, | १४६३ ते १४८२ |
| (१४) शहाबुद्दीन महमूद | ...... | ,, | १४८२ ते १५१८ |
| (१५) अहमद ( चवथा ) | ...... | ,, | १५१८ ते १५२० |
| (१६) अल्लाउद्दीन शाह | ...... | ,, | १५२० ते १५२३ |
| (१७) वली उल्लाह | ...... | ,, | १५२३ ते १५२६ |
| (१८) कलीमुल्लाह | ...... | ,, | १५२६ ते १५३८ |

बहमनी राजांनी एकूण १९१ वर्षे राज्य केले.

त्यांचा राज्यविस्तार गुलबर्गा, विजापूर, अहमदनगर, वऱ्हाड, औसा, कंधार व तेलंगण प्रांतात झालेला होता. यांची राज्ययंत्रणेची पद्धत म्हणजे राज्याचे विभाग पाडून त्यावरती एक गव्हर्नर ( Governor ) अथवा प्रांताध्यक्ष नेमला जात असे. तो आपल्या प्रांतातील राज्यकारभारास जबाबदार असे. मुहम्मद पहिला याने राज्याचे चार भाग पाडले व त्यावरती एक एक प्रांताध्यक्ष नेमिला. त्यांच्या कारभारावरती प्रत्यक्ष बादशहाचेच लक्ष असावयाचे. काही कालानंतर राज्याचे चारच्याऐवजी आठ विभाग करण्यात आले. परंतु हीच शासनपद्धती कायम ठेवण्यात आली. याचा एक दुष्परिणाम म्हणजे कालांतराने प्रांतिक सुभेदार हे अत्यंत मातब्बर झाले व जेव्हा केंद्रातील राजा तितकासा प्रबल नसेल तेव्हा त्यांनी त्याच्या विरुद्ध उठाव केले. याचा परिणाम म्हणून केंद्रशासन पुढील काळात कधीच बळकट होऊ शकले नाही. याचप्रमाणे वतने व जहागिरी परंपरेने दिल्यामुळे आपसातील भांडणे व कटकटी वाढीस लागल्या. त्याचा योग्य तो बंदोबस्त बहमनी राजांना करता आला नाही व सत्तास्पर्धेमुळे, तसेच महत्वाकांक्षी मुत्सद्यांच्यामुळे अनेक बहमनी राजांचे खून झाले व राज्याची घडी विस्कळित झाली.

एवढे असूनही बहमनी राज्याची पूर्व सीमा बंगालच्या उपसागराला भिडलेली होती. बहमनींच्या राजसत्तेतील राजकीय काळ हा शेजारच्या प्रांतावरती हल्ले करणे, नवीन प्रांत काबीज करणे, लूटमार करणे व आपसातील खून मारामाऱ्या यांच्यातच जास्ती प्रमाणात व्यतीत झालेला दिसतो. बहमनी राजांच्या तेलंगण, वरंगल, विजयनगर, ओडीसा, माळवा, व गुजरात येथील राजांचे बरोबर सतत लढाया होत होत्या. यांपैकी कुठल्याही शत्रूवरती ते कायमची मात करू शकले नाहीत. त्यातल्या त्यात गुजरातच्या सैन्याकडून त्यांना नेहमी पराभवच पत्करावा लागला.

सैन्य व शासन अधिक कार्यक्षम व्हावे यासाठी इराण, तुर्कस्तान, वगैरे प्रांतांतून सैनिक व शासक यांची सतत आयात करण्याचे बहमनी राज्यकर्त्यांचे धोरण असे. त्यामुळे त्यांच्या राज्यामध्ये परदेशी व दक्षिणी ( स्थानिक ) असे दोन तट पडून राज्याच्या

एकतेला कायमचा धोका निर्माण झालेला होता. तशातच हे परकी लोक बव्हंशी शिया पंथाचे व स्थानिक लोक सुन्नी पंथाचे असल्याने तक्रारींना आणखी वाव मिळत गेला.

शहाबुद्दीन अहमद ( पहिला ) याने गुलबर्ग्याच्याऐवजी बिदर येथे राजधानी वसविली. अल्लाउद्दीन हुमायूँ याच्या काळात माळव्याच्या मुसलमान राजाने बिदरवर स्वारी केली. त्यात बहमनी राजाचा पराजय झाला; परंतु माळव्याच्या राजास परत जावे लागल्यामुळे हुमायूँ परत राज्यावरती आला. यानंतर निजामशहाच्या काळात मुहम्मद गाँवॉन नावाचा मोठा मुत्सद्दी व शिक्षणप्रसारक होऊन गेला. त्याने राज्यव्यवस्थेत अनेक सुधारणा केल्या. तसेच त्याने कोकणात अधिक स्वाऱ्या करून कोकण प्रांत जिंकून बहमनी राज्यास जोडला. कालांतराने आपसातील वैमनस्यामुळे मुहम्मद गाँवॉनचा खून करण्यात आला. ( दुसऱ्या ) मुहम्मद शाहनंतर महमूद ( दुसरा ) राज्यावर आला. याचा काल म्हणजे अमीर उमरावांच्या व वजिरांच्या आपसातील बंडाचाच इतिहास आहे. तसेच काही मातब्बर सेनापती व प्रांताध्यक्ष स्वतंत्र होण्याच्या मार्गावर लागले. यानंतर बहमनी घराण्यात चार राजे राज्यावर आले; पण ते अत्यंत कमी प्रतीचे व दुर्बल असल्यामुळे सर्व राज्यकारभार वजिरांच्या हातात गेला व शेवटचा बहमनी राजा कलिम-उ-उल्लाह हा इ. स. १५२७ मध्ये अहमदनगर येथे पळून गेला व तेथेच मरण पावला. अशा रीतीने बहमनी राज्याचा अस्त झाला.

बहमनी राज्याच्या अस्तानंतर दक्षिणेत मुसलमान सरदारांची पाच राज्ये निर्माण झाली. ( १ ) बरीदशाही–बिदर, ( २ ) आदिलशाही– विजापूर, ( ३ ) इमादशाही– वऱ्हाड ( एलिचपूर ), ( ४ ) निजामशाही– अहमदनगर, ( ५ ) कुत्बशाही– गोवळकोंडा.

बहमनी राजांनी राज्यव्यवस्थेत ज्याप्रमाणे सुधारणा केली त्याचप्रमाणे न्यायदानाच्या पद्धतीतही केली. यापूर्वी न्यायदानाच्या बाबतीत पंचायत हा अत्यंत महत्त्वाचा घटक समजला जात असे; परंतु या राजांनी इस्लामी धर्माप्रमाणे न्यायदानाच्या बाबतीत "शरियत" चे नियम बंधनकारक करून काझी आणि आदिल यांची नियुक्ती केली. परंतु महसूल, स्थानिक राज्य व व्यापार यांबाबतीत मात्र त्यांनी चालुक्यांचेच अनुकरण केले. इतर प्रजाजनांच्या धर्मात फारशी ढवळाढवळ केल्याचे दिसत नाही व धर्मांतराची सक्ती केल्याचीही फारशी उदाहरणे दिसत नाहीत. त्यामुळे त्यांचा धार्मिक दृष्टिकोन, नंतरच्या मुसलमान राज्यकर्त्यांच्यापेक्षा बराचसा उदारमतवादी होता असे वाटते.

तत्कालीन सामाजिक परिस्थितीबद्दल सांगावयाचे म्हणजे समाजात साधारणपणे दोनच वर्ग होते असे दिसते. पहिला वर्ग म्हणजे श्रीमंत अमीर उमराव, सरंजामदार वगैरे प्रतिष्ठित लोकांचा, तर दुसरा गरीब, कष्टाळू, शेतकरी, व्यावसायिक व व्यापारी यांचा. व्यापाऱ्यांच्या "श्रेणी" होत्या. यात मोडणारे लोक म्हणजे विणकर, सोनार,

चांभार, रंगारी इत्यादी. अल्बेरुनीच्या म्हणण्याप्रमाणे त्याकाळी आठ प्रकारच्या "श्रेणी" (Guilds) होत्या. व्यापाराची प्रमुख ठिकाणे म्हणजे बिदर, पैठण, गुलबर्गा, चौल, दाभोळ आणि गोवा. देशात व परदेशात मोठा व्यापार होत असे व तो सर्व उपर्युक्त श्रेणींच्या अधिपत्याखाली चालत असे. असे असले तरी गरीब लोकांची व शेतकऱ्यांची परिस्थिती मात्र चांगली नव्हती. त्यांना अंगभर कपडा अथवा पोटभर अन्न किंवा राहण्यास चांगले घर कधीच लाभले नाही. त्यांचे जीवन हे अत्यंत कष्टमय होते.

शिल्प व संस्कृती या दृष्टीने या काळाचा विचार करता बहमनी राजांनी सुरुवातीच्या काळात जुने शिल्पच पुढे चालू ठेवले. त्यात अर्थातच थोडेफार बदल घडवून आणले व असा एक बदल म्हणजे "मिहराब". परंतु काही काळानंतर त्यांनी राजवाडे, किल्ले, मशिदी, मिनार, शाळा वगैरे बांधल्या. त्यांच्या या बांधकामावर पर्शियन छाप (Persian influence) फार प्रमाणात पडलेली आहे. मुसलमानी असे म्हणण्यासारखे म्हणजे, भव्य दालने (Halls), गुळगुळीत भिंती (Smooth Faced walls), साधे घुमट (Plain Domes), व बांधणी (Constructoin).

बहमनी राजांनी गुलबर्ग्यात बऱ्याच वास्तू उभारल्या. त्यातल्या विशेष म्हणजे बंदेनवाज याचा दर्गाह, जामे मस्जिद, शाहखलीलउल्लाह याची कबर, या सर्वांवर निळ्या आणि हिरव्या रंगाच्या कौलांचा (Tiles) उपयोग केलेला आढळतो. या सर्वांवर हिंदू व इराणी छाप (influence) दिसून येते. अहमदशाहाच्या काळात बिदर हे राजधानीचे शहर झाले. त्यावेळी त्याने तुर्कस्तान, बगदाद, इराण, अरबस्तान, रोम वगैरे ठिकाणांहून स्थापत्य-शास्त्र विशारदांना बोलावून घेतले. त्यामुळे बिदर येथील शिल्पावर परकी छाप (influence) फार मोठ्या प्रमाणावर दिसून येते. असे असले तरी स्थानिकत्वाचे वैशिष्ट्य हे देखील जाणवते. बिदरचा किल्ला, त्यातील राजवाडे, सोळा खांबी मशीद, गगन महाल, तर्कश महाल, रंगीन महाल वगैरे शिल्प अत्यंत उच्च दर्जाच्या अभिरुचीचे प्रतीक आहे, असे म्हटले पाहिजे. तसेच किल्ल्यामध्ये केलेली पाण्याची योजना ही स्थापत्यदृष्ट्या महत्त्वाची बाब समजली पाहिजे. अहमदशाह वली याच्या कबरीवरती पर्शियन पद्धतीचे रंगकामकुसर आहे (Persian style paintings).

बहमनी राजांनी स्वतःच्या नावाची नाणी पाडली. अलाउद्दीन हसन बहमनशाह (पहिला) याची सोने, चांदी व तांब्याची नाणी होती. आजही काही ठिकाणी ही नाणी सापडतात.

बहमनी राज्याचे पाच तुकडे होऊन इ. स. १४९० ते १५२२ या काळात पाच स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली. वऱ्हाडात इमादशाही, पश्चिम महाराष्ट्रात निजामशाही, दक्षिण महाराष्ट्रात आदिलशाही आणि मराठवाड्यावर बरीदशाही व कुतुबशाही ही ती पाच राज्ये होत. एलिचपूर, अहमदनगर, विजापूर, बिदर व गोवळकोंडा ही त्यांची

राजधानीची शहरे होत. यांपैकी अहमदनगर, विजापूर, ही शिया पंथाची; गोवळकोंडा व वऱ्हाड, बिदर ही सुन्नीपंथीय असली तरी तिथले सर्व सुल्तान मुसलमानच होते. त्यांतल्या त्यांत सुन्नी पंथीय राज्ये थोडी दुर्बळ होती. 'या पाच राज्यांचा किंवा शाह्यांचा इतिहास म्हणजे अखंड संघर्षाचे एक पुराणच होय. यांचे पंथ भिन्न असले तरी धर्म एकच होता. गुजरात, विजयनगर यांच्याशी असणाऱ्या संबंधात (शत्रुत्वांत) तरी त्यांचे हित समान होते. सर्व राजघराण्यांचे एकमेकांशी विवाहसंबंध होते. परंतु धर्म, नाते किंवा समाजहितसंबंध यांपैकी कोणतीच गोष्ट त्यांना एकत्र बांधून ठेवण्यास असमर्थ ठरली. त्यामुळे बराच काळपर्यंत त्यांना भोवतालच्या शत्रूवर वा एकमेकांवर मात करता आली नाही. एकाच महत्त्वाच्या प्रसंगी व ते म्हणजे विजयनगरशी तालिकोट येथे झालेल्या संग्रामात या एकीचे फळ त्यांना विजयनगरच्या पाडावाच्या रूपाने मिळाले; पण लगोलग नंतर पुन्हा यादवी सुरू झाली व त्यामुळे मोंगल सम्राटांना यांपैकी प्रत्येकाचा स्वतंत्रपणे मोड करता आला.'

बहमनी सुल्तानांप्रमाणे या सुल्तानांनीही इराण, अरबस्तान, तुर्कस्तान, आफ्रिका या भागांतून सैनिक, मुत्सद्दी, कवी, कलाकार, धर्मगुरू आणि गुलाम यांची फार मोठ्या प्रमाणावर आयात केली. पूर्वीप्रमाणे आताही कित्येकजण महत्पदास चढले. उत्तर भारतातूनही कर्तबगार माणसे इकडे येत राहिली. परकी सत्तेबरोबर महाराष्ट्रांत परकी संस्कृती आली व परप्रांतातून येणाऱ्या या विशेषज्ञांमुळे तिचे परकी स्वरूप कायम राहण्यास मदत झाली. आतापर्यंत महाराष्ट्र भूमीवर कोणी परकीय लोक आलेच नाहीत असे नाही— शक आभीर हे स्थानिक नव्हतेच; पण ते येथील समाजाशी एकरूप होऊन गेले. आता मात्र तसे घडले नाही.

परदेशातून वा परप्रांतातून आणलेली माणसे अधिक विश्वासार्ह समजण्यात येत असली, तरी सर्वच राज्यशकट केवळ त्यांच्याच साहाय्याने उभारणे अथवा चालविणे शक्य नव्हते. तसेच प्राचीन काळापासून चालत आलेली ग्रामसंस्था व वंशपरंपरागत जहागिरी बुडविणे शक्य नव्हते; नवीन राज्यकर्त्यांना हितावहही नव्हते. आपसातील भांडणात या स्थानिक जहागीरदारांचा उपयोग होण्यासारखा होता. या स्थितीचा फायदा घेऊन अनेक परंपरागत देशमुख-जहागीरदार यांनी आपले आसन स्थिर केले. एवढेच नव्हे, तर आपापले सामर्थ्यही वाढविले. इतके की पुन्हा एकदा सरंजामदार, प्रांताध्यक्ष यांच्यामुळे मध्यवर्ती सत्ता लोप पावेल अशी स्थिती प्रत्येक राज्यात उत्पन्न झाली. मात्र आता एक फार महत्त्वाचा फरक झाला. कोणी एक सरदार वा सरंजामदार बलदंड होण्याऐवजी एक विशिष्ट वर्ग सुसंघटित होऊन सुल्तानी सत्तेला विरोध करावयास उभा राहिला. हे एकीकरण साधण्याचे व त्याला नवा आशय प्राप्त करून देण्याचे श्रेय छत्रपती शिवाजी महाराजांचे. परसत्ता नष्ट करून 'स्वराज्य' स्थापन करण्याच्या त्यांच्या प्रयत्नास १६५० नंतर यशप्राप्तीची चिन्हे दिसू लागली. १६७० ला पक्क्या झालेल्या या राष्ट्रीय उत्थानाची अखेर १८१०

मध्ये झाली. मराठी सत्तेचे उदयास्त कालदृष्ट्या अगदी नजीकचे आहेत. या सत्तेचा इतिहास कोणाही मराठी भाषिक माणसाच्या इतक्या परिचयाचा आहे, की त्याची पुनरुक्ती करण्याची गरज नाही. मात्र, पुरातात्त्विक संदर्भात काही गोष्टी नमूद करणे आवश्यक ठरते. मराठेशाहीचे, शिवकाल व पेशवेकाल असे दोन भाग इतिहासकार करतात. शिवकालीन जीवन धामधुमीचे, संघर्षाचे. स्वाभाविकच शांततेच्या काळात भरभराटीला येणाऱ्या विद्याशास्त्र कला इ. " सांस्कृतिक " घडामोडींचे दर्शन या काळात होत नाही. पेशवेकालात, राजकीय ( लष्करी ) हालचाली महाराष्ट्राबाहेरच होत राहिल्या. संपन्न व सुसंस्कृत-विलासी जीवनाशी त्यांचा साक्षात् संबंध आला. उत्तम चित्रकारांना आश्रय मिळाला, संगीतज्ञांचा परामर्ष घेता आला; परंतु हे सर्व फारच थोड्या अवधीपुरते. एरव्ही मराठी सत्तेच्या जीवनात विशेष उल्लेखनीय असे काही नाही. ग्रामव्यवस्था ही प्राचीन परंपरेने चालणारी असून, भारतातील इतर ठिकाणांप्रमाणेच येथेही गावातील श्रेष्ठ माणसे ( पंचायत ) रोजचा कारभार, विशेषतः न्यायदानाचे काम पाहात. या परंपरागत व्यवस्थेत कोणाही राजाने नाव घेण्याजोगे बदल केलेले दिसत नाहीत. ग्रामशासनाचे कार्यक्षेत्र व अधिकार शतकानुशतके चालत आलेले होते.

□ □

# " प्राचीन ऐतिहासिक "
# काळाची संस्कृती

म. के. ढवळीकर

महाराष्ट्रातील प्राचीन स्थळांच्या उत्खननातून हाती आलेल्या पुराव्यांवरून असे दिसून येते की, येथील गोदावरीच्या खोऱ्यातील आद्य शेतकऱ्यांची वसाहत संपुष्टात आल्यानंतर ही स्थळे सुमारे चार-पाच शतके उजाड पडली होती. पुढे खिस्तपूर्व ६ व्या ५ व्या शतकात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पुन्हा नव्याने वसाहती झाल्या. येथून प्राचीन ऐतिहासिक काळाची सुरुवात होते. बहुसंख्य ठिकाणी या वसाहती इ. स. च्या दुसऱ्या तिसऱ्या शतकापर्यंत भरभराटीस आलेल्या दिसून येतात. म्हणजेच सातवाहन काळ हा प्राचीन ऐतिहासिक कालांचा उत्कर्ष बिंदू होय. त्यानंतर पुन्हा अनेक वसाहती उजाड झाल्या. त्याचे कारण काय असावे यासंबंधी निश्चित पुरावा अजून मिळालेला नाही. क्वचित ठिकाणी चौथ्या शतकापासून पुढील काळातील अवशेष सापडतात. सर्वसाधारणपणे सातवाहन काळानंतर पुन्हा सर्वत्र मोगल-मराठा काळात वस्ती केली गेली. मराठेशाहीतील कित्येक गढ्या प्राचीन वसाहतींवर उभारल्या गेल्या. अशा काही गढ्यांतून आजही वस्ती आहे.

प्राचीन ऐतिहासिक काळाचे उत्खनित पुराव्यांवरून दोन कालखंड पाडता येतात. त्यातील पहिला खिस्तपूर्व ६ वे शतक ते खिस्तपूर्व दुसरे शतक, आणि दुसरा, खिस्तपूर्व दुसरे शतक ते इ. स. २ रे ३ रे शतक. यातील प्रथम कालखंडात मानवी जीवनात अत्यंत क्रांतिकारक बदल घडून आले. नागर संस्कृतीचा उदय या काळात झाला. लोखंडाची हत्यारे प्रथमच मोठ्या प्रमाणात उपयोगात आली. लोहयुगाची सुरुवात महाराष्ट्रात कोठून आणि कशी झाली या संबंधीचा पुरावा अद्यापि मिळालेला नाही. परंतु या कालखंडाच्या आधी निदान दोन शतकापूर्वी लोखंड तयार करण्याचे ज्ञान येथील मानवाने हस्तगत केले असावे. पक्क्या विटांचा वापरही या काळात सुरू झालेला दिसून येतो. पूर्वीची ताम्रपाषाणयुगीन रंगीत नक्षीकाम केलेली भांडी नाहीशी होऊन त्याजागी काळी–तांबडी भांडी आली. तसेच आहत ( Punch-marked ) नाणीही प्रथमतर वापरात आली. उत्तरेकडील काळी झिलई असलेली चमकदार खापरे ( N. B. P. )

खिस्तपूर्व तिसऱ्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्रात आली असावीत. बहुधा बौद्ध भिक्षूंच्या बरोबर ती इकडे आली. प्राचीन ऐतिहासिक काळाचा हा प्रथम कालखंड प्रकाश, बहाळ इत्यादी ठिकाणी निश्चित करण्यात आला आहे.

दुसऱ्या उत्कालखंडास (खिस्तपूर्व २ रे शतक ते इ. स. २ रे–३ रे शतक) सातवाहन काळ ही संज्ञा यथार्थ ठरेल. सातवाहन राजांची नाणी या काळात सापडतात. तसेच लेखांकित मुद्रा व कोरीव लेखही या काळात सापडतात. (सातवाहन हे महाराष्ट्राचे पहिले सम्राट समजले जातात.) सातवाहनकालीन संस्कृतीचे अवशेष महाराष्ट्रातील बहुसंख्य स्थळांच्या उत्खननात मिळाले आहेत. दक्षिण महाराष्ट्रात कऱ्हाड व कोल्हापूर, प. महाराष्ट्रात नाशिक, नेवासे आणि नाला सोपारा, खानदेशात प्रकाश व बहाळ, तसेच मराठवाड्यात तेर व पैठण आणि विदर्भात कौंडिण्यपूर, पवनार व पवनी येथील उत्खननात सातवाहनकालीन अवशेष सापडले आहेत. सातवाहनांच्या साम्राज्यात भक्कम तटबंदी केलेली तीस शहरे होती, असे प्लिनीने सांगितले आहे. परंतु सातवाहन स्थळांच्या–खुद्द पैठण येथे सुद्धा–उत्खननात तटबंदीचे अवशेष अद्याप सापडले नाहीत.

खिस्तपूर्व ६ वे ते २ रे शतक या काळात सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी काही नवीन उपाय योजण्यात आले. जमिनीत खोल खड्डा खणून त्यात मोठाले माट, त्यांचे बूड फोडून एकावर एक रचले जात. या माटांमधून खाली जमिनीत पाणी सोडले जाई. तसेच मोठाल्या भाजक्या मातीच्या कड्या जमिनीत खूप खोलवर खड्डा खणून एकावर एक रचल्या जात. परंतु या कड्यांचा उपयोग विहिरींसाठी केला जात असावा असे वाटते. कच्छमधील काही भागात अरुंद विहिरी खणून त्यांच्या बाजू बांधून काढण्याऐवजी तेथे अशा तऱ्हेच्या कड्या रचतात. या प्रकारच्या विहिरी उत्तर भारतातील अनेक स्थळांच्या उत्खननात सापडल्या आहेत. त्यांचा काळ खिस्तपूर्व ६ वे शतक ते इ. स. २ रे–३ रे शतक असा निश्चित केलेला गेला आहे. या प्रकारच्या कड्या एकात एक अडकवून त्यांचा धान्य साठविण्यासाठी उपयोग केला जाई. वरील दोन्ही प्रकारच्या सांडपाण्याच्या निचरा करण्याच्या पद्धती प्रकाश येथील उत्खननात आढळून आल्या. तेथे त्यांचा खिस्तपूर्व ६०० ते १०० असा काळ निश्चित केला आहे.

वरील विवेचनावरून नागरी संस्कृतीची सुरुवात महाराष्ट्रात खिस्तपूर्व ६ व्या शतकात सुरू झाली हे दिसून येते. परंतु महाराष्ट्रात फारच थोड्या– प्रकाश, बहाळ इत्यादि–स्थळांच्या उत्खननात खिस्तपूर्व ६०० ते २०० म्हणजे सातवाहनपूर्वकालीन अवशेष सापडले आहेत. या उलट, बहुसंख्य ठिकाणी ऐतिहासिक काळाची सुरुवात खिस्तपूर्व ३ ऱ्या–२ ऱ्या शतकात झालेली दिसून येते. मौर्यकाळात महाराष्ट्रात अशोकाचे अधिराज्य होते हे त्याच्या सोपाऱ्याच्या शिलाशासनावरून सिद्ध होते. इतकेच नव्हे; तर महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी त्याचे यवन धर्मरक्षित या भिक्षूची नेमणूक केली होती. परंतु इ. स. पू. २३२ मध्ये अशोकाच्या मृत्यूनंतर

सातवाहन कुल उदयास आले व थोड्याच काळात महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात त्यांनी आपली सत्ता स्थापन केली. उत्खननातसुद्धा बऱ्याच ठिकाणी याच काळात म्हणजे मौर्य–सातवाहन काळात नागरी जीवनास सुरुवात झालेली दिसून येते.

सातवाहनकालीन उत्खनित अवशेषात पक्क्या विटांच्या घरांचे विपुल अवशेष सापडले आहेत. या विटा २१ " लांब, ११" रुंद व ३" जाड अशा आकाराच्या आहेत परंतु हल्लीसारखी उभी–आडवी अशी विटांची बांधणी केलेली आढळून येत नाही. सर्व बांधकाम मातीत केले जाई. घराचे खांब लाकडी असत व ते भिंतीत रोवले जात. वरचे छप्पर लाकडी असून त्यावर चौकोनी कौले असत. ही छपरे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांना दोन भोके असत. त्यात लोखंडी खिळे ठोकले जात. लोखंडी खिळ्यांसहित अशी शेकडो कौले कोल्हापूर, कऱ्हाड, नाशिक, सोपारा व तेर येथील उत्खननात सापडली आहेत. या कौलांना दोन उभट पन्हाळी असत. त्यातून पावसाचे पाणी वाहून जाई. याशिवाय कौलाच्या खालच्या भागास एक खाच असून ती शेजारच्या कौलाच्या उंच कडेत अडकवली जाई. ही कौले भाजून पक्की केलेली असत.

घरांचा आकार काटकोनी असे. नेवासे येथील उत्खननात सुमारे १२ × १५ फूट आणि १२ × १३ फूट या आकाराच्या खोल्या सापडल्या आहेत. भिंत बांधण्याआधी ती खचू नये म्हणून १॥ ते २ फुटांचा पाया खोदला जाई व तो दगड-गोट्यांनी भरून काढला जाई. तसेच घरातील जमीनही काळजीपूर्वक केली जाई. सर्वसाधारपणे नदीकाठचा पिवळा केवटा आणि काळी चिकण माती चोपून जमीन तयार करीत असत. नेवासे व तेर येथे सातवाहनकालीन घरांच्या जमिनी चुना व तागाचे तुकडे एकत्र करून केलेल्या होत्या. नाशिक येथील घरांच्या जमिनीत प्रथम वाळूचा थर घातलेला आढळून आला. त्यावर चिकण माती चोपून जमीन तयार केली होती.

सातवाहनपूर्व काळात सांडपाण्याची विल्हेवाट कशी केली जात असे याचा वर उल्लेख केला आहे. तीच पद्धत या काळातही प्रचलित होती. शिवाय कूपही बांधले जात. हे कूप घरापासून थोड्या अंतरावर असत. तेथे जाण्याकरिता फुटकी कौले अथवा दगड-गोटे टाकून रस्ता तयार केलेला असे. त्या कूपाचा व्यास ४ ते ४॥ फुटांचा असे. काही वेळा कूप पक्का व्हावा म्हणून पाचरीच्या आकाराच्या विटांनी तो बांधून काढीत. या प्रकारचे कूप नेवासे व नाशिक येथे सापडले आहेत. नाशिक येथील कूपाच्या तोंडावर लाकडी फळ्या टाकलेल्या आढळल्या. अशा फळ्या नीट बसाव्या म्हणून आडवा दांड बसविण्याची व्यवस्था नेवाश्याच्या सांडपाण्याच्या कूपात केलेली होती. तसेच विटांनी बांधून काढलेले एक गटार या कूपापर्यंत नेऊन भिडविलेले पैठणला सापडले. या कूपातून फुटकीतुटकी खापरे, सडलेले धान्य इत्यादी वस्तू सापडतात.

नाशिक येथे उत्खननात १०×२० फूट लांबी-रुंदीचे स्वयंपाकघर सापडले. तेथे जमिनीत पुरलेले सहा रांजण, मातीची व विटांची चूल, जळक्या लाकडांचे ओंडके, फुटलेले माठ व जनावरांची जळलेली हाडे सापडली. या काळातील पाटे-वरवंटे वैशिष्ट्य-पूर्ण आहेत. पाटे लंबचौकोनी असून त्यांना चार पाय आहेत. पाट्याचा एक भाग पुढे झुकवलेला असे, त्यामुळे त्याखाली वाटलेला पदार्थ पडण्यासाठी थाळी ठेवता येत असे. वरवंटे मात्र हल्लीसारखेच आहेत. धान्य दळण्यासाठी जात्याचा उपयोग प्रथमच या काळात केला गेला. हे जाते हल्लीपेक्षा निराळ्या प्रकारचे आहे. त्यांची वरची तळी उभट असे. तीत लाकडी दांडा आडवा घातला जाई. दोन स्त्रिया समोरासमोर बसून हा दांडा फिरवीत. हे जाते मूळचे रोमन. त्यांच्याकडूनच ते आपल्याकडे आले असावे असे डॉ. सांकलियांचे मत आहे. हल्लीचे उभ्या दांड्याचे जाते हे अशा रोमन जात्याची सुधारलेली आवृत्ती होय.

उत्खननात सापडलेल्या धान्यांच्या अवशेषांवरून तत्कालीन आहार-विहाराची कल्पना येते. शेती आणि शिकार यावर तत्कालीन महाराष्ट्रीयांची उपजीविका चालत असे. ते मांसाहारी होते यात शंका नाही. मासे पकडण्यासाठी लोखंडी गळ वापरले जात. नेवाश्याला गहू, हरभरा, ज्वारी, नाचणी, करडई, मटार, वाल इ. धान्यांचे जळके अवशेष सापडले. बहाळ येथे तांदूळ व तेर येथे गहू, तांदूळ व द्विदल धान्ये सापडली आहेत. सर्वात महत्त्वपूर्ण पुरावा कौंडिण्यपूर येथील उत्खननात मिळाला. तेथील ६ व्या ७ व्या शतकातील खापरावर मक्याच्या कणसाचे ठसे उमटलेले आहेत. मका हे धान्य मूळ दक्षिण अमेरिकेतील. ते पोर्तुगीजांनी आपल्याकडे आणले असेल अशी समजूत आहे परंतु त्यापूर्वीही आपल्याकडे मका होता असे आता म्हणता येईल. आहारात शिंपल्यातील कालवाचाही उल्लेख केला पाहिजे.

या काळातील खापरे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यात काळी-तांबडी मातीची भांडी आणि तांबड्या झिलईची भांडी महत्त्वाची आहेत. काळी-तांबडी भांडी भारतातील निरनिराळ्या भागात सापडली आहेत. ती बनविण्याचे एक विशिष्ट तंत्र होते. सर्व भांडे प्रथम तांबडे भाजले जाई. त्यानंतर आतील व तोंडापासला भाग काळा व्हावा म्हणून तो गवताने किंवा शेणाने किंवा राखेने झाकून टाकून भांडे पुन्हा भाजले जाई. *तांबडी झिलई असलेली खापरे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ती उत्कृष्ट पोताची असून अत्यंत पातळ असतात. त्यांच्या पृष्ठभागावर तांबड्या रंगाचा लेप असून तो भाग घासून अत्यंत गुळगुळीत व चमकदार केला जात असे. ही भांडी मूळ रोमन लोकांची असावीत. त्यांच्याशी आपला संपर्क आल्यानंतर ती आपल्याकडे करण्यास सुरुवात झाली असे समजले जाते. परंतु गुजराथमध्ये अमरेली येथील उत्खननात जो पुरावा हाताशी आला आहे, त्यावरून ही भांडी तयार करण्यामागे रोमन प्रेरणा नसावी असे वाटते. या भांड्यांमध्ये प्रामुख्याने सुरया असतात. त्यांची तोटी लहान असून त्यात हवा जाण्या-

साठी छिद्रे असत, त्यामुळे त्यात पाणी गार राहत असे. या प्रकारची सुरई बुद्ध भिक्षुंच्या बरोबर असे. तिचा 'कुंडिका' असा बौद्धवाङ्मयात उल्लेख आढळतो.

निकृष्ट प्रतीची तांबड्या रंगाची खापरे सातवाहन काळात विपुल प्रमाणात आढळतात. ही भांडी रोजच्या वापरातील आहेत. त्यात लहान-मोठी हरप्रकारची भांडी आहेत. या भांड्यांवर तांबड्या रंगाचा लेप असून त्यावर क्वचित जिलई आढळते. ही जिलई करण्याचे एक विशिष्ट तंत्र होते. भांडे खरपूस भाजून लाल झाले म्हणजे त्यावर मिठाच्या पाण्याचा शिडकाव केला जाई. त्यामुळे एक विशिष्ट चमक ( salt-glazing ) भांड्यांवर दिसते.

सातवाहनकालीन अलंकारांत मणीमाला, कर्णभूषणे व काकणे प्रामुख्याने सापडतात. मणी निरनिराळ्या दगडांचे तयार केले जात. त्यात गार, स्फटिक इ. दगडांचे मणी नेहमी आढळतात. हे मणी कसे तयार केले जात याची कल्पना अपूर्ण मण्यांवरून करता येते. दगड घासून हवा तो आकार दिल्यानंतर त्याला दोन्ही बाजूंनी छिद्र पाडले जाई. काही ठिकाणी दोन्ही छिद्रे तिरकी पडल्यामुळे मणी अपूर्ण राहिले. लॅपिस लाझुली या निळ्या दगडाचे मणी सातवाहन काळात प्रथमच वापरात आले. हा मौल्यवान दगड बहुधा अफगाणिस्थानातून किंवा इराणमधून आणला असावा. या दगडाचे मणी बव्हंशी चपटे आणि काटकोनी आहेत. त्यांना तीन किंवा अधिक आडवी छिद्रे असतात. यातून मण्यांचे सर ओवले जात असावेत. या प्रकारच्या हारांचा 'फलक-हार' असा कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रा'त उल्लेख केला आहे. विविध प्रकारचे दृष्ट मणीही ( 'Eye-beads' ) या काळात प्रचलित होते.

मण्याबरोबर अनेक प्रकारचे ताईतही सापडतात. खंजीर, सिंह, कासव व वाघ-नखांच्या आकाराचे ताईत निरनिराळ्या उत्खननात सापडले आहेत. कानांतील चक्राकार कुंडले भाजक्या मातीची किंवा जास्परच्या दगडाची असत. ती कुंडले घासून अत्यंत चमकदार केली जात. त्यांचा नेमका उपयोग काय असावा याची कल्पना नव्हती. परन्तु ती कर्णभूषणे असावीत हे प्रभास पाटण येथील पुराव्यावरून दिसून येते. दगडी चक्र सोन्याने मढवून त्यावर नक्षी कोरली जाई. प्राचीन वाङ्मयातील 'ताटंक-चक्र' हेच असावे.

काकणे प्रामुख्याने शंखाची केली जात. त्यांवर विविध प्रकारची नक्षी कोरली जाई. अशा नक्षीदार बांगड्यांचे अनेक नमुने प्रकाश येथील उत्खननात सापडले आहेत. हस्तिदंताच्या बांगड्याही क्वचित सापडतात. डोळ्यांत सुरमा घालण्यासाठी तांब्याच्या शलाका वापरीत. नाशिक व नेवासे येथील हस्तिदंती शलाकांवर अत्यंत नाजुक नक्षीकाम आहे. केस विंचरण्यासाठी हस्तिदंती फण्या असत. तसेच स्नानाच्या वेळी अंग घासण्यासाठी हरतऱ्हेच्या मातीच्या वज्र्या वापरीत. आंब्याच्या कापलेल्या कोयीच्या

आकाराच्या वज्र्या पुष्कळ ठिकाणी सापडल्या आहेत. आजही आंब्याच्या कोथीचा डोक्यातील मळ काढण्यासाठी उपयोग करतात.

निरनिराळ्या प्रकारची आयुधे व उपकरणे सातवाहनकालीन स्थळांच्या उत्खननात सापडली आहेत. चाकू, सुऱ्या, भाल्यांचे फाळ आणि तीराग्रे सर्वत्र सापडतात. ती लोखंडाची आहेत. हाडाचीसुद्धा तीराग्रे केली जात. नाशिक येथे एक वैशिष्ट्यपूर्ण हत्यार सापडले. त्याला तीन किंवा चार अणकुचीदार टोके आहेत. ही वस्तू जमिनीवर कशीही पडली तरी तिचे एक टोक वर राहते. 'अर्थशास्त्रात' याचा 'त्रिक्' असा उल्लेख केला आहे. यालाच इंग्रजीत 'caltrop' म्हणतात. पहिल्या महायुद्धात घोडदळाला अडथळा आणण्याकरिता असे कॅलट्रॉप हजारोंनी वापरले गेले.

पळ्या, उलथणी इ. हल्ली वापरात असलेली उपकरणी सातवाहन काळात प्रथमच वापरात आली.

## रोमन संपर्क

सातवाहनकाळात रोमन साम्राज्यांशी महाराष्ट्राचा मोठ्या प्रमाणावर व्यापार होता. पश्चिम किनाऱ्यावरील सोपारा, कल्याण, चौल इत्यादी बंदरांतून हा व्यापार चालत असे. तेर हे त्या काळी व्यापाराचे महाराष्ट्रातील सर्वात मोठे केन्द्र होते. या व्यापाराचा उल्लेख प्लिनी, टॉलिमी इत्यादी रोमन लेखकांनी व 'Periplus of the Erythroean Sea' या ग्रंथात केलेला आहे. अनेक ग्रीक आणि रोमन व्यापारी महाराष्ट्रात राहिले होते. त्यांनी लेणी कोरण्यासाठी अनेक दाने दिली. त्यांचे दानलेख प्रसिद्ध आहेत. या व्यापारामुळे रोमन भांडी, मद्यकुंभ, काचसामान, ब्रॉंझचे पुतळे, (आकृति ८) रोमन दिवे इत्यादी वस्तू आपल्याकडे आल्या. कोल्हापूर येथे ब्रॉंझचे पुतळे आणि अनेक शोभेच्या वस्तू एका सातवाहनकालीन घरात सापडल्या. ते बहुधा एखाद्या रोमन व्यापाऱ्याचे घर असावे. तेथे सापडलेला पॉसिडॉन या सागरदेवतेचा पुतळा जगात अत्युत्कृष्ट समजला जातो. (आकृति ९ व १०)

रोमन साम्राज्यातून आपल्याकडे मद्य आयात केले जाई. मद्य कुंभांचे अवशेष कोल्हापूर, नेवासे, तेर, पवनार इत्यादी ठिकाणी सापडले आहेत. याशिवाय ॲरेटाईन, मेगॅरियन इत्यादी रोमन बनावटीची सुबक मातीची भांडी तेर येथे सापडली आहेत. त्यांवर उठावात नक्षी कोरलेली असते.

आपल्याकडून उंची कापड, मोती, हस्तिदंती वस्तु, रंगीत दगडी मणी रोमन साम्राज्यात निर्यात केले जात. भारतीय बनावटीची एक अत्युत्कृष्ट हस्तिदंती मूर्ती इटलीतील पॉंपे येथील उत्खननात सापडली. तसेच एक ब्रॉंझची स्त्री मूर्ती पार्शियन गल्फच्या



सातवाहन कालीन मूर्ती, कोल्हापूर

पृ. ३८



पृ. ७०–७१

मध्ययुगीन घराचे अवशेष, नेवासे

भागात सापडली. ती भारतीय असून सातवाहनकालीन आहे. सातवाहनकालीन ब्रॉंझच्या आणि पाषाणाच्या मूर्ती आग्नेय आशियातही सापडल्या आहेत.

इ. स. ४ थे ते १० वे शतक या काळातील अवशेष उत्खननात क्वचितच आढळतात. प्रकाश येथील उत्खननात या काळातील काही अवशेष सापडले आहेत तसेच शिलाहार-यादवकालीन घरांचे अवशेष कोल्हापूरच्या उत्खननात सापडले. परंतु सातवाहनोत्तर कालातील अवशेष सर्वसाधारणपणे उत्खननात आढळत नाही.

## संदर्भ ग्रंथ

(१) शां. भा. देव, *महाराष्ट्रातील उत्खनने* (पुणे)

(२) शां. भा. देव, *महाराष्ट्र : एक पुरातत्त्वीय समालोचन*, (मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १९६५)

(३) H. D. Sankalia, *Indian Archaeology Today* (Bombay)

* ही समजूत डॉ. ग. गं. मुजूमदार यांनी फोल ठरविली आहे. त्याचे पूर्ण तंत्र त्यांनी सिद्ध केले आहे.—संपादक

□ □

# मध्ययुगीन संस्कृती

जैनुद्दीन दाऊद अन्सारी

## प्रास्ताविक

महाराष्ट्रात गेल्या तीस वर्षांमध्ये पुरातत्त्वदृष्ट्या ( Archaeological ) पहाणी करीत असताना कित्येक ठिकाणी जुन्या वस्त्या असल्याचा पुरावा मिळाला. ह्या ठिकाणी सापडलेल्या प्राचीन अवशेषांवरून महाराष्ट्रात मानव अश्मयुगापासून ते मध्ययुगापर्यंत राहात असल्याचा पुरावा मिळालेला आहे.

प्राचीन वस्ती : महाराष्ट्रात निरनिराळ्या ठिकाणी झालेल्या उत्खननांपैकी काही ठिकाणी मध्ययुगाचा ( Medieval Period ) पुरावा हाती आलेला आहे. ह्याचा अर्थ असा मात्र घ्यावयाचा नाही की, ह्या काळामध्ये फक्त एवढ्याच ठिकाणी मानवी वस्ती होती. आजही बऱ्याच गावांमध्ये आपल्याला गावांचे तट, वेशी, गढ्या, वाडे, किल्ले आणि इमारती इत्यादी वस्तीचे जुने अवशेष पाहावयास मिळतात. परंतु उत्खननां-द्वारे हाती आलेल्या पुराव्यांवरून सामान्य मानवाचे जीवन कसे होते हे जाणून घेण्यास बरीच मदत होते.

उत्खननामध्ये सापडलेल्या पुराव्यावरून त्या काळातील जीवनाची जी कल्पना येते ती थोडक्यामध्ये खालीलप्रमाणे आहे:

उत्खननांचा विस्तार अगदी मर्यादित स्वरूपाचा असल्याने त्या काळातील नगर-रचनेसंबंधी कसलाही पुरावा अजूनपर्यंत मिळालेला नाही.

कित्येक गावांना अजून मध्ययुगीन काळातील तटबंद्या संपूर्ण किंवा पडझड झालेल्या अवस्थेत आढळून येतात. तटबंदी पूर्ण दगडी, अथवा अर्धी दगडी ( खालची बाजू ) व वरचा भाग कच्च्या मातीच्या मेंढ्यांनी रचलेला असतो.

## गृह-रचना

घरांचा आकार सर्वसाधारण १५'×१०' फूट असे. घरांचे दरवाजे उत्तरदिशेकडे असत. घरांच्या दोन रांगांमध्ये साधारण १५ फूट अंतर असे.[२] घरांचे छप्पर धाब्याचे

असे. ज्या ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी असते त्या ठिकाणी धाब्यांची घरे करतात. ( उदाहरणार्थ– महाराष्ट्रात नगर जिल्ह्यातील घरे. ) घरांचा पाया ३ ते ३॥ फूट जमिन खणून त्यात काळी माती व दगड यांची भर घालून करीत असत. भिंतीची रुंदी २ ते ३ फूटपर्यंत असे. भिंती संपूर्ण दगडांनी किंवा खालचा भाग दगडांनी व वरचा भाग कच्च्या मातीच्या विटांनी अशा बांधून काढीत असत. हल्लीच्या काळातसुद्धा घरे बांधण्याची व पाया भरण्याची अशीच पद्धत चालू आहे. घराच्या जमिनी मातीच्या होत्या. आजही मातीच्या जमिनी चोपून तयार करतात. ह्या काळात सर्वसाधारणपणे सगळी घरे एक किंवा दोन खोल्यांची असत. उत्खननात एका श्रीमंत नागरिकाचे किंवा जहागिरदाराचे घरही उजेडात आलेले आहे. त्या घराला बऱ्याच खोल्या होत्या. या घराची जमीन, नदीतील दगडी गोटे चुन्यात रचून त्यांचे एकावर एका थर रचून केलेली होती; त्यावरती चुन्याचाच पक्का गिलावा होता. एका लहान खोलीत दगडी झाकण असलेली दगडाची पेटी होती. हवेलीच्या भोवताली मोठमोठाले चपटे दगड उभे करून पुढच्या अंगणाला वाडा केलेला होता. वाड्याला दगडी चबुतरा होता, व त्याच्यावर एक चपटा मोठा दगड ( धुण्यासाठी ) होता. त्याच्या एका बाजूला पाणी जाण्यासाठी ( आंघोळीचे व कपडे धुण्याचे पाणी जाण्यासाठी ) पाट तयार केलेले होते. या हवेली वाड्याच्या आसपास एक किंवा दोन खोल्यांची घरे होती. बहुधा या घरांमध्ये या श्रीमंत गृहस्थाचे नोकर-चाकर राहात असावेत.

## विविध प्रकारची भांडी

सर्वसामान्य लोक मातीची भांडी वापरत होते. काही लोक तांब्याचीही भांडी वापरत असत. कुंभार लोक लाल रंगाची व काळ्या रंगाची भांडी तयार करीत असत. काही भांड्यांवर गाळीव मातीचा लेप लावून त्यांना गुळगुळीत दगडांच्या किंवा सागर-गोट्यांच्या माळांनी घासून ती भांडी गुळगुळीत करीत होते. सुमारे ५० वर्षांपर्यंत गावामध्ये सार्वजनिक उत्सवप्रसंगी किंवा खाजगी विवाहप्रसंगी गावजेवणासाठी लोक कुंभारांकडून थाळा, वाडगे, गाडगी इत्यादी भांडी करवून आणीत असत व त्यामध्ये जेवण दिले जात असे. या काळात लोक रांजण, घागरी, माठ, गाडगी, मडकी, वाडगा, वाट्या, सानक, परात इत्यादी प्रकारांची व आकारांची मातीची भांडी रोजच्या व्यवहारात वापरीत असत. या भांड्यांच्या बरोबरीला गाडगी, मडकी यांना लहान तोट्या जरा वरच्या बाजूला लावण्याची पद्धत होती. महाराष्ट्रात तोटी असलेली भांडी ताम्रपाषाण युगानंतर मुस्लिम-मराठा काळातच सापडतात. भांड्यांना झाकण्यासाठी मुद्दाम तयार केलेली मातीची झाकणेही होती. रांजणांना शोभिवंत करण्याकरिता रांजणाच्या गळ्याजवळ चिखलाच्या मिंडोरी अंतराअंतरावर बोटांनी दाबून केलेली नक्षी आढळून येते. मातीची भांडी कुंभार चाकावर तयार करीत असे. परंतु काही भांड्यांना वरच्या भागाला चाकावर आधार देऊन खालचा भाग थापीने ठोकून ( कुंभार ) भांडी तय ।ः करीत

असत. मोठा रांजण चाकावर तयार करणे शक्य नसल्याने मातीच्या जाड जाड वळकट्या एकमेकांवर ठेवून किंवा दोन्ही हातांनी माती थापून कुंभार रांजण तयार करीत होते. सध्याही कुंभार अशाच पद्धतीने भांडी तयार करतात.

## अवजारे व शस्त्रे

बहुतेक अवजारे व शस्त्रे लोखंडाची तयार केलेली असत. विशेष उल्लेखनीय म्हणजे उत्खननात सापडलेली भाल्यांचे फाळ ( Spearheads ) चाकूची पाती व खिळे हे होत. याखेरीज (लोखंडाची) लोखंडापासून तयार केलेले चाप... ( Clamps ); दस्ते, व आंगठ्या-वळी ( Rings ) ह्यांचाही समावेश उल्लेखनीय आहे. शिकारीकरता बाणाला लोखंडी टोके लावीत असत.

## खेळ आणि खेळणी

बैल, हत्ती, एडके, पशू, पक्षी वगैरे मुलांची खेळणी भाजलेल्या मातीपासून तयार करीत असत. खेळातील बैलगाडीची चाकेही मातीचीच तयार करीत असत. काही पक्षी हुबेहूब दिसण्यासाठी पक्ष्यांच्या पंखांमध्ये पिसे खोचत असत. काही खेळणी ( उदा. हत्ती ) अर्धी अर्धी प्रथम तयार करून त्यामध्ये लहानलहान खडे टाकीत असत व नंतर ती खेळणी जोडीत असत. ही खेळणी भाजल्यानंतर तयार झाली म्हणजे खुळ-खुळ्यासारखी वाजत असत असे अनेक खुळखुळे मिळाले आहेत. खेळण्यांसाठी मातीचे पक्षी, जनावरे, व बाहुल्याही तयार करीत असत. काही बाहुल्या चिनी मातीच्या असून त्या एका साच्यात चिनी माती दाबून त्यांचे दोन भागात ठसे घेत असत व नंतर ते भाग जोडत असत. ह्या बाहुल्या काळजीपूर्वक करीत असत व त्यांच्या आता हाती येणाऱ्या तुकड्यांवरून या काळात ही कला अतिशय उच्च दर्जाची होती असे आढळून येते. त्या बाहुल्यांच्या व मूर्तींच्या केशभूषा व वेषभूषा (अलंकार) यावरून त्या काळातील फॅशनची कल्पना येते.

## अलंकार

बांगड्या ह्या स्त्रियांचा प्रमुख अलंकार या काळामध्ये होता. काचेच्या बांगड्यांचे निरनिराळ्या जातींचे व रंगांचे विविध तुकडे या काळातील संशोधनामध्ये उपलब्ध झालेले आहेत. काही बांगड्या रुंद, चपट्या, व विविध रंगांनी नटलेल्या होत्या व त्यांच्या कडेला बारीक मणी जास्त शोभा आणण्यासाठी लावलेले असत. त्याखेरीज आतल्या बाजूने सपाट व बाहेरून गोल, त्रिकोणी, चौरस अशा विविध आकारांच्या बांगड्या वापरत असत. काही बांगड्यांवर वेगळ्या रंगाचे ठिपके थोडथोड्या अंतरावर लावून त्या जास्त सुंदर केलेल्या असत. बांगड्या काळ्या, पिवळ्या, हिरव्या, निळ्या, लाल रंगांच्या, व संमिश्र रंगाच्या काचांपासून तयार करीत असत.

काचेच्या बांगड्याखेरीज शंखांच्या, हस्तिदंतांच्याही बांगड्या वापरण्याची पद्धत या काळी होती. या बांगड्या कोरीव व नक्षीकाम केलेल्या अशा आढळतात तर काही अगदी साध्या पद्धतीच्या बांगड्या वापरीत असत. बांगड्याशिवाय काचेच्या, शंखांच्या व हस्तिदंताच्या अंगठ्याही वापरीत असत. अंगठ्यांमध्ये काळ्या, हिरव्या, लाल, निळ्या, एकरंगी किंवा बहुरंगी अशा काचेच्या अंगठ्या विशेष पद्धतीच्या अशा वापरत असत.

नुसत्या बांगड्या व अंगठ्या वापरूनच समाधान होत नसल्याने या काळात लोक आपल्या गळ्यांमध्ये दगडांचे, काचेचे, शंखांचे, हस्तिदंतांचे, भाजलेल्या हाडांचे व भाजलेल्या मातीचे मणी व त्यांच्या माळा वापरीत असावेत असा पुरावा उत्खननामध्ये सापडलेल्या अवशेषांवरून मिळालेला आहे. दगडांच्या मण्यांत Amethyst carnelian, (गोमेद), Agate (अकीक) Chalcedony, Coral (प्रवाळ) Crystal (गार) Jasper, Quartz (गार) वगैरे जातीच्या दगडांपासून केलेले मणी सापडलेले आहेत.

मण्यांचे प्रकार चपटे, गोल, गोटीवजा, त्रिकोणी, पिंपासारखे द्विकोनाकार वगैरे प्रकारचे आढळतात.

काचेचे मणी काळे, हिरवे, निळे, पिवळे, लाल, पांढरे इ. रंगांचे असतात. काही मण्यांना पिवळ्या रंगाचा लेप असे.

याशिवाय लाखेचे मणी तयार करून त्या मण्यांवर सोन्याचे पाणी चढवीत असत अगर सोन्याचा वर्ख लावीत असत. तर काही मण्यांमध्ये काचेच्या दोन थरांमध्ये सोन्याचा वर्ख होता. ह्या प्रकारचे मणी काचेच्या कारागिरीचा एक उत्कृष्ट नमुना आहे. असल्या प्रकारचे मणी हुबेहूब सोन्याच्या मण्यासारखेच दिसत असत. हाडापासूनही मणी तयार करीत असत. लोक गळ्यात घालण्यासाठी मण्यांचे विविध हार वापरीत असावेत. त्या हारांमध्ये मध्यभागी लोलक व ताईत (Pendant) लावीत असत. काही ताईत हाडापासून तयार केलेले आढळले. तसेच मातीचे नंदी ताईतासारखे वापरीत असावेत. नेवासे येथील उत्खननात सालंकृत, कमलासनावर बसलेला नंदी सापडलेला आहे व त्याच्या कमलासनाखाली आरपार एक भोक आहे. यामध्ये दोरा घालून तो नंदी ताईता-सारखा वापरत असावेत. हा मातीचा नंदी साच्यात माती दाबून दोन भागांत करून मग एकत्र जुळविलेला आहे, व त्या नंदीच्या गळ्यात व पाठीवर अलंकार कोरलेले आहेत. दुसरा एक गोल आकाराचा ताईत असून त्याच्या एका बाजूवर आसनमांडी घातलेल्या मानवाची आकृती आढळून आलेली आहे. मण्यांपासून हार व माळा तयार करताना वापरात असलेले आंतरकही मिळाले आहेत.

## सौंदर्यप्रसाधने

लोक डोळ्यांत काजळ, सुरमा घालीत असावेत असे उत्खननात सापडलेल्या

कज्जल-शलाकांवरून म्हणता येते. सुरमा घालावयाच्या कांड्या हस्तिदंताच्या व हाडांच्या असत. विविध प्रकारचे नक्षीकाम केलेल्या, बारीक बारीक भोके किंवा रेषा पाडलेल्या, भाजलेल्या तांब्याच्या मातीच्या, वजनात हलक्या अशा अंग धुण्याच्या व घासण्याच्या मातीच्या वड्या ( Skin–Rubbers ) वज्र्या चौकोनी व गोल आकाराच्या अशा मातीच्या वज्र्याही सापडलेल्या आहेत.

ह्या काळात दोन चपट्या दगडांचे जाते धान्य दळण्यासाठी वापरीत असत. हल्लीसुद्धा अशीच जाती वापरतात.

चटणी वाटण्याचा पाटा दगडी असे. त्या पाट्याचा आकार trapezoid चौकोनी-त्रिकोणी किंवा वेड्यावाकड्या ( Irregular ) आकृतींचे असत; तसेच दगडी वरवंटेही सापडतात.

## नाणी

कोल्हापूर येथील उत्खननात बहमनी राजांचे व मुगल सम्राट आलमगीर याचे छाप असलेली विविध नाणी मिळाली. त्याचप्रमाणे नेवासे येथील उत्खननात मोहमद तगलघ, मुगल सम्राट अकबर, निजामशाही, कुतुबशाही व छत्रपती शिवाजी यांची शिवराई अशी त्या काळातील विविध नाणी सापडली. नाशिक येथील उत्खननात मोंगल बादशहांची व बडोद्याचे सरदार गायकवाड यांची नाणी सापडली. महाराष्ट्रातील वरील तीन प्रमुख उत्खननात ही नाणी सापडली आहेत.

□ □

प्रा६५

# कला व शिल्प—प्राचीन कालखंड

म. के. ढवळीकर

महाराष्ट्रातील प्राचीन वास्तुशिल्पावशेष इ. स. पू. तिसऱ्या शतकापेक्षा प्राचीन नाहीत. सोपारा ( जि. ठाणे ) आणि पवनी ( जि. भंडारा ) येथील स्तूप इ. स. पू. ३ ऱ्या शतकात अशोकाने बांधले असावेत. परंतु कालांतराने सुधारणा करण्यात येऊन त्यांचा विस्तार केल्यामुळे त्यांचे मूळचे स्वरूप आता पहावयास मिळत नाहीत. मौर्य-कालीन शिल्पांचे अवशेष महाराष्ट्रात नाहीतच असे म्हणावे लागेल.

प्राचीन महाराष्ट्रातील कलावशेषांत प्रामुख्याने वास्तुकला आणि मूर्तिशिल्प ( कला ) यांचे अवशेष मोठ्या प्रमाणावर सापडतात. याशिवाय चित्रकला, मृण्मयमूर्ती यांचा विचार जरूर आहे.

सोपारा येथील स्तूपाचे उत्खनन भगवानलाल इंद्रजी यांनी १८८२ मध्ये केले. या स्तूपाचा व्यास ६८ फूट होता. वरील अण्ड नष्ट झाल्याने त्याच्या संपूर्ण आकाराची कल्पना येत नाही. स्तूपाच्या मध्यभागी एक दगडी पेटी सापडली. तीत तांब्याचा, चांदीचा, स्फटिकाचा आणि सोन्याचा असे एकात एक करंडक होते. शिवाय त्यांत गौतमीपुत्र यज्ञश्री शातकर्णीचे एक चांदीचे नाणेही सापडले. त्यावरून हा स्तूप इ. स. २ ऱ्या शतकाच्या शेवटच्या चतुष्कात बांधला गेला हे सिद्ध होते.

पवनी ( जि. भंडारा ) येथे नव्याने केलेल्या उत्खननात जे प्राचीन अवशेष उजेडात आले आहेत त्यात वैशिष्ट्यपूर्ण बांधणीचा एक स्तूप सापडलेला. या स्तूपाच्या बांधणीची सुरुवात मौर्यशुंग काळात ( इ. स. पू. तिसरे दुसरे शतक ) झाली. हा स्तूप पक्क्या विटांचा बांधलेला आहे. या मूळच्या स्तूपाभोवती दगडी वेदिकेऐवजी लाकडी वेदिका असावी असा कयास खांबांच्या दरावरून करता येतो. या काळात स्तूपाभोवती प्रदक्षणा पथ तयार केलेला नव्हता असे उत्खननात आढळून आले. मूळ स्तूपाचा व्यास सुमारे ३८ मीटर होता. त्यावरून हा स्तूप त्या काळातही मोठ्या स्तूपांपैकी एक म्हणून गणला जात असावा. तो भारहूत येथील स्तूपापेक्षा मोठा आणि सांचीच्या तोडीचा असावा यात शंका नाही.

एवढया प्रचंड स्तूपाचा घुमट ( अण्ड ) विटांच्या भाराने खचून जाऊ नये म्हणून त्याच्या बांधणीत एका अभिनव तंत्राचा वापर केल्याचे आढळून आले. संपूर्ण घुमट विटांनी भरीव बांधून न काढता त्याच्या निरनिराळया स्तरावर चौकोनी आकाराच्या पेटिका तयार करून त्यात माती व विटांचे तुकडे भरण्यात आले. त्यामुळे घुमटाच्या पायावर पडणारा भार निश्चित कमी झाला. अमरावती व नागार्जुनकोंड येथील स्तूपात बांधणीचे हेच तंत्र वापरलेले आहे.

खिस्तपूर्व दुसऱ्या शतकात म्हणजे शुंग कालामध्ये या स्तूपाचा आकार वाढविण्यात आला व त्याचा व्यास ४१॥ मीटर इतका विस्तृत झाला. त्यामुळे तो भव्य व कलात्मक झाला. प्रदक्षणा पथ, वेदिकेच्या स्तंभावरील उत्कृष्ट कलाकृती, शिल्पाकृती आणि दान लेख, चारी दिशांना उभारण्यात आलेली प्रवेशद्वारे, स्तूपाच्या शीर्षावर बसवलेली दगडी छत्रावली या वैशिष्ट्यामुळे हा स्तूप केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर संपूर्ण भारतात प्रसिद्धी पावला असावा.

तेर येथील उत्खननात पक्क्या विटांचा बांधलेला एक चक्राकार आकाराचा स्तूप सापडला. त्याचा व्यास सुमारे २६ मीटर असून त्याच्या चारी बाजूस आयक ओटे आहेत. तसेच सभोवती प्रदक्षणापथही आहेत. तेथे सापडलेल्या एका लेखावरून आणि एका नाण्याच्या पुराव्यावरून ते पुळुमावीच्या कारकीर्दीत (इ. स. २ रे शतक) बांधला गेला असावा असे वाटते. तसेच उस्मानाबादजवळ वडगाव या गावी एका विटांच्या बांधलेल्या स्तूपाचे अवशेष आहेत. तो स्तूपही बहुधा इ. स. च्या २ ऱ्या शतकातील असावा.

मौर्यशुंग काळातील बांधणीचे स्तूप, वरील दोन अपवाद सोडल्यास, महाराष्ट्रात इतरत्र आढळले नाहीत. पण त्यापेक्षाही महत्त्वपूर्ण आणि चिरकाल टिकणाऱ्या एका अभिनव वास्तुप्रकारास खिस्तपूर्व दुसऱ्या शतकात महाराष्ट्रात सुरवात झाली, हा वास्तुप्रकार म्हणजे सह्याद्रीच्या कुशीतील शैलगृहे होत. भारतातील अतिप्राचीन लेणी अशोक आणि त्याचा नातू दशरथ यांच्या कारकीर्दीत बराबर आणि नागार्जुन टेकड्या ( जि. गया, बिहार ) खोदण्यात आली. त्यामध्ये अशोक आणि दशरथ यांचे लेख कोरलेले आहेत. त्यावरून आजीविक पंथाच्या भिक्षूंसाठी ती लेणी कोरलेली होती असे दिसून येते. यानंतर अशा प्रकारची लेणी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर खोदली जाऊ लागली. भारतातील एकूण १२०० लेण्यांपैकी सुमारे आठशेवर लेणी महाराष्ट्रात आहेत. खि. पू. दुसऱ्या शतकापासून इ. स. च्या १२ शतकापर्यंत शेकडो लेणी महाराष्ट्रात खोदली गेली. हा वास्तूप्रकार मराठी भूमीत लोकप्रिय होण्याचे मुख्य कारण म्हणजे सह्याद्रीच्या डोंगरातील उत्कृष्ट प्रतीचा कातळ ( Trap ) होय. हा खोदण्यास फारसा कठीण नव्हता. सातवाहन राजे आणि श्रीमंत व्यापारी यांच्या दातृत्वामुळे लेणी खोदण्यास मोठ्या प्रमाणावर सुरवात झाली. बौद्ध भिक्षूंना उपासनेसाठी आणि निवासासाठी या लेण्यांचा बहुमोल उपयोग होत असे. ते वर्षभर धर्मप्रसारार्थ निरनिराळ्या

भागात फिरत असत. मात्र पावसाळ्यात त्यांना एके ठिकाणी वस्ती करून राहणे भाग पडे. भिक्षूंनी पावसाळ्यात चार महिने एके ठिकाणी वास्तव्य करून धर्माच्या तत्त्वांचे मनन करून त्यावर चर्चा करावी असा भगवान बुद्धाचा आदेश होता. म्हणूनच पावसाळ्यात त्यांच्या निवाऱ्यासाठी खोदल्या गेलेल्या शैलगृहाचा ( सेलीय-घर ) ' वर्षावास ' असा उल्लेख बौद्ध ग्रंथांतून केलेला आढळतो. ही सर्व लेणी प्राचीन शहरापासून आणि व्यापारी केंद्रापासून थोडी दूर असली तरी ती प्राचीन हमरस्त्यावर होती. सोपारा ते उज्जैन या राजमार्गावर नाशिक येथील लेणी आहेत. तसेच कल्याणमार्गे निघणाऱ्या दुसऱ्या हमरस्त्यावर कार्ले, भाजे व तेथून जवळच जुन्नर येथील लेणी आढळतात. औरंगाबाद, वेरूळ, पितळखोरे ही लेणी तेरहून पैठण मार्गे चाळीसगाव या रस्त्यावर आहेत. औरंगाबादहून महेश्वरला ( महिष्मती )जाणाऱ्या मार्गावर अजंठा आणि घटोत्कच येथील लेणी आहेत.

शैलगृहाच्या वास्तुप्रकाराची प्रेरणा बहुधा इराणमधून भारतात आली. खि. पू. ५ व्या शतकात डरायस व त्यानंतरच्या अखमोनिय राजपुरुषांची थडगी पर्सिपोलीजवळ असलेल्या डोंगरात खोदलेली आहेत. परंतु ही प्रेरणा जरी विदेशी असली तरी तिचा विकास मात्र सर्वस्वी येथे झाला. बौद्ध लेण्यांची हीनयान व महायान अशा दोन गटांत विभागणी केली जाते खिस्तपूर्व दुसरे शतक ते इ. स. २ रे शतक या काळात हीनयान लेणी खोदली गेली. या लेण्यांत बुद्धाऐवजी चैत्यगृहात प्रचंड स्तूप कोरला जाई. पुढे दुसऱ्या शतकात उत्तरेत बुद्धमूर्तींची पूजा प्रचारात आली. त्यामुळे महायान लेण्यात स्तूपाची जागा बुद्धमूर्तींनी घेतली. इ. स. च्या ५ व्या व ६ व्या शतकात महाराष्ट्रात जी बौद्ध लेणी खोदली गेली, त्यातून बुद्धाच्या मूर्ती सर्वत्र आढळतात. इतकेच नव्हे तर काही ठिकाणी ( उदा. नाशिक, कार्ले इ. ) हीनयान लेण्यांचे रूपान्तर बुद्धमूर्ती खोदून महायान लेण्यात केलेले आढळते. ६ व्या शतकात हिंदुधर्मीयांनी लेणी खोदण्यास सुरवात केली. त्यावरून हा वास्तूप्रकार कोणत्याही एका धर्माची किंवा पंथाची मक्तेदारी नव्हती असे दिसून येते. तथापि निदान महाराष्ट्रात तरी हा वास्तूप्रकार सुरू करण्याचे श्रेय बौद्धधर्मीयांना दिले पाहिजे.

हीनयान पंथीय लेण्यांत चैत्यगृह आणि विहार अशा दोन वास्तू आढळतात. चैत्यगृहात स्तूप असतो. तेथे पूजा-अर्चा आणि धार्मिक विधी चालत. विहारांत भिक्षूंना राहण्याची सोय असे. महाराष्ट्रातील हीनयान चैत्यगृहाच्या अभ्यासावरून त्यांच्या वास्तूशिल्पात कालपरत्वे कसकसे बदल घडत गेले याची कल्पना येते. सर्वांत जुने चैत्यगृह भाजे ( जि. पुणे ) येथे आहे. काष्ठशिल्पाचा त्यावरील प्रभाव ध्यानात येण्यासारखा आहे. त्याचे लाकडी इमारतीशी असलेले साधर्म्य व त्यामध्ये अनुस्यूत असलेले अंधानुकरण पुढे कालांतराने हळूहळू कमी झालेले दिसले तरी त्याचा प्रत्यय कमीअधिक प्रमाणात ६ व्या शतकापर्यंत काही लेण्यांतून आढळतो.

भाजे, कोंडाणे, पितळखोरा, अजंठा ( क्र. १० ), बेडसा इत्यादी हीनयान चैत्यगृहे चापकार आहेत. त्यात दोन्ही बाजूंनी स्तंभ असतात. मागील अर्धगोलाकार भागात स्तूप असतो. भाजे येथील चैत्यगृहांत छतामध्ये असलेल्या लाकडी तुळयावर ( एकीवर ) " धमभाग पसादो " अशी अक्षरे कोरलेली आहेत. त्यावरून धर्मभाग नावाच्या एका गृहस्थाने हे दान दिले होते असे म्हणता येईल. या लेखाची अक्षरवटिका ख्रि. पू. सुमारे दोनशे या काळातील आहे. येथील स्तूपाच्या दर्शनी भागी लाकडी स्तंभ व काष्ठशिल्पही होते. कोंडाणे येथील चैत्यगृहाच्या दर्शनी भागात लाकडी खांबाऐवजी दगडी स्तंभ खोदलेले आहेत. पितळखोरा आणि अजंठा ( क्र. १० ) येथील चैत्यगृहांत कडेच्या व्हरांड्यात छतामध्ये लाकडी फासळ्याऐवजी दगडी फासळ्या कोरलेल्या आहेत. अजंठा ( क्र. १० ) हे चैत्यगृह १०० × ४० × ३३ फूट इतके भव्य आहे. तेथील स्तूपाची बैठक दुहेरी असून त्याचे अंड लंबगोलाकृती आहे. बेडसा चैत्यगृहाच्या दर्शनी भागातील स्तंभशीर्षावर मानवी आकृती आणि प्राणी कोरलेले आहेत. पर्सिपोली येथील स्तंभशीर्ष याच प्रकारचे आहेत. अजंठा ( क्रमांक ९ ) आणि नाशिक येथील पांडव-लेण्यातील चैत्यगृहांच्या दर्शनी भागावर लाकडी कोरीव काम नसावे असे वाटते. या दोन्ही चैत्यगृहांचे आणखी एक वैशिष्ट्य असे की ती चापाकार नसून काटकोनी आहेत तसेच बाजूच्या दालनातील छतही अर्धगोलाकृती नसून सपाट आहे.

हीनयान चैत्यगृहांच्या विकासातील शेवटचा टप्पा कार्ले येथे दिसून येतो. हे चैत्यगृह अत्यंत भव्य आणि कलापूर्ण असून कोरीव लेण्यांचा सर्वोत्कृष्ट नमुना म्हणून प्रसिद्ध आहे. याच्या दर्शनी भागावर चैत्यगृहाच्या स्थापनेचा लेख कोरलेला आहे.

" वेजयन्तितो सेठीना भूतपालेन सेलघरं
परिनिठापितं जंबुदीपाम्हि उत्तम "

" वैजयंती ( बनवासी-जिल्हा उत्तर कॅनरा, म्हैसूर ) येथील श्रेष्ठी भूतपाल याने जम्बुद्वीपामधील: सर्वोत्तम अशा या शैलगृहाची स्थापना केली. " चैत्यगृहाची लांबी १२५ फूट, रुंदी ४६ फूट, व उंची ४५ फूट आहे. त्याचा मागील भाग अर्धगोलाकृती असून आत जाताना दोन्ही बाजूस गोलाकृती कलशामधून निघालेले अष्टकोनी स्तंभ आहेत. स्तंभशीर्षावर हत्तीवर जोड-जोडीने बसलेल्या स्त्री-पुरुषांच्या मूर्ती फारच बहारदार कोरलेल्या आहेत. अर्धगोलाकृती पार्श्वभागात स्तूप असून त्यावर लाकडी छत्र आहे. अर्धगोलाकार छतावर कड्या असून त्यांना जोडणाऱ्या व लांबीशी समांतर लाकडी पट्यांनी वर छत बसविले आहे. मूळ कड्यांच्या दोन्ही बाजूस कमल-वेलींचे रंगीत चित्रण आहे आता ते फारच पुसट झाले आहे. चैत्यगृहाच्या दर्शनी भागावर कोरलेली मिथुने पुष्ट आहेत. त्यांची तुरेदार शिरोभूषणे, टपोरे अलंकार आणि आणि भावनिदर्शक निरागस चेहरे आपली दृष्टी खिळवून टाकतात. ही बहुधा दान देणारी जोडपी असावीत. या लेण्यांत अनेक दानलेख आहेत. त्यांपैकी काही दाने

धेनुकाकर येथील यवन ( ग्रीक ) व्यापाऱ्यांनी दिली होती. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता असे वाटते. पश्चिम महाराष्ट्रातील ग्रीक व्यापाऱ्यांची संख्या एवढी मोठी होती की अशोकाला बुद्ध धर्माच्या प्रसाराकरता धर्मरक्षित नामक यवनाची नेमणूक करावी लागली.

यानंतर इतके प्रचंड आणि भव्य लेणे हीनयान पंथीयांनी कोरले नाही. कान्हेरी ( कृष्णगिरी ) येथील हीनयान लेणी महत्त्वाची आहेत. येथील चैत्यगृह ( इ. स. दुसरे शतक ) हा हीनयान पंथीयांचा जवळ जवळ शेवटचा प्रयत्न आहे. ते कार्ले चैत्यगृहासारखे असले तरी त्याच्या तुलनेने खालच्या दर्जाचे आहे. जुन्नर येथील हीनयान लेणी समूह ( १३५ ) सर्वांत मोठा आहे. येथील चैत्यगृहे वास्तुशिल्पाच्या अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. ( तुळजा लेणे समूहातील गोलाकृती चैत्यगृह वैशिष्टयपूर्ण आहे. तेथील स्तूपाभोवती प्रदक्षणापथ आहे. स्तंभावर रंगीत चित्रे असल्याचे अलीकडे आढळून आले आहे. शिवनेरी लेण्यांतही अशाच प्रकारचे रंगीत चित्रांचे अवशेष आहेत. कुडा आणि महाड ( जि. कुलाबा ) येथील हीनयान लेणी तिसऱ्या शतकातील असावीत असे वाटते.

हीनयानपंथीय चैत्यगृहाबरोबरच विहारही खोदलेले आहेत. या विहारांचा आकार सर्वसाधारणपणे ठरीव साच्याचा आहे. त्यात मध्ये उघडे दालन असून त्यांच्याभोवती दर्शनी भाग सोडून इतर तिन्ही बाजूंस भिक्षूंसाठी लहान खोल्या खोदलेल्या आहेत. विहारातून फारसे कोरीव नक्षीकाम आढळत नाही. पितळखोरा ( इ. स. पू. २ रे शतक ) विहारांत मात्र ठसठशीत कोरीव काम केलेले आहे. चैत्यकमान, कोरीवजाळी, आणि दोन्ही बाजूंस प्राणीशीर्ष असलेले पर्सिपोलिटनधर्तीचे अर्धस्तंभ ( Pilaster ) उल्लेखनीय आहेत.

इ. स. च्या ३ ऱ्या शतकात सातवाहनांचा अस्त होऊन महाराष्ट्रातील लेणी खोदण्याचे काम बंद पडले. पुढे दोन शतकानंतर वाकाटकांच्या कारकीर्दीत पुन्हा लेणी खोदण्यास मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली. या काळात महायान पंथाचा सर्वत्र प्रसार होऊन बुद्धाच्या मूर्तीची पूजा करण्यात येऊ लागली. लेण्यांमध्ये बुद्धाच्या प्रचंड मूर्ती कोरण्यात आल्या. या काळातील महायान लेणी प्रामुख्याने मराठवाड्यात अजंठा, घटोत्कच, वेरूळ, औरंगाबाद येथे आहेत. महाराष्ट्रात इतरत्र काही ठिकाणी ( नाशिक, कान्हेरी, कार्ले ) महायान लेणी आहेत. तसेच जुन्या हीनयान लेण्यांत बुद्धमूर्ती कोरून त्यांचे महायान पंथीयात रूपांतर करण्याचे प्रयत्नही काही ठिकाणी केलेले आढळून येतात. परंतु ६ व्या शतकाच्या अखेरीस बौद्ध धर्माचा ऱ्हास सुरू झाला आणि बौद्ध लेणी खोदण्याचे काम संपुष्टात आले.

महायान लेण्यांचा पदविन्यास हीनयान लेण्याहून भिन्न आहे. चैत्य व विहार या दोन वास्तुप्रकारांची सांगड घालून महायान बौद्धांचे नवे लेणे तयार झाले. या लेण्यांत बौद्धमंदिरांतच भिक्षूंच्या निवासाची सोय करण्यात आली. बुद्धमूर्तीची पूजा हे महायान

पंथीयांचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे याचा वर उल्लेख केलेलाच आहे. तेव्हा बुद्धमूर्ती या लेण्यात असते हे सांगणे नकोच. इ. स. च्या ५ व्या व ६ व्या शतकात जी महायान लेणी महाराष्ट्रात खोदण्यात आली, त्यांचा पदविन्यास ठराविक, साचेबंद आहे. सर्व-साधारणपणे या लेण्यात एक भव्य दालन असून त्याच्या मागील भिंतीतील गर्भगृहात भव्य बुद्धमूर्ती कोरलेली असते. ही मूर्ती बहुधा धर्मचक्रप्रवर्तन मुद्रेत असते. गर्भगृह व मंडप यांच्यामध्ये कालांतराने अंतराळाचीही योजना करण्यात आली. शिवाय या मंदिरांत दर्शनी भाग सोडून तिन्ही बाजूंच्या भिंतींत भिक्षुंच्या निवासासाठी छोट्या खोल्या असतात. दर्शनी भागात भव्य प्रवेशिका असतात. या प्रकारची महायान लेणी अजंठा (उदा. क्र. १,२,१६,१७) घटोत्कच, औरंगाबाद, आणि वेरूळ इत्यादी ठिकाणी आहेत.

महायान लेण्यांचा आणखी एक प्रकार अजंठा (क्र. २०, २४) व वेरूळ येथे विश्वकर्मा (क्र. १०) पाहावयास मिळतो. ही लेणी हुबेहूब हीनयान चैत्यगृहासारखी आहेत. फरक फक्त एवढाच की त्यात असलेल्या स्तूपामध्ये बुद्धाची मूर्ती कोरलेली आहे. कदाचित दोन्ही पंथीयांच्या भावनांचा विचार करून अशा प्रकारची लेणी खोदली असावीत. वेरूळ येथील काही लेणी निराळ्या प्रकारची आहेत. लेणे क्र. २ मध्ये गर्भगृहात बुद्धमूर्ती असून मंडपाच्या दोन्ही बाजूंस उंच ओट्यावर काही मूर्ती कोरलेल्या आहेत. या शिल्पवीथि अत्यंत अभिनव आहेत. तसेच एक प्रचंड लेणे (क्र. ५) वेरूळ येथे आहे. ते ११७′ लांब व ५८॥′ रुंद आहे. त्यात १० खांबांच्या दोन रांगा आहेत. त्यामधील विस्तृत मंडपाच्या मध्यभागी फूटभर उंचीचे ओटे ठेवलेले आहेत. भिंतीमध्ये एकूण १७ खोल्या आहेत. या प्रचंड लेण्याचा उपयोग सामुदायिक पद्धतीने अध्ययन, अध्यापन व निवारा यासाठी केला जात असावा. या लेण्यास "महारवाडा" असे जुने नाव आहे. ते बहुधा "महाविहार" या मूळच्या नावावरून पडले असावे. कारण हा येथील सर्वांत मोठा विहार आहे. कान्हेरी येथील 'दरबार' लेणे याच धर्तीचे आहे.

वेरूळ येथील क्रमांक ११ आणि १२ ही लेणी अत्यंत भव्य आहेत. ती दोन्ही तीन मजली आहेत. परंतु लेणे क्रमांक ११ ला 'दोनताल' म्हणतात. १८७६ पर्यंत या लेण्याचा तळमजला मातीने संपूर्ण भरून गेला होता. ही दोन्ही लेणी बुद्धधर्मीयांची अखेरची कलाकृती होय.

औरंगाबाद येथील लेणी ६–७ व्या शतकातील आहेत. त्यांपैकी लेणे क्र. ३ हे अजंठ्याच्या महायान लेण्यांच्या परंपरेतले आहे. लेणे क्र. ७ मात्र वेरूळच्या "रामेश्वर" (क्र. २४) या लेण्याशी मिळतेजुळते आहे. त्यात पुढे व्हरांडा असून मागील भिंतीत गर्भगृह आहे. भिक्षूंच्या खोल्या आहे. गर्भगृहाच्या सभोवती प्रदक्षिणापथ आहे आणि त्याच्या भिंतीत भिक्षूंच्या खोल्या आहेत. या लेण्यात अत्युच्च कोटीच्या अनेक शिल्पकृती आहेत.

## हिंदू लेणी

महाराष्ट्रात ६ व्या शतकाच्या प्रथमार्धात हिंदुधर्मीयांची लेणी खोदण्यास सुरुवात झाली. त्यावेळी येथील काही प्रदेशावर कलचुरींचे राज्य होते. ते निस्सीम शिवभक्त असल्यामुळे शैवलेणी मोठ्या प्रमाणावर खोदली गेली. त्यामध्ये घारापुरी येथील लेण्यांचा अगत्याने उल्लेख केला पाहिजे. तेथील भव्य त्रिमूर्तीला ( लेणे क्र. १ ) भारतीय कलेच्या इतिहासात अनन्यसाधारण स्थान आहे. या लेण्याचा पदविन्यास वैशिष्टयपूर्ण आहे. एका प्रचंड मंडपात मागील भिंतीच्या अलिकडे गर्भगृह खोदलेले आहे. त्याला प्रदक्षणापथही आहे. डाव्या-उजव्या बाजूस स्तंभयुक्त दालने ( Transepts ) असून तेथूनही प्रवेशाची योजना केलेली आहे. वेरूळ येथील धुमार लेण्याचा ( क्र. २९ ) पदविन्यास याच प्रकारचा आहे. दोन्ही ठिकाणी बाजूच्या भिंतीत शैवमूर्ती आहेत. तसेच गर्भगृहाच्या दर्शनी भागावर अजस्र द्वारपाल कोरलेले आहेत.

वेरूळ येथील लेणे क्र. २१ ( रामेश्वर ) हे त्यातील अत्युत्कृष्ट शिल्पपटामुळे फारच मनोवेधक वाटते. येथील मंडपात दोन्ही बाजूच्या भिंतीत शैवशिल्पे आहेत. मागील भिंतीत गर्भगृह आहे. त्याच्या सभोवती प्रदक्षणापथ आहे. अंगणात उंच चौथऱ्यावर नंदी आहे. लेण्याच्या दर्शनी भागावर असलेल्या कडेच्या बाजूस गंगा व यमुना यांच्या अप्रतिम मूर्ती कोरलेल्या आहेत. वेरूळ येथील दशावतार लेणे ( लेणे क्र. १५ ) हे बौद्धधर्मीय लेण्याप्रमाणे तिमजली करण्याचा विचार असावा असे वाटते. कदाचित याची सुरुवातही बौद्धधर्मीयांनी केली असण्याची शक्यता आहे. कारण वरच्या मजल्यावरील दर्शनी ( बाजू ) खांबावर असलेल्या स्तंभशीर्षात भूमिस्पर्श मुद्रेतील बुद्धाची मूर्ती कोरलेली आहे. बहुधा बौद्धधर्मीयांनी आपले काम स्थगित केल्यानंतर हिंदुधर्मीयांनी हे लेणे कोरण्यासाठी हाती घेतले असावे. या लेण्यामध्ये अनेक शैव व वैष्णव मूर्ती कोरलेल्या आहेत. अंगणातील नंदीमंडपावर राष्ट्रकूट राजा दंतिदुर्ग ( राजा ) याचा कोरीव लेख आहे. त्यावरून हे लेणे ८ व्या शतकाच्या प्रथमार्धात खोदलेले असावे असे वाटते.

कैलास लेणे क्र. १६ हे साऱ्या भारतातील अत्युत्कृष्ट लेणे गणले जाते. त्याचे सौंदर्य केवळ अवर्णनीय आहे.

ताम्रलेखाच्या पुराव्यावरून कैलास लेणे ८ व्या शतकाच्या मध्यात राष्ट्रकूट राजा पहिला कृष्ण ( इ. स. ८५२–५३ ) याने कोरले असे दिसते. येथील स्वयंभू शिवलिंग हिरेमाणकांनी मढविले होते असा उल्लेख त्या दानलेखांत आहे. चारी बाजूंनी डोंगर फोडून " आधी कळस मग पाया रे " या उक्तीप्रमाणे ते कोरलेले आहे. द्राविड पद्धतीचे हे मंदिर प्रचंड आहे. पट्टदकल येथील विरुपाक्ष मंदिर आणि कांजीवरम् येथील कैलासनाथ मंदिर या वास्तूशी त्याचे विलक्षण साम्य आहे. हे मंदिर एका प्रचंड अधिष्ठानावर उभे आहे. त्यावर हत्ती, सिंह, व्याल यांच्या भव्य मूर्ती कोरलेल्या आहेत. मंदिराच्या

बाहेरील भिंतीवर काही वैशिष्ट्यपूर्ण शिल्पे आहेत. त्यांत दक्षिणेस रामायणातील व उत्तरेस महाभारतातील काही प्रसंग कोरलेले आहेत.

मंदिराच्या सभामंडपाच्या छतावर पूर्वी रंगीत चित्रे होती. ती आता पुष्कळशी नाहीशी झाली आहेत. या चित्रामुळेच लेण्याचे " रंगमहाल " असे नाव पडले असावे. छतावर नटराज शिवाची मूर्ती कोरलेली आहे. मुख्य गाभाऱ्यात शिवलिंग आहे. बारा ज्योतिर्लिंगामध्ये घृष्णेशाचा एक स्वयंभू ज्योतिर्लिंग म्हणून उल्लेख केलेला आहे. 'घृष्' म्हणजे " खोदणे " " फोडणे " किंवा " घोटणे. " तेव्हा खोदून तयार केलेले हे घृष्णेश शिवलिंग म्हणजेच कैलास लेणे असावे असे वाटते. लेण्यासमोर असलेले घृष्णेश्वर मंदिर १८ व्या शतकात अहिल्यादेवीने बांधले. परंतु ह्या लेण्यातील शिवलिंग हेच मूळ ज्योतिर्लिंग असावे.

मुख्य मंदिरामागे व दोन्ही बाजूंना ओवऱ्या आहेत. त्यांच्या भिंतीमध्ये अनेक सुंदर शिल्पे कोरलेली आहेत. उत्तरेच्या भिंतीत नदी-देवता मंदिराजवळ एक स्तंभयुक्त दालन आहे. त्यामधून लंकेश्वर मंदिरात जाण्याचा मार्ग आहे. हे लेणे १० व्या शतकात कोरले असावे.

वेरूळ येथील जैन लेणी ९ व्या १० व्या शतकातील आहेत. महाराष्ट्रात ९ व्या शतकापासून जैन लेणी खोदण्यास सुरुवात झाली. अंकाई-टंकाई, नाशिक व पाटण या ठिकाणी जैन लेणी आहेत. राष्ट्रकूट राजा अमोघ वर्ष ( ८१४ ते ८७८ ) हा जैनधर्मप्रेमी होता. तेव्हाच वेरूळ येथील जैन लेणी खोदण्यास सुरुवात झाली असावी. तेथील जैन लेण्यात गोमतेश्वराची प्रतिमा वारंवार आढळते. ही लेणी दिगंबर जैनपंथीयाची असावीत. जैनधर्मीयांनी हिंदू लेण्यांपासून स्फूर्ती घेतली असावी. लेणे क्र. ३० " छोटा कैलास " किंवा " इंद्रसभा " ( क्र. ३१ ) ह्या लेण्याचे कैलास लेण्याशी विलक्षण साम्य आहे. धाराशिव ( जि. उस्मानाबाद ) येथील जैन लेण्यांची खूपच पडझड झालेली आहे. परंतु तेथील प्रमुख लेणे मूळ बौद्धधर्मीय असून ५ व्या शतकात खोदले गेले असावे असे वाटते.

" छोटा कैलास " हे " कैलास "प्रमाणेच द्राविड पद्धतीचे मंदिर असून त्याच्या गर्भगृहात महावीराची प्रतिमा आहे. याच्या सभामंडपाच्या तिन्ही बाजूंस छोटे मंडप आहेत. वरच्या मजल्यावर एक महावीर प्रतिमागृह आहे. मुख्य सभामंडपातील स्तंभाची योजना कैलास लेण्यातील सभामंडपाप्रमाणेच आहेत. या लेण्यात १८७७ साली एक सुटे शिल्प सापडले, त्यावर १३ व्या शतकाचा उल्लेख होता. त्यावरून १३ व्या शतकातही येथे पूजाअर्चा चाले हे सिद्ध होते. परंतु अल्लाउद्दीन खिलजीच्या आगमनानंतर येथील पूजापाठ संपुष्टात आला.

क्र. ३१ ते ३४ ही जैन लेणी एकमेकास लागून कोरलेली आहेत. त्यातील

" इंद्रसभा " क्र. ३१ हे लेणे उल्लेखनीय आहे. या लेण्याच्या सभामंडपात उजव्या बाजूस गोमतेश्वराची कायोत्सर्ग मुद्रेतील मूर्ती असून, तिच्या समोर पार्श्वनाथाची प्रतिमा आहे. लेणे क्र. ३२ मध्ये प्राङ्गणात उंच अधिष्ठानावर चतुर्मुख तीर्थंकर प्रतिमा कोरलेली आहे. त्यावरून मूर्ती कशी कोरली जाई याची कल्पना येते. तळमजल्यावरील गर्भगृहात महावीराची मूर्ती आहे. बाजूच्या भिंतीतील खोदकाम अर्धवट राहिलेले दिसते. वरच्या मजल्यावर असलेल्या अग्रमंडपात समोरासमोर मातंग व सिद्धायिका यांच्या अप्रतिम मूर्ती आहेत. जगन्नाथ सभा ( लेणे नं. ३३ ) येथेही मातंग व सिद्धायिका यांच्या मूर्ती आहेत. या जैन लेण्यांत रंगीत चित्रांचे अवशेष आहेत. ते फार खराब झाल्यामुळे त्यांची आजपर्यंत फारशी कल्पना नव्हती. परंतु ती चित्रे आता नव्याने रासायनिक प्रक्रिया करून स्वच्छ केली जात आहेत.

तेर येथील उत्खननात एका चापाकर ( apsidal ) मंदिराचे अवशेष ( ३ रे, १ ले, २ रे शतक ) सापडले आहेत. त्यातही स्तूप आहेत. ते बहुधा त्रिविक्रम मंदिरासारखे असावेत.

## शिल्पकला

मौर्यकालीन किंवा तत्पूर्वीचे शिल्पावशेष अद्यापि महाराष्ट्रात सापडले नाहीत. येथील अतिप्राचीन शिल्पाचे उदाहरण भाजे लेण्यात आहे. तेथील विहारात असलेल्या सूर्य आणि इंद्र यांच्या उठावात कोरलेल्या शुंग सातवाहन कालीन शिल्पकृती शिल्पकौशल्याची साक्ष देतात. त्या मूर्ती सूर्य आणि इंद्र या देवतांच्या नसून तो शिल्पपट " दिव्यावदान" या महायान ग्रंथांत वर्णन केलेल्या विजिगीषु राजा मांधाता याच्या उत्तर कुरूतील स्वारीचे चित्रण आहे, असे वासुदेवशरण अग्रवाल यांचे मत आहे. या शिल्पाच्या जवळजवळ समकालीन शिल्पकृती पवनी येथील उत्खननात अलिकडे सापडल्या आहेत. त्या शुंग शैलीच्या असून त्याचे भारहूत येथील शिल्पाशी विलक्षण साम्य आहे. त्यात उत्कृष्ट मानवी शिल्पे आहेत. तसेच नागमुचलिंदाच्या प्रसंगासारखे बुद्ध जीवनातील काही प्रसंगही कोरलेले आहेत. स्त्री-पुरुषांच्या अंगावरील अलंकार, त्यांची केशभूषा व वस्त्र-प्रावरणे अत्यंत मनोरम आहेत. तसेच धर्मचक्र, स्तूप इत्यादी धर्मचिन्हेही कोरलेली आहेत. विविध वेलबुट्टींची नक्षी कोरलेले अनेक स्तंभ आहेत. महाराष्ट्रातील शुंगकालीन शिल्पाकृती एवढ्याच !

वैशिष्ट्यपूर्ण सातवाहन शिल्पाची सुरुवात पितळखोरा येथे होते. येथील बहुसंख्य शिल्पाकृती काही वर्षांपूर्वी उत्खननामध्ये सापडल्या. त्यात अनेक मानवी शिल्पे आहेत. त्यांच्या अभ्यासावरून सातवाहनांची एक स्वतंत्र शिल्पशैली होती असे म्हणता येईल. शुंग शैलीतील ओबडधोबडपणाचा यात अभाव आहे. यातील यक्ष, द्वारपाल आणि स्त्री पुरुष अत्यंत सौष्ठवपूर्ण आणि गतिमान आहेत. त्यांचे रसरशीत अवयव, चेहऱ्या-

वरील मुग्ध पण खेळकर भाव पाहून त्या जिवंत मानवी आकृती वाटतात. पितळखोरा येथील यक्षमूर्तीचा केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर भारतीय शिल्पकलेतील एक अत्युत्कृष्ट मूर्ती म्हणून निर्देश करावा लागेल. संपूर्ण गोलाकार कोरलेला सातवाहनकालीन पुतळा हा एकच आहे.

सातवाहनशैलीचा परमोच्च बिंदू कार्ले येथील लेण्यात पहावयास मिळतो. तेथील दर्शनी भिंतीवर कोरलेली स्त्री-पुरुषांची मिथुने परिपुष्ट आणि ठसठशीत आहेत. त्यांची शरीरसंपदा दृष्ट लागण्यासारखी आहे. तथापि ती काहीशी स्थूल वाटतात. त्यांचे चेहरे भावपूर्ण, बघणारांची दृष्टी खिळवून टाकणारे. अशी दोन जोडपी. अत्यंत सुंदर चैत्यगृह बांधण्याचा कृतार्थतेचा निर्भेळ आनंद त्यांच्या चेहेऱ्यावर ओसंडून दिसत आहे. याच प्रकारची जोडपी कान्हेरी येथील यज्ञश्री गुंफेत आहेत. त्यांची तुरेदार शिरोभूषणे व टपोरे अलंकार लक्षणीय आहेत.

गुप्त-वाकाटककालीन अनेक शिल्पाकृती अजंठ्याच्या लेण्यात आहेत. तेथे मानवी आकृती, पशुपक्षी, लेहरेदार पल्लवींची नक्षी यांचे असंख्य नमुने कोरलेले आहेत. १० व्या लेण्याजवळील नागराज व त्याची राणी यांची शिल्पे अत्यंत मनोहारी आहेत. त्यांच्या चेहऱ्यांवरील मुग्धभाव गुप्तकालीन सारनाथ शैलीची आठवण करून देतो. लेणे क्र. २४ मधील डाव्या बाजूच्या भिंतीवर कोरलेला प्रचंड शिल्पपट अत्यंत मनोवेधक आहे. बुद्ध-निर्वाणाचे दृश्य त्यांच्या अनुयायांचे आणि भक्तांचे आक्रंदन आणि बुद्धाच्या चेहऱ्या-वरील समाधिस्त भाव अवर्णनीय आहे. या शिल्पाच्या शेजारी बुद्धाला मोहिनी घालणाऱ्या सौंदर्यवती मारकन्या आहेत. त्यांचे कमनीय देह व मोहक हावभाव भारतीय शिल्पांत इतरत्र फारसे आढळत नाहीत. माराचे राक्षस अनुयायी अत्यंत अक्राळ-विक्राळ, भयानक आहेत. वरच्या बाजूस हर्षोत्फुल्ल झालेले इंद्र, ब्रह्मा इत्यादी देवगण आहेत. या साऱ्या शिल्पावर गुप्त शैलीचा ठसा उमटलेला दिसतो. अजिंठ्याची शिल्पे त्यावर मातीचा लेप देऊन रंगवविलेली होती. लेपाचे व रंगाचे अवशेष अजूनही काही शिल्पांवर आहेत. गुप्तकाळातील काही शिल्पाकृती पवनार येथे सापडल्या आहेत. त्यांत रामायणातील काही प्रसंग कोरलेले आहेत. परंतु या मूर्तीतील कोरीव काम आता संपूर्ण-पणे नाहीसे होत आले आहे. फक्त अंधकासूरवध मूर्ती आणि गंगेची मूर्ती ही दोन शिल्पे सुस्थितीत आहेत.

६ व्या व ७ व्या शतकातील अत्युत्कृष्ट शिल्प घारापुरी वेरूळ ( क्र. २१ ) आणि औरंगाबाद येथील लेण्यांत आहे. घारापुरीची त्रिमूर्ती साऱ्या जगभर प्रसिद्ध आहे. भारतात त्याला तोड नाही. शिल्पातून दृग्गोचर होणारा सर्व रसांचा व गुणांचा याहून अधिक परिणामकारक आविष्कार अन्यत्र सापडणे कठीण. वेरूळच्या दशावतार गुंफेतील हिरण्यकशिपु-वधाचे शिल्प राष्ट्रकूट शिल्पकलेचा अप्रतिम नमुना आहे. त्यातील नृसिंहाच्या नखानखातून त्वेष ओसंडताना दिसतो. याच गुंफेतील अंधकासूर-वधाचे शिल्पही अत्यंत

कौशल्याने कोरलेले आहे. शिवाचे रौद्र स्वरूप इतके प्रभावी इतरत्र क्वचितच आढळले. राष्ट्रकूटकालीन वास्तुकलेचा परमोच्च बिंदू "कैलास लेण्यात" आणि शिल्पाचा "दशावतार लेण्यात" प्रतीत झाला आहे.

## चित्रकला

इतिहासकालीन भारतीय चित्रकलेचे अवशेष काही अपवाद सोडल्यास फक्त महाराष्ट्रातच आहेत हे सांगणे अगत्याचे आहे. महाराष्ट्रातील बहुसंख्य बौद्ध लेणी पूर्वी भित्तीचित्रांनी सुशोभित केलेली होती. परंतु नैसर्गिक व मानवी तडाख्यात सापडून यातील असंख्य चित्रे नाश पावली आहेत. ती आता फक्त अजंठा येथील लेणे क्र. १-२, १६-१७ आणि वेरूळ येथील 'कैलास' या लेण्यांत थोडी फार शिल्लक आहेत. वेरूळ येथील जैन लेण्यांतील चित्रे संपूर्णपणे काळवंडून गेली होती. परंतु अलिकडे त्यांच्यावर रासायनिक प्रक्रिया करून ती बरीचशी स्वच्छ करण्यात आली आहेत. एकंदरीत चित्रांचा अभ्यास केल्यास असे दिसून येईल की महाराष्ट्रातील चित्रकला इ. स. पू. दुसरे शतक ते इ. स. १० वे शतक या १२ शे वर्षांच्या प्रदीर्घ काळात मोहरली. यातूनच चित्रकलेच्या विकासाची पुढील पायरी गुजराथेतील जैन हस्तलिखितातील चित्रांत पहावयास मिळते. मध्ययुगीन राजस्थानी, पहाडी, कांगडा इत्यादी शैलींचा उगमही प्राचीन भित्तिचित्रांतून झाला असे काही विद्वानांचे मत आहे.

अजंठा व वेरूळ येथील भित्तिचित्रांच्या तंत्रांचा अभ्यास करण्याचे मान्यवर विद्वानांनी प्रयत्न केले आहेत. त्यावरून ही चित्रे कशी रंगवली गेली याची कल्पना येते. सर्वप्रथम लेण्याच्या भिंती तासून काढीत. मात्र त्यावर गिलावा पक्का बसावा म्हणून त्या थोड्या ओबडधोबड ठेवीत. त्यावर चिखलाचा जाडसर लेप दिला जाई. चिखल घट्ट आणि एकजीव व्हावा म्हणून त्यात शेणकूट, भाताचा तूस, भुसा इत्यादींचे मिश्रण केले जाई. त्यामुळे हा लेप पक्का बसे. हा लेप घोटून गुळगुळीत केला जाई व त्यावर चुन्याच्या पांढऱ्या रंगाचा हात देत असत. त्यावर गेरूने चित्रांच्या आकृत्या रेखाटल्या जात. या आकृत्यांतून पुढे रंग भरले जात. रंगांत पांढरा, काळा, लाल, पिवळा व हिरवा हे रंग प्रामुख्याने वापरले आहेत. यावर कापड अंथरलेले होते असे आता दिसून आले आहे. नैसर्गिक रंग जागेवर तयार केले जात. अजंठ्याच्या महायान लेण्यांतील चित्रांत काही ठिकाणी निळा रंग वापरला आहे. हा बहुधा अफगाणिस्तान आणि इराणमधून आयात केला गेला असावा. कारण लॅपिस लाझुलीच्या खाणी आपल्याकडे नाहीत. ही चित्रे कित्येक शतकांच्या प्रदीर्घ काळानंतरही टिकून आहेत याचे आश्चर्य वाटते. रंगकाम पक्के व्हावे म्हणून त्यावर डिंकासारख्या चिकट पदार्थाचा पातळसा थर दिल्याचा पुरावा रासायनिक पृथक्करण केल्यावर आढळून आला आहे. त्यामुळे ही चित्रे फ्रेस्को पद्धतीची नसून "टेम्पेरा" पद्धतीची आहेत हे नव्याने सिद्ध झाले आहे.

सातवाहनकालीन ख्रिस्तपूर्व दुसऱ्या पहिल्या शतकाचे चित्रकलेचे अवशेष अजंठ्याच्या १० व्या लेण्यात आहेत. त्यातील छदंत जातकाची कथा अत्यंत हळुवारपणे चितारलेली आहे. त्यात हत्तीचे चित्रण फार प्रभावी आहे.

वाकाटक गुप्तकालीन चित्रकलेचे वैभव अजंठ्याच्या लेणे क्र. १–२, १६–१७ यात पाहावयास मिळते. या काळात चित्रकलेचे काही संकेत रूढ झाले होते. निरनिराळ्या जातक कथांचा आविष्कार करण्यासाठी चित्रकारांनी या संकेताचा मोठ्या खुबीने उपयोग केला. त्यामुळे कथेतील निरनिराळे प्रसंग क्रमाक्रमाने समजून घेण्यास मदत होते. छाया-प्रकाशाचा वापरही मोठ्या कौशल्याने केलेला आढळतो. चित्रांतील मानवी आकृती आणि पशु-पक्षीयांचे जिवंत व सहृदय चित्रण तेथे केलेले आहे. त्यांच्या चेहेऱ्यावरील मुग्ध भावांचा संवेदनाशील आविष्कार बहारीचा आहे क्र. १६ मधील मरणोन्मुख राणीच्या चेहेऱ्यावरील मूर्छित भाव हृदय हेलावून टाकतो. कौशल्यपूर्ण रंगयोजना आणि भावस्पर्शी चित्रण यांचा विचार करता साऱ्या विश्वात या चित्राला तोड नाही. तसेच लेणे क्र. १७ मध्ये बुद्धदेव आणि राणी यशोधरा व पुत्र राहुल यांचे चित्र आहे. या चित्रात तिघांच्या चेहेऱ्यावर निरनिराळे भाव अत्यंत कौशल्याने दाखविले आहेत. जातक व अवदान कथा यांच्या चित्रणाखेरीज हरतऱ्हेची नक्षीही तेथे चितारलेली आहे. खांबावर, छतावर आणि इतरत्रही मोहोरदार लतापल्लवी आणि वेलबुट्टया रंगविल्या आहेत. त्यांची कलाकुसरही कमी प्रतीची नाही.

अजंठ्याच्या चित्रकलेची परंपरा राष्ट्रकूट काळातही (८ वे शतक) चालू राहिली. परंतु तिचे फार थोडे अवशेष वेरूळच्या कैलास लेण्यात आहेत. तेथील मुख्य मंडपाच्या छतावर पांढऱ्या, लाल आणि तपकिरी रंगात कमल सरोवराचे दृश्य आहे. शिवाय एका लढाईचेही दृश्य आहे. त्यावर "स्वस्ति श्री परमारराऊ" असा रंगीत लेख आहे. माळव्यातील परमार राजानी दक्षिणेत जी स्वारी केली तिचे हे दृश्य असावे. या चित्रांतील स्त्री-पुरुषांची ठेवण बाकदार, धारदार नाक, लांबट गोल डोळे वैशिष्टयपूर्ण आहेत. या शैलीचा विकास पुढे गुजराथेतील जैन हस्तलिखितांतील चित्रांत पाहावयास मिळतो.

## मृण्मय मूर्ती

महाराष्ट्रांतील मातीच्या मूर्तींचा अभ्यास अद्यापि झाला नाही याचे मुख्य कारण असे की उत्तर भारतातल्याप्रमाणे आपल्याकडे भाजक्या मातीच्या मूर्ती विपुल प्रमाणात सापडत नाहीत. फक्त सातवाहनकालीन मातीची चित्रे आणि खेळणी सापडतात. ती प्रामुख्याने तेर ( जि. उस्मानाबाद ) येथे सापडली आहेत. काही थोड्या मूर्ती नेवाश्याच्या उत्खननात सापडल्या. या चित्रात प्रामुख्याने स्त्री-पुरुष आणि बालकांच्या मूर्ती, हत्ती, घोडा, बैल इत्यादी प्राण्यांची चित्रे आहेत. या सर्व मूर्ती, एखाद-दुसरा अपवाद सोडल्यास, शाडूच्या बनविलेल्या आहेत. त्या बनवण्याचे एक अभिनव तंत्र होते. त्या आतून पोकळ आहेत. चित्राचे दोन भाग दोन निराळ्या साच्यातून काढून

नंतर जोडले जात. सातवाहन काळापूर्वी हे तंत्र भारतीय मूर्तिकारांना ज्ञात नव्हते. रोमन साम्राज्यात मात्र सर्वत्र या तंत्राचा अवलंब करून मातीच्या मूर्ती बनविल्या जात. तेव्हा हे तंत्र तिकडूनच आपल्याकडे आले असावे यात शंका नाही.

स्त्री-पुरुषांच्या मातीच्या मूर्ती आणि कार्ले, कान्हेरी इत्यादी लेण्यांतील कोरीव मूर्ती यांमध्ये असलेले विलक्षण साम्य लक्षात घेता त्या समकालीन असाव्यात यात शंका नाही. नेवाशाच्या उत्खननात एक छोटासा भाजक्या मातीचा स्तूप सापडला आहे. त्याच्या चारी बाजूस शालभंजिका आहेत. सांचीच्या तोरणात याच धर्तीची चित्रे कोरलेली आहेत. तेर येथे काही स्त्री नग्नकबंधांची चित्रे आहेत. त्यामागील प्रेरणा रोमन असावी असे डॉ. सांकलियाचे मत आहे. नेवाशाचा निरागस, हसऱ्या चेहऱ्याचा मुग्ध बालक त्याच प्रकारच्या मूर्तींची आठवण करून देतो. केवळ रोमन तंत्र आणि रोमन शैलीचा प्रभावच नव्हे तर रोमन मूर्तीही तेर येथे सापडल्या आहेत. त्यात मनुष्यशीर्ष असलेल्या दिव्याचा उल्लेख करणे अगत्याचे आहे. रोमन दिव्याचे उल्लेख दक्षिणेतील शिलालेखातून आढळतात.

□ □

# कला व शिल्प-मध्ययुग, पश्चिम महाराष्ट्र

म. श्री. माटे

महाराष्ट्र भूमीवर उत्पन्न झालेल्या निरनिराळ्या कलाकृतींपैकी बौद्धधर्मीय कृती आणि काही हिंदू व जैन कृती यांचा परिचय वर आलेलाच आहे. राष्ट्रकूटांच्या काळापर्यंतच्या कलावशेषांचा त्यात समावेश झालेला आहे. त्यानंतर हजार ते बाराशे वर्षांच्या दीर्घ कालखंडात ज्या कलाकृती उत्पन्न झाल्या त्या हिंदू, जैन व इस्लामी धर्मीयांच्या होत. वास्तु वा मूर्तीकलेचा अभ्यास करताना धार्मिक स्वरूपाच्या वास्तूंचा विचार प्रथम डोळ्यांसमोर येतो, याचे कारण असे की आज केवळ त्यांचीच अवशिष्ट रूपे पहावयास मिळतात. तत्कालीन नगरे, राजप्रासाद, दुर्ग यांची वर्णने साहित्यातून वाचावयास सापडत असली तरी त्यांचे प्रत्यक्ष व बोधप्रद अवशेष जवळपास कोठेच पाहावयास मिळत नाहीत. याला मुख्य कारण असे की धार्मिक वास्तूसाठी प्रायः दगडांचा वापर होत असे, तर नागरी वास्तूसाठी विटा व लाकूड. स्वाभाविकच दगडी वास्तु वा शिल्प अधिक काळ टिकून राहते. दुसरा फरक असा की एखादा राजप्रासाद वा महाल हा त्या त्या व्यक्तीच्या वा घराण्याच्या मालकीचा असतो. तो टिकविण्याची, त्याची देखभाल करण्याची जबाबदारी वैयक्तिक असते. याउलट देवालयाच्या उभारणीला पुष्कळदा एखाद्या व्यक्तीचेच श्रम वा दातृत्व कारणीभूत असले, तरी ते टिकवून धरण्याची जबाबदारी सामाजिक ठरते. त्या मागचा उद्देश धार्मिक असल्याने सबंध समाजाला जिव्हाळ्याचा; त्याविषयी एखाददुसऱ्या माणसाला किंवा घराण्याला नव्हे तर सर्वच समाजाला आस्था वाटते. महाराष्ट्रात मंदिरे, समाधी, मशिदी, थडगी, आदी वास्तूंचे अवशेष शेकड्यांनी आढळतात. त्यापैकी काही पूर्वीचे रूप कमीजास्त प्रमाणात सांभाळून राहिले आहेत तर काही अक्षरशः जमीनदोस्त झाले आहेत. या सर्व कलाकृतींची सविस्तर माहिती या ठिकाणी देणे शक्य नाही आणि ते आवश्यकही नाही. गुणलक्षणावरून कोणते विभाग वा कालखंड अभ्यासकांनी कल्पिलेले आहेत व त्या त्या विभागांची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती याचे थोडक्यात विवेचन करून नंतर निरनिराळ्या प्रकारातील काही प्रेक्षणीय व लक्षणीय कलाकृतींचे वर्णन द्यावयाचे अशी योजना केलेली आहे.

इ. स. च्या नवव्या किंवा दहाव्या शतकापासून ते तेराव्या शतकाच्या शेवटापर्यंतचा काल हा हिंदु–जैन काल म्हणता येईल. महाराष्ट्रात यावेळी कल्याणी चालुक्य, शिलाहार व यादव या प्रमुख घराण्यांची सत्ता होती. सन १३०० ते १६५० हा दुसरा कालखंड. यामध्ये हिंदु-मंदिर बांधणी जवळजवळ स्थगितच होती. इस्लामी राज्यकर्त्यांनी बांधविलेल्या मशिदी, थडगी, मनोरे अशा स्वरूपाच्या वास्तु अनेक ठिकाणी दिसतात ती सर्व या कालखंडातील होत. इ. स. १६५० ते १८७० हा तिसरा कालखंड समजता येईल. यालाच "मराठेशाही" असेही नाव आहे. पुन्हा एकदा हिंदुधर्माला बरे दिवस येऊन मंदिरे, घाट, समाधी यांची बांधणी झाली. या शेवटच्या काळातील, निदान या काळातील शैलीवर उभारलेल्या काही नागरी वास्तूही अद्याप शिल्लक आहेत. क्वचित् काही उदाहरणे सोडता, मध्ययुगातील या कलाकृती यापूर्वीच्या बौद्ध–हिंदु कलाकृतींच्या मानाने डाव्याच ठरतात हे मान्यच करावयास हवे. त्याचबरोबर हेही खरे की त्यासंबंधी फारसे संशोधनही झालेले नाही. कित्येक अवशेष अनभ्यासित आहेत एवढेच नव्हे तर बव्हंशी अज्ञातही आहेत. त्यांच्या कलागुणांचे स्वरूप नीट लक्षात आल्यानंतर हे मूल्य-मापन पालटावयासही लागेल. परंतु ती पुढची गोष्ट झाली. आज जे ठाऊक आहे त्याची रूपरेषा येथे देता येईल.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील शिवमंदिर हे महाराष्ट्राच्या मध्ययुगीन मंदिर शिल्प-परंपरेचे आरंभस्थान मानण्यात येते. हे मंदिर शिलाहार राजा चित्तराज याने सन १०३० ते १०४० च्या दरम्यान बांधविले. याच्याच आगेमागे पेलार व वाळकेश्वर येथील मंदिरेही बांधण्यात आली. अलिकडेच कोकण भागात (पन्हाळे) सापडलेली बौद्ध व हिंदु शिलागृहे याच काळातील असावीत. या सर्व संसारात अंबरनाथचे मंदिर विशेष लक्षणीय होय. याच काळात माळव्यामध्ये उत्तर भारतीय मंदिर-शैलीची जी एक विशिष्ट शाखा प्रचलित होती तिचेच हे एक फल आहे. आणि या शाखेला 'भूमिज' असे नाव अभ्यासक देतात. उदेपूरचे उदयेश्वर मंदिर हे या शाखेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. हे मंदिर परमार राजा उदयादित्य याने सन १०६० च्या आसपास बांधविले. या विशिष्ट शैलीचा एक सर्वांगपरिपूर्ण नमुना म्हणून या मंदिराकडे पाहता येते. या आधी शंभर एक वर्षे तरी माळव्यात अशी मंदिरे बांधण्यात येत होती. महाराष्ट्राच्या उत्तर भागावर (खानदेश) आणि कोकणच्या उत्तर भागावर परमारांनी काही काळ तरी सत्ता बसविली होती आणि हे प्रांत नेहमीच विवाद्य राहिले; यावरून या भागात परमार पद्धतीची मंदिरे का यावीत याचा उलगडा होतो. पुढील दोनशे वर्षांमध्ये ठाणे, पुणे, नाशिक, खानदेश या जिल्ह्यांत व विदर्भात काही ठिकाणी या प्रकारची मंदिरे उभी राहिली. हे काम यादवांच्या आश्रयाने झाले. म्हणजे महाराष्ट्रापुरते तरी या मंदिर-शैलीला "यादव मंदिर शैली" म्हणावयास प्रत्यवाय नाही. परंतु यादवानी आपल्या साम्राज्यास जोडलेला सगळा प्रदेश सांस्कृतिकदृष्ट्या एकसंध नव्हता. त्यापैकी दक्षिणेचा बराच भाग हा यापूर्वी राष्ट्रकूट व कल्याणी चालुक्य यांच्या अंमलाखाली होता.

स्वाभाविक या भागात चालुक्य मंदिराशी साम्य असलेली देवालये उभारण्यात आली. ही सर्व द्राविड शैलीतील होती. नाशिक, नगर जिल्ह्यांचे काही भाग, मराठवाडा, सोलापूर, कोल्हापूर या भागात अशा प्रकारची मंदिरे आहेत. ही विभागणी स्थूल आहे. उत्तरेकडील द्राविड व दक्षिण भागात नागर शलीची मंदिरे झालीच नाहीत असा याचा अर्थ नव्हे, यादवसत्तेच्या उत्तर कालात या दोन्ही शैलीतील काही घटक एकत्र होऊन एक निराळाच शिल्पप्रकार उत्पन्न झाला.

यादवांचा मुख्य प्रधान "हेमाद्रि" किंवा "हेमाडपंत" हा या मिश्र शैलीचा जनक अशी सर्वसामान्य समजूत असल्याने अशा देवळांना व सामान्यपरत्वे सगळ्याच यादवकालीन मंदिरांना "हेमाडपंती" असे नाव दिलेले आढळते. विशेषतः याच धाटाची जी निकृष्ट व कलाहीन मंदिरे दिसतात त्यांना हे नाव हटकून लावण्यात येते. वस्तुतः त्याचा व या शैलीचा संबंध नाही.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ या गावच्या पूर्वेस साधारण दीड मैलावर चित्तराज शिलाहार याने बांधविलेले शिवमंदिर आहे. त्याच्या शिखराचा वरचा भाग पडून गेला आहे. मंदिर पश्चिमाभिमुख आहे. मंदिराची वास्तु ८९ फूट लांब व ७४ फूट रुंद आहे व त्या भोवती १५०′ लांब व १०५′ रुंद असा प्राकार आहे. मंदिराच्या वस्तूचे तीन भाग आहेत,– गाभारा, त्याच्या समोरची लहानशी खोली म्हणजे "अंतराळ" आणि त्याच्यासमोर मंडप. मंडपाला तीन बाजूंनी दरवाजे असून त्यासमोर भद्र ( Porch ) आहेत. गाभारा व मंडप दोन्ही चौरस विधानाचे आहेत. पण त्यांचे कोन एकमेकांना जोडून त्यांची मांडणी केली आहे. शिवाय भिंतीची मोडणी अशा प्रकारे केली आहे की बाहेरून पाहणाराला गाभारा व मंडप हे दोन्ही नक्षत्राकृतीच भासतात. देवालयाच्या पायाशी केलेली ही नक्षत्राकृती आखणी थेट शिखराच्या टोकापर्यंत कायम ठेवण्यात आली आहे. जोत्याचा भाग काहीसा पसरट असून त्यावर स्पष्ट उठून दिसतील असे थर आहेत यातील एकाएका थरावर हत्ती, घोडे, वा मानवाकृतींच्या रांगा कोरलेल्या आहेत. त्यावर भिंतीचा भाग येतो. नक्षत्राकृती विधानामुळे भिंत सलग वा सपाट दिसत नाही; यात अनेक कोन येतात व लहान लहान पण स्वतंत्र पृष्ठभाग तयार होतात. या पृष्ठ-भागावर देवदेवता, गंधर्व, अप्सरा, यक्ष-व्याल यांच्या आकृती पूर्ण उठाव्यात कोरलेल्या आहेत. उत्तर, दक्षिण व पूर्व या दिशांना भिंतींत मोठ्या आकाराच्या देवळ्या करून त्यात शैव देवतांच्या मूर्ती बसविल्या आहेत. मूर्तींच्या डोक्यावर एकाच धाटाचे खोदकाम असलेले पट्ट येतात व त्यावर पागोळ्या ( Cornice ). मंडपाच्या भिंतींचा सजावट याच प्रकारची आहे. पागोळीच्या वर मात्र छपरांचा आकार बदलतो.

गाभाऱ्यावर उत्तुंग शिखर येते. मुख्य दिशाकडे तोंड करून ज्या देवळ्या येतात, त्यांच्या डोक्यावरून एक सलग पट्ट (त्याला "रथ" म्हणतात) निघतो तो थेट आमलकापर्यंत जातो. शिखराच्या माथ्यावर, आवळ्यासारखे कर्वे किंवा खाचा पाडलेला

हा प्रचंड गोलाकार दगड बसवीत व त्यावर कलश. अंबरनाथ मंदिराचे हे भाग पडून गेलेले आहेत. पण रथांचा काही भाग शिल्लक आहे. या दोन रथांच्यामध्ये जी जागा राहते त्यात अगदी लहान आकाराच्या शिखरांच्या ओळी बसवितात. प्रत्येक ओळीचा एक स्वतंत्र मजला असला तरी त्यांची बाह्याकृती अशा बेताने आखलेली आहे की, हे मजले वेगळे दिसू नयेत. पागोळ्यांच्या लगेच वर जेथे रथ उगम पावतो तेथे चैत्य तोरणाकृती कोनाडा बसवून शिवमूर्ती बसविल्या आहेत. गाभाऱ्याला जोडून असणाऱ्या " अंतराळावर " गजपृष्ठाकार ( दोन्ही उतरत्या बाजू गोलसर असलेले ) छप्पर बसवीत. या छपराची चांदईची एक बाजू दिसे, तिला चैत्य तोरणाचा आकार असून त्यातही नटराज मूर्ती बसविली आहे. या भागाला " शुक नासिका " असे नाव आहे. गाभाऱ्याचे व अंतराळाचे छप्पर एकमेकांना जोडून असले तरी मंडपाचे छप्पर स्वतंत्र दिसते ( म्हणजे असतेच ). याची रचनाही मजल्यांची किंवा पायऱ्यांचीच असून प्रत्येक पायरीवर घुमटांच्या छोट्या प्रतिकृतींची ओळ दिसते. भद्रावर अशाच घाटाची छपरे आहेत. मंडपावरील छपरे गाभाऱ्याच्या शिखरापेक्षा उंचीला खूपच कमी आहेत ( असतात ). एका बाजूने पाहिले तर प्रथम भद्राचे, त्यानंतर मंडपाचे, त्यानंतर अंतराळाची शुकनास व मग गाभाऱ्याचे मुख्य शिखर ही क्रमाक्रमाने उंच उंच होत गेलेली आहेत असे दिसून येईल.

भिंतीची अनेकशः मोडणी केलेली असल्याने व विविध आकारांच्या थरांची योजना जागोजाग केली असल्याने या वास्तूवर छाया प्रकाशाचा मोठा नयनरम्य खेळ पाहावयास सापडतो. उत्तर भारतीय व नागरशैलीला अनुसरून सर्वच भागांचे प्रमाण अशा रीतीने बसविलेले आहे की या वास्तूची झेपावत जाणारी उंची सहज प्रतीत व्हावी.

अत्यंत आकर्षक अशा या बहिरंगाच्या दर्शनानंतर मंदिराच्या अंतरंगात थोडीशी निराशाच होते. दोन-चार ठिकाणच्या कोनाड्यातील देवतामूर्ती सोडल्या तर भिंतीवर कसलेही नक्षीकाम नाही. याची भरपाई थोड्याफार प्रमाणात स्तंभ, हस्त तुला, छत व द्वारशाखा करतात हे मात्र खरे.

मंडपातील स्तंभ पायथ्यापाशी चौरस असून त्याचा आकार वर जातील तसा बदलत जाऊन स्तंभशीर्षाखाली गोलच होतो. स्तंभावर लहान मोठ्या देवळ्या करून मूर्ती बसविल्या आहेत तसेच इतर अलंकारात्मक कोरीव कामही आहे. या कोरीव कामात कीर्तीमुखे व लतापल्लव यांचा उपयोग करण्यात आलेला आहे. हस्तावर पारंपरिक स्वरूपाच्या कीचकमूर्ती दिसतात. मंडपाच्या कडेने असणाऱ्या तुलांवर छोटे छोटे कोनाडे करून देवदेवतांच्या मूर्ती बसविलेल्या आहेत. मंडपाच्या छताचे दोन मुख्य भाग पडतात. मधल्या चार खांबानी होणाऱ्या चौरस छतावर घुमटाकृती, " गजतालू " पद्धतीचे नक्षीकाम असणारे छत आहे तर उरलेल्या भागात सपाट, कमीजास्त अलंकृत असे छत आहे. घुमटावर एकात एक बसतील अशी खोलगट कडी कोरली असून त्या प्रत्येक

कड्यात अर्धघुमटाकार अशा आकाराच्या "गजतालू" रूपकांची योजना आहे. सपाट छतावर कीर्तीमुखे कमलपुष्पे व लतापल्लवादी कोरीव काम आहे. यात मानवी, दैवी मूर्ती क्वचितच आहेत. हे सगळे बऱ्याच अंधारात असल्याने मुद्दाम शोधू गेल्याखेरीज सापडावयाचे नाही! द्वारशाखेवर कोरीव-काम आहे पण इथल्यापेक्षा बलसाणे येथील काम अधिक प्रातिनिधिक असल्याने तेथील द्वारशाखेचेच वर्णन केले आहे.

अंबरनाथच्या या मंदिराची वास्तु मोठी डौलदार आहे यात शंका नाही. बाह्यांगाच्या सजावटीसाठी, थर रथ यांचा मार्मिक उपयोगही करण्यात आलेला आहे. परंतु मूर्तीकाम मात्र प्रेक्षणीय आहे असे म्हणणे कठीण आहे. परंपरेला अनुसरून पीठावर अश्वथर, नरथर, ग्रासपट्टी ( कीर्तीमुख ) अशा सारख्या रूपकांची, तसेच जंघेवर देवदेवता यक्षी, व व्याल या मूर्तींची योजना केलेली असली तरी या सबंध शिल्पाच्या अंगात काही जिवंतपणा किंवा चेतना दिसून येत नाही. परिपाठामुळे एखादा किस्सा गिरवावा तसे याचे स्वरूप आहे. यात प्रतिभा किंवा स्वतंत्र प्रज्ञा कोठेही प्रत्ययास येत नाही. महाराष्ट्रातील मध्ययुगीन मंदिरशिल्पांत ही उणीव बहुधा सर्वत्र जाणवते.

या धाटाची दोन मंदिरे उल्लेखनीय आहेत. ती म्हणजे बलसाणे ( जि. धुळे ) येथील "क्रमांक १" हे मंदिर आणि सिन्नर ( जि. नासिक ) येथील सुप्रसिद्ध गोंडेश्वर मंदिर, बलसाणे मंदिर भग्नावस्थेत आहे आणि त्याचे त्रिदली विधान हे अंबरनाथापेक्षा निराळे दाखविता येईल असे. एरवी भिंतीची रचना, छपराचा ( शिखराचा ) आकार सर्व त्याप्रमाणेच आहेत. गाभारा, त्यासमोर अंतराळ, मंडप, मंडपाच्या दोहों बाजूस अंतराळ व गाभारा आणि समोरच्या बाजूस मुखमंडप किंवा भद्रही मांडणी झाली. मंडपाचे स्तंभ चौरस असून त्यावर कोरीव काम फारच थोडे आहे. हस्तावर कीचकादी रूपके आहेत तर तुलेवर फुले. मंडपाचे छत क्षिप्तोत्क्षिप्त प्रकारचे व गजतालू पद्धतीचे. गाभाऱ्यासमोरच्या दरवाज्याभोवती असणाऱ्या चौकटी द्वारशाखा, मध्ययुगीन शिल्पाचा एक उत्कृष्ट नमुना असून बाहेरून दाराकडे ओळीने व्याल शाखा, रत्न शाखा, स्तंभ शाखा पल्लव शाखा, व शेवटीही पल्लव शाखा दिसतात. खालच्या बाजूला शैव द्वारपाल आहेत. गणेश पट्टीवर गणपतीची सुरेख मूर्ती आहे.

हे मंदिर अंबरनाथनंतर सरासरी पंचवीस वर्षांच्या आत किंवा कदाचित त्याबरोबरच बांधण्यात आले असावे असे समजतात. याच ठिकाणचे मंदिर क्र. ५ निराळ्याच विधानावर उभारलेले आहे. ही आखणी राष्ट्रकूटांच्या कालातील हिंदु शैलमंदिराप्रमाणेच आहे. गाभारा, त्यासमोर अंतराळ, मंडप, वीथिका हे मुख्य भाग. वीथिकेच्या दोहो बाजूस दोन देवळ्या आहेत तर मंडपाच्या तीन बाजूंना मिळून आठ देवता आहेत. मुख्य देवता सोडून इतर दहा देवतांची सोय येथे केलेली आहे व हे दशावतार मंदिर असावे असे समजतात.

मंदिराची एकूण घडण आणि नक्षीकामातील रूपके यांचा विचार करता हे मंदिर क्र. १ नंतर पन्नासएक वर्षांनंतर झाले असावे असे म्हणता येईल.

शिलाहार-यादव मंदिरांपैकी सर्वात परिपूर्ण वास्तू म्हणजे सिन्नर येथील "गोंडेश्वर मंदिर" होय. हे मंदिर यादव राजा गोविंद याने बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात बांधविले असावे. हे पंचायतन स्वरूपाचे असून मुख्य शिवालयापासून थोड्या अंतरावर चारी कोपऱ्यांत विष्णु, गणेश, सूर्य व देवी यांची छोटी देवालये आहेत. शिवालया-समोर स्वतंत्र नंदी मंडपही आहे मुख्य मंदिर ७८ फूट लांब व ६५ फूट रुंद आहे. मंदिराचे विधान अंबरनाथ मंदिरासारखेच आहे आणि भिंती व स्तरही तशाच आहेत. या देवालयाचे शिखर धड अवस्थेत आहे आणि या विशिष्ट प्रकारच्या वास्तूचा डौल व सौंदर्य यांची पुरेपूर प्रचीती यावरून येते.

मंदिर शिल्पाचा दुसरा उल्लेखनीय वर्ग म्हणजे द्राविड मंदिर शैलीचा. आतापर्यंत पाहिलेली मंदिरे उत्तर शैलीतील आहेत तर आयेश्वर हे मंदिर चालुक्य (कल्याणी) किंवा द्राविड शैलीतील आहे. किंबहुना सिन्नरचे आयेश्वर मंदिर हे द्राविड शैलीचे सर्वांत उत्तरेकडील उदाहरण म्हणून प्रसिद्ध आहे. कालदृष्ट्या हे मंदिर गोंडेश्वराच्या पूर्वीचे म्हणून समजण्यात येते. याचे मुख्य कारण असे की आयेश्वर मंदिराची धाटणी ही चालुक्य मंदिर-शैलीच्या सर्वोत्तम प्रकारापैकी आहे, व या मंदिराचा काल दहावे-अकरावे शतक असल्याने आयेश्वर मंदिरही याच कालातील असावे. याची बांधणी कोणी केली असावी याविषयी काहीच माहिती मिळत नाही. या कालात निरनिराळे राजे एकमेकांच्या प्रदेशांतील तीर्थक्षेत्रांना यात्रेसाठी जात असत. त्यांचेबरोबर त्यांचे कारागीरही तिकडे पोचून परक्या शैलीची मंदिरे येथे राहात यात आश्चर्य वाटू नये. तसेच त्या त्या गावातील कोणी पुरुष दुसरीकडे व्यवसायानिमित्त राहिल्यास आपल्या गावी परत आल्यावर त्या ठिकाणाची मंदिरे व शिल्पशैली आणीत असे. मराठेशाहीतही हा प्रकार सर्रास चालत असेच.

सिन्नरच्या आयेश्वर मंदिराच्या विधानात गाभारा आणि त्याच्यासमोर मंडप हेच दोन मुख्य भाग होते. शिवाय मंदिराचा चौथरा विस्तीर्ण असून त्यावर मुख्य वास्तूपासून अलग असे दोन चौरस किंवा एक लंब चौकोनी मंडप होता— होता म्हणण्यापेक्षा योजलेला होता असे म्हणणे जास्त बरोबर दिसते— प्रायः हे बांधकाम पूर्ण झाले नसावे. गाभाऱ्याच्या भिंती जवळपास एका सरळ चौकोनात बसतात; त्यातून अर्धस्तंभ, रथ हे जरी प्रक्षेपित होत असले तरी त्यामुळे गाभाऱ्याच्या मूळ चौरसाकारास बाध येत नाही. भिंतीवरील अर्धस्तंभ चौकोनी गळ्यापाशी किंचित अरुंद होणारे असे खास चालुक्य-धर्तीचे आहेत. त्याशिवाय भिंतीवर गोष्ठ व गोष्ठपाञ्जर यासारखी रूपके आहेतच. शिखर ठेंगणे व टप्प्याटप्प्याने वर जाणारे असून आज त्यांपैकी फक्त सगळ्यात खालचा टप्पाच पूर्णावस्थेत आहे. मंदिराच्या बाहेरच्या (अपूर्ण) मंडपासाठी उभारलेले स्तंभ विशेष

लक्षणीय आहेत. त्यावर अनेक पैलू पाडून बारीक कोरीव काम व मूर्तीकाम केले आहे. परंतु अंबरनाथ व तत्सम मंदिरातील स्तंभाप्रमाणे याच्या आकारात बदल होत नाहीत, साधारण चौकोनी आकारच कायम राहतो. या मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तेथील मकरतोरण. मंडपाच्या दारावर असलेल्या या तोरणाचा आकार अर्धवर्तुळाकार आहे. दोन्ही बाजूच्या खांबांवर दोन मकर बसविले असून त्यांच्या मुखातून गंधर्व, कीचक आणि पुष्पलतायुक्त तोरण बाहेर पडते. त्याच्या मध्यावर कीर्तीमुख असून दोन्ही बाजूच्या रिकाम्या जागा मकराच्या लहरीदार पुच्छांनी भरून घेतलेल्या आहेत. द्राविड विशेषतः पल्लव मंदिरांत ही मकरतोरणे फार लोकप्रिय होती, परंतु इतके बहारदार तोरण इतरत्र क्वचितच पहावयास सापडते.

याशिवाय पेडगावचे लक्ष्मीनारायण मंदिर किंवा शिंगणापूरचे शंभू महादेव मंदिर यासारखी काही प्रेक्षणीय मंदिरे अवशिष्ट स्वरूपात आहेत, परंतु घाटणीच्या दृष्टीने त्यांना पुढचे पाऊल म्हणता येत नाही. चौदाव्या शतकाच्या मध्यापासून किंवा त्याही थोड्याशा नंतर या परमार शैलीचे थोडे फार विकृत स्वरूप दृष्टीस पडू लागते. पहिली गोष्ट म्हणजे मंदिराच्या बाह्यांगावरील मूर्तीकाम जवळपास पूर्णपणे लुप्त होते. 'रथ', भिंतीचे पुढे आलेले उभे पट्टे आणि 'थर', आडवे पट्टे, शिल्लक राहतात पण त्यावर मूर्ती दिसत नाहीत. क्वचित कोठे कोरीव काम असलेच तर ते फक्त भौमितिक किंवा फलाफुलांच्या नक्षीचे असते. यापुढची पायरी म्हणजे अगदी साध्या अनलंकृत भिंती. मंदिराचा आकार लहान होत जातो. स्तंभ, तुला, यावरील कोरीव काम नाहीसे होतेच पण शिवाय घडणी-तील सफाईही नाहीशी होते. सगळे मिळून मंदिर कोंडे, कोंदट वाटावयास लागते. या प्रकारची किती तरी मंदिरे महाराष्ट्रात पहावयास मिळतात. या सगळ्यांना सामान्यपणे "हेमाडपंती" असे नाव दिलेले आढळते. मुसलमानी राजवटीत मंदिरे बांधणे अवघड झाले, बांधलीच तर त्यावर देवदेवतांच्या मूर्ती बसविणे किंवा कोरणे आणखीच कठीण बनले. या सर्वांचा परिणाम म्हणजे ही "हेमाडपंती" देवळे होत. शिवकालात पुन्हा एकवार मंदिर उभारणीस प्रारंभ झाला त्यावेळी मराठी वास्तुकाराला मंदिर बांधणीची ही एकच शैली ज्ञात असल्याने त्याच घाटाची मंदिरे उभारण्यात आली. पुढेही त्यात फेरफार करून, सुधारणा करून पेशवाईत अशा धर्तीच्या काही वास्तु उभारण्यात आल्या.

पुणे–सोलापूर रस्त्यावर, पुण्यापासून केवळ वीसच मैलावर असणाऱ्या यवत गावापासून तीन मैलावर "किल्ले दौलतमंगल" या नावाचा डोंगर आहे. या मोठ्या पठारावर मध्ययुगात मोठा किल्ला होता. त्यातल्या त्यात एका उंचशा भागावर "भुलेश्वर" महादेवाचे मंदिर उभे केले आहे. मंदिरामध्ये आज दिसणारे रूप त्याच्या मूळ रूपापेक्षा किती तरी निराळे आहे हे स्पष्ट आहे. साधारण दहा ते बारा फूट उंच अशा दगडी चौथऱ्यावर हे मंदिर उभे आहे. नंदीमंडप, चौरसमंडप, अंतराळ आणि गर्भगृह हे विधानाचे चार भाग. यापैकी गाभारा नक्षत्राकृती आहे. भिंतीच्या प्रत्येक मोडणीवर

आकृती ११



भिंतीवरील मूर्तिशिल्प; भुलेश्वर मंदिर : यवत

पृ. १६

आकृती १२



शिवमंदिर : अन्वा

अतिशय घाटदार अशा मूर्ती होत्या, त्या मुख्यत्वे नर्तिकांच्या वा वादिकांच्या; त्याच्या जोडीला काही पारंपारिक रूपकेही आलेली आहेत. ( आकृती १२ ) यात दर्पणधारिणी, पत्रलेखिका यांचा उल्लेख करावयाचा. मंडपाच्या चौथऱ्यावर रामायण व महाभारत यातील कथांचे पट्टे कोरलेले आहेत. सर्व मूर्तीकाम भग्नावस्थेत आहे– हेतुतः मोडतोड केल्याने तुटलेले– फुटलेले आहे. तरीही ज्या मूर्ती शिल्लक आहेत किंवा मूर्तीचे जे भाग, खंड शिल्लक आहेत त्यावरून असे सांगता येते की महाराष्ट्रातील मंदिरांत इतके सौष्ठवपूर्ण मूर्तीकाम क्वचितच पहावयास मिळते. शरीराची प्रमाणबद्धता आणि घाटदारपणा तसेच हालचालीतील लालित्य यामुळे या मूर्ती नजर वेधून टाकतात. इ. सनाच्या तेराव्या शतकात हे काम झाले असावे. त्यानंतर याची मोडतोड झाली. आणि अठराव्या शतकाच्या मध्यास याचा पुनरुद्धार झाला. या वेळी मंडप व गाभारा यांवर शिखरे उभारण्यात आली. भोवताली ओवऱ्या बांधण्यात आल्या कदाचित जुन्या ओवऱ्यांच्या जागी या नव्या बांधल्या असाव्यात. याच वेळी या ओहऱ्यांच्या कपाळावर मातृकामूर्तींचे पट्ट बसविण्यात आले असावेत. हे पट्टही प्राचीन असावेत. पण ते सध्या दिसतात त्या ठिकाणीच होते की अन्यत्र कोठे याची खात्री होत नाही. पण हे पट्ट अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून महाराष्ट्रातील इतर देवालयांत अशा प्रकारचे पट्ट असल्याची माहिती नाही. फलटण गावाच्या मध्यभागी असणारी जैन मंदिरे ( हे आता शिवालय झाले आहे ) आणि गावाबाहेर असणारे पण अत्यंत पडिक स्थितीतील नृसिंह मंदिर ही फारशी प्रसिद्ध नाहीत पण त्यावरील मूर्तीकाम लक्षणीय आहे. भुलेश्वरचे लालित्य व सौष्ठव येथे मात्र नाही.

शिलाहार व यादव यांच्या मंदिरांत विपुल मूर्तीकाम आणि कोरीव काम आहे हे वर सांगितलेलेच आहे. अजिंठा, वेरूळ या सारख्या त्यांच्यापूर्वीच्या आणि गुजराथ–मध्य प्रदेश–ओरिसा इकडच्या काहीशा समकालीन मंदिरांवरील शिल्पाच्या मानाने या मंदिरावरील शिल्पकला काहीशी डावीच भासते. बाह्यांगी पीठावर, गजथर, अश्वथर, नरथर ही रूपके. भिंतीवरील कोनाड्यांत देवदेवतांच्या मूर्ती, मधल्या पट्ट्यावर देवदेवतांच्या जोडीला यक्षी व्याल यांच्या मूर्ती आणि इतर सजावटीला पारंपरिक पद्धतीची वेलपत्ती, रत्नहार, कीर्तीमुखे, मौक्तिकमाला या सर्वांचा उपयोग करण्यात आला आहे. आतील बाजूला स्तंभ, तुला व हस्त आणि द्वारशाखा यांवरही असेच कोरीव काम आहे. यातील सर्व वर्ण्यविषयक ठराविकच आहेत, पूर्वापार चालत आलेले आहेत. मात्र त्यांची अभिव्यक्ती म्हणावी तशी कलात्मक नाही. वेलपत्तीमध्ये वेल पुढे वाढतो आहे, सरकतो आहे अशी जी कल्पना प्राचीन शिल्पे पाहणाऱ्याला येते तशी आता येत नाही. त्यातली हालचाल, जीव, नाहीसा झाल्यासारखा दिसतो. मानवी आकृती बऱ्याच स्थूल आहेत, भरीव, जोमदार शरीरांची जागा बोजड व स्थूल आकृतींनी घेतली आहे. त्यांच्यातील चेतना नष्ट झाली आहे. प्रमाणबद्धता व चेतना गेल्यावर त्यांच्या हालचालींत विशेष लालित्यही उरलेले नाही.

क्वचित कोठे तरी चांगल्या सगुण शिल्पाचे दर्शन घडते; नाही असे नाही. अंबरनाथला एक दोन तरी मूर्ती उत्कृष्ट आहेत. पुण्यानजिकच्या भुलेश्वर मंदिरावरील मूर्ती भग्नावस्थेत असल्या तरी अतिशय लालित्यपूर्ण भासतात. पण हे अपवाद म्हणून नमूद करावयाचे. सरसकट काम सामान्य प्रतीचे दिसते.

कोरीव कामांत तांत्रिक सफाई आहे. छतांची, दरवाजांची घडण अत्यंत सफाईदार आहे, पण त्यातून प्रतीत होते ते पाथरवटाचे तांत्रिक कसब–त्याच्या कल्पकतेचा व प्रतिभेचा साक्षात्कार फारच क्वचित होतो !

□

# कला व शिल्प–मध्ययुग : मराठवाडा

प्रभाकर देव

मराठवाड्यातील कलावशेषांमध्ये मध्ययुगीन काळातली असंख्य देवालयेही आहेत. ही सर्व देवालये अजूनही बऱ्याच अंशी अज्ञात अशीच आहेत. ही सर्व देवालये कलात्मकदृष्ट्या मराठवाड्याच्या भोवतालच्या परिसरातील मध्ययुगीन देवालयांचाच वारसा सांगणारी आहेत. मराठवाड्याच्या दक्षिणेस लगतच असलेल्या म्हैसूर राज्यातील होयसळ देवालयीन पद्धतीचा बराच प्रभाव उस्मानाबाद जिल्ह्यातील देवालयांवर प्रामुख्याने प्रकर्षाने जाणवतो. त्याचप्रमाणे आंध्रप्रदेशातील पूर्व-चालुक्य देवालयीन पद्धतीचाही प्रभाव दर्शविणारी काही देवालये मराठवाड्यात आढळतात. देवगिरीच्या यादवांच्या कालखंडातील काही अप्रतिम अवशेषही या परिसरात सापडतात. इ. सनाच्या आठव्या शतकापासून ते १४ शतकापर्यंतच्या सर्वच देवालयांना पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे या भागातही हेमाडपंती हे संबोधन लावले जाते.

मराठवाड्यातील अतिप्राचीन देवालय म्हणून तेरच्या 'त्रिविक्रमाचा' उल्लेख करता येईल. उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरणा नदीचे काठी उस्मानाबाद शहराच्या उत्तरेस ३०–३५ मैलांचे अंतरावर तेर नावाचे एक छोटेसे खेडे आहे. फ्लीट यांनी तेर हे गाव म्हणजेच प्राचीन काळातील तगर नावाचे प्रसिद्ध शहर होय, असा निष्कर्ष काढल्याने तेर या गावातील अवशेषांना अधिक महत्त्व प्राप्त झाले. कझिन्स यांनी या गावातील अवशेषांचा विशेष अभ्यास केला. गावातील देवालयीन अवशेषांपैकी त्रिविक्रमाचे देवालय कझिन्सना सर्वात अधिक महत्त्वाचे वाटले. या देवालयाची बांधणी, छताचा आकार, विटांचा आकार, आणि देवालयाचे प्राचीनत्व दर्शविणारे रंग-रूप यावरून हे देवालय इ. सनाच्या ५ व्या शतकापूर्वीचे असावे असे कझिन्स यांनी मत प्रतिपादन केले.

नंतरच्या संशोधनावरून असे दिसते की इ. सनाच्या ४ थ्या शतकापासून ते ८ व्या शतकापर्यंतच्या कालखंडातील देवालय बांधणीचा प्रभाव त्रिविक्रमाच्या देवालया-

वर दिसतो. यामुळे या कालखंडात हे देऊळ बांधले गेले असावे असे प्रतिपादन अधिक निर्विवाद ठरावे.

तेर या गावी असलेल्या इतर अवशेषांमध्ये उत्तरेश्वर व कालेश्वर ही दोन देवालये उल्लेखनीय आहेत. उत्तरेश्वराचे देवालय खूपच जीर्णावस्थेस पोहोचलेले. या देवालयाची बांधणीही विटांची—संपूर्ण देऊळ अगदीच पडलेले, विटांचा ढिगारा, आणि एखादी उभी भिंत अवशेषरूपे देवळाचे अस्तित्व दाखवितात. या देवालयातील सर्वात सुंदर वस्तू म्हणजे गाभाऱ्याची द्वारपट्टी असल्याचा उल्लेख कझिन्स यांनी केला आहे. आज अप्रतिम लाकडी शिल्पकाम असलेली ती द्वारपट्टीही तेथे पाहायला मिळत नसली तरी दिल्लीच्या वस्तुसंग्रहालयात फार तरतुदीने ठेवलेली आहे.

कालेश्वराचे देवालयाचा पुनरुद्धार अलिकडे झालेला दिसतो. या पुनरुद्धारात जुना आराखडा जरी कायम ठेवलेला असला तरी देवालयाचे स्वरूप मात्र खूपच पालटले. मुख्य देवालय विटांच्याच बांधणीचे – अत्यंत पक्क्या भाजलेल्या विटा– खूप लांब, रुंद आणि जाड. येथील सर्व विटांचे वैशिष्ट्य असे की ह्या विटा नेहमी वापरात असलेल्या विटांपेक्षा अधिक मोठ्या असूनही वजनाला मात्र हलक्या आहेत, आणि म्हणूनच की काय पाण्यावरही तरंगू शकतात. या विटांचे तुकडे पाण्यात टाकून प्रत्यक्ष हा तरंगण्याचा प्रकार पाहता येतो.

तेर या गावाच्या उत्तरेस ६ मैलांवरील जागजी या खेडेगावातही एक प्राचीन वैष्णव मंदिर असावे असे वाटते. या मंदिराच्या समोरील कुंडातील ३० मूर्ती, शिल्प-कामाचे अप्रतिम नमुने आहेत. ही सर्व मूर्तीशिल्पे या कुंडातील बाजूच्या भिंतीमध्ये स्वतंत्र देवकोष्टांत ठेवलेली आहेत. यातील काही मूर्ती मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास विभागातील वस्तुसंग्रहालयात हालविण्यात आल्या आहेत. ह्या सर्व मूर्ती वैष्णवपंथी देवतांच्या आहेत. अशा रीतीने तेर या गावातच नव्हे तर आजूबाजूलाही आढळणाऱ्या मूर्तीशिल्पांचे अवशेषात वैष्णवमूर्तींचा समावेश अधिक आढळतो. याच पार्श्वभूमीवर त्रिविक्रमाचे देवालयही मूलतः विष्णूचेच म्हणजेच त्रिविक्रमाचेच असावे, हा निष्कर्ष अधिक ग्राह्य वाटावा. तेर नंतर तीन ते चार शतकांच्या काळात बसविता येईल असे मंदिर क्वचितच सापडते. उत्तर चालुक्य पद्धतीची बरीच देवालये मराठवाड्यात आढळतात. उत्तर चालुक्यांच्या मांडलिक राजांपैकी होयसळ व काकतीय राजांच्या शिल्पकलेचा प्रभाव मराठवाड्यातील देवालयीन शिल्पावर अधिक जाणवतो. हे सर्व अवशेष प्रामुख्याने इसवी सनाच्या ११ व्या व १२ व्या शतकातील आहेत.

औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा लेण्यापासून दक्षिणेस २५ मैलांवर असलेल्या अन्वा या गावी एक अप्रतिम शिवालय आहे. (आकृती १३) देवालयाची बांधणी नवलाखा देवा-लयाच्या पद्धतीची असल्याचे कझिन्स व फर्ग्युसन यांनी उल्लेखिले आहे. गावाच्या अगदी मध्यवस्तीत एका मोठ्या आवाराच्या मध्यभागी ४ फूट उंचीच्या चौथऱ्यावर हे देवालय उभे आहे. संरक्षित स्मारक असल्यामुळे चांगल्या अवस्थेत आहे. देवालयाचा आराखडा

नक्षत्राकृती आहे. मंडपाची रचनादेखील नक्षत्राकृती असून मंडप जवळजवळ मोकळाच आहे. पन्नास सुडौल खांब या मंडपात मोठ्या कल्पकतेने योजिलेले आढळतात. मंडपाच्या मध्यभागी एक छोटासा रंगमंडप असून वर्तुळाकार रंगशिला आहे. मंडपाच्या बाजूस असलेले कक्षासन आकर्षक आहे. देवालयाची सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे मुख-मंडपाचे गोलाकृती छत. मंडपाच्या बाह्यभिंतीवरील मूर्तीशिल्पही लक्षात राहण्यासारखे आहे. आडव्या पट्टिकामध्ये अनेक प्रकारच्या भौमितिक आकृती कोरण्यात आल्या आहेत. त्याशिवाय गजलक्ष्मीची मूर्ती, शिवनटेश्वराची मूर्ती, वराहाची मूर्ती अधिक आकर्षक आहेत. नृत्यांगनांची शिल्पेही खास उल्लेखनीय आहेत.

देवालयाच्या गर्भगृहाची द्वारशाखा सामान्यपणे चालुक्य होयसळ पद्धतीच्या देवालयातील द्वारशाखेसमान अत्यंत सुशोभित आहे. गणेशपट्टीवर गणेशाची मूर्ती कोरलेली आहे. गणेशपट्टीवर एक तोरण असून तोरणावरील बाजूस लंबचौकोनाकृती कोरलेल्या आढळतात.

देवालयातील सर्वांत प्रेक्षणीय मूर्तीशिल्प गाभाऱ्याच्या बाह्यभिंतीवर कोरलेले आहे. १½′ ते २′ फूट उंचीच्या या मूर्ती मोठ्या मोहक आहेत. या शिल्पांमध्ये मिथुन, शालभंजिका यक्ष-यक्षी, मृदंगवादिका वगैरे मूर्तीशिल्पे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. सर्वच मूर्ती मोठ्या सुबक आहेत. गजलक्ष्मी, वराह, शिवनटेश्वराचे मूर्तीशिल्प प्रभावीपणे कोरलेले असून स्वतंत्र मूर्तीकोष्ठात ठेवलेले आढळते.

मूर्तीभंजनामुळे शिल्प विद्रूप होऊनदेखील देवालयाची प्रेक्षणीयता कमी झालेली नाही. याच देवालयाला समकालीन चालुक्य शिल्पस्थापत्याचा प्रभाव दर्शविणारे दुसरे देवालय बीड जिल्ह्यात आढळते. आंबेजोगाई शहराच्या दक्षिणेस ३० किलोमीटर्स अंतरावरील धर्मापुरी या गावी अशाच एका अप्रतिम देवालयाचे अवशेष आढळतात. देवालयावरील शिल्पावर होयसळ शिल्पपद्धतीचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो.

बीड जिल्ह्यातील मध्ययुगीन देवालयीन स्थापत्य अवशेषाचा नमुना पानगाव येथील विठ्ठल देऊळाच्या स्वरूपात सापडतो. पानगाव हे गाव परळी वैजनाथ या रेल्वे-स्टेशनापासून परळी-हैद्राबाद ब्रॉडगेज रेल्वे मार्गावर ३० किलोमीटर्स अंतरावर आहे. गावाच्या अगदी मध्यभागी ग्रामपंचायत कार्यालयासमोर ' विठ्ठल देऊळ ' नावाचे एक अप्रतिम आणि भव्य असे देवालय उभे आहे, अगदी चांगल्या अवस्थेत. मूर्तीभंजनामुळे विद्रूप झालेले मूर्तीशिल्पही देवालयाचे शिल्पसौंदर्य टिकवून आहे.

पानगावच्या विठ्ठल देऊळाचा आराखडा धर्मापुरीच्या शिवालयासारखा असला तरी देवालयीन स्थापत्य मात्र थोडेसे भिन्न स्वरूपाचे आहे. या चौथऱ्यावर चढताना पायऱ्याच्या दोन्ही बाजूंस देवकोष्ठे कोरलेली आढळतात. देवालयाचा प्रमुख मंडप दगडाच्या कोरीव जाळ्यांनी बंद केलेला आहे. ही जाळी वापरण्याची पद्धती होयसळांच्या देवालयीन पद्धतीनुरूप आहे. मंडपातील खांबावर बाहेरील बाजूंनी सज्जाला तीर म्हणून मूर्तीचाच उपयोग करण्यात आलेला आहे. या ठिकाणी असलेले मूर्तीशिल्प केवळ अप्रतिमच

आहे. काकतीय शिल्पकलेचा प्रभाव या मूर्तीशिल्पावर आधिक्याने जाणवतो. धर्मापुरी येथील मूर्तीपेक्षा पानगाव येथील मूर्ती अधिक सडपातळ, मोहक, आणि कमनीय आहेत. या मूर्तीशिल्पांमध्ये शालभंजिका, यक्षिणी, मदनिका, आणि अप्सरांची मूर्ती शिल्पे अधिक मोहक आहेत. देवाल्यातील बाह्य भिंतीवरील मूर्तीशिल्पांपैकी नृसिंह, वराह, शिव, विष्णु, भैरव इत्यादी मूर्तीशिल्पे विशेष वैशिष्ट्यपूर्ण आहेत. देवालयीन स्थापत्य पद्धती आणि शिल्पकलेच्या प्रकाराधारे पानगावचे विठ्ठल देऊळ इ. सनाच्या ११ व्या शतकातील असावे असे म्हणता येईल.

देवालयीन स्थापत्याच्या विकासाचा पुढचा टप्पा दर्शविणारे देवालय उस्मानाबाद जिल्ह्यातील निलंगा या तालुक्याच्या गावी अस्तित्वात आहे. निलंगा हे गाव लातूर पासून दक्षिणेस ४० मैलांवर आहे. गावात अनेक प्राचीन आणि मध्ययुगीन अवशेष आढळतात. या सर्व अवशेषांत गावाच्या पूर्वेस मध्यवस्तीतच असलेले एक मध्ययुगीन देवालय सर्वांत महत्त्वाचे. संपूर्ण देवालय चांगल्या अवस्थेत आहे.

देवालयाचे स्थापत्य प्रामुख्याने चालुक्य-होयसळ पद्धतीचे असून, मराठवाड्यातील देवालयीन बांधणीच्या प्रगतीचा पुढील टप्पा दर्शविणारे आहे. धर्मापुरी व पानगाव येथील आराखड्यातील अर्धमंडपाची जागा निलंग्याच्या देवालयातील आराखड्यात गर्भगृहाने घेतली आहे. या दोन अधिक गर्भगृहांच्या योजनेमुळे देवालयाचा आराखडा बिल्वदळी बनला. होयसळ पद्धतीच्या देवालयाच्या स्थापत्यातून बिल्वदळी आराखडे प्रामुख्याने वापरले जात. त्या होयसळ पद्धतीचा स्पष्ट प्रभाव नीलकंठेश्वरावर जाणवतो.

मंदिराचा मंडप चौकोनी आकाराचा आहे. मंदिरातील एकूण १६ खांब मोठ्या योजकतेने उभारलेले आहेत. खांबाची पद्धती प्रामुख्याने चालुक्यकालीन देवालयाच्या खांबासमान आहे. वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट अशी की या खांबावरील मध्य चौकोनात रामायण-महाभारतातील काही कथाविषय शिल्पित केलेले आहेत. देवकोष्ठांची रचनाही वैशिष्ट्यपूर्ण आहे.

नीलकंठेश्वराचे छतावर कीर्तीमुख, सप्तमातृका, आणि नृत्यांगना कोरलेल्या आहेत. या सर्व त्रिकोणी शिळांच्या मध्यावरील चौकोनी शिळेवर एक पूर्ण विकसित कमळ कोरलेले आढळते.

येथील मूर्तीशिल्पावर चालुक्यांचा प्रभाव आधिक्यतेने जाणवतो. नीलकंठेश्वराच्या आराखड्यासमान आराखडा असलेली बिल्वदली देवालये बीड आणि उमरगा या दोन गावीही चांगल्या स्थितीत अस्तित्वात आहेत. या दोन देवालयांपैकी बीडचे कनकालेश्वर हे नीलकंठेश्वरानंतरचे इ. सनाच्या ११ व्या शतकाच्या उत्तरार्धातील. उमरग्याचे शिवालय त्यानंतरचे. त्याची बांधणी एका भव्य अशा तळ्याच्या मध्यभागी करण्यात आली असल्याने मराठवाड्यातील मध्ययुगीन देवालयांमध्ये हे वैशिष्ट्यपूर्ण ठरते. उमरग्याचे शिवालय अजूनपावेतो अभ्यासलेले नाही. या ठिकाणी होत असलेला या

देवालयाचा उल्लेख बहुधा प्रथमच होत असावा. देवालयाचा आराखडा होयसळ-चालुक्य पद्धतीचा आणि नीलकंठेश्वर व कनकालेश्वरासमान आहे.

या देवालयात तीन गर्भगृहे, अंतराळ, एक महामंडप आणि मुखमंडप आहे. आतील सर्वच भाग अत्यंत प्रभावीपणे शिल्पित केलेला आहे. छताची मांडणी नीलकंठेश्वरासारखीच असून छतासाठी वापरलेल्या त्रिकोणी शिळांचा कोपरान् कोपरा शिल्पित केलेला आहे. सप्तमातृकांच्या मूर्ती लहान आकाराच्या असूनही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

इसवी सनाच्या १२ व्या शतकातील स्थापत्यअवशेष होट्टल, जामखेड, आंबेजोगाई, येरंडब, राहेट इत्यादी गावी असलेल्या देवालयांच्या रूपाने पाहायला सापडतात. या सर्व देवालयांची बांधणी पूर्वीच्या देवालयांसारखीच आहे. तरीही ११ व्या शतकातील देवालयांच्या विधानातील व रचनेतील गुंतागुंत १२ व्या शतकातील देवालयांत आढळत नाही. बाह्य भिंतीवरील शिल्पही कमी झाले. मूर्तीशिल्पाची जागा काही अंशी भौमितिक आकृतींनी घेतलेली आहे. देवालयाचा नक्षत्राकृती प्रकार तसाच ठेवण्याचा प्रयत्न असूनही गर्भगृहांची संख्या मात्र कमी करण्यात आली आहे. बाह्यभिंतीवरील क्षेपोत्क्षेप कमी करून भिंती सपाट ठेवण्याची प्रवृत्ती बळावत चालल्याचे जाणवते. १२ व्या शतकातील देवालयांची ही पद्धत प्रामुख्याने होट्टलच्या देवालयावरून स्पष्ट होते. या देवालयावरील शिलालेखावरून[1] हे देवालय १२ व्या शतकात कल्याणीच्या चालुक्यांचा मांडलिक राजा–वहीनी कुलातील सिद्धुगी याने बांधविले हे स्पष्ट होते.

होट्टल येथील सिद्धेश्वराचे देवालय गावाच्या पश्चिमेस असून चांगल्या अवस्थेत आहे. याही देवालयाची नोंद अजूनपावेतो घेतली गेलेली नाही. येथील देवालयाचा आराखडा ( plan ) धर्मापुरीच्या शिवालयासमान आहे. त्याच आराखड्यावर आधारित असे देवालय असूनही मूर्तीशिल्पाचा प्रभाव मात्र धर्मापुरीएवढा जाणवत नाही. बाह्यभिंतीवर कमी मूर्तीशिल्प आहे. असलेल्या मूर्ती मात्र अप्रतिमच आहेत.

यावनी सत्तेच्या आक्रमणामुळे मराठवाड्यातील कलाकारांची समाधी भंग पावली. इ. सनाच्या १२ व्या शतकात बांधली गेलेली राहेर, आंबेजोगाई, येळंब, बसा, इत्यादी ठिकाणची देवालये अत्यंत साधी आणि शिल्पकामाचा प्रभाव कमी कमी होत असल्याचे दाखवितात.

इसवी सनाच्या १३ व्या शतकातील देवालये तर याहीपेक्षा अधिक सामान्य स्वरूप घेऊन आकाराला आली आहेत. सामान्यपणे हेमाडपंती म्हटली जातात त्या प्रकारची ही मंदिरे आहेत.

आंबेजोगाईचे खोलेश्वर देवालय या कालखंडातील देवालयीन बांधणीचे स्वरूप दर्शविते. यादवांच्या देवालयीन स्थापत्याचा अवशेष म्हणून खोलेश्वराचे देवालय महत्त्वाचे आहे. देवालयावरील शिलालेखाधारे हे देवालय इसवी सनाच्या १२४०

पूर्वी बांधले गेल्याचा पुरावा मिळतो. या देवालयाचा आराखडा चालुक्यकालीन देवालयाप्रमाणेच आहे. परंतु बाह्य भितीच्या रचनेत मात्र खूपच बदल झाला आहे. बाह्य भितीवर मूर्तीशिल्प अजिबात नाही. क्षेपोत्क्षेपांची जागा बऱ्याच अंशी सपाट अशा भागांनी घेतली असून पूर्वीच्या पद्धतीचा परिणाम कायम ठेवण्याचा प्रयत्न म्हणून खांबाच्या स्वरूपात काही क्षेप देण्यात आले आहेत. बाह्य भितीवरील देव–कोष्टे नाहीशी झाली आहेत. आतील देवकोष्ठांची संख्याही कमी झाली आहे. देवालयाच्या आतील भागात कुठेही आकर्षित करणारे असे शिल्पकाम नाही. रंगशिला कायम आहे परंतु नुसत्याच एका गोलाकृती शिळेच्या स्वरूपात.

□ □

# कला व शिल्प-मध्ययुग : विदर्भ

गो. ब. देगलूरकर

अगदी प्राचीन काळची मंदिरे जशी महाराष्ट्राच्या इतर भागात नाहीत, तशी ती विदर्भातही नाहीत. विदर्भात सातवाहनानंतर वाकाटक घराण्याची सत्ता स्थापन झाली. हे वाकाटक नृपती कलांचे आश्रयदाते होते. गुप्तकालात उत्तरेकडे जशी मंदिरे उभारली गेली तशीच मंदिरे दक्षिणेकडे वाकाटकांनी उभारली होती. पैकी प्रवरसेनाने बांधलेले प्रवरेश्वराचे देवालय, रामगिरीवरचे (रामटेकचे) रामगिरी स्वामीचे देवालय, अश्वत्थखेटकातील विष्णूचे मंदिर आणि द्वितीय प्रवरसेनाने आपल्या आईसाठी बांधलेले श्रीरामचंद्राचे उत्तुंग मंदिर यांचा शिलालेखांतून उल्लेख आढळतो. ही मंदिरे आता मात्र खरोखरच अभिलेखशेष झाली आहेत. शिलालेखात उल्लेखिलेल्या स्थळी त्यांचा मागमूसही सापडत नाही. रामटेकवर सध्या जे श्रीरामाचे मंदिर दिसते ते पूर्वीच्या मंदिराचेच जागी असले तरी त्यात आता इतका बदल झाला आहे की वाकाटककालीन मंदिर कसे होते याचा अंदाजच बांधता येत नाही. वाकाटकांच्या स्थापत्याचे अवशेष आता विदर्भात एक दोन ठिकाणी उपलब्ध आहेत. रामटेक (जि. नागपूर) येथे वराह दरवाजाच्या ईशान्येस एक देऊळ भग्नावस्थेत आहे. तेथे पूर्वी असलेल्या मंदिराचा फक्त लहानसा मंडप—तोही भग्नावस्थेत आता पहावयास मिळतो. तो गूढ मंडप नाही; चोहोबाजूंनी उघडा आहे. मंडपाचे छत सपाट आहे व त्याला सहा स्तंभांचा आधार आहे. पैकी चारावर पद्मबंध कोरलेले आहेत. या मंडपाचे शेजारी त्या काळचीच एक त्रिविक्रमाचीच मूर्ती आहे. त्यावरून फार तर एवढे अनुमान करता येते की कदाचित हे देऊळ विष्णूच्याच एखाद्या अवताराचे असावे.

रामटेकप्रमाणेच प्रवरपूर येथेही एक मंदिर वाकाटकांचे काळात बांधलेले होते. त्या देवळाच्या बांधकामात उपयोगिलेल्या शिल्पपटापैकी काही तेथेच (पवनार, जि. वर्धा) श्री विनोबाजींच्या आश्रमात ठेवले आहेत. श्रीरामजन्म, वनवासगमन, भरतभेट, वालीवध वगैरे प्रसंग त्या शिल्पपटात दिसतात. त्यावरून येथील देवालय कदाचित श्रीरामाचे असावे असे वाटते.

विदर्भात सध्या अस्तित्वात असलेली बहुतेक सर्व मंदिरे यादवकाळची किंवा त्यानंतरची आहेत. याला अपवाद फक्त चांदा जिल्ह्यातील मार्कंडी येथील मंदिराचा. हे मंदिर इ. सनाच्या १०–११ व्या शतकातले आहे. विदर्भाच्या आठही जिल्ह्यांत हेमाडपंती देवळे आहेत. या सर्व जिल्ह्यांचे अन्वेषण अद्यापपर्यंत झालेले नाही. नागपूर विद्यापीठातर्फे आता या कार्यास प्रारंभ झालेला आहे. पन्नास वर्षांपूर्वी कझिन्स यांनी काही जिल्ह्यांतील मंदिरांचे वर्णन केलेले आहे; पण त्यानंतर या क्षेत्राकडे कोणाचेही लक्ष गेलेले दिसत नाही. विदर्भाच्या दक्षिणेकडील जिल्ह्यांतच तेवढी देवळे आहेत व उत्तरेकडील जिल्हे वैराण आहेत हे कझिन्स यांचे मत आता ग्राह्य मानता येत नाही.

विदर्भात खजुराहोसारखी सांधार मंदिरे नाहीत; आहेत ती सर्व निरंधार. येथील बरीच मंदिरे शिवाची आहेत. सातगाव व लोणार इथल्यासारखी काही मंदिरे विष्णूची आहेत. तर बार्शी–टाकळी, अमडापूर वगैरेसारख्या ठिकाणची मंदिरे देवीची आहेत. त्यातल्या त्यात कझिन्सने वर्णिलेली काही व मार्कंडी येथील मंदिरे सुस्थितीत आहेत. तरी त्यांच्या शिखरांची खूपच पडझड झालेली दिसते.

विदर्भातील बहुतेक सगळी मंदिरे काळ्या दगडाची आहेत. फक्त चांदा जिल्ह्यातील मार्कंड ऋषीचे म्हणून प्रसिद्ध असलेले शिवमंदिर लाल पाषाणांचे आहे. अमडापूर ( बुलढाणा जिल्हा ) येथे टेकडीवर जे देवीचे मंदिर आहे ते मात्र पक्क्या विटांचे आहे व त्या विटा निरनिराळ्या आकाराच्या मुळातच केलेल्या व नंतर भाजलेल्या अशा आहेत. दगड ठिसूळ असल्यामुळे, मंदिराचे पाये पक्के नसल्यामुळे व शतकानुशतकाच्या अनास्थेमुळे ही देवळे आपले अस्तित्व कसे तरी टिकवून धरीत आहेत. परंतु सातगाव, साकेगाव, बार्शी-टाकळी, लोणार व मार्कंडी येथील मंदिरे संबंधित पुराणवस्तु विभागाने वेळीच डागडुजी व देखभाल केल्यामुळे बरीच सुदृढ आहेत.

विदर्भातील मंदिरे, तीन-चार प्रकारांनी बांधलेली दिसतात:– ( १ ) चतुष्कोनी गर्भगृह व तशाच आकाराचा सभामंडप, ( २ ) चतुष्कोनी गर्भगृह व आयत चतुष्कोनी सभागृह ( मंडप ), ( ३ ) तारकाकृती गाभारा व आयत चतुष्कोनी सभामंडप, ( ४ ) गाभारा व मंडप दोन्हीही तारकाकृतीचे. या शिवाय प्रवेशद्वाराच्या व मंडपाच्या ठेवणीवरूनही विदर्भातील मंदिरांची विभागणी करता येते. ती अशी :– ( १ ) काही मंदिरांच्या सभागृहाला एकच प्रवेशद्वार असते ( उ. साकेगावचे मंदिर ) व ते सभागृहाच्या बरोबर समोर असते. हा प्रकार सामान्यतः सगळीकडेच पाहायला मिळतो. पण याला अपवाद म्हणून दुसरा एक प्रकार बार्शी–टाकळी ( अकोला जिल्हा ) येथील देवळांचे रचनेत आढळतो. इथे गाभाऱ्याचे समोरचे दिशेस प्रवेशद्वार असण्याऐवजी उजवीकडे म्हणजे गाभाऱ्याचे दाराशी काटकोन साधून मंडपाचे प्रवेशद्वार आलेले. ( २ ) काही मंदिरांच्या मंडपांना तीन दिशेस तीन प्रवेशद्वारे असतात. काही वेळा त्यांचे समोर मुखमंडप असतात. उदा. सातगाव येथील मंदिर. ( ३ ) काही मंदिरांचे सभामंडप उघडे आहेत, त्यांच्याभोवतीच्या ओट्यावरील लहान स्तंभावर छत आधारलेले आहे. उ. सातगावचे मंदिर.

तर काही सभामंडप संपूर्ण भिंतीने वेढलेले म्हणजे गूढमंडप पद्धतीचे आहेत. उदा. लोणार, मार्कंडी येथील मंदिरे. (४) काही मंदिरांच्या भिंती अगदी साध्या, नक्षी-विरहित आहेत. काहींच्या नक्षीयुक्त आहेत. काहींच्या मंडोवरावरील जंघाभागावर देव-देवतांची व सुरसुंदरींची शिल्पे एका पट्टिकेत कोरलेली आहेत. उ. बार्शी-टाकळी, लोणार वगैरे. तर मार्कंडीच्या मंदिरावर अशा तीन पट्टिका आहेत. त्रिजंघायुक्त मंडोवर असलेले ते मंदिर आहे. या सर्व मंदिरांपैकी काहींचे स्थापत्य कसे आहे हे विस्ताराने पाहणे बरे होईल.

विदर्भात मध्ययुगीन काळातील सगळ्यात प्राचीन मंदिर आहे मार्कंडी येथील. (आकृती १४) ते शिवाचे मंदिर इ. स. १०–११ व्या शतकातले आहे. याला चतुरस्र अयतस्र असे गर्भगृह व तीन प्रवेशद्वारयुक्त सभामंडप आहे. दोन्हीला सांधणारे अंतराळही आहे. पूर्वेकडील प्रवेशद्वारासमोर आहे तसाच मुखमंडप दक्षिणोत्तर प्रवेशद्वारासमोरही होता. आता फक्त त्यांची अधिष्ठाने शिल्लक आहेत. सभागृहाच्या भिंती नव्याने बांधलेल्या आहेत. गाभाऱ्याची भिंत त्रिजंघायुक्त मंडोवराची आहे. म्हणजे मंडोवरावर शिल्पयुक्त तीन पट्टीका आहेत. त्या संपूर्ण गाभाऱ्याला वेढतात. भिंती अस्त्रस व रथकांनी युक्त आहेत. प्रत्येक रथकावर देवदेवतांच्या व सुरसुंदरींच्या, नृत्याप्सरांच्या प्रतिमा आहेत व अस्त्रस भागावर निरनिराळे व्याल आहेत. गाभाऱ्याचे अधिष्ठान वा मसुरक पीठ, पद्म, कणी, पट्टीका, कुंभ, कुमुद, दांतऱ्यासह पद्म, पत्रलतासह पट्टिका, कणी व पद्म इत्यादी थरांनी युक्त आहे. येथील या अधिष्ठानाचे एक वैशिष्ट्य असे आहे की दांतऱ्यासह असलेल्या पद्मभागावर मधून मधून कीर्तीमुख आहेत. त्या मुखातून आंब्याचे डेरेदार झाड कुमुद भागावर येऊन पडते. व त्या आम्रवृक्षाखाली सुबक ठेंगण्या वृक्षिका उभ्या आहेत. त्यांच्यामागे अधिष्ठानातील कुंभ थर येतो. हे निरनिराळे आडवे जाणारे थर मध्येच उभ्या कमनीय वृक्षिकांनी छेदले गेल्यामुळे अधिष्ठानाला देखणेपणा प्राप्त झालेला आहे.

जंघाभागावरील शिल्पातून अष्टदिग्पाल, ब्रह्मा-सरस्वती, विष्णु-लक्ष्मी; शिव-पार्वती, नटेश, कार्तिकेय, नृत्यगणेश, हयग्रीव, हरीहर सप्ताश्वासह सूर्य आदींच्या मूर्ती आहेत. पण त्याशिवाय ब्रह्मा-विष्णु-महेश अशा जोड देवताही आहेत. हे एक या देवतांचे वैशिष्ट्य आहे.

या मंदिराचे शिखर नागर पद्धतीचे आहे. ते गाभाऱ्यावर येते. त्याचे चार टोकास चार लहान लहान शिखरे आहेत, ती मात्र लहान होत जाणाऱ्या पायऱ्यांची आहेत. वर आहे अमरशिला.

या मंदिरातील स्तंभ कलाकुसरयुक्त आहेत. कणीयुक्त पीठावर चारीकडून उभ्या लांबट चौकोनाचे शिल्पपट आहेत. स्तंभमध्याचे खालच्या बाजूस सुरसुंदरी व देवता यांची शिल्पे चारी अंगाने आहेत. ही शिल्पे द्विअर्धस्तंभयुक्त असल्यामुळे उठून दिसतात.

स्तंभमध्याच्या वरच्या बाजूस अष्टकोनाकृती आकार असून त्यावर नक्षी आहे. कीर्तीमुखही आहेत. वर गोलाकार नक्षीयुक्त भाग आहे. त्यावर घंटाकृती स्तंभशीर्ष आहे.

हे मार्कंडेयाचे मंदिर ज्या विस्तीर्ण अशा प्राकारात आहे, त्यातच दुसरी १५–१६ लहान लहान मंदिरे आहेत. पैकी यमधर्म, मुरकुंड ऋषी, मृत्युंजय, उमाशंकर दशावतार ही त्यामानाने मोठी आहेत. काहींच्या मंडोवर भागावर मुख्य कोनाड्यात मूर्ती आहेत. हा सर्व प्राकार वैनगंगेच्या अगदी काठावर आहे. मंदिराच्या भव्यतेला त्यामुळे मनोहारीपणा येतो.

विदर्भात याच्यासारखे देखणे मंदिर हेच म्हणून याला विदर्भापुरते तरी " देवालय चक्रवर्ती " असे म्हणता येईल ! मूळ मर्कंड मंदिरासमोर एक स्वतंत्र असा भव्य नंदी-मंडप होता. आता त्याचे अधिष्ठान व मंडपाचा पडझड झालेला छतविरहीत सांगाडा फक्त दिसतो. एकोणिसाव्या शतकाच्या चवथ्या चरणाच्या सुरुवातीलाच कनिंगहॅम यांनी या मंदिराचे त्रोटक वर्णन प्रसिद्ध केले पण त्याचे सविस्तर वर्णन कोठेच उपलब्ध नाही.

बार्शी–टाकळी ( जि. भंडारा ) येथील भवानीचे मंदिर गर्भगृह, अंतराळ व सभामंडपयुक्त आहे. मंदिराचे प्रवेशद्वार सभामंडपाच्या एका अंगास असून ते मूळ सभागृहाच्या द्वाराला काटकोनात येते. नेहमीसारखे समोरासमोर येत नाही. या प्रवेश-द्वाराचे आतील अंगास दोही बाजूस पाठ टेकण्याची सोय असलेली कक्षासने आहेत. प्रवेशद्वाराच्या वरच्या अंगास उतरते कपोत आहेत. गर्भगृह तारकाकृती आहे. सभा-मंडपातील मुख्य स्तंभ चतुष्टयातील स्तंभाप्रमाणेच याचा पदविन्यास वा छेद आहे. सभागृह चौकोनी आहे. शिखर व सभागृहाचे छत पडलेले आहे. मंदिराचे मागील भिंतीवरील शिलालेखानुसार हे मंदिर इ. स. ११७६ साली बांधलेले आहे. या मंदिराच्या भिंती अनेक प्रकारच्या स्तरांनी युक्त अशा आहेत. गर्भगृह व सभामंडप यांच्या भिंतीच्या बाहेरील भागावर एका पट्टात देवादिकांची शिल्पे आहेत. देवीच्या मंदिराभोवती देवतांची शिल्पे अधिक असावीत हे संयुक्तिक आहे व स्वाभाविकही आहे. या पट्टात काही मिथुन शिल्पेही आहेत.

विदर्भातील उत्तम मंदिरापैकी एक मंदिर लोणार येथे आहे. हे गाव अखिल भारतात तेथे असलेल्या खाऱ्या पाण्याच्या सरोवरासाठी प्रसिद्ध आहे. कारण असे खारे सरोवर भारतात अन्यत्र कोठेही नाही. लोणार गावात असलेले मध्ययुगीन मंदिर दैत्य-सूदनाचे म्हणून प्रसिद्ध आहे. गाभारा व मंडप ही दोन्हीही तारकाकृती आहेत. सभागृह गूढ पद्धतीचे असून त्याला तीन प्रवेशद्वारे आहेत. (दोन सध्या बंद ठेवलेली आहेत.) प्रत्येकासमोर मुखमंडपासाठी जगति बांधलेल्या दिसतात. मात्र मुखमंडप काय किंवा प्रवेशद्वाराची वरची बाजू काय ही त्यावेळी बांधली गेली नसावी असे दिसते. हे अर्धवट बांधले गेलेले मंदिर पूर्ण करण्याचे कार्य पुन्हा केव्हा तरी हाती घेतल्याचे विटा–दगडगोटे यांच्या बांधकामावरून दिसते.

आकृती १३



शिवमंदिर : सातगाव

आकृती [illegible]



पृ. १०८ शिवमंदिर : साकेगाव

वर उल्लेखिलेल्या खाऱ्या पाण्याच्या सरोवराचे काठाकाठाने याच काळची पण सापेक्षतः साधी लहान–मोठी सुमारे १५ मंदिरे आहेत.

बुलढाणा जिल्ह्यात सातगाव येथेही एक विष्णूचे मंदिर आहे. हे गाव चिखली या तालुक्याच्या गावापासून वायव्येकडे चार मैलांवर आहे. इथे एका आवारात अनेक मंदिरे होती. त्यापैकी काही कशीबशी अजून उभी आहेत. पैकी मुख्य विष्णूचे देऊळ त्यातल्या त्यात चांगल्या अवस्थेत आहे. या आवाराला एक भव्य द्वारशाला होती. तिचे रूपांतर आता गावकऱ्यांनी मंदिरात केले आहे. या द्वारशालेला पंचशाखायुक्त, प्रवेशद्वार होते. प्रवेशद्वारावर लाटबिंब म्हणून गणेश कोरलेला आहे, व त्यावरील तुळईवर सहामातृका एका पटात कोरलेल्या असून या पट्टिकेच्या वरच्या अंगास मधोमध सातवी माता कोरलेली दिसते. प्रवेशद्वाराच्या आतल्या अंगास दक्षिणोत्तर कक्षासने बांधलेली आहेत. यांच्या कठड्यावर काही समागम शिल्पेही आहेत.

या द्वारशालेपासून थोड्याच अंतरावर विष्णूचे मंदिर पश्चिमाभिमुख असून त्याचे गर्भगृह ५′–१०″ चे समचतुरस्र असे आहे. अंतराळ ६′ × ४′–३″ आहे व त्रिमुख-मंडपयुक्त सभामंडप १६′–२″ × १५′ × १०½″ आहे. (आकृती १५) गर्भगृहात भद्रपीठावरील दर्शनी भागावर खाली धर्मयश ( Lozenge ), त्याचे वरचे बाजूस शंखपद्मधारी देवी कोरलेली आहे व त्याहीवर वज्रासनातील अंजलिमुद्रेतील गरूड एका लहानशा मखरात कोरलेला आहे.

अंतराळात व सभामंडपाच्या पश्चिमाभिमुख भिंतीत देवकोष्ठ आहेत. सध्या ते रिकामे आहेत. सभामंडप चतुःस्तंभयुक्त असून भग्नावस्थेतील रंगशिला ८′·८′×८·६″ आहे. स्तंभाच्या तळखड्याचे चारही बाजूस देवींच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. स्तंभमध्याचा खालचा भाग द्विकोनयुक्त असून त्यावरचा भाग नक्षीयुक्त अष्टकोनी आहे. त्यावर घटपल्लव, पुन्हा त्रिकोणाची नक्षी असलेला गोल भाग आणि कपोतालीवर घंटाकृती, मथळा व शीर्षभागी कीचक आहे. या स्तंभरचनेत येथे एक वैशिष्ट्य आहे. दोन स्तंभावरील कीचकांच्या मधील एका लहानशा पुढे आलेल्या भागावर आणखी एक लहानसा चतुर्भुज कीचक इथे कोरलेला आहे. असे एकूण चार कीचक रंगशीलेच्या चारी कोपऱ्यांत होते. छताच्या तुळया पेलण्याचे यांचे काम नसून प्रस्तरात मध्ये खोचलेल्या शालभंजिकेचे पादपीठ म्हणून यांचा उपयोग केलेला होता. पैकी सध्या एकही प्रतिमा तेथे नाही. अंतराळाच्या बाजूच्या अर्धस्तंभावर घटपल्लव शीर्षाचेऐवजी हस्त– शीर्ष आहेत, तर सभामंडपाच्या भोवतीच्या अर्ध्या भिंतीवरील स्तंभाच्या मध्यास चौदिशेस पुढे आलेल्या पट्टिकेचा वेढा आहे. पुढे आलेल्या या भागावर पूर्वी शालभंजिका असाव्यात असे त्यावर असलेल्या भोकांवरुन अनुमान करता येते.

येथील सभामंडपाचे छत विदर्भातील दुसऱ्या कुठल्याही मंदिराचे छतापेक्षा वेगळे असून ते मधल्या चार खांबावर सपाट असून चोहीकडे उतरते होत जाऊन भिंतीवरील

अर्धस्तंभावर विसावलेले आहे. यावरील नक्षीकाम सुरेख असून ते कृष्णकमळाच्या एकावर एक असणाऱ्या पाकळ्यांच्या थरासारखे आहे. हे पाहून दिलवारा मंदिराच्या छताची आठवण होते. रंगशिलेवरील छताचे चारी बाजूस तुळयांवर वैष्णवी, ब्राह्मी, वाराही, पार्वती वगैरे मातृका पुनः पुनः कोरलेल्या आहेत.

तिन्हीही मुखमंडपांच्या अर्ध्या भिंतीवर बाहेरील बाजूस अर्धस्तंभाची नक्षी आहे. प्रत्येक दोन अर्धस्तंभात सुरसुंदरी व नृत्यवादनमग्न स्त्रियांची शिल्पे कोरलेली आहेत. दक्षिणोत्तर पूर्वेकडील भागाच्या मध्यात देवकोष्ठ आहेत. पूर्वी तेथे मूर्ती असाव्यात.

गाभाऱ्यावरील शिखर सिन्नर येथील गोंडेश्वराच्या देवळासारखेच होते, हे अर्धवट शिल्लक राहिलेल्या शिखर भागावरून कल्पिता येते. स्कंधभागी त्याच्या टोकास कीर्तिमुख आहे व त्याचे खालचे टोकास कमानीत पूर्ण कलश आहे. शिखराच्या दर्शनी बाजूच्या रथावर शुकनासिका आलेली आहे. प्रत्येक दोन रथांमध्ये एकावर एक ठेवलेल्या मूळ शिखराच्या अगदी लहान प्रतिकृतींचे तीन उभे पट्टे आहेत. वरच्या टोकास कुमुद-अमलशिला व कळस आहे. मार्कंडी येथील देवळाचे शिखर सोडल्यास विदर्भात सगळ्या देवळांची शिखरे अशीच होती.

प्रत्येक मुखमंडपावरील छतावर लहान लहान होत जाणाऱ्या पायऱ्यांचे शिखर ( Pyramidal ) असावेसे अवशेष भागावरून वाटते. मात्र खजुराहो वगैरे ठिकाणी याचे सगळ्यात वर घंटाकलश दिसतो इथे मात्र अमलशिला व कळसच त्यांचेवर असावेसे वाटते.

याच प्रकारात आणखी एक लहानसे शिवमंदिर आहे. गाभारा व मुखमंडपयुक्त हे मंदिर बरेच पडलेले आहे.

चिखलीपासून पश्चिमेस सहा मैलावर साकेगाव येथे साकेश्वराचे मंदिर आहे. प्राकारात उभे असलेले हे मंदिर गाभारा, अंतराळ, गूढमंडप व मुखमंडपयुक्त आहे. एके काळी या मंदिराच्या विमानाचा भाग पडलेला होता. नंतर पुरातत्त्वखात्याने तो जसाच्या तसा बांधून काढलेला आहे. त्यावरून विदर्भातील मंदिरांच्या वर उल्लेखिल्या-प्रमाणे शिखरांची ठेवण कशी होते हे कळते.

सध्या मंदिराच्या मुखमंडपात तीन नंदी ठेवलेले आहेत. याच्या सभामंडपाचे छत मुख्य अशा चार खांबावर व भिंतीवरील अर्धस्तंभावर नऊ भागात विभागलेले आहे. या मुख्य चार खांबाच्या स्तंभ मध्याच्या खालच्या आयताकृती भागावर निरनिराळ्या मूर्ती कोरलेल्या आहेत. यापैकी अंतराळाकडे जे दोन स्तंभ येतात त्यावर कीचक आहेत. पैकी एक स्त्री चतुर्भुज आहे व एक अंकुश व मोदक वगैरे हाती घेतलेला चतुर्भुज गणेश आहे.

गाभाऱ्याच्या दारावरील शाखावर प्रतिहारी, मांगल्य विहग, घटपल्लव वगैरे आढळतात. गाभारा सभामंडपापेक्षा चार फूट खोल आहे. अंतराळातील समोरासमोरील देव-कोष्ठात कुबेर व गणेश आहेत.

मंदिराचे शिखर सातगाव येथील विष्णुमंदिराच्या शिखरासारखेच आहे. शुक-नासिकेवर दर्शनी बाजूस षड्भुज नटेश असून त्याच्या खाली तीन शिल्पपटात अनुक्रमे ब्रह्मा–सरस्वती, शिव–पार्वती, व विष्णु–लक्ष्मी (?) आहेत. शिवाय दक्षिणोत्तर भागावर सरस्वती, इंद्र, महिषासुरमर्दिनी वगैरेंच्या प्रतिमा आहेत.

वर वर्णन केलेल्याशिवाय धोत्रानंदई येथे तीन व मढ येथे दोन मंदिरे आहेत. ही दोन्हीही ठिकाणे बुलढाणा जिल्ह्यात आहेत. पैकी धोत्रानंदई येथील गावाच्या बाहेरील शेतात जे महत्त्वाचे मंदिर आहे ते अजूनही सुस्थितीत आहे. उंच अधिष्ठानावरील हे मंदिर, गाभारा, अंतराळ व गूढमंडपयुक्त आहे. स्तंभ चौकोनी आहेत. स्तंभशीर्षाला नागाकृती हस्त आहेत. सभामंडपाच्या दक्षिणोत्तर भिंतीच्या मध्यांत मोठे कोनाडे आहेत. त्यामुळे मंदिर त्रिदल असल्याचा भास होतो. ते नीलकंठेश्वराचे व दुसरे रामेश्वर मंदिर. या रामेश्वर मंदिराच्या सभामंडपाचे स्तंभ फार प्रेक्षणीय असे आहेत. यांच्या तळखड्यांच्या चारी बाजूस देवतांच्या छोट्या प्रतिमा कोरलेल्या आहेतच. पण स्तंभ मध्यांतही एकावर एक असे दोन शिल्पपट आहेत. या प्रत्येक पटात मधला मोठा व बाजूचे दोन लहान पट आहेत, व त्याचे नृसिंह, वामन, भैरव, गणेश, नटेश, हनुमान, वालीचा मृत्यू, अशोकवनातील सीता अशी चित्रे आढळतात.

विदर्भातील मध्ययुगीन मंदिराच्या स्थापत्य शैलीचा विचार करता वरील विवेचना-वरून हे ध्यानात येते की मार्कंडीचे मंदिर वगळता थोड्या फार फरकाने बाकीची देवळे एकाच वर्गात मोडतात. मार्कंडीचे शिखर रहपग पंचरथ पद्धतीचे असून आजूबाजूला कोपऱ्यावर भूमी व अमलक याचे आलटून पालटून स्तर येतात व शेवटी टोकाला अमलक आणि कळस चढविलेला आढळतो. अशी शिखरे खजुराहो येथे आढळतात. बाकीच्या देवळांची शिखरे कशा प्रकारची आहेत यासंबंधीचे विवेचन मागे आलेच आहे. ती झोडगा, सिन्नर, बलसाणे वगैरे ठिकाणच्या हेमाडपंती मंदिरांच्या शिखरा-सारखीच आहेत.

पश्चिम महाराष्ट्रात व मराठवाड्यात हेमाडपंती म्हणवली जाणारी देवळे खूप आहेतच पण सापेक्षतः ती मोठी व कलाकुसरयुक्त आहेत. विदर्भातील ही मंदिरे या स्थापत्यशैलीच्या पहिल्या बहराची वाटत नाहीत. ती कमी कलाकुसरीची व त्यामानाने कमी शिल्पे असलेली आहेत. इथे त्रिदल वा द्विदल मंदिरे नाहीतच म्हटले तरी चालेल अशी आज घटकेला परिस्थिती आहे. मोठ्या मंदिरांच्या अधिष्ठानावर आढळणारे अश्वथर, गजथर व नरथर इथे एकाही मंदिरावर आढळत नाहीत. फक्त कीर्तीमुख थर आढळतो. याला अपवाद फक्त लोणार येथील मंदिराच्या मुखमंडपाच्या अधिष्ठानावर नरथर आहे तोच. पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांच्या तुलनेत संख्येने ही येथील मंदिरे कमी भरतात. तरीपण ही हेमाडपंती मंदिरे आहेत व त्या शैलीचा आढावा घेताना यांनाही विचारात घ्यायला हवे हे मात्र खरेच.

**मंदिरातील शिल्प :** मंदिरांचा विचार त्यावरील शिल्पकामाचा आढावा घेतल्या-शिवाय पूर्ण व्हायचा नाही. विदर्भातील मंदिरातून तीन प्रकारचे शिल्प आहे.

( १ ) पत्रलता, फुले व इतर प्रकारचे नक्षीकाम ( २ ) प्राण्यांची शिल्पे व ( ३ ) मनुष्यप्राणी व देवदेवतांची शिल्पे. हे शिल्पप्रकार स्तंभावर, छतावर, भिंतीवर व शिखरा-वर थोड्याफार प्रमाणात आढळून येतात. गर्भगृहात प्रतिष्ठापित मूर्तीशिवाय अन्य प्रकारचे शिल्प नसते. याचे उलट गाभाऱ्याचे प्रवेशद्वार कलाकुसर व मानवी शिल्पयुक्त असते. विदर्भातील मंदिराच्या भिंतीच्या बाहेरील बाजूस म्हणजे मंडोवराच्या जंघाभागावर जे शिल्प आढळते त्याचे प्रमाण थोडे आहे. देवदेवतांच्या व मानवदानवांच्या प्रतिमा येथे आढळतात. लोणार बार्शी-टाकळी येथील देवळावर समागम शिल्पेही आढळतात. लोणारच्या मंदिराच्या जंघाभागावर एक स्त्री हत्तीचे पिलू उचलून प्रतिस्पर्ध्यावर हल्ला करते आहे असे दाखविले आहे तर सातगाव येथील सभामंडपाच्या छतावर कुस्तीचा प्रसंग शिल्पित केला गेला आहे. काही संन्यासी व साधूही तेथे कोरलेले आहेत.

देवदेवतांच्या अनेक प्रतिमा व मूर्ती यांचेपैकी आवर्जून उल्लेख करावा अशी एक मूर्ती बुलढाणा जिल्ह्यात मेहेकर येथे बालाजीच्या मंदिरात आहे. देऊळ नवे असले तरी मूर्ती १२-१३ व्या शतकातील आहे. ती जमिनीतून बाहेर काढली तेव्हा मग सध्याच्या मंदिरात-प्रतिष्ठापिली गेली आहे. ही मूर्ती केशवाची आहे. ही मूर्ती म्हणजे शिल्पकलेचा एक अप्रतिम नमुनाच होय. ६ फुटाच्या गंडकी शिळेच्या या मूर्तीचे अवयव दृष्ट लागण्यासारखे रेखीव आहेत. तिचे शिरोभागी रत्नखचित मुकूट झळाळतो आहे. कंठी वैजयंतीमाळा रुजते आहे, बाहूत अंगद आहेत, वलये आहेत. मनगटाभोवती, पंजाचे मागचे बाजूस हस्तपत्र नावाचा दागिना आहे. कटिभोवती रत्नमेखला आहे. एकूण केशवाचे रूपच साजिरे-गोजिरे आहे. प्राणिशिल्पापैकी फार थोडे शिल्प विदर्भात आढळते. मार्कंडी येथील मंदिरावरील व्यालांचा मात्र आवर्जून उल्लेख करावा लागेल. इतक्या प्रकारचे व्याल महाराष्ट्रात व मराठवाड्यातही शिल्पिलेले आढळत नाहीत. इथे गजव्याल, शुकव्याल, गृध्रव्याल, अश्वव्याल, नरव्याल, मेषव्याल, श्वानव्याल, व शार्दूलव्याल पुनः-पुन्हा कोरलेले आढळतात. याशिवाय देवदेवतांच्या मूर्तींबरोबर त्यांची वाहने म्हणून बैल, रेडा, हत्ती, सिंह हे प्राणी व हंस, मोर, गरुड वगैरे पक्षी दिसतात.

□ □

आकृती १५

प्र. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्रा ५१/२
ग्रंथालय.



पृ. १०५ व ११०

मूर्तिशिल्प, मार्कंडेश्वर : मार्कंडी

आकृती १९



गुजरात-शैलीचे लाकडी हस्त : श्रीगोंदे

पृ. १२१

# कला व शिल्प : इस्लामी व मराठेशाही काळ

म. श्री. माटे

महाराष्ट्राच्या बहुतेक सर्व भागावर तेराव्या शतकाच्या शेवटापासून सुलतानी राज्य असले तरी मुसलमानी राजवटीतील सर्वोत प्रेक्षणीय असे कलात्मक अवशेष आज महाराष्ट्राबाहेरच आहेत. औरंगाबाद आणि दौलताबाद या दिल्ली सुलतानांच्या प्रादेशिक राजधान्या, एलिचपूर, थळनेर, जुन्नर, अहमदनगर या सुलतानी राजनगरी महाराष्ट्रातच येतात. परंतु कलाकौशल्याचे खरे नमुने महाराष्ट्राबाहेर असणाऱ्या गुलबर्गा, बिदर, गोवळकोंडा व विजापूर येथेच आहेत. त्यांची फिकट प्रतिबिंबे वा नकला कोठेकोठे पहावयास सापडतात. त्यात कलागुण विशेष नसले तरी एका एका विशिष्ट कालखंडाच्या प्रातिनिधिक म्हणून त्यांची नोंद घ्यावयास हवी.

पहिली मुसलमानी राजधानी देवगिरी ( दौलताबाद ) येथे झाली. दौलताबादेच्या किल्ल्याची मुसलमानी काळात बरीच पुनर्बांधणी व पुनर्रचना झाली असावी. तट, दरवाजे यांचे शिल्प इतर ठिकाणी आढळणाऱ्या इस्लामी शिल्पाच्या धर्तीचे आहे. याच ठिकाणी इकडच्या बाजूची सर्वात प्राचीन मशीद उभी झाली ( इ. स. १३१५ ). ती म्हणजे जुम्मा मशीद. किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या मंदिरांचा विध्वंस करून त्यांचेच खांब, तुळया इत्यादी वापरून ही मशीद उभी करण्यात आली. बांधणीची पद्धत पूर्णपणे प्राचीन हिंदू थाटाची असली तरी इमारतीचे विधान मशिदीचे आहे. एक मोठा थोरला मंडप, त्यात मिहराब आणि मंडपासमोर प्रशस्त चौक. याच्याभोवती उंच भिंती. ह्या मशिदीला जुम्मा मशीद असे नाव असून तिचा काळ १३१५ असा सांगतात. हैद्राबाद संस्थानच्या विलीनीकरणानंतर तिचे रूपांतर "हिंदमाता मंदिर" म्हणून केलेले आहे. मात्र हे करताना, मिहराबेच्या जागी हिंदमातेची मूर्ती बसविण्यापलिकडे कसलाच फरक– विशेषतः वास्तूविषयक फरक– केलेला नाही. त्यामुळे तिची घेडगुजरी रचना आणि इस्लामी वास्तुविधान आजही ओळखता येतात. अशा तऱ्हेच्या कामचलाऊ मशिदी दक्षिणेत ठिकठिकाणी बांधण्यात आल्या. विजापूरच्या किल्ल्यात अशा दोन मोठाल्या

मशिदी आहेत. यानंतरच्या काळात स्वतंत्र बांधकामाला प्रारंभ होऊन सर्वांगपरिपूर्ण मशिदी उभ्या राहिल्या.

देवगिरी किल्ल्याच्या परिसरात अनेक पडिक घुमट, भिंती व इतर बांधकामे दिसून येतात. ही सगळी भोवतालच्या झाडीने केवळ ग्रासून टाकलेली आहेत. महंमद तघलखाने दिल्लीहून येथे आणली, ती काही वर्षे येथे होती. त्याने आपल्याबरोबर दिल्लीतील कुशल कारागीर, स्थापत्य विशारद आणले होते. त्याने जर काही बांधकाम केले असले तर त्याचे अवशेष या जंगलांत सापडावयास हवेत. या दृष्टीने या परिसराची पाहणी झालेली नाही.

**चांद मीनार :** दौलताबादेची सर्वात प्रसिद्ध वास्तू म्हणजे " चांद मीनार. " लांबून पाहिली असता ही वास्तु खडूच्या कांडीसारखी, हलकी, थोडीशी तरंगत असल्या-सारखीही दिसते. पण जवळ जावे तसतसा तिचा अवाढव्य आकार डोळ्यात भरू लागतो. उत्तुंग असणाऱ्या या मनोऱ्याचे विधान वर्तुळाकार आहे व त्याचा व्यास म्हणजे उंचीच्या साधारण एक दशांश आहे. दंडगोल असणाऱ्या या मनोऱ्याची रचना मोठी प्रेक्षणीय आहे. शरीरावर चुनेगच्ची पट्टे ओढले आहेत पण त्यामुळे झेपावत जाणाऱ्या उंचीला बाध येत नाही. मनोऱ्यावर तीन ठिकाणी खूपच पुढे झुकणारे सज्जे बांधलेले आहेत. पण हे सज्जेही मनोऱ्याच्या ऊर्ध्ववृत्तीला अडथळा न आणता सहाय्यच करतात. भिंती सपाट असल्याने कोठेही छायाप्रकाशाच्या खेळाला व त्यातून उत्पन्न होणाऱ्या घनतेला वावच मिळत नाही. म्हणूनच लांबून पाहिल्यावर हा मनोरा तरंगावा तसा वाटतो. याच्या बांधणीचा काळ सन १४३५ आहे. यापुढे गुलबर्गा व बिदर ( विशेषतः महमूद गावानचा मद्रासा ) येथील काही इमारतीवर त्याचप्रकारचे मनोरे बांधण्यात आले. पण ते जोडीने उभारलेले आहेत. येथल्यासारखे एकटे नव्हे. इतरत्र मशिदीच्या दर्शनी भागावर लहान लहान आकारांचे मनोरे जोडीने उभारण्यात आले. पण त्यांचे रूप भिन्न प्रकारचे होते. उंच उंच मनोरे उभारण्याची प्रथा चालू राहिली व कोठे कोठे अजूनही असे मुसलमानकालीन मनोरे पहावयास सापडतात. उदाहरणार्थ कऱ्हाड.

दौलताबाद किल्ल्याचे आजचे दिसणारे स्वरूप म्हणजे यादव, बहमनी आणि तुघलक स्थापत्यविशारदांच्या कौशल्याचा परिपाक होय. " मध्ययुगीन जगतातील एक अत्यंत नामांकित दुर्ग " असे त्याचे वर्णन करण्यात आलेले आहे. देवगिरीच्या माथ्यावर बालेकिल्ला आहे. सगळ्या बाजूंनी दीडदीडशे फूट उंचीपर्यंत तासून खड्या दरडी करविल्या आहेत व त्यांच्या पायाशी चांगला रुंद खंदक आहे. बालेकिल्ल्यात जाण्यासाठी बोगद्यातून एकच वाट ठेवण्यात आलेली आहे, व युद्धप्रसंगी सबंध बोगदा तापविण्याची किंवा धुराने भरविण्याची व्यवस्था करण्यात आलेली होती. बालेकिल्ल्यात बारमास पाण्याची सोय होती. या टेकडीभोवती अडीच मैलांचा परिसर सामावून घेऊन बाहेरचा तट बांधला आहे. बाहेरचा तट व परिसराचा तट यांच्यामध्ये भिंतीच्या तीन रांगा आहेत. प्रत्येक प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंस प्रचंड बुरूज आहेत. याभोवती विस्तीर्ण खंदक आहे.

"उत्तर भारताच्या लष्करी शिल्पामध्ये शक्ती आणि युक्ती या दोन्ही दृष्टीने दौलताबादेला तोड नाही–अगदी मोगल किल्ल्यातही नाही." याखेरीज परांडा, नळदुर्ग येथेही असेच दुर्गम किल्ले बहमनी काळात उभारण्यात आले.

बहमनी राज्यकर्त्यांनी दौलताबादेहून गुलबर्गा व बिदर येथे राजधानी हालविल्यावर मराठी प्रदेशात नावाजण्यासारखे काम झाले ते 'पाच शाह्यांचा' उदय झाल्यावर. त्यातही निजामशाहीचे राजधानीचे गाव म्हणजे अहमदनगर, मुख्य ठाणे जुन्नर आणि फरुकी राजघराण्याची राजधानी असणारे थळनेर हे गाव ही प्रमुख. येथे काही मशिदी, महत्त्वाचे अवशेष आणि लहान मोठे घुमट म्हणजे थडगी आजही उभी आहेत. पन्नास-एक वर्षांपूर्वी अहमदनगर येथे काही वास्तूंचे अवशेष उभे होते. आज मात्र त्यातील बहुतेक वास्तू जमीनदोस्त झाल्या आहेत. विजापूर किंवा गोवळकोंडा येथील वास्तूप्रमाणे इथल्या इमारतींची देखभाल झाली नाही. त्यातल्या त्यात सुस्थितींत असताना त्या वास्तूंचे स्वरूप कसे होते त्याची वर्णने उपलब्ध आहेत त्यावरून काही सांगता येते.

"अहमदनगरचा किल्ला" हा पुढे खूपच प्रसिद्धीस आला. अहमदनगर राज्याच्या रचनेचा आरंभ येथपासूनच झाला आणि निजामशाहीच्या अस्तापर्यंत या घराण्यांतील राजांचे वास्तव्य येथेच असे. आरंभी असणारा "कच्चा" किंवा मातीचा तट पाडून १५६० मध्ये दगडी तट उभारण्यात आला. यांतच अहमद निजामशहाचा राजवाडा, गगन-महाल, मद्रेसा अशा इमारती होत्या. परंतु आज यांचे केवळ अवशेष आणि तेही बहुतेकांचे बाबतीत जोती व पाये याच स्वरूपात आहेत.

सबंध गावाभोवती भक्कम दगडी कोट औरंगजेबाचा सुभेदार सर्जेखान याने १६३१ मध्ये बांधला.

इतर इमारतींत, बेहस्तबाग व फराबाग या नावाची शाही विलासस्थाने, अहमदशहाची बागरोजा नावाची व सलाबतखानाची "चांदबिबी महाल" या चुकीच्या नावाने ओळखली जाणारी कबर, "दमडी" व "जुम्मा" या मशिदी, कासीमखानाचा, चंगीजखानाचा असे पाच महाल ( वाडे ) एवढ्याच नाव घेण्यासारख्या आहेत. त्यातल्या त्यात फराबाग, बेहस्तबाग, दमडीमशीद हे प्रस्तुत चर्चेत उल्लेखनीय. फराबाग व बेहस्तबाग येथे पूर्वी मोठाल्या बागा होत्या. त्यात हमामखाने ( स्नानगृहे ) असून मोठाले तलाव होते. या तलावांच्या मध्यभागी उंच अशा चौथऱ्यावर अष्टकोनी आकाराच्या दोन-तीन मजली इमारती होत्या. त्यात वास्तुरचना व सजावट या दोन्ही दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण असे काही नाही. दमडी मशीद आकाराने लहान आहे पण त्यातील दगडावर बऱ्यापैकी कोरीव काम आहे. नगरमध्ये असे काम फारसे सापडत नाही. इतर अवशेष हे केवळ अवशेष याच दृष्टीने उल्लेखनीय, त्यात कलापूर्ण असे काही नाही.

नित्यापेक्षा अगदी निराळी अशी येथे आढळणारी गोष्ट म्हणजे अहमदनगरची

पाणी पुरवठ्याची व्यवस्था. भिंगार, कापुरवाडी इ. छोटी गावे व वाड्या म्हणजे अहमदनगर शहरांचे मूलस्थान. ही सर्व सीना नदीवर असली तरी ह्या नदीचे पाणी राजधानीच्या मोठ्या शहराला पुरण्यासारखे नव्हते म्हणून निजामशाही सुलतानांनी आरंभापासूनच शहरात बाहेरचे पाणी आणण्याची योजना केलेली होती. बारमास पाणी असणाऱ्या एखाद्या विहिरीचे वा तलावाचे पाणी खापरी नळाने गावातील काही वाड्यांत अथवा हौदांत आणण्यात आले होते. वाटेत उछ्वास ठेऊन हे नळ तुंबणार नाहीत याची खबरदारी घेण्यात आली होती. अशा निरनिराळ्या सोळा नळांची माहिती आतापर्यंत झालेली आहे. महत्त्वाची गोष्ट अशी की हे नळ दहा ते पंधरा मैल इतक्या लांबीचे आहेत. विजापूरला अशाच स्वरूपाचे नळ बांधलेले होते. सुलतानांनी ते बांधविलेले असल्याने त्यांना "जापानी" किंवा "जहापन्ही" नळ म्हणण्यात येऊ लागले. मराठेशाहीत विशेषतः पेशवाईत हीच पद्धत चालू राहिली व विजापूरच्या अनुकरणाने, लहान नळाऐवजी मोठे झाकलेले पाटच बांधण्यात आले.

निजामशहांची पहिली राजधानी जुन्नर; तेथेही दोन थडग्यांपलीकडे नाव घेण्यासारखे काहीही शिल्लक नाही. थडग्यांचा उल्लेख करावयाचा एवढ्याचसाठी की पूर्वीची बहमनी पद्धती त्यातही वापरली आहे. चौरस तिमजली इमारतीच्या डोक्यावर पसरट घुमट व भिंतींना कमानदार कोनाडे हीच योजना येथे दिसते.

फरुकी घराण्याची पहिली राजधानी बऱ्हाणपूर. येथेच त्यानी आरंभी बांधलेला किल्ला, राजवाडा, जुम्मा ( बिबी-की ) मशीद या इमारती अथवा त्यांचे अवशेष आहेत. हे सर्व महाराष्ट्राच्या बाहेर असल्याने त्याचे तपशीलवार वर्णन येथे देता आले नाही तरी या शिल्पाचे प्रमुख वैशिष्ट्य कोणते याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. माळव्यामध्ये यापूर्वी झालेल्या इस्लामी वास्तूंची दाट छाया फरुकी वास्तूवर आहे. खानदेशातील थाळनेर येथील काही थडगी येथे पहावयाची आहेत. ही सगळी पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धातील आहेत. चौकोनी इमारत, त्यावर टोकदार पण थोडेसे पसरट घुमट, आणि चारी बाजूंनी पागोळ्या– सज्जे ( Cornice ) हे त्यांचे रूप आहे. एका थडग्याच्या चारही कोपऱ्यांवर छोटे छोटे बुरूज आहेत. या समूहासमोरच पडीक अवस्थेतील एक अष्टकोनी इमारतही आहे, सर्व बाजूंनी कमानी असून त्याभोतालच्या भिंतीवर भौमितिक नक्षी व काही लेख आहेत. राजप्रसाद अथवा अन्य नागरी वास्तूंचे कोणतेच अवशेष आता उपलब्ध नाहीत.

**औरंगाबाद** — १६७९– रबिआ– उद्– दुराणी ( Rabia-ud-Daurani ) औरंगजेबाच्या बायकोचीही कबर; अताउल्ला हा प्रमुख शिल्पी, ताजमहालची ही सहीसही नक्कल – परंतु कमानींचा आकार ( येथे मिहरपीच्या आहेत ), मनोरे, छोटे व मोठे घुमट आणि मुख्य इमारत यांचे परस्परप्रमाण सुधारणेच्या भरात नासविले आहे. बारीक

घडीव व कोरीव काम उत्तम असले पण इतर बाबतीत विशेषतः कल्पकता व उदात्तपणा याचा पूर्ण अभाव आहे.

दक्षिणेतील इस्लामी राज्यकर्त्यांनी वा त्यांच्या आश्रितांनी बांधलेल्या वास्तूंची कल्पना आतापर्यंत घेतली. यानंतर त्यांच्या आश्रयाने पोसलेल्या चित्रकलेची थोडक्यात माहिती द्यायची आहे.

अजिंठा व वेरूळ येथील चित्रकाम जगप्रसिद्ध आहे, परंतु त्या नंतरही ठिकठिकाणी चांगल्या प्रकारचे काम होतच राहिले. त्याचे फारच थोडे नमुने आज शिल्लक आहेत; पण जे आहेत त्यावरून, अजिंठा शैलीचेच काम पुढच्याही शतकात होत राहिले असे दिसते. मुसलमानी काळात, इराणी कलाकारांना दक्षिणच्या दरबारात आश्रय मिळाला आणि एका निराळ्याच धर्तीच्या कामाचा आरंभ झाला. या शैलीला " दख्खन कलम " म्हणतात. स्थानिक व इराणी कलामूल्यांची मिसळ करून त्यातून काही सुरेख चित्रे तयार करण्यात आली. अहमदनगर, विजापूर आणि गोवळकोंडा या तीन ठिकाणच्या दरबारांनी ही जोपासलेली असली तरी तिचा आरंभ अहमदनगरच्या उत्तेजनाने झाला. पूर्वीप्रमाणे ही चित्रे इमारतीच्या भिंतीवर नसून लहान लहान कागदावर काढलेली होती व तीही एखाद्या पुस्तकात घालण्यासाठी. अशा तऱ्हेचे पहिले ज्ञात पुस्तक म्हणजे " तारीफ–इ–हुसेन शाही " नगरच्या हुसेन निजामशहाच्या कारकीर्दीचा गौरव करणारे प्रदीर्घ फारशी काव्य. त्याची राणी खानजादा हुमायूँ हिने हे काव्य लिहवून घेतले असावे असे समजतात ( १५६५, ६९ ). या चित्रांतून दिसणारे विशेष म्हणजे त्यातील रंगयोजना व आकाश सोनेरी रंगाचे, क्षितीज धूसर–पांढरे, फुला-फळांनी मोहरलेली वृक्षराजी, गडद हिरव्या रंगाची त्याहीपेक्षा नजरेत भरणारी गडद निळ्या रंगाची पार्श्वभूमी ही रंगयोजना इराणी नमुन्यानुसार आहे. मात्र यातील रेखांकन आणि कपडे, दागिने दाखविण्याची पद्धती केवळ दक्षिणीच आहेत. यानंतर कालांतराने मोगल कलाकारांशी व कलेशी संबंध आल्यावर दोन निराळे चित्रप्रकार प्रचलित झाले. पहिला म्हणजे व्यक्तिचित्र आणि दुसरा " रागमाला ". बुऱ्हान निजामशहा ( दुसरा ) याचे एक चित्र उपलब्ध आहे. त्यात शहाखेरीज आणखी तीनच माणसे–तेही त्याचे हुजरे आहेत. पूर्वीप्रमाणे भडक रंग-योजना नाही किंवा मोगल चित्रांमध्ये आढळते तशी माणसांची गर्दी आणि इमारतीची पार्श्वभूमी नाही. मोजक्या पात्रांची योजना व सफाईदार रेखाटन हेच त्यांचे वैशिष्ट्य. " विसावा " या राजपुत्राच्या चित्रातही हीच गोष्ट जाणवते. फक्त येथे पाना-फुलांची रेलचेल आहे, रंगही भडक आहेत. रागमालेतील चित्रावर उत्तरी कलेची छाप स्पष्ट आहे. झाडांची बाह्यरेषा ठोकळेबाज असली तरी पाने व फुले तपशीलाने रेखाटली आहेत. नायक नायिका–त्यातल्या त्यात नायिका ( व तिचा वेष ) उत्तरी धाटणीची आहेत. अहमदनगर राज्याचे आयुष्य मुळातच मर्यादित होते व जे होते ते धामधुमीचे. त्यामुळे दख्खन कलमाचे जनकत्व अहमदनगरकडे असले तरी लालन-पोषण करण्याचे काम विजापूर व गोवळकोंडा यांनीच केले.

## मराठेशाही :

मराठेशाहीतील अवशेष मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत. या काळात उभारण्यात आलेली मंदिरे, नगरे, राजप्रासाद, दुर्ग आणि त्यांच्या सजावटीसाठी वापरलेली चित्रे इतक्यांचा यात समावेश होतो. सगळ्या अवशेषांचा अभ्यास केला असता जाणवणारी गोष्ट एकच आणि ती म्हणजे हे सगळे आकाराने लहान आहे. काही विशाल दृष्टीचा, आकांक्षेचा पुरावा यात मिळत नाही. बऱ्याच अंशी ती परभृतही आहेत. स्वतंत्र प्रज्ञेच्या उन्मेषाला वावच मिळाला नाही. मराठी सत्ता या दृष्टीने फार अल्पायुषी ठरली असे म्हणता येईल.

शिवकालामध्ये बांधकाम झाले ते मुख्यत्वे किल्ल्यांचे. "दुर्ग हे राज्याचे प्राणच होत" ही शिकवण देणारा रामचंद्रपंत अमात्य शिवाजीच्या तालमीत तयार झालेला होता. राज्याभिषेकाच्या सुमारास शिवाजीजवळ पावणे चारशे किल्ले होते. त्यात डोंगरी व सागरी किल्ल्यांचा समावेश होतो. बरेचसे किल्ले या पूर्वीच्या मुसलमानी अमदानीत बांधण्यात आले असून ते डागडुजी करून शिवाजीने आपल्या उपयोगाला आणले. कितीतरी नवीन बांधले. या किल्ल्यांत रायगड, राजगड, सिंधुदुर्ग हे फार बळकट व अभेद्य दुर्ग येतात. मोठाली शहरे वा हमरस्ते त्यांच्या माऱ्यांत राहतील अशीच ठिकाणे किल्ले बांधण्यासाठी निवडण्यात येत. हा डोंगर शक्य तितका कठीण–दुर्गम असे, शिवाय त्याच्या माथ्यावर प्रशस्त पठार असे. माथ्याभोवती भक्कम तटबंदी करण्यात येई तसेच डोंगरावर चढण्याच्या सगळ्या वाटा तट घालून बंद तरी करण्यात येत किंवा त्यावर बळकट दरवाजे तरी उभारीत. सगळे बांधकाम दगडी असून बुरुजांवर मोठाल्या तोफा चढविण्याची सोय असे. पाऊणशे वर्षांपूर्वीपर्यंत काही किल्ल्यांवर तोफाही होत्या. बंदिस्त आवारात एक-दोन मोठे प्रासाद, शिपायांसाठी बराकीसारख्या इमारती, लहानमोठे बाजार, आणि गोड्या पाण्याची टाकी असत. सिंधुदुर्ग हा जलदुर्ग असल्यामुळे म्हणजे त्याच्या तटावर पाण्याचा परिणाम होण्याची शक्यता असल्याने त्याच्या बांधकामात अधिक बळकटी आणण्यासाठी लोखंडी आकडे वापरलेले होते, आणि एकात एक अशा तटांच्या रांगा होत्या. रायगड हा किल्ला अतिशय दुर्गम अशाच ठिकाणी वसविला आहे. परंतु तो केवळ संरक्षक किल्ला नसून तीच राजधानीही असल्याने तेथे पाण्याची सोय जास्त आहे. विस्तीर्ण बाजारपेठ बांधण्यात आलेली आहे आणि तत्कालीन वर्णनावरून पाहता येथील प्रासादही प्रशस्त व देखणा असावा. डोंगरी किल्ल्यांना जे स्वाभाविक बल उत्पन्न होते ते या किल्ल्यांनाही आहे, पण भुईकोट किल्ले बांधून ते अत्यंत प्रबल करण्याची सुलतानी राजवटीतील विद्या मराठी राज्यकर्त्यांनी उपयोजिलेली दिसत नाही. शिवाजी व संभाजी यांच्यानंतर खुद्द महाराष्ट्रावरील संकट लुप्तप्राय झाले; मराठी भूमीवरच सतत लढाई चाले, त्याऐवजी ती आता इतर प्रदेशांत गेली. त्याचा स्वाभाविक परिणाम असा झाला की पेशवाईत नवे किल्ले फारसे बांधण्यात आले नाहीत. जुन्यांची

डागडुजी करून त्यांचाच सैनिकीतळ म्हणून व वेळप्रसंगी शासनकर्त्यांना आश्रयासाठी उपयोग होऊ लागला. त्याऐवजी आता संरक्षक शिल्पाचा एक नवीनच प्रकार रूढ झाला तो म्हणजे "गढी". "गढी" म्हणजे सुरक्षित निवासस्थान. एका प्रशस्त प्रासादा-भोवती अतिशय बळकट अशी तटबंदी उभारण्यात येई. साधारणपणे उंचवट्यावर गढी बांधण्यात येई आणि आकाराने लहान असली तरी लष्करीदृष्ट्या चांगली भक्कम असे. परकीय सैन्यासमोरही टिकाव धरतील अशा शनिवारवाड्यासारख्या गढ्या थोड्या, अगदी हाताच्या बोटावर मोजण्यासारख्या. परंतु एरव्हीच्या गढ्या उपद्रवकारक बंड-खोरांवर वचक ठेवण्यास पुरेशा असत. शिवाय गढी हे तिच्या मालकाच्या राजकीय स्थानाचे, प्रतिष्ठेचे प्रतीक होऊन बसले. पुण्याच्या शनिवारवाड्याभोवतालचे संरक्षक कवच उभे आहे. चांगल्या रुंद दगडी व विटाच्या भिंती, त्यात मध्ये मध्ये गोल व दर्शनी भागावर अष्टकोनी बुरुज, दिल्ली दरवाजा ही मूळच्या स्वरूपात पहावयास सापडतात. पुण्याच्या दक्षिणेला एकोणीस मैलावर असणारी जाधववाडी येथील गढी अत्यंत प्रेक्षणीय आहे. आतला प्रासाद शिल्लक नाही, पण उंच उंच असे दोन तट एकात एक आहेत, आणि अशा वास्तूंच्या बळाची उत्तम कल्पना त्यावरून करता येते.

नगराभोवती कोट उभारण्याची प्रथा मुसलमानी काळात जारी होती; शिव-कालात आणि पेशवाईतही कदाचित चालू असावी. मात्र मुसलमानी काळाच्या मानाने शिवकालात व पेशवाईत त्या संबंधीच्या कल्पना बदलल्या होत्या. मोठाली नगरे वेढून घेण्यास कोणाला वेळही नव्हता आणि जरूरही भासली नसावी. पेशव्यांच्याच वेळी पुण्याभोवती कोट उभारण्याची कल्पना निघून बांधकामाला आरंभही झाला होता परंतु शाहू महाराजांनी हे काम थांबविले. नंतर केव्हा सगळ्या गावाभोवती तट घातला असावा असे वाटत नाही. सातारा ही राजधानी पण तिच्या भोवतीही तटबंदी नव्हती, इतर शहराभोवती असण्याचा प्रश्नच नव्हता. पूर्वीची असली तर ती तंदुरुस्त ठेवीत.

शिवकालात अनेक दुर्ग उभारण्यात आले आणि त्यावर रोजच्या नागरी व सैनिकी गरजा भागवतील अशा इमारतीही उभारण्यात आल्या. परंतु त्यांचे स्वरूप लष्करी छावणीचे होते, नगराचे नव्हते. पेशवाईमध्ये काही नवी गावे बसविण्यात आली, तसेच जुन्या शहरांची थोडीशी पुनर्रचना व बरीचशी वाढही झाली. यापैकी कोणतीच गावे किंवा नगरे आज पूर्वस्थितीत पहावयास सापडत नाहीत. त्यात कालमाना-प्रमाणे बदल होत जाणे अपरिहार्यच होते. जी एक-दोन ठिकाणे जुन्या रूपाचा सांभाळ करून आहेत त्यात 'टोके' हे उल्लेखनीय. गावाचा आकार मोठा नसला तरी तेथे अनेक वास्तुप्रकार आणि त्यांची योजनापूर्वक मांडणी दिसून येते. इतर ठिकाणांबाबत पत्रव्यवहार बखरी इ. मध्ये आलेल्या वर्णनांचा उपयोग होतो. सरळ, शक्य तो एकमेकांना काटकोनात असणारे रस्ते आणि तेही चार दिशांकडे तोंडे करूनच आखावे हे नगररचनेचे प्राचीन

तत्त्व टोक्याला उपयोजलेले आहे. रस्ते अरुंद असले तरी दगडांनी आच्छादलेले फरसबंद आहेत. गोदावरीच्या तीराने जवळपास ८८० फूट लांब आणि त्याला काटकोनात प्रवरेच्या तीराने ८५० फूट लांब असे दोन विस्तीर्ण घाट गावाची उत्तर व पूर्व सीमा आखतात. घाटाच्या वरच्या बाजूला कमानदार ओहऱ्या बांधलेल्या असून तीच गावची हद्द. घाटात मध्ये मध्ये मोठे बुरुज बांधून पुराच्या वेळी पाण्याची गती रोखण्याची व घाट सुरक्षित राखण्याची योजना केलेली आहे. गावाच्या मध्यभागी सिद्धेश्वर हे महादेवाचे एक सुरेख मंदिर आहे. याच्या आवाराच्या चारही बाजूंनी रस्ते आहेत व त्या पलीकडे तसेच आयत आखून त्यात वा चौरसात घरे बांधलेली आहेत.

ज्यांची वाढ झाली अशा शहरांत पुणे प्रमुख. येथे पेशवाईच्या उत्तरकाळात निरनिराळ्या पेठा वसविण्यात आल्या. त्यांची नावे कोणतीही असली तरी त्यांतील वस्ती सामान्यपणे एकाच जातीच्या किंवा एकाच व्यवसायाच्या लोकांची असावी असे दिसते. 'शनिवारवाडा' हा मध्यबिंदू कल्पून त्याच्या तिन्ही बाजूला पेशव्यांचे आप्त, विश्वासातले सरदार, दरकदार यांच्या वाड्यांच्या ओळी होत्या. राज्यकर्त्यांना यामुळे सुरक्षित वाटत असेल हे एक आणि प्रतिष्ठितांच्या मानाप्रमाणे त्यांना स्थानही मिळते हे दुसरे. ही व्यवस्थाही अत्यंत प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. याच्या लगेच भोवती पुण्याची पूर्वीची वस्ती होती. त्याच्या थोडे पलिकडे नव्या पेठा वा वस्त्या झाल्या. सोमवार पेठेत गोसावी लोकांची वस्ती होती. रविवारात बोहरी व्यापारी होते. व्यवसाय व जातवारीने लोकवस्ती वसविण्याची प्रथाही प्राचीनच होती.

या वाढत्या वस्तीला सतत पाणी-पुरवठा होत रहावा यासाठी जी व्यवस्था करण्यात आलेली होती, ती सतराव्या शतकातील अहमदनगर अथवा विजापूर या शहरांसारखी होती. या दोन्ही ठिकाणी शहरापासून काही मैल दूर असणाऱ्या विहिरीतून भूमिगत नळाने पाणी आणले होते. काही ठिकाणी खापरी नळ वापरले होते तर काही बांधीव व बंदिस्त पाट होते. या पाटांचे स्वरूप थोडेसे बोगद्यासारखे किंवा भुयारासारखे असे व त्यातून माणसांना सहज जा-ये करता येई. मधुनमधून लहान लहान खळगे ठेवून गाळ अडविण्याची व्यवस्था होती व अडलेला गाळ बाहेर काढण्यासाठी उच्छ्वास बांधलेले होते. पुण्याला पाणी आणण्यासाठी कात्रजजवळ एकाखाली एक अशी दोन धरणे बांधली असून त्यातून भुयारी नळाने पाणी शहरात खेळविण्यात आले होते. पुष्करणी, सदाशिवाचा हौद, बाहुलीचा हौद असे अनेक लहान मोठे हौद गावात ठिकठिकाणी बांधविण्यात आले व कात्रज तलावाचे पाणी त्यातून सर्वसामान्य नागरिकांना मिळत असे. खाशा स्वाऱ्यांच्या घरी खास नळ नेलेले असून त्यावर बगीचे करण्यात आले होते, कारंजीही नाचत असत. नागरी वस्तीला पाणी-पुरवठा करण्याचे हे स्थापत्य काम आदिलशाही व निजामशाही कारागिरांकडून शिकण्यात आले असावे. आजही या पाण्याचा पुरवठा होत आहे. यावरून सबंध व्यवस्था किती शास्त्रशुद्ध होती याची सहज कल्पना येईल. याखेरीज ठिकठिकाणी धरणे, तलाव व कुंडे बांधण्यात आली.

१६४० च्या आसपास शिवाजी महाराजांचा लालमहाल बांधून झाला. त्यानंतर १६७४ पूर्वी राजगड, रायगड येथे राजमहाल बांधण्यात आले. त्यांचे अवशेषही ओळखू येण्यासारख्या स्वरूपात उपलब्ध नाहीत. १७३० नंतरच्या काळातील बऱ्याच वाड्यांची, प्रासादांची नावे तत्कालीन साहित्यात आलेली आहेत. पुण्याचा शनिवार वाडा, शुक्रवार वाडा, विश्रामबाग वाडा; नाशिकचा सरकार वाडा, कोपरगावचा रघुनाथराव पेशव्यांचा वाडा, आणि सातारकर छत्रपतींचे "नवा" व "जुना" असे दोन राजवाडे हे अधिक प्रसिद्ध. साताऱ्चे वाडे चांगल्या स्थितीत उभे आहेत. नाशिक व कोपरगाव येथील वाड्यांत नंतरच्या काळात खूपच बदल झालेला आहे. शनिवार व शुक्रवार हे पुण्यातले वाडे नष्टच झाले आहेत. विश्रामबाग वाडाही जवळजवळ नष्टच होण्याच्या मार्गावर होता; पण तो वाचविण्यात आला. आणि पुनरुद्धार करतेवेळी जुन्याच थाटाची बांधणी व लाकूडकाम त्यावर वापरण्यात आले. याशिवाय वाई, मेणवली, टोके, श्रीगोंदे, पंढरपूर अशासारख्या ठिकाणी अठराव्या शतकातील काही घरे उभी आहेत.

धार्मिक वास्तू व कलाशिल्प यावर परंपरा व रूढी यांचा काच जबर असतो अशी सामान्यपणे समजूत असते. परंतु नागरी उपयोगाच्या वास्तूवरही परंपरेचा ठसा पक्का उमटलेला असतो याकडे डोळेझाक करणे अशक्य आहे. मराठी गृहशिल्पाचा अभ्यास केल्यावर तर असेच वाटू लागते की मंदिरे, समाध्या यांच्यापेक्षा घरे व प्रासाद हीच रूढीला, प्राचीन संकेतांना जास्त चिकटून राहिली आहेत. नाविन्याचे वारे घरात फारसे शिरू देण्यास कोणी तयार नसावे! सजावटीच्या बाबतीत काही नव्या गोष्टी पत्करल्या असल्या तरी वास्तूच्या आखणीसंबंधी म्हणजे उपलब्ध जागेचा वापर कसा, कोणत्या कारणासाठी करावा हे ठरविण्याच्या बाबतीत पूर्वीच्याच प्रथा कायम टिकविण्यात आल्या. फरक असलाच तर तो फक्त बाहेरचा दिवाणखाना, भोवतीच्या ओसऱ्या यांच्या मांडणीत– तोही उपयुक्ततेकडे जास्त लक्ष देऊन!

सगळी घरे विटांची बांधलेली होती. कच्च्या व पक्क्या (भाजलेल्या) अशा दोन्ही प्रकारच्या विटांचा वापर होत असे. विटांच्या जोडीला लाकडी खांब, तुळया, पाट यांचा उपयोग असेच. जोत्यासाठी घडीव दगड वापरीत. मोठ्या गावातील मोठाल्या वाड्यांचा सबंध तळमजला दगडी बांधणीचा असे आणि त्यावरचे बांधकाम लाकूड–विटांचे होते. जिन्यासाठी किंवा दरवाज्यांसाठी कमानींचे बांधकाम होई. एरवी सगळ्यांचा आधार लाकडी खांब व तुळया हाच असे. उत्तम घोटलेल्या चुन्याचे भिंतींना प्लॅस्टर करीत. तसेच भिंतींच्या बाहेरच्या बाजूच्या दरजा चुन्यानेच भरीत. एरवीच्या ठिकाणी बांधकामाला चिखलच वापरलेला असे. भिंतीची जाडी तीन फूट किंवा त्याहीपेक्षा जाड असून खिडक्या आकाराने लहान व संख्येने कमी ठेवीत. छप्पर नळीच्या कौलांचेच केलेले असे व त्याला आधार म्हणून बांबूच्या चिरफळ्यांचे आच्छादन करण्यात येई.

घरातील खोल्यांची मांडणी एका मोठ्या चौकाभोवती करण्यात येई. या चौकाला छप्पर नसल्याने सर्व खोल्यांत हवा उजेड खेळत असे. आजही फार मोठ्या इमारतींत असेच चौक ठेवतात. पण त्यांना नाव निराळे देतात– " Light well " प्रकाशाची विहीर! घर मोठे बांधावयाचे याचा अर्थ चौकांची संख्या वाढवावयाची. त्यातल्या त्यात संपन्न माणसांचे वाडे तीन तरी चौकांचे असत. राजप्रासादासारख्या इमारतीत ही संख्या सहा–सात येथपर्यंत जात असे. मग हे चौक एकमेकापाठीमागे न राहता एक-मेकाशेजारी राहात. उघड्या चौकात पाण्याचे लहानसे हौद बांधून त्यात कारंजीही सोड-ण्यात येत. यासाठी लागणाऱ्या पाणीपुरवठ्याचे वर्णन वर केलेले आहेच.

दर्शनी भाग दोन प्रकारचा दिसतो. रस्त्याच्या बाजूला सलग भिंत व त्यात मधोमध दरवाजा. या भिंतीत साधारण सात ते आठ फुटांच्यावरच खिडक्या सुरू होत. दुसरी पद्धत म्हणजे, मधोमध दरवाजा, त्याच्या दोन्ही बाजूला ओसरी किंवा ओटी. यालाच काही ठिकाणी देवडी असे म्हटलेले आढळते. पुण्याचा विश्रामबाग वाडा या योजनेचे उदाहरण. येथून आत शिरले की प्रशस्त चौक. चौकाच्या चारी बाजूने जोत्यावर उघड्याच ओसऱ्या असत. येथेच नित्यातल्या येणाऱ्या-जाणाऱ्याचे आगत-स्वागत होत असे. एखाद्या ओसरीत दप्तरखाना असे. काही घरांमध्ये, डाव्या हाताच्या कोपऱ्यात देवघर ठेवीत असत. लाकडी जाळ्या मध्ये घालून हा भाग इतर ओहऱ्यांपासून निराळा काढीत. समोरच्या ओसरीतून आत जाऊ लागले म्हणजे दरवाज्याला लागून भिंतीतून डाव्या-उजव्या हातांना जिने बांधलेले असतात. या जिन्यांना कठडे असणे शक्य नव्हते कारण ते सपाट भिंतीत असत. तसेच खिडक्यासुद्धा नसतात त्यामुळे त्या अंधाऱ्या जिन्यावरून चढउतार करणे आज अतिशय गैरसोईचे असले तरी जिन्यांची हीच बांधणी सर्वत्र प्रसारात होती. मोठाल्या सरदारांच्या व अधिकाऱ्याच्या घरांमधून पहिल्या मजल्यावर, जिना चढून वर आल्याबरोबर एक प्रशस्त दालन असे व त्याला 'सदर' 'दरबार' अशी नावे देत. या दालनाचे तोंड दरवाजाकडे असे व समोरच्या भिंतीत उभट खिडक्या हारीने काढलेल्या असत. सगळे खांब 'सुरूचे', कमानी मेहरपीच्या असत. तक्तपोशीवर नाजूक नक्षीकाम असे आणि भिंतीवर रंगीत नक्षीकाम असून देवदेवतांची व पौराणिक कथांची चित्रेही रंगवीत. याच सदरेत सणावाराचे दरबार भरत, नृत्य गायनाचे जलसेही होत असत. सदरेच्या मागच्या बाजूच्या भिंतीत जाळीच्या मोठ्या खिडक्या असत. त्या काळी पडद्याची चाल होती व अशा समारंभांना स्त्रिया-मुली येऊन बसत नसल्याने त्यांच्यासाठी ही सोय अगत्याची होती.

आतल्या चौकाभोवती माजघर, स्वयंपाकघर, जेवणघर अशा खोल्या तळमजल्यात असत; आणि वरच्या मजल्यावर प्रायः शेजघरे असत. बाहेरच्या चौकाभोवती क्वचित पहिल्या मजल्यावरही कचेऱ्या किंवा दप्तरखाने मांडीत. वाड्याच्या एखाद्याच दालनावर दोन-तीन मजले जास्त बांधून त्यावर आकाशमंदिर बांधीत. येथे झोपाळेही बांधीत

इतरांपासून जरा दूर जाऊन बसून बरधनी व बरधनीण यांना आमोद-प्रमोदात वेळ घालविता यावा यासाठीच हा " हवामहाल " केलेला असे. फार संपन्न माणसांच्या घरामध्ये आणखीही काही ' महाल ' असत. एखाद्या मोठ्या दालनात छोटी चित्रे रंगवीत किंवा तसबिरी बनविलेल्या असत व याला चित्रशाला, रंगमहाल अशी नावे देत. चारी भिंती, छत, जमिनी यावर आरसे बसविण्यात येत, त्यांना ' आरसे महाल ' असेच नाव होते. एखाद्या दालनाच्या छतात, लाकडी कोरीव कामात ' हस्तिदंताचा ' वापर करीत व त्याला " हस्तिदंती महाल " अशा नावाने ओळखीत. या महालावरून मालकाच्या संपन्नतेची कल्पना येत असली किंवा त्याच्या अभिरुचीवर प्रकाश पडत असला तरी त्यात रचनेची किंवा स्थापत्याची कोणतीच वैशिष्ट्ये दिसून येत नाहीत.

घराच्या सजावटीत काष्ठ शिल्पास महत्त्वाचे स्थान मिळाले. स्तंभ, हस्त, तुला, छत, दरवाजे व दरवाजाच्या चौकटी आणि वास्तूचे दर्शनी भाग ही सगळी लाकडी कोरीवकामाने मढविलेली असत. लाकूडकामाचे उपयोजन आणि कोरीव कामाची शैली यावरून असे दिसते की दोन निरनिराळ्या परंपरांचा उपयोग येथे करून घेण्यात आला होता, आणि पुढेपुढे त्यांचा संगमही घडवून आणण्याचा बुद्धिपुरस्सर यत्न मराठी कलाकारांनी केला. एका शैलीला गुजराती व दुसरीला हिंदुस्थानी किंवा दिल्ली अशी नावे देण्यात आलेली आहेत. चौकोनी खांब त्यावर पूर्ण उठावाचे कोरीव काम असलेले हस्त आणि बारीक कामाने मढविलेली दारे व त्यांच्या चौकटी हे गुजराती काष्ठ शिल्पाचे विशेष. दिल्ली शैलीचे काम गुजराती शैलीसारखे ठसठशीत नाही. त्यावरील कोरीव कामही गुजराती कामाइतक्या उठावाचे नाही. सुरूचे खांब, त्यावर विसावलेल्या त्रिदली आणि मेहेरपी कमानी, छतावरील नाजूक जोडकाम हे मोगली कलेच्या जनानी वृत्तीचेच आविष्कार. आग्रा, जयपूर इकडे असेच काम संगमरवर किंवा मकराणा पत्थरात घडविले आहे. महाराष्ट्रातील काम लाकडावर, बाकी आकृतिबंध तेच, ढंग तोच, तोच नाजुकपणा, तीच आदब.

गुजरात शैलीतील हस्त आणि कोपऱ्यावर सोडलेले लोलक अत्यंत उठावदार आणि प्रेक्षणीय. हस्ताचा आकार सगळा मिळून चौकोनी ठोकळ्यासारखा असला तरी प्रत्यक्ष डोळ्यांना दिसतात ती दोन प्रफुल्लित कमळे, त्यांना जोडणारा नागमोडी आकाराचा देठ व त्यावर पसरलेल्या कळ्या–पाने. मधून कोठेतरी कोरलेल्या नाजूक साखळ्या दिसतात, देठांना वेढून घेणाऱ्या, त्यांच्या अंगा-खांद्यावर खेळणाऱ्या. यांच्या जोडीला काही ठिकाणी कमळदळांची नक्षी असलेले तर कोठे बगळा किंवा करकोचा अशा पक्षांचा आकार दिलेले " तीर " आहेत. पुढच्या काळात या तीरांना " मकराकार " दिला आहे. सज्जांच्या किंवा छपराच्या टोकापासून आणि वाड्याच्या पहिल्या चौकात पागोळीच्या पट्ट्यांच्या कोपऱ्यावर लाकडी झुंबरे किंवा लोलक आहेत. एकाखाली एक आकाराने लहान होत जाणारी ही पूर्ण उमललेली कमळे, त्यावर कोठे पोपट तर कोठे

मोर, कोठे माकडे बसविलेली आहेत. सौंदर्य नाही तरी वैचित्र्य नक्कीच आणले आहे! दरवाजाच्या चौकटीवर लहरीदार वेलपत्ती हीच मुख्य सजावट. गणेशपट्टीवर मकर, मोर व वेल यांच्या मिश्रणाच्या आकृती वापरीत. मध्यभागी ठेवलेल्या छोट्या कोनाड्यात गणेशाची लाकडी मूर्ती खोदण्यात येत असे. दिल्लीशैलीत कमानीच्या पायाशी असणारे पोपट, कमानीच्या वरच्या भागावरील कमलाकृती आणि मुख्यतः भौमितिक सांगाड्यावर आधारलेले छताचे नक्षीकाम ही लक्षणीय. त्यातल्या त्यात इमारतीच्या दर्शनी भागावर जे सज्जे काढीत, त्यावर मेहेरपीच्या कमानी, कमळाचे लोलक, चित्रविचित्र नक्षीच्या पानपट्ट्या सर्वत्र दिसून येत.

महाराष्ट्रात जुन्या काळातील फारच थोडी घरे शिल्लक आहेत; पण जी आहेत त्यावरील लाकडी कामावरून ती कोणत्या घाटाची हे सांगता येते. खानदेशातील नंदुर-बार व पिंपळगाव, पुण्याजवळ जाधववाडी, नगर जिल्ह्यातील श्रीगोंदे, आणि नाशिकची काही घरे ही गुजराती घाटाची. नेवासे, पैठण इकडेही याचप्रकारचे काही काम दिसते. यापैकी काही इमारती मराठेशाहीच्याही पूर्वीच्या आहेत. तेव्हा गुजराती पद्धतीचे काम महाराष्ट्रात बरीच वर्षे प्रचलित असावे. किंबहुना महाराष्ट्राचा म्हणता येईल असा खास घाट व गुजराती घाट एकच असावेत. हिंदुस्थानी किंवा दिल्ली प्रकारच्या इमारती मुख्यतः पुणे आणि नाशिक येथे दृष्टीस पडतात. जालना आणि औरंगाबाद येथेही अशाच प्रकारच्या इमारती आहेत.

पेशवाईत म्हणजे मराठेशाहीच्या उत्तरकालात शेकडो मंदिरे बांधण्यात आली आणि त्यापैकी अनेक आज बऱ्या स्थितीत उभी आहेत हे वर सांगितलेच आहे. वाई, माहुली, नाशिक अशा क्षेत्रांच्या ठिकाणी आणि पुण्यासारख्या राजधानीसम असणाऱ्या शहरा-तच यापैकी बहुसंख्य मंदिरे आहेत. याच्या जोडीला कोणा सरदाराचे वा धनिकाचे कुल-दैवत असलेल्या देवतेसाठी, अशाच कोणा संपन्न माणसाच्या मूळगावी, कोठे संगमाच्या ठिकाणी देवालये उभी राहिली. सर्वच कलाशाखांत, त्यातल्या त्यात वास्तुशिल्पात परंपरेला मोठीच मान्यता असते. धार्मिक उद्दिष्टाने बांधल्या जाणाऱ्या वास्तूंच्या बाबतीत तर हे परंपरापालन म्हणजे एक काचच ठ तो. मराठी शिल्प या सामान्य नियमाला अपवाद नाही. परंतु साधारण चौदाव्या शतकानंतर दोन-अडीच शतके देवालये उभार-ण्यास फारसा वाव न मिळाल्यामुळे परंपरेचे सातत्य टिकले नव्हते. त्याशिवाय इस्लामी परंपरेच्या सतत संपर्कामुळे प्राचीन परंपरेचे एकजिनसीपणही नाहीसे झाले होते. अठराव्या शतकाच्या प्रारंभी नवनिर्मितीस सुरुवात झाली त्यावेळी परंपरागत शिल्पाची स्थिती अशी असल्यामुळे परंपरेचा जाच मराठी शिल्पकारांना जाणवला नाही. निरनिराळ्या कला-शाखातून थोडी थोडी उसनवारी करून आपली भट्टी तयार करण्याचे स्वातंत्र्य त्यांना मिळाले. त्याचा त्यांनी भरपूर उपयोगही करून घेतला. त्यामुळे मराठी मंदिरांच्या रूपांत इतके वैचित्र्य आढळते की सकृद्दर्शनी तरी ती एकाच कोष्टकात बसविणे जड वाटते. ही

सगळी उसनवारी सफाईने एकत्र मिसळून एकसंध असे स्वतंत्र रूप आणि आकार मराठी शिल्पकारांनी निर्माण केलेले आहेत त्याकडेच स्वतंत्र अशी मराठी शैली म्हणून बोट दाखविता येईल. मराठेशाहीत (विशेषतः पेशवाईत) बांधलेल्या मंदिरांचे चार गट पाडता येतात.

एक गट आहे तो मध्ययुगीन मराठी मंदिरांचा. यांना यादव किंवा हेमाडपंती असे कोणतेही नाव देता येईल. या मंदिरांचे स्वरूप पूर्णपणे परंपरानिष्ठ असे आहे. आणि त्यासाठीच त्यांना 'महाराष्ट्री' नाव द्यावयास हरकत असू नये. दुसरा गट आहे तो 'नागर मंदिरांचा'. माळव्यात प्रचलित असणाऱ्या हिंदुस्थानी किंवा नागर शैलीची ही मंदिरे संख्येने थोडी असली तरी इतकी वैशिष्ट्यपूर्ण आहेत की त्यांचा स्वतंत्र गट सहज करता येतो. तिसरा गट आहे तो 'मराठेशाही मंदिरां'चा. माळवा, आग्रा अशा ठिकाणच्या वास्तुंमधील काही काही खंड यात एकत्रित करण्यात आले आहेत व साधारण सतराशे पंचाहत्तरच्या (१७७५ च्या) सुमारास एक वेगळा ठसा निर्माण झाला. सबंध महाराष्ट्रभर आणि क्वचित भोवतालच्या प्रदेशात अशा प्रकारची देवळे पहावयास सापडतात. चवथा प्रकार 'संकीर्ण' या स्वरूपात बसेल असा. पुण्याच्या ओंकारेश्वर मंदिरासारखी देवालये यात जमा होतात.

शिवकालात बांधलेली मंदिरे हेमाडपंती पद्धतीची होती. अर्थात ती ओबडधोबड होती. त्यातले शिल्पच नव्हे तर स्थापत्यही अतिशय सामान्य दर्जाचे होते हे खरे असले तरी त्यांनी यादव मंदिरेच आदर्श म्हणून स्वीकारलेली होती हे महत्त्वाचे आहे. कोल्हापूरच्या अंबाबाई मंदिराचे शिखर, ज्योतिबाच्या डोंगरावरील मंदिरे, शिखर शिंगणापूरचा शंभु महादेव, वेरूळच्या घृष्णेश्वराचे मंदिर ही या गटाची "शुद्ध" उदाहरणे. याच कल्पनेचा मूळ आधार कायम ठेवून त्यात काही नवीन अंश अथवा भाग मिसळूनही काही मंदिरे उभारण्यात आली. सासवड येथील संगमेश्वर व वटेश्वर, धावडशी येथील परशुरामाचे, पालीचे खंडोबाचे अशी मंदिरे या स्वरूपाची. वास्तूच्या विविध अंगांचा थोडासा विचार पुढे आहेच, पण येथे हे सांगणे आवश्यक आहे की या थोड्याशा परावर्तित प्रकाशातही वास्तुयोजनेतील मूळ सौंदर्य कायम ठेवण्यात आलेले आहे. फक्त तोच दृश्य परिणाम घटकांच्या निराळ्या संयोजनातून साधण्याचा प्रयत्न शिल्पकारांनी केलेला आहे. महत्त्वाची गोष्ट अशी की ते या प्रयत्नात यशस्वीही झालेले आहेत.

हा परिणाम कोणता? थोडक्यात सांगावयाचे तर सबंध वास्तूच्या उंचीचा किंवा वर झेपावत जाण्याच्या वृत्तीचा प्रभाव पडणे हा. मंदिराच्या रचनेत आडवे थर, कोनाडे, मुख मंडप, असे कितीतरी घटक येतात. आणि त्यांच्या योजनेत "समतोल" (Symmetry) ही कल्पनाच नसल्याने मंदिराची वास्तू म्हणजे एक आडवा फापट-पसारा किंवा निरनिराळ्या घटकांचा रचलेला ढीग अशीच होण्याची भीती असते. उत्तर भारतात प्रचलित असलेल्या नागरशैलीत हा दोष काढून टाकून पाहणारांची नजर वर

सरकत कळसापर्यंत पोचेल अशी व्यवस्था असते. यादवांनी स्वीकारलेली " भूमिज " ही नागरपद्धतीची शाखा असल्याने तिच्यात हे वैशिष्ट्य यावे हे स्वाभाविकच आहे. अंबरनाथ, बलसाणे, सिन्नर येथील शिलाहार–यादव मंदिरे याच घाटाची आहेत. परंतु मराठेशाहीत थोडा फरक पडला. गोलसर छप्पर असणारे आणि एखाद्या गॅलरीसारखे दिसणारे कोनाडे आणि मनोरे यांची जिकडेतिकडे गर्दी उडाली. वास्तूचा संकलित परिणाम होण्याच्या मार्गात ही आणखी एक अडचण उभी राहिली. या कोनाड्यांचा आणि मनोऱ्यांचा आकार कमी-जास्त करून एक उर्ध्वगामी वास्तू तयार करण्याचे यत्न १७५० च्या बेताला सुरू झाले व १० ते १५ वर्षांतच त्यांना यश आले. " भूमिज " शैलीची बारीकसारीक अंगोपांगे नाही तरी सर्वसाधारण सौंदर्यकल्पना मराठी वास्तुकारांनी प्रत्यक्षात उतरविली. फरक एवढाच आहे की या देवालयावर मूर्तीकाम अजिबात नाही. द्वारशाखेसारख्या ठिकाणी मूर्तीकाम अटळ बनते तेथे मराठी मंदिरात कोरीव काम आहे, पण त्याचा दर्जा इतका निकृष्ट आहे की ते तेथे नसते तरी बरे असेच म्हणावे लागते.

मराठी मंदिरांचा दुसरा प्रकार म्हणजे " हिंदुस्थानी " किंवा नागर मंदिरांचा. नाशिकचे काळ्या रामाचे मंदिर, त्र्यंबकेश्वराचे शिवमंदिर, गोदा-प्रवरा संगमावर कायगाव व टोके या दोन्ही ठिकाणची शिवमंदिरे, नेवासे येथील मोहिनीराज मंदिर ही देवालये या प्रकारातली होत. या सगळ्यांचे एक वैशिष्ट्य असे की यापैकी कोणतेच सतराशेसाठच्या ( १७६० च्या ) आधीचे नाही. दुसरी उल्लेखनीय गोष्ट अशी की मंदिरे बांधविणारांपैकी जवळपास प्रत्येकाचा इंदूर-ग्वाल्हेर दरबारांशी ( म्हणजे माळव्याशी ) किंवा खुद्द दिल्लीशी प्रत्यक्ष संबंध होता. कोणी सावकारीसाठी, कोणी चाकरीसाठी, तर कोणी त्या ठिकाणचे पेशव्यांचे वकील म्हणून आपापली गावे सोडून तिकडे बराच काळ स्थायिक झालेले होते. गाठीशी थोडासा धनसंचय झाल्यावर आपल्या देशात परत येऊन त्यांनी मोठ्या क्षेत्राचे ठिकाणी किंवा आपल्या जहागिरीच्या गावी, मुळच्या गावी मंदिरे बांधविली, नवीन परिचय झालेल्या मुलुखातील मंदिरशैली व त्यासाठी कदाचित त्या प्रदेशातील कारागीरही त्यांनी महाराष्ट्रात आणले.

यादव शैलीची आणि नंतर प्रचलित झालेल्या मराठी शैलीची मंदिरे दगड आणि विटा दोन्हींची मिळून बांधलेली होती. भिंतीपर्यंतचा भाग दगडी, आणि शिखराचा सर्व भाग चुना व विटा यांचा असे. " हिंदुस्थानी " मंदिरे संपूर्णपणे दगडी बांधणीची आहेत. दगड येथील काळा फत्तरच असला तरी घडीव व गुळगुळीत केला आहे. बांधकामही सफाईदार आहे. या प्रकारच्या मंदिरांचा पदविन्यास यादव मंदिरापेक्षा बराच निराळा आहे. गाभारा, अंतराळ, मंडप व मुखमंडप हीच प्रमुख अंगे असली तरी येथे चौरसाच्या चौकटीतून कोठेही सुटका झालेली नाही. गाभारा आतून चौरस आहे तसा बाहेरूनही. बाहेरच्या भिंतीची जाडी मध्यभागी उभ्या पट्ट्यांनी वाढविलेली असते व त्यामुळे यादव मंदिरासारखेच " रथ " निर्माण होतो. पण विधानाला कोठेही नक्षत्राकार

येत नाही. अंतराळ आयताकार आणि मंडप चौरस आहे. भिंतीत असलेले स्तर फारसे तीव्र नाहीत भिंतीच्या सपाटपणात फारसा मोडता घालीत नाहीत. बाह्यांगावर मूर्तीकाम अगदी नाममात्र आहे. लक्ष कशाकडे जात असेल तर ते शिखराकडे. सफाईदारपणे याची बाह्यरेषा डोळे आमलकापर्यंत घेऊन जाते. अंगासरशी असणारी अर्धशिखरे त्यात कोठेच अडथळा करीत नाहीत, मूळ मंदिराची प्रकृतीच न समजल्यामुळे टोक्याच्या सिद्धेश्वर मंदिराची जी खुजी व बसकट वास्तू उभी राहिली आहे ती अपवादात्मकच समजावयास हवी. अन्यथा बाकदार बाह्यरेषेचे उंचच उंच शिखर हा स्थायीभाव त्र्यंबकेश्वर आणि नेवासे येथील मंदिरात फारच सुंदर रीतीने व्यक्त होतो.

या मंदिराचे स्तंभ पैलूदार आहेत, पण त्यावर कोरीव काम नाही. मंडपाचा किंवा गाभाऱ्याचा घुमटही साधासुधा, कसलेही नक्षीकाम नसलेला. घडणीतल्या आणि बांधकामाच्या सफाईमुळे जास्त लक्षात राहण्यासारखा.

राजस्थानी–मुगल कलापरंपरांचा प्रभाव किती खोलवर पोचला होता व हा शिल्पप्रकार साकार करण्यात मराठी शिल्पकारांनी किती यश मिळविले होते याची यथातथ्य कल्पना टोके येथील सिद्धेश्वर मंदिरातील दगडी ओहऱ्यांवरून येते. ही ओहरी संपूर्ण दगडी बांधणीची आहे. दोन्ही बाजूला सुरूच्या अत्यंत घाटदार खांबाच्या ओळी आहेत. खांबाच्या ओळी जोडण्यासाठी दगडाच्या मेहेरपीच्या कमानी आहेत. दोन्हीसाठी साधा काळा फत्तर वापरलेला आहे. दोन्हीवर कसलेही विशेष नक्षीकाम नाही. पण त्यांचे आकारमान इतके डौलदार आहे, त्यांची मांडणी अशा कल्पकतेने केलेली आहे की पाहणारांचे मनावर हे शिल्प कायमचा ठसा उमटवून जाते.

उत्तर काळात बांधण्यात आलेली बहुंशी मंदिरे खास मराठी घाटाची आहेत. मोठाल्या शहरापासून ते लहानसहान खेडेगावापर्यंत हा प्रकार इतका सर्वमान्य झाला आहे की ह्याकडे वास्तुशैली म्हणून लक्ष द्यावे असे सहसा कोणाला वाटतच नाही. शिवाय संख्या इतकी वाढलेली असल्यामुळे प्रकारांतही वैविध्य आलेले आहे. यातील बऱ्याच मंदिरांत आजही पूजाअर्चा होत असते, आणि त्यामुळे त्यांचा जीर्णोद्धारही झालेला आहे. पुणे शहरातील तुळशीबाग, रामेश्वर, पर्वतीवरील शिवालय व विष्णुमंदिर ही देवालये चांगल्या स्थितीत असणारी उत्तम उदाहरणे म्हणून दाखविता येतात. हा प्रकार कसा उत्पन्न झाला, याचा विचार थोडा पुढे केला आहे. त्यावरून मराठेशाहीच्या उत्तरकालात किती निरनिराळ्या प्रवाहांचा संगम झाला होता याची कल्पना येईल. येथे उल्लेखण्यासारखी गोष्ट एवढीच की सर्वस्वी परप्रांतीय अशी कल्पना आणि आकृतिबंध हे मराठी समाजाने इतक्या सत्वर आणि पूर्णत्वाने आत्मसात केले की ते येथलेच आहेत, स्थानिकच आहेत अशी समजूत निर्माण व्हावी.

या मंदिराची रचना अत्यंत साधी आहे. चौरस गाभारा आणि त्यासमोर आयताकार ओहरी. दोन्ही सहसा दगडी बांधणीचे, ओहरीच्या दर्शनी भागाला दोन अर्धस्तंभ व

दोन स्तंभ असून मध्ये तीन कमानी असत. खांब जर सुरूचे असले तर कमानी मेहेरपीच्या असत. अन्यथा साध्या असत. ही ओव्हरी आणि तिची रचना यांचे तत्कालीन दख्खनी मशिदीच्या दर्शनी भागाशी असणारे साम्य योगायोगाने उत्पन्न झालेले असणे शक्य नाही. गुप्तकालातील अगदी प्रायोगिक अवस्थेतील मंदिरात याच स्वरूपाचा मुखमंडप किंवा ओवऱ्या होत्या, त्यांची आठवण येथे येणे स्वाभाविक आहे. मधल्या काळात याच वास्तुखंडाला " अंतराळ " हे स्वरूप प्राप्त झाले असले तरी त्याचे मूळ अशा मुखमंडपातच होते व मराठेशाही मंदिराचा मुखमंडप हा याचाच वंशज यात शंका नाही. फक्त वास्तुरूप हे मशिदीवरून उचललेले आहे. गाभारा व हा मुखमंडप ( यालाच काही वेळेला अर्ध मंडपही म्हणता येते ) याच्या भिंती आतून बाहेरून सपाट, साध्या असतात; त्यावर कोन, रथ, असे प्रकार अजिबात दिसणार नाहीत. त्यातल्या त्यात मोठ्या, प्रसिद्ध अशा देवळासमोर एक प्रशस्त सभामंडप बांधण्यात येत असून तो आयताकार असे. तो बहुधा लाकडी बांधणीचाच असे. साधे चौकोनी खांब असल्यास त्याच्यामध्ये त्रिदळी लाकडी कमानी असत, तर सुरूचे खांब असले तर मेहेरपीच्या. या मंडपात डोळ्यात भरण्यासारखा भाग म्हणजे म्हणजे छतावरील कोरीव काम. भौमितिक चौकटीत किंवा सांगाड्यावर वेलपत्यांच्या वेगवेगळ्या आकृत्या कोरण्यात येत किंवा बसविण्यात येत. दरवर्षी तेलपाणी करून हे लाकूडकाम स्वच्छ करण्यात येई. त्यामुळेच त्याचे रक्षणही होत असे. या सभामंडपाचे छप्पर कौलारू असून अर्धमंडपावर सपाट लादी घालीत आणि गाभाऱ्यावर मात्र शिखर असे. हे शिखर हेच मराठी शैलीचे सर्वांत डोळ्यांत भरण्यासारखे वैशिष्ट्य.

शिखराची साधारण आकृती कोनाकार असली तरी त्याच्या तीन किंवा चार पायऱ्या केलेल्या असत ( आकृती १६ ). खालची पायरी ( Stage ) चौरस, त्यावरची अष्टकोनी आणि त्यावरची गोल विधानाची असून तिच्या माथ्यावर आमलक व कळस यांची जागा घेणारे छोटे घुमट बसविलेले असत. प्रत्येक पायरी किंवा मजला स्पष्टपणे वेगळा दिसेल अशीच बांधणी असे. प्रत्येक मजल्यावर गोलाकार छपराचे कोनाडे काढीत व त्यासाठी छोट्या आकाराचे सुरूचे खांब, व मेहेरपीच्या कमानी वापरलेल्या असत. यात क्वचित चुन्याच्या ( Stucco ) मूर्तीही बसविलेल्या आहेत. दोन कोनाड्यांच्या मध्ये लहानसे मनोरे उभे करीत. चारही कोपऱ्यावर छोटे मनोरे किंवा देवळ्या बांधलेल्या असत. अशा तऱ्हेने पायऱ्यांचे किंवा मजल्याचे शिखर बांधण्याची कल्पना कर्नाटकांतील " द्रविड " मंदिरावरून उचललेली आहे हे उघड आहे. हिंदुस्थानी ( म्हणजे नागर ) देवालयावर ही मजल्याची रचना आढळत नाही. शिल्पपद्धतीत मूलभूत म्हणून स्वीकारलेल्या कल्पनांशी ती विसंगत आहेत. द्राविड पद्धतीत प्रत्येक मजल्यावर घरांच्या व मंडपांच्या छोट्या प्रतिकृती ओळीने उभ्या करीत. यांना शाला किंवा कूट म्हणत. शाला ही वास्तू आयताकार, लांबट तर कूट ही चौकोनी. मराठी शिल्पकारांनी शाला व कूट यांच्याऐवजी मेहेरपीचे कोनाडे व मनोरे वापरण्यास आरंभ केला. हे कोनाडे तरी कोठून आले ?



पृ. १२६ विठ्ठलमंदिर : विठ्ठलवाडी, पुणे

आकृती १८



ब्राह्मी शिलालेख : गास

पृ. १५१

राजस्थानी किंवा आग्र्याच्या वास्तूंत जे सज्जे दिसतात त्यांच्याच या प्रतिकृती. यांची कल्पना यावयाची तर पुण्याच्या विश्रामबाग वाड्याची दर्शनी बाजू पहावी. या सज्जाला " मेघडंबरी " असे नाव होते. सुरूचे कातीव स्तंभ, लहरेदार मेहेरपीच्या कमानी आणि बाकदार छप्पर हीच या रचनेची वैशिष्ट्ये. शिखरावर दिसणारे कोनाडे म्हणजेच या सज्जांच्या छोट्या प्रतिकृती. शिखराचे मजले कितीही वाढविता येतात. प्रत्येक मजल्यावरील कोनाड्यांचे आकार व संख्या यातही कमी-जास्त करता येते.

यापूर्वीची मंदिरे, तुळा व स्तंभ यांवर आधारलेली होती, आता विटांच्या व दगडी बांधणीच्या मराठी मंदिराच्या बांधकामात कमानी व घुमट यांचा सर्रास उपयोग करण्यात आलेला आहे. टोकदार साध्या कमानी, त्रिदली, मेहेरपीच्या हे सगळे प्रकार आहेत. शिवाय घुमटांना आवश्यक असणारे कोपऱ्यातील आधार ( Squinches ) निरनिराळ्या रूपांत अवतीर्ण झाले आहेत. या सगळ्याचे मूळ शोधू गेले तर दख्खनच्या आणि माळव्याच्या मुसलमानी स्थापत्यात सापडते.

मराठेशाहीतील मंदिरे आणि घरे या दोन्हींच्या सजावटीसाठी चित्रकामाचा वापर फार मोठ्या प्रमाणावर केलेला होता. सतराशे पंचवीस नंतरच्या काळातील मंदिरे व वाडे यांवरील भित्तिचित्रे प्राचीन परंपरेतील नसून त्यांचा राजस्थानी व मुगल चित्रकलेशी निकटचा संबंध आहे. भिंतीवर गुलबक्षी रंगाचा हात देऊन त्यावर पांढऱ्या, पिवळ्या, हिरव्या व निळ्या रंगात चित्रे काढलेली असत. सबंध भिंतीचे भाग पाडून छोट्या छोट्या चौकटी तयार करीत व त्या चौकटींत व चौकटींभोवती चित्रे रंगवीत. चित्रविषयात दशावतार, कृष्णलीला व रामचरित हे विषय प्रमुख असत. मिरवणुकीचे वा दरबारचे प्रसंगही कोठे कोठे रंगविलेले आहेत. काही ठिकाणी लहानशा चौकटीत रंगविलेली ही चित्रे राजपूत-मुगलशैलीच्या ' छोट्या ' चित्रांचे ( miniatures ) स्मरण करून देतात. विशेषतः चित्ररचनेतील साम्य लक्षणीय ठरते. ठळक काळी बाह्यरेषाही दोघांना समान आहे. वाईला अनेक जुन्या वाड्यांत हे चित्रकाम शिल्लक आहे. तासगाव, पांडेश्वर, मोरगाव अशा ठिकाणच्या मंदिरांतही काही अवशेष मिळालेले आहेत. परंतु या रंग-कामाचा सांगोपांग अभ्यास अद्याप झालेला नाही, त्यामुळे केवळ त्याच्या अस्तित्वाची दखल घेऊनच येथे थांबावे लागते.

जवळपास अर्ध्या शतकानंतर पुण्यामधे पूर्णपणे पाश्चिमात्यघाटाच्या इमारती उभारण्यात आल्या. मुंबईमध्ये त्यांची उभारणी यापूर्वीच झालेली होती. इतिहासकालाची समाप्ती होऊन आधुनिक युगाचा प्रारंभ झाल्याची ही दृश्य निशाणीच होय.

◻ ◻

# महाराष्ट्राची 'अभिलेख' संपदा

शोभना गोखले

पुरातत्त्वशाखेमध्ये कोरीव लेखाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारताचा इतिहास उज्ज्वल असला तरी ग्रीस, इटली, चीन या देशांतील लोकांप्रमाणे भारतीयांनी इतिहास-लेखन केले नाही. हिरोडोटस, थ्युसिडायडस, टॅसिटस यांच्यासारखे थोर इतिहासकार या भूमीवर जन्माला आले नसल्यामुळे जगज्जेत्या अलेक्झांडरच्या स्वारीपर्यंत कुठल्याही राजकीय घटनांचा कालखंड निश्चित करता येत नाही. भारतीय प्राचीन इतिहासाचे लेखन करताना उत्खननातील पुरावे, प्राचीन नाणी, ऐतिहासिक वास्तू, शिलालेख, ताम्रपट इत्यादी साधनसामुग्रीचा उपयोग करावा लागतो. या सर्व साधनसंहितेमध्ये कोरीव लेख अतिशय महत्त्वाचे आहेत. भारतातील लेखनकला फार प्राचीन असल्याचे वाङ्मयीन पुरावे मिळतात. अपौरुषेय वैदिक वाङ्मयात लेखनविषयक पुरावे आहेत. परंतु त्या वाङ्मयामध्ये वेळोवेळी भर पडत गेल्यामुळे त्या कालाची ऐतिहासिकदृष्ट्या विश्वसनीयता ठरविणे अवघड आहे. तीच कथा बौद्ध आणि जैन वाङ्मयाची आहे. त्या काळातील लेखनाचे पुरावे उपलब्ध नाहीत. लेखनाचे पुरावे उपलब्ध नसल्याने तर्कालाच जास्त अधिष्ठान आहे. आजमितीला सम्राट अशोकाचे लेख हेच भारतातील लेखनकलेचे प्राचीनतम नमुने म्हणून सांगता येतील. या लेखातील लिपी सर्वांशाने परिपूर्ण आहे. ऱ्हस्व, दीर्घ स्वर, मृदु आणि कठोर व्यंजने, अनुनासिके, अनुस्वार चिन्हे, जोडाक्षरे या साऱ्या गोष्टी या लिपीची प्रगतावस्था आणि प्राचीनता दर्शवितात यात शंका नाही, परंतु त्यावरून केलेले कालनिश्चितीचे विधान हे अनु-मानाच्या सदरात मोडेल. सिंधुसंस्कृतीच्या काळातील चित्रांकित मुद्रा उत्खननात सापडल्या आहेत. या चित्रलिपीचे वाचन करण्याच्या प्रयत्नाला अजून तरी म्हणावे असे यश प्राप्त झाले नाही. सिंधुसंस्कृतीची लिपी ही चित्रलिपी आहे असे समजतात. अशोककालीन ब्राह्मी ही अक्षरलिपी आहे. दोन्ही लिपी भिन्न वर्गात मोडतात. याशिवाय सिंधुसंस्कृतीचा अंतकाल आणि सम्राट अशोकाचा काळ यामध्ये जवळजवळ दोन हजार वर्षांचे अंतर आहे. या कालखंडातील लेखविद्येचे अवशेष आजतागायत उपलब्ध नाहीत. वर निर्देश केलेल्या दोन लिपींमधील दुवाही उपलब्ध नाही. अशा

परिस्थितीमध्ये अशोकाच्या धर्माज्ञांचीच भारतातील प्राचीनतम लेख म्हणून गणना करावी लागेल. या धर्माज्ञा ब्राह्मी लिपीमध्ये आहेत. ब्राह्मी लिपी सर्व भारतातील लिपींची जननी असल्यामुळे तिच्या उत्पत्तीविषयी केलेली चर्चा अस्थानी ठरणार नाही. महाराष्ट्रातील लेखसंपदेची ओळख करून देण्यापूर्वी भारतातील लेखनकला व ब्राह्मी लिपीची उत्पत्ती या विषयांचे थोडक्यात विवेचन केले तर ते विषयान्तर न ठरता त्याचा पृष्ठभूमीसारखा उपयोग होईल.

## भारतातील लेखनकला :

भारतातील आद्य लिपीचे नाव ब्राह्मी. सृष्टिविधाता ब्रह्मदेवाने ती निर्माण केली म्हणून तिचे नाव ब्राह्मी. अर्थात ती लिपी अतिशय प्राचीन आहे असा सर्वसाधारण समज असल्यास नवल नाही. जैन, बौद्ध व वैदिक वाङ्मयातील पुराव्यावरून लेखनकला अतिशय प्राचीन होती असा संशोधकांचा तर्क आहे. परंतु सम्राट अशोकाच्या लेखा-पूर्वीचे लेखनपुरावे अद्याप उपलब्ध नाहीत.

## जैन वाङ्मयातील पुरावे :

जैनांच्या समवायांगसूत्राचा काळ इ. स. पूर्वकाळ ३०० आणि पण्णावणासूत्राचा काळ इ. स. पू. १६८ हा आहे. या दोन्ही ग्रंथांतून भारतातील अठरा लिपींचा उल्लेख आहे. त्यात ब्राह्मी लिपीचा अंतर्भाव आहे. याशिवाय खरोष्ठी आणि यवनानी लिपींचाही त्या यादीत उल्लेख आहे. खरोष्ठी लिपीचे लेख वायव्यप्रांतात व पंजाबमध्ये सापडले आहेत. यवनानी लिपीचा उल्लेख पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्ये आहे. या यवनानी लिपीचा पाणिनीच्या अष्टाध्यायीमधील उल्लेख हा महत्त्वाचा लिपिविषयक ऐतिहासिक पुरावा आहे. पाणिनीचा काळ सर्वसाधारणपणे इ. स. पू. चौथे शतक हा मानला जातो. भारती-यांचे ग्रीकांशी राजकीय आणि व्यापारी संबंध आले आणि त्यातून निर्माण झालेल्या सांस्कृतिक संपर्कातून भारतीयांना ग्रीक लिपीची ओळख झाली असे म्हणावयास हरकत नाही. या पुराव्यावरून अलेक्झांडरच्या स्वारीपूर्वी ग्रीकलिपीची भारतीयांना ओळख होती असे म्हणता येईल. जैनाचा दृष्टिवाद हा ग्रंथ नष्ट झाला परंतु जो अवशिष्ट भाग उपलब्ध आहे, त्यामध्ये ब्राह्मी लिपीच्या एकुण ४६ अक्षरांचा उल्लेख आहे. इ. स. पू. तिसऱ्या शतकात एकूण ४६ अक्षरे होती. संस्कृतभाषेतील काही शब्दांमुळे नवीन अक्षरांशी भर पडली. ती अक्षरे म्हणजे अै, अो, अं, अः आणि ङ्. या जैनवाङ्मयातील पुराव्यावरून भारतीयांना इ. स. पू. तिसऱ्या शतकात लेखनकलेचे संपूर्ण ज्ञान होते असे दिसून येते.

## वैदिक वाङ्मयातील उल्लेख :

वैदिक वाङ्मयात आढळणारे भाषेच्या विविध अंगोपांगांचे उल्लेख आणि व्याकरण चर्चावरून भारतीयांना इ. स. पूर्व १००० ते ८०० या सुमारास लेखनकला अवगत

होती असा तर्क करावयास हरकत नाही. परंतु त्या काळातील लेख मात्र अद्याप उपलब्ध नाहीत. मुखस्थविद्येवर बराच भर असल्यामुळे लेखनास फारसे महत्त्व दिले जात नसावे. नंतरच्या काळातही लेखनाचे महत्त्व दर्शविणारे पुरावे सापडतात. पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्ये लिपी, लिपीकर, ग्रंथ, यवनानी हे शब्द आलेले आहेत. कौटिलीय अर्थशास्त्रामध्ये मुलाचे चौलकर्म झाल्यावर त्यास अक्षरे व पाढे शिकवावे असे लिहिले आहे. वात्स्यायनाच्या कामसूत्रांमध्ये पुस्तकवाचन ही चौसष्ट कलांमधील एक कला मानली आहे. रामायण व महाभारतातही लेखनविषयक उल्लेख आहेत. आठव्या शतकातील वासिष्ठधर्मसूत्रामध्ये लेखी पुरावा हा कायदेशीर पुरावा मानला आहे. अशा तऱ्हेचे पुष्कळ उल्लेख उपलब्ध आहेत. यावरून लेखनकला फार प्राचीन होती असे म्हणावयास हरकत नाही. परंतु या ग्रंथांचा काल आणि त्यामध्ये मागाहून पडलेली भर याविषयी निरनिराळी मतमतांतरे आहेत, आणि म्हणून पुरातत्त्वदृष्ट्या तो पुरावा निश्चित स्वरूपाचा मानता येत नाही.

## बौद्धवाङ्मयातील पुरावे :

बौद्ध धर्मग्रंथांचे तीन विभाग आहेत. ( १ ) विनय, ( २ ) सुत्त, ( ३ ) अभिधम्म. त्या प्रत्येकाला पिटक म्हणतात. विनयपिटकामध्ये बौद्ध साधूंचे आचारनियम सांगितले आहेत. त्यामध्ये लेखनकलेचे पुष्कळ उल्लेख उपलब्ध आहेत. त्यानुसार कोणीही बौद्ध साधू आत्मघाताची प्रशंसा करील तर प्रत्येक अक्षराबद्दल त्यास पाप लागेल असे स्पष्ट नमूद केले आहे. त्या काळात लेखनव्यवसाय हा गृहस्थाश्रमी लोकांच्या चरितार्थाचे एक साधन मानले होते. जातककथामधून खाजगी, सरकारी आज्ञापत्रांचा, कुटुंबातील प्रमुख घटना सुवर्णपत्रावर लिहिल्याचा उल्लेख सापडतो. रुरुजातकात सुवर्णपात्रावरील लेखाचा पुरावा सापडतो. काशीराजाची स्त्री खेमा हिने स्वप्नामध्ये सुवर्णमृग पाहिला. राजाने सुवर्णपत्रावर एक कविता लिहिली तीमध्ये जो कोणी हा सुवर्णमृग शोधील त्याला एक गाव आणि एक सालंकृत स्त्री देण्यात येईल असे लिहिले. महावग्गामध्ये उपालीच्या आईवडिलांनी मुलाला काय शिकवावे याचा विचार केला. लेखन, गणना आणि हिशेब शिकविल्यास अंती फलदायी होईल, परंतु बोटे, छाती आणि डोळे यांना त्रास होईल म्हणून सरतेशेवटी त्यांनी उपालीला भिक्षू करून टाकले. ‘ ललितविस्तर ’ या ग्रंथात गौतमबुद्ध पाठशाळेत विश्वमित्र नावाच्या गुरूजवळ चंदनाच्या पाटीवर सोन्याच्या लेखणीने लिहावयास शिकला असे सांगितले आहे. सुत्तात या ग्रंथाच्या पहिल्या खंडातील पहिल्या अध्यायात बुद्धाने आचारोपदेश सांगितला आहे. त्यामध्ये ‘ अक्खरिका ’ या खेळाचा निर्देश आहे. त्या खेळात एकाने हवेत बोटाने अक्षर काढावयाचे व दुसऱ्याने ते ओळखावयाचे. सिलोनमधील त्रिपिटकात छिन्दति लिखित लेख, लेखक, अक्षर, पर्ण, फलक, सुवर्णपत्र या लेखनविषयक शब्दांचा उल्लेख आहे. परंतु त्यात लिपी, लिपीकर हे शब्द नाहीत.

## अभारतीय पुरावे :

अलेक्झांडरचा सेनापती निआर्कस याने भारतीय लोक कापूस कुटून तयार केलेल्या कापडावर लिहीत असे नमूद केले आहे. यावरून भारतात इ. स. पूर्वकाळात ३२७ ते ३२५ च्या दरम्यान लोकांना लेखनकला अवगत होती असा तर्क करावयास हरकत नाही. मेगॅस्थेनिस हा चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारी आलेला ग्रीक वकील. त्याच्या ' इंडिका ' या ग्रंथातील अनेक पुरावे भारतातील लेखनकलेची प्राचीनता सिद्ध करण्यास पोषक आहेत. हा ग्रंथ नष्ट झालेला आहे, परंतु या ग्रंथातील माहिती इतर ग्रंथकारांनी उद्धृत केली आहे. त्या माहितीवरून प्रत्येक स्टेडिआनंतर ( एक स्टेडिआ ६०६ फूट ) धर्मशाळेची जागा व अंतर दर्शविण्यासाठी दगड पुरलेले असत. या सर्वांवरून लेखन-कलेची प्राचीनता दिसून येते. ह्युएन्त्संगाने हिंदू मुले बाराखडीचा अभ्यास करतात व लिपीमध्ये ४७ अक्षरे आहेत असे लिहिले आहे. जैन, बौद्ध व वैदिक वाङ्मयात लेखन-कलेचे विविध उल्लेख सापडतात.

इ. स. पू. दुसऱ्या शतकातील खारवेल राजाच्या लेखात राजपुत्र खारवेल हा लेखन, पाढे आणि हिशेब या विषयांत पारंगत होता असे स्पष्टपणे म्हटले आहे.

जैन, बौद्ध व वैदिक वाङ्मयात लेखनकलेचे प्राचीनत्व दर्शविणारे उल्लेख आढळून आले तरी पुरातत्त्वदृष्ट्या सम्राट अशोकाच्या पूर्वीचे म्हणजे इ. स. पू. तिसऱ्या शतका-पूर्वीचे लेखनाचे विश्वसनीय पुरावे सापडत नाहीत. इ. स. १९१२ साली पंडित गौरीशंकर हिराचंद ओझा यांना अजमीर जिल्ह्यात बडली नावाच्या गावी एक त्रुटित स्तंभलेख सापडला. त्याच्या पहिल्या ओळीत ' वीराय भागवत ' आणि दुसऱ्या ओळीत ' चतुराशिति ' अशी अक्षरे खोदलेली आहेत. हा लेख जैनांच्या शेवटच्या तीर्थंकराच्या महावीराच्या निर्वाणाच्या ८४ व्या वर्षी कोरविला असावा असा पंडित ओझा यांचा कयास आहे. या लेखातील ' वी ' या अक्षरातील ' इ ' अशोककालीन लेखातील ' इ ' पेक्षा निराळी आहे. नंतरच्या काळातील लेखांतून अशा पद्धतीची ' इ ' आढळून येत नसल्यामुळे हा लेख अशोकपूर्वकालीन असावा असे पंडित ओझा यांचे अनुमान आहे.

गौतमबुद्धाचे निर्वाण झाल्यावर राजगृह वैशाली, कपिलवस्तु, पावा, कुशिन्तर इत्यादी ठिकाणी बुद्धाच्या अस्थीवर स्तूप बांधण्यात आले. नेपाळच्या तराई जंगलात पिपरावा येथे बुद्धनिर्वाणानंतर अशा तऱ्हेचा स्तूप बांधण्यात आला. त्या स्तूपातील अस्थी ठेवलेल्या पात्रावर लेख आहे. बुद्धनिर्वाणकाल इ. स. पू. ४८७ हा धरला तर वरील लेखाच्या पुराव्यावरून इ. स. पू. पाचव्या शतकात ब्राह्मी लिपी भारतीय लोकांना अवगत होती असा काही संशोधकांचा कयास आहे.

## ब्राह्मी लिपी :

आजतागायत उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून सम्राट अशोकाच्या धर्माज्ञा याच भारतातील प्राचीन लेखनकलेचे नमुने समजले जातात. देवांना प्रिय असणारा प्रियदर्शी राजा अशोक याच्या धर्माज्ञा ब्राह्मी लिपीत दगडावर कोरविल्या आहेत. भारतातील चारी दिशांना शिलाफलकांवर अथवा स्तंभांवर या आज्ञा कोरविल्या आहेत. अशोक हे नाव म्हैसूर राज्यातील मास्की आणि मध्यप्रदेशातील झाशीजवळील गुजरा येथील लेखांत आले आहे. जंबुद्वीप हे त्याच्या राज्याचे नाव. पाटलीपुत्र ही राजधानी. त्याच्या राज्याच्या मर्यादा, शासनव्यवस्था या साऱ्याची माहिती त्याच्या देशाच्या चारी दिशांना उभारलेल्या शिलाफलकांवरून व स्तंभांवरून मिळते. ब्राह्मी लिपीच्या उत्पत्ती-विषयी विद्वानांची निरनिराळी मतमतांतरे आहेत. कनिंगहॅम यांच्या मताप्रमाणे सिंधु-संस्कृतीच्या चित्रलिपीवरूनच ब्राह्मी लिपीची उत्पत्ती झाली. परंतु ते मत सिद्ध करण्यासाठी लागणारे पुरावे अद्याप उपलब्ध झालेले नाहीत. हॅलवे या संशोधकाच्या मताप्रमाणे ब्राह्मी लिपी इ. स. पू. चवथ्या शतकातील अरमाईक खरोष्ठी आणि ग्रीक लिपीच्या मिश्रणातून उत्पन्न झाली आहे. वेबर यांच्या मते ब्राह्मीची उत्पत्ती प्राचीन नॉर्थ सेमेटिक लिपीपासून झाली. डीके आणि टेलर यांच्या मते ती दक्षिण सेमेटिक लिपीपासून उत्पन्न झाली. काही संशोधक तिचा संबंध सेबिअन अक्षरांशी लावतात. डॉ. अहमद हसन दानी आणि डॉ. ब्यूहर यांच्या मते फिनिशिआ ते मेसापोटेमिया या प्रदेशात अस्तित्वात असलेल्या नॉर्थ सेमेटिक लिपीपासून ब्राह्मी लिपीची उत्पत्ती झाली. भारतीय संशोधक कै. डॉ. राजबली पांडे व कै. गौरीशंकर ओझा यांच्या मते ब्राह्मीच्या निर्मितीचे श्रेय सर्वस्वी प्राचीन भारतीय पंडितांकडेच जाते.

ब्राह्मी लिपी भारतातील प्राचीन लिपी असली तरी आठव्या नवव्या शतकात नागरी लिपीचा आणि त्यानंतर प्रादेशिक लिपीचा भारतात प्रसार झाल्यावर जनतेच्या स्मृति-पटलावरून ती लिपी नष्ट झाली. दिल्लीचा सुलतान फिरोजशहा तुघलक याने पंजाबमधील अंबाला जिल्ह्यातील टोपरा आणि मीरत येथील अशोकाचे स्तंभ मोठ्या परिश्रमाने दिल्लीस आणविले. त्या लेखांतील आशय समजावून घेण्यासाठी विद्वानांना पाचारण केले. हे शैलस्तंभ आणण्यास किती प्रयास पडले याचे वर्णन शम्स-इ-शीराज याने तारीख-ए-फिरोजशाहीमध्ये केले आहे. सम्राट् अकबरानेही या शैललेखांच्या वाचनासाठी पुष्कळ विद्वानांना आमंत्रण केले; परंतु उभय बादशहांच्या पदरी निराशाच पडली. त्यानंतर भारताचे प्राचीन इतिहासवैभव वास्तुशिल्प, मूर्ती, शिलालेख, ताम्रपट, मुद्रा, नाणी इत्यादी अवशेषांमध्ये विखुरलेले आहे याची जाणीव ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या सनदी नोकरांना झाली. कलकत्ता येथील सुप्रीम कोर्टाचे त्या वेळचे जज्ज सर विल्यम जोन्स यांनी प्राचीन अवशेषांचा पद्धतशीर अभ्यास करण्यासाठी १५ जानेवारी १७८४ मध्ये एशियाटिक सोसायटी स्थापन करून इ. १७८८ मध्ये 'एशियाटिक रिसर्चेस'

हे नियतकालिक सुरू केले. या नियतकालिकांत शिल्प, नाणी या विषयावरचे अभ्यासपूर्ण लेख प्रसिद्ध होऊ लागले; परंतु इ. १८३७ पर्यंत ब्राह्मी लिपी कुणालाही वाचता येत नव्हती. कलकत्त्याच्या टांकसाळीमध्ये जेम्स प्रिन्सेप हे धातूतपासनीस म्हणून काम करीत होते. त्यांना इंडोग्रीक राजांची नाणी जमविण्याचा छंद होता. ते वायव्य प्रान्तात गेले असता त्यांना इंडोग्रीक राजा पॅन्टॉलिऑन याची नाणी सापडली. त्या नाण्यांवर बॅसिलिऑस पॅन्टॉलिऑन हे ग्रीक नाव व त्याची ब्राह्मी छाया या दोन्ही गोष्टी होत्या. ती ब्राह्मी छाया म्हणजे 'रजने-पतलवष'. 'रजने पतलवष' हा जणू अष्टाक्षरी मंत्रच मिळाला. या अक्षरांच्या साहाय्याने त्यांनी अशोकाच्या लेखांचे वाचन करून अक्षरांचे तक्ते तयार केले. अशोकाच्या तेराव्या राजाज्ञेमध्ये उल्लेखिलेला तुरमाय हा इजिप्तचा राजा टॉलेमी फिलाडेल्फॉस (इ. स. पू. २८५) आणि अंतियक हा सीरियाचा राजा अँटिओकस हे प्रिन्सेप यांनी दाखवून दिल्यामुळे सम्राट् अशोकाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आणि त्याचा काल निश्चित झाला.

## खरोष्ठी लिपी :

खरोष्ठी लिपीचे नाव अन्वर्थक आहे. गाढवाच्या ओठासारखी लपेटी असलेली ही लिपी नॉर्थ सेमेटिक लिपीपासून उत्पन्न झालेल्या अरमइक लिपीपासून उत्पन्न झाली. खरोष्ठी हे नाव फा-उन-शु-लीन या चिनी कोशात आणि इ. स. पू. तिसऱ्या शतकातील ललितविस्तर या बौद्धग्रंथात उल्लेखिले आहे. सीस्तान, कंदाहार, अफगाणिस्तान, स्वात, लडाख, चिनी तुर्कस्तान, तक्षशिला या भागात खरोष्ठी लिपीतील लेख सापडतात. तिच्या मर्यादित क्षेत्रामुळे संशोधकांनी तिला निरनिराळी नावे दिली आहेत. लॅसन यांनी काबुली लिपी, विल्सन यांनी ॲरिऑनिअन, कॅनिंगहॅम यांनी गांधार लिपी असे अनुक्रमे तिचे नामकरण केले. खरोष्ठी लिपीमधील लेख प्राकृत भाषेत असल्यामुळे तिला बॅक्ट्रोपाली किंवा ॲरिॲनेपाली हीसुद्धा नावे मिळाली. पश्चिम पाकिस्तानमधील हजारा जिल्ह्यातील मान्सेरा व पेशावर जिल्ह्यातील शाहबाजगढी येथे अशोकाचे खरोष्ठीमधील लेख आहेत. कंदाहारजवळ खरोष्ठी आणि अरमाईक अशा दोन लिपींमध्ये असलेला अशोकाचा लेख सापडला आहे. कुषाणांच्या राजवटीत खरोष्ठीचे लेख मथुरेला सापडले आहेत.

ब्राह्मीप्रमाणेच खरोष्ठीचे लेख प्रस्तर, धातुचे पत्रे, नाणी, उंटाचे कातडे, भूर्जपत्रे यावर सापडतात. खोतान येथे दुसऱ्या शतकातील खरोष्ठी लिपीमध्ये लिहिलेले भूर्जपत्रावरील हस्तलिखित सापडले आहे. कोरून लिहिणे आणि लेखणीने उंटाच्या कातड्यावर अगर भूर्जपत्रावर लिहिणे अशा खरोष्ठी लेखनाच्या दोन पद्धती आहेत. या लिपीमध्ये एक प्रकारचा साचेबंदपणा आढळतो. या साचेबंदपणामुळे खरोष्ठीमधील लेखांची कालानुरूप परंपरा लावणे कठीण आहे; असे जरी असले तरी कोणत्याही भाषेतील उच्चारवैचित्र्य अक्षरांकित करण्याचे सामर्थ्य त्या लिपीला आहे. या लिपीतील उच्चारचिन्हांमुळे कोणत्याही शब्दांतील ध्वनीची अभिव्यक्ती करण्याचे सामर्थ्य तिच्यामध्ये होते. इ. स.

१८३३ मध्ये जनरल वेंटुरा यांनी माणिक्याल स्तूपाचे उत्खनन केले. त्यात खरोष्ठी व ग्रीक या दोन्ही लिपींमध्ये नावे असलेली इंडोग्रीक राजांची नाणी सापडली. ती नॉरिस आणि कर्नल मॅसन यांनी वाचली आणि अशा तऱ्हेने खरोष्ठी लिपी वाचण्याची गुरुकिल्ली इंडोग्रीक राजांच्या द्वैभाषिक नाण्यामुळे मिळाली.

## इतिहासलेखनाचा दुवा :

शिलालेख आणि ताम्रपट यामधून मिळणारी माहिती सर्वात विश्वसनीय ऐतिहासिक पुरावा म्हणून समजला जातो. प्राचीन काळातील राजकीय, सामाजिक आणि धार्मिक जीवनाचा मागोवा घेणे प्राचीन लेखांमुळे सुलभ झाले आहे. या क्षेत्रातील संशोधन सुकर होण्यासाठी लेखांची सूची अतिशय महत्त्वाची असते. कीलहॉर्न यांनी दक्षिण भारतातील पाचव्या शतकापासून उपलब्ध असलेल्या लेखांची यादी प्रसिद्ध केली. इ. १९१० साली ल्यूडर्स यांनी भारतातील सर्व ब्राह्मी लेखांची यादी करून त्यातील भौगोलिक नावांची आणि व्यक्तिनामांची सूची करून प्रत्येक लेखांतील महत्त्वाच्या घटनांची नोंद केली. ही सूची एपिग्राफिया इंडिका, भाग १० च्या ग्रंथात प्रसिद्ध झाली. प्राचीन लेखविद्येचे अभ्यासक, डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांनी उत्तर हिंदुस्थानातील इ. २०० पासून ज्ञात असलेल्या प्रत्येक लेखातील महत्त्वपूर्ण विशेषांची माहिती देणारी सूची तयार केली. ही सूची इ. स. १९३२ मध्ये पुरी झाली. महाराष्ट्रात सापडलेल्या लेखांचे अभ्यासपूर्ण परिशीलन कीलहॉर्न, ब्यूह्लर, बर्जेस, भाऊदाजी, भगवानलाल इंद्रजी यांनी केले. महाराष्ट्रातील शैलगृहातील प्राकृत लेखांचे संपादन डॉ. बर्जेस यांनी केले. तत्कालीन महाराष्ट्राची धार्मिक बैठक कोणत्या स्वरूपाची होती, सामाजिक आणि राजकीय जडणघडण कशी होती याचे साधार दर्शन इतिहासाच्या अभ्यासकांना त्यांनी घडविले. भगवानलाल इंद्रजी यांनी अजंठ्याच्या भित्तिलेखांचा आणि धातुरागांनी लिहिलेल्या लेखांचा अभ्यास केला. डॉ. वासुदेव विष्णु मिराशी यांनी कलचुरी व वाकाटक राजांच्या ताम्रशासनांचा आणि शिलालेखांचा अभ्यास करून त्यावरील अभ्यासपूर्ण विवेचन कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम, भाग ४ व ५ या ग्रंथांत प्रसिद्ध केले. याशिवाय निरनिराळ्या राजवंशातील सापडलेले लेख परिश्रमपूर्वक अभ्यासून ते संशोधनमुक्तावली भाग १ ते ५ या ग्रंथांत प्रसिद्ध करून मराठी वाचकांना संशोधनाचे मुक्तद्वार खुले केले. 'वाकटकनृपती आणि त्यांचा काल' हे पुस्तक प्रसिद्ध करून वाकटककालीन सुवर्णयुगाची महाराष्ट्रास ओळख करून दिली. त्यांचे कोरीव लेखांचे कार्य आदर्श, आणि भरघोस आहे. कै. डॉ. अनंत सदाशिव अळतेकर यांनी राष्ट्रकूटांच्या कोरीव लेखांचा अभ्यास करून 'The Rastrakutas and their times' हा ग्रंथ लिहिला. गोव्याच्या कदंबांच्या लेखांचा अभ्यास करून डॉ. जॉर्ज मोरेअस यांनी 'कदंबकुल' हा प्रबंध लिहिला. शिलाहारांच्या लेखांचा विशेषत्वाने अभ्यास कै. डॉ. अनंत सदाशिव अळतेकर व कै. डॉ. मोरेश्वर गंगाधर दीक्षित यांनी व डॉ. वासुदेव विष्णु मिराशी यांनी केला.

यादवकालीन लेखांचा अभ्यास करून यादवकालीन महाराष्ट्राची ओळख कै. डॉ. मुरलीधर गजानन पानसे यांनी करून दिली. याशिवाय 'The Yadavas and their times' हा प्रबंध डॉ. ओंकार प्रकाश वर्मा यांनी लिहिला.

## गतेतिहासाचे भांडार :

कोरीव लेख आणि ताम्रपट म्हणजे गतेतिहासातील अमोल ठेवा आहे. लेखाची लिपी, भाषा, काव्य, अंक, व्यक्तिनामे, ग्रामनामे, भौगोलिक रचना, तत्कालीन सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवन इत्यादी गोष्टींचे प्रतिबिंब प्राचीन लेखांतून आढळते. या साऱ्या गोष्टींचे संशोधन नव्याने सुरू झाले आहे. कोरीव लेखांत अथपासून इतिपर्यंत प्रत्येक गोष्ट महत्त्वाची असते. त्यातील मंगलाचरणावरून तो राजा कोणत्या पंथाचा आहे हे कळते. त्यातील वंशावळीवरून राज्यकर्त्याच्या घराण्याची वंशावळ कळते. त्यांत उल्लेखिलेल्या शासनविभागावरून राज्यकर्त्याच्या राजकीय भूगोलाची कल्पना येते. दान-पत्रांच्या देणगीच्या वेळी प्रमुख शासनाधिकारी हजर असत. त्यांचाही दानपत्रांतून उल्लेख केलेला असतो. त्यावरून तत्कालीन शासनव्यवस्थेचे निदान करता येते. दान घेणाऱ्या ब्राह्मणाच्या तीन पिढ्यांची वंशावळ दिलेली असते. त्याचे राहण्याचे ठिकाण, गोत्र यांचा उल्लेख असतो. राजाने धारण केलेल्या बिरुदावरून तत्कालीन राजधर्माची कल्पना येते. उदाहरणार्थ, वाकाटक राजे शिवभक्त होते. त्यांनी महाभैरवभक्त, परममाहेश्वर अशी विशेषणे धारण केली. यादव राजे वैष्णवपंथाचे होते. त्यांनी आपल्या यदुकुलाचा साभिमान उल्लेख केलेला आहे. त्यांनी आपल्या शासनमुद्रेवर गरूड हे चिन्ह धारण केले होते.

ताम्रपटावरून किती तरी ऐतिहासिक माहिती कळते. वाकाटकसम्राज्ञी प्रभावती-गुप्ता हिच्या रिथपुर आणि पुणे ताम्रपटांत तिच्या माहेरच्या गुप्तवंशाची वंशावळ दिलेली असल्यामुळे या दोन राजघराण्यांचे विवाहसंबंध जमून आले होते ही ऐतिहासिक घटना कळली. पांडरंगपल्लि ताम्रपटावरून राष्ट्रकूट राजा देवराज याचा मुलगा अविधेय हा ज्ञात झाला तर हिंगणीबेरडी ताम्रपटावरून त्याचा विभुराज हा पुत्र इतिहास संशोधकांना ठाऊक झाला. जसजसे नवे पुरावे उपलब्ध होतात तसतसे इतिहासाचे दुवे नव्याने उपलब्ध होतात आणि नव्या माहितीची भर पडते. उत्तर शिलाहारवंशातील प्रथम अपरादित्याचा पन्हाळे येथे ताम्रपट सांपडला आणि त्याचा मुलगा विक्रमादित्य याचे नाव त्या ताम्रपटावरून कळले. यादवराजा महादेव याने निर्जला एकादशीस अप्तोर्याम यज्ञ केला हे पंढरपुरच्या पोलीस चावडीत असलेल्या शिलालेखावरून कळले. यादवराजा रामचंद्रदेव याच्या पुरुषोत्तमपुरी ताम्रपटात त्याने देवगिरीचा किल्ला कसा काबीज केला याचे वर्णन केले आहे. रामचंद्राने नर्तकाचा वेष धारण केलेल्या सैनिकासमवेत किल्ल्यात प्रवेश केला. शत्रूचे सैनिक नाच पाहण्यात दंग झाले आहेत असे पाहून त्याने शत्रूवर

हल्ला केला आणि देवगिरीचा पाडाव केला हे ऐतिहासिक सत्य या ताम्रपटावरून कळले. रत्नागिरी जिल्ह्यात दापोली तालुक्यातील माठवण येथे त्रैकूटकांचे दोन ताम्रपट सांपडले. त्यावरून मध्यमसेन आणि विक्रमसेन या दोन नवीन त्रैकूटवंशातील राजांची ओळख झाली. आतापर्यंत त्रैकूटक वंशातील व्याघ्रसेन हाच शेवटला राजा मानीत असत. नवीन उपलब्ध झालेल्या ताम्रपटावरून व्याघ्रसेनाचा मुलगा मध्यमसेन आणि मध्यमसेनाचा मुलगा विक्रमसेन हे कळले. मध्यमसेनाच्या ताम्रपटावरून त्याने वाकाटकांचे वर्चस्व झुगारून दिल्याचे कळते तर विक्रमसेनाच्या ताम्रपटावरून त्याने कलचुरींचे वर्चस्व स्वीकारले होते या स्पष्ट पुराव्याची ओळख त्याच्या ताम्रपटातील 'विजयानिरुद्धपुरात् कटच्चुरीणां' या वाक्याने होते.

नवनवीन पुरावे उपलब्ध झाले की नवी भर इतिहासात पडते याची किती तरी उदाहरणे इतिहासात आहेत. राष्ट्रकूट राजा तिसरा इंद्र याच्या चिंचणी ताम्रपटावरून राष्ट्रकूट शासनव्यवस्थेत अरब गव्हर्नराचे स्थान कसे प्रमुख होते हे दिसून येते. कदंबराजा जयकेशी याच्या पणजी येथील ताम्रपटावरून त्याने स्वदेशी सचिवांना टाकून परकीयांना कसे जवळ केले याचा पुरावा उपलब्ध होतो. या ताम्रपटात दान घेणारा च्छडम हा अलिय नौवित्तिकाचा नातू. या च्छडमाला जयकेशीने आपला मुख्यमंत्री नेमले.

कोरीव लेखांतील भौगोलिक रचना, ग्रामनामे या विषयांचे संशोधनदृष्ट्या महत्त्व डॉ. हसमुख धीरजलाल सांकलिया यांनी ओळखले आणि त्यांनी 'Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Gujrat' हा ग्रंथ लिहिला. या धर्तीवरच महाराष्ट्र कर्नाटकातील कोरीव लेखांचा अभ्यास करून डॉ. सौ. सुमती मुळे यांनी 'Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of the Deccan' हा प्रबंध डॉ. सांकलिया यांच्या मार्गदर्शनाखाली लिहिला.

कोरीव लेख किंवा ताम्रपटाचे दान ही पूर्वीच्या काळी सहजासहजी घडणारी गोष्ट नव्हती. आतासारखी लेखविद्या सुलभ नव्हती. राज्यकर्ता, राजघराण्यातील स्त्रिया, पुरुष, शासनाधिकारी, धनिक, सावकार, व्यापाऱ्यांच्या श्रेणी दान देत असत. त्यामुळे कोरीव लेखांतील प्रत्येक तपशील काळजीपूर्वक लिहिला जाई. काही निष्काळजीपणाने लिहिलेले कोरीव लेखही अस्तित्वात आहेत पण ते अपवादात्मक.

### ताम्रशासन :

ताम्रशासनाचा प्रघात फार प्राचीन काळापासून आहे. भारतात इ. स. पू. तिसऱ्या शतकापासून ताम्रशासनाचा उपयोग करीत असल्याचे दिसून येते. सोहगौडा ताम्रपट हा सर्वात प्राचीन ताम्रपट आहे. महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन ताम्रपट वाकाटक राजा द्वितीय विंध्यशक्ती याचा वाशीम ताम्रपट याचा निर्देश करावा लागेल.

ताम्रपटात बहुधा राजाने प्रत्यक्ष दान दिले असेल, ते तांब्यांच्या पत्र्यावर नोंदविले असते. राजा ब्राह्मणाला भूमिदान करीत असे. ती भूमी शासकीय करमुक्त असे. देवाच्या पूजाअर्चेसाठी बलि, चरू, वैश्वदेव करण्यासाठी राजेलोक पर्वकाळी दान देत असत. विष्णुस्मृति आणि याज्ञवल्क्यस्मृति यामध्ये राजाने ब्राह्मणास जमीन द्यावी परंतु पुढील राजांच्या माहितीसाठी ते दान तांब्याच्या पत्र्यावर लिहावे. जमिनीच्या चतुःसीमा सांगाव्या व पत्र्यामध्ये कडी ओवून मुद्रा ठोकावी असा स्पष्ट निर्देश आहे. याज्ञवल्क्य-स्मृतीतील लेख्यप्रकरणांत राजशासने कशी तयार करावीत याबद्दलचा तपशील आहे. विज्ञानेश्वराच्या याज्ञवल्क्यस्मृतीवरील मिताक्षरा या टीकेत राजशासने लिहावी याबद्दल माहिती दिलेली आहे. गतशककाल, त्या त्या राजाचा राज्यसंवत् असेल तर तो, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण अगर ज्यावेळी दान केले असेल त्या पर्वकालाचे नाव, राजाची वंशावळ, जो दान घेणारा असेल त्याची तीन पिढ्यापर्यंतची वंशावळ द्यावी. मोठ्या जबाबदार माणसाची या कामी नेमणूक करावी असे या टीकेमध्ये लिहिले आहे. ताम्रपट लिहिण्यापूर्वी त्यातील मजकूर लाकडी फळीवर खडूने लिहीत व तो 'करणिक' तंतोतंत ताम्रपटावर कोरून काढीत असे. हे कार्य सुव्यवस्थित होण्यासाठी त्यावर एका अधिकाऱ्याची नेमणूक असे, त्यास ' अक्षपटलिक ' म्हणत. कोरक्याने कोरलेल्या मजकुराला उत्कीर्ण, उत्कीलित असे शब्द आहेत. असे ताम्रपट राजाच्या शासनागारांत व्यवस्थित ठेवलेले असत. या विभागास सातवाहनांच्या लेखात फलकवार म्हटले आहे.

ताम्रशासने पिढ्यान्‌पिढ्या दान दिलेली असतात. त्यामुळे लोक दानपत्र काळजी-पूर्वक ठेवीत. घरांतील भिंतीमध्ये, कोनाड्यात, दगडी पेटीत सुरक्षित ठेवीत. यादवराजा महादेव याचा काळेगाव येथे सापडलेला ताम्रपट दगडीपेटीतच सापडला.

**ताम्रशासनाचे स्वरूप :**

( १ ) प्रारंभ, ( २ ) मध्यांग व ( ३ ) शेवट. ताम्रशासने मुख्यत्वेकरून लांबट चौकोनी असतात. हिंदू, जैन यंत्रे मात्र गोल, त्रिकोनी आकाराची असतात. ताम्र-शासनाच्या पत्र्याची संख्या बहुधा तीन असते. पत्र्याच्या चारही बाजूच्या कडा थोड्या थोड्या वर उचललेल्या असतात. त्यामुळे पत्रे एकमेकांवर घासून अक्षरे झिजत नाहीत.

सुरुवातीस सिद्धम् , दृष्टम् , स्वस्ति असे मांगल्यसूचक शब्द असतात. कधी स्वस्तिक, त्रिरत्न, कमळ असते. त्यानंतर ज्या स्थानाहून दान दिले असेल त्या स्थानाचे नाव दिलेले असते. त्यानंतर जो दाता असेल त्याची वंशावळ दिलेली असते. त्यामध्ये पूर्वसूरींच्या पराक्रमाचेही वर्णन असते. जे दान दिलेले असेल त्याचा तपशील दिलेला असतो. भूमिदान असेल तर गावाच्या चतुःसीमा दिलेल्या असतात. राजाच्या पुण्याभिवृद्धीसाठी, राज्याभिषेकाच्यानिमित्त, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, व्यतिपात किंवा पर्वकाळी बव्हंशी ही दाने दिलेली असतात. दान घेणाऱ्याचे नाव, त्याची वंशावळ, गोत्र, त्याचे वास्तव्य, विनिर्गत

यांचाही ताम्रपटात उल्लेख असतो. दान देतेसमयी जे जे अधिकारी हजर असत त्या त्या हुद्देदारांची नावे असतात व सरतेशेवटी शकवर्ष, राजशकातील काल, तिथी, दिवस, पंधरवडा, महिना यांची नोंद असते.

शेवटी दानपत्राच्या रक्षणासाठी सर्वांना विनंती असे. राजाज्ञेचे उल्लंघन करणारा पाच पातके आणि पाच महापातकांचा धनी होत असे. या शापाशीर्वादात्मक श्लोकांचे जनकत्व बहुधा व्यास महर्षींना दिलेले आढळून येते.

ताम्रलेखनाची जबाबदारी बहुधा वरिष्ठ अधिकाऱ्यांवर टाकलेली असे. पुष्कळदा सांधिविग्रहिक या कामगिरीवर असे. ताम्रपटातून लिहिणाऱ्याचे संपूर्ण नाव असते. अशा वेळी तो त्या मजकुराचा रचयिता आहे की केवळ लेखनिक आहे हे कळावयास मार्ग नसतो. कित्येक वेळा लिहिणारा व कोरणारा हे भिन्न असत. त्या वेळी अमक्या-तमक्याने लिहिले व अमक्यातमक्याने उत्कीर्ण केले अशी नोंद असते. उत्कीर्णतेचे कार्य करणाऱ्याला सुवर्णकार, कांस्यकार, अक्षशालिन् म्हटलेले आहे.

ही राजाज्ञा प्रत्येक वेळी राजाच देत असे असे नाही तर कित्येक वेळा इतरांकरवी युवराजामार्फतही दानपत्र दिले जात असे. प्रत्यक्ष अशा राजाकरवी आज्ञा असेल तर आज्ञा स्वयं स्वमुखाज्ञा असा स्पष्ट उल्लेख असतो.

ताम्रलेखन पहिल्या पत्र्याच्या आतील बाजूवर, मधल्या पत्र्यावर दोन्ही बाजूंवर, तिसऱ्या पत्र्याच्या आतील बाजूवर लिहिलेले असते. या पत्र्यांना डाव्या बाजूला गोल भोके असून ती कडीत गोवलेली असतात. कडीची दोन्ही टोके एकत्र करून त्यावर राजमुद्रा असते. मुद्रा बहुधा ब्रॉन्झ किंवा तांब्याची असते. त्यावर राजाचे शिक्कामोर्तब असे. ह्या चिन्हावरून राजाचा धर्मपंथ समजतो. बदामी चालुक्य आणि राष्ट्रकूटांच्या मुद्रावर वराह आहे. शिलाहारांच्या मुद्रांवर गरुड, सर्पधर गरुड आहे. यादवांच्याही ताम्रपटावरील मुद्रांवर गरुडच आहे. वाकाटकराजा द्वितीय प्रवरसेन याच्या ताम्रपटाच्या मुद्रांवर अनुष्टुभ् चरणातील श्लोक आहे.

**वाकाटक ललामस्य क्रमप्राप्तनृपश्रियः ।**
**राज्ञः प्रवरसेनस्य शासनं रिपुशासनम् ।**

भूमी अगर गाव दान मिळाल्यानंतर दान घेणाऱ्याला काही अधिकार मिळत. उदाहरणार्थ, अपरंपराबलिबर्द- त्या गावात राहणाऱ्या लोकांवर शासनाधिकाऱ्यांना बैल पुरविण्याची जबाबदारी राहात नसे. अभटप्रवेश—शासनाच्या सैनिकांनाही तेथे प्रवेश होत नसे. इतकेच नव्हे तर शासनाधिकारी दौऱ्यावर असताना त्यांना जळण, तांदूळ, खाट, आसरा देण्याचे बंधन तेथील गावकऱ्यांना नसे. ( अकुरतोलकविनाशीखट्वासंवास ) तेथून कोणालाही दूध, दही, गवत, लाकूड, हळद, भाजीपाला, फुले पुरविण्याचे बंधन

नसे. ( अदुग्धदधिग्रहणअतृणकाष्ठग्रहणहरीतकशाकपुष्पग्रहण ). अचारासनचर्मअंगार-कपारासन. शासनाधिकारी, त्या जागेत तळ ठोकणे, तेथून जाणे इत्यादी गोष्टी करू शकत नसत. कोळसा, मीठ अगर इतर खनिजपदार्थासाठी ती जमीन उपयोगात आणली जात नसे. काही विवक्षित करांचीच त्या जमिनीवर आकारणी होत असे. या भूमीवरील आंबा, मोहाची झाडे, कूप, वाटिका यावर कोणत्याही कराची आकारणी होत नसे. अशी जमीन धारण करणाऱ्याला ती विकता येत नसे. गहाण टाकता येत नसे. तेथे गणिकांना वसतीसाठी, जुगार खेळणे यास बंदी असे. उपरिनिर्दिष्ट गोष्टी जमीनधारकाने पाळल्या नाहीत तर त्याची जमीन जप्त होत असे.

ही दाने बहुधा परंपरागत असत. कित्येकवेळा ताम्रपट फार मोठे असतात. त्यात कित्येकवेळा ऐतिहासिक घटनांचा उल्लेख असतो. पुरुषोत्तमपुरी येथे सापडलेल्या यादव-कालीन ताम्रपटात देवगिरीच्या किल्ल्यात आमणाला कसे पकडले याचा वृत्तान्त आहे. कित्येकवेळा ताम्रशासनांतून अतिशयोक्तीपर मजकूर, अतिरंजित कथने असतात. स्तुतीपर मजकूरही अवास्तवपणे लिहिलेला असतो. लहानसा राजा असला तरी त्याची पुष्कळ वेळा अवास्तव स्तुती केलेली असते. कित्येकवेळा खोटी ताम्रशासनेही लोक तयार करीत; परंतु त्यात वार, तिथी, काळ यांचा मेळ बसत नाही. वंशावळ चुकीची निघते.

## लिपी :

महाराष्ट्रातील कोरीव लेखांत मौर्यकाळातील ब्राह्मी, क्षहरात राजा नहपानाच्या लेखातील ठाशीव व घवघवीत लिपी, सातवाहनांची लेखनशैली, वाकाटकांची पेटिका-शीर्षक लिपी, बदामी चालुक्य व राष्ट्रकूट यांची दाक्षिणात्य लिपी व यादवांच्या लेखांतून देवनागरी लिपी असे प्रकार आढळून येतात. वाकाटकांच्या दरबारी पेटिकाशीर्षक लिपी प्रसारात आली. ही देखणी लिपी म्हणजे दाक्षिणात्य आणि उत्तरेकडील लिपींचे सुंदर मीलन आहे. सातवाहन सम्राट् सातकर्णीने माळवा पादाक्रांत केला आणि सांचीच्या स्तंभावर लेख कोरविला. तेव्हापासून दाक्षिणात्य लिपीचा उत्तरेकडे प्रवेश झाला. ही पेटिकाशीर्षक लिपी इतकी लोकप्रिय झाली की गुर्जर राजांच्या लेखात, वाकाटकांचे मांडलिक शरभपुरचे राजे यांच्या लेखांत, एरण व उदयगिरी येथील समुद्रगुप्त व द्वितीय चंद्रगुप्ताच्या लेखात या लिपीचा उपयोग केला आहे. वाकाटकांचा अस्त झाला परंतु त्याच्या या सुंदर लिपीची मोहिनी काही काळ तशीच होती. नगरधन येथील स्वामी-राजाचा लेख पेटिकाशीर्षक लिपीत लिहिला आहे; तर कर्नाटकातील येकेरी येथील द्वितीय पुलकेशीचा लेख याच लिपीत लिहिलेला आहे. कदंब, शिलाहार व यादव-वंशातील राजांचे लेख देवनागरी लिपीमध्ये लिहिलेले आहेत. कल्याणी चालुक्यांचे लेख कानडी लिपीत लिहिलेले आहेत. लिपीवरून संशोधकांना सर्वसाधारणपणे लेखाचा काल ठरविता येतो. कित्येकवेळा लेखांमध्ये शकाचा, तिथीचा अगर महिन्याचा उल्लेख नसतो;

अशा वेळी अक्षरांची उंची, जाडी, वेलांट्या, लपेटी– या साऱ्या बारकाव्यांवरून संशोधक लेखाचा काळ ठरवितात.

## कोरीव लेखाची भाषा :

महाराष्ट्रात प्राकृत, संस्कृत, मराठी, कानडी भाषेत लिहिलेले लेख आढळून येतात. सर्वात प्राचीन लेख सोपारा येथील अशोकाचा आणि दुसरा मौर्य काळातील महाराष्ट्रातील चांदा जिल्ह्यातील देवटेक येथील लेख. नाणेघाटातील नागणिकेचा लेख, कार्ला भाजा, बेडसा, कुडा, महाड येथील लेखांची भाषा प्राकृत आहे. नाशिकच्या सातवाहन राजांच्या लेखांत प्राकृत भाषा आहे. चालुक्य, वाकाटक, राष्ट्रकूट, कदंब, शिलाहार वंशांतील राजाचे लेख संस्कृत भाषेत आहेत. यादवांच्या लेखातून संस्कृत आणि मराठी एकाच वेळी आलेली दिसून येते. उदाहरणार्थ, तासगाव ताम्रपट, सामंत जैत्राचा ताम्रपट. राष्ट्रकूट राजा चतुर्थ गोविंद याच्या कळस येथील शिलालेखात कानडी काव्यपंक्ती आहेत. कोरीव लेख कित्येकदा वृत्तबद्ध असतात. तत्कालीन लेखातील भाषेवरून भाषेचे सौंदर्य दिसून येते. खोलेश्वराच्या आंबे येथील लेखात आंबे नगराचे मोठे मनोज्ञ वर्णन आले आहे. निरनिराळ्या जनपदांनी व्यापलेले, बागांनी वेढलेले, तोरणे, ध्वज यांनी शोभिवन्त असे आंबे नगर पृथ्वीचे भूषण असल्याचे या लेखात सांगितले आहे.

मराठी शिलालेख आणि ताम्रपट दहाव्या शतकापासून सापडतात. श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या मूर्तीखाली श्री चावुण्डराये करवियले हे वाक्य आहे. परंतु त्या लेखात कालाचा प्रत्यक्ष उल्लेख नाही. गंगराजाच्या प्रधानाच्या नावावरून अदमासे शके ९८३ मधील हा लेख आहे असे मानण्यात येते, परंतु दिवेआगर येथील मराठी ताम्रपट शके ९८२ मधील आहे. हाच मराठी भाषेतील आद्य ताम्रपट आहे असे कै. डॉ. मोरेश्वर गंगाधर दीक्षित यांनी प्रतिपादन केले आहे. याशिवाय आंबेजोगाई, रांजली, चिपळूण, तेर, सावरगाव परळ, पाटण इत्यादी ठिकाणी मराठी लेख सापडलेले आहेत. या लेखांचे संशोधन डॉ. शं. गो तुळपुळे यांनी आपल्या 'मराठी कोरीव लेख' या ग्रंथात केलेले आहे. सम्राट अशोकाच्या काळापासून ते यादव कालापर्यंतच्या ऐतिहासिक साधनसामुग्रीत ताम्रशासने आणि शिलालेख यांचा वाटा फार मोठा आहे. मुसलमानी अमदानीत कागदाची किमया आली आणि कागदी फर्मानाबरोबर शिलालेख आणि ताम्रपट यांचे महत्त्व कमी झाले.

## लेखनसाहित्य :

कागदाची किमया आणि तिचे महत्त्व बाराव्या शतकानंतरचे आहे. तत्पूर्वीच्या लेखनसामुग्रीमध्ये चिरस्थायीपणाकडे जास्त लक्ष दिल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे लेखन-विद्या एका विशिष्ट वर्गाची मिरासदारी असल्यामुळे तिचे स्वरूप अतिशय मर्यादित होते.

प्राचीनकाळातील लेखनाचे जे पुरावे उपलब्ध आहेत त्यावरून असे दिसून येते की राजेलोक, शासनाधिकारी, समाजश्रेष्ठी, व्यापारश्रेष्ठी विशेष प्रसंगांची नोंद करण्यासाठी शिलालेख अगर ताम्रपट लिहवून घेत असत, त्यामुळे ते काळजीपूर्वक लिहिले जात असत. त्याच्या टिकाऊपणाकडे जास्त लक्ष दिले जात असे. प्राचीन लेखनसाहित्यात खालील साहित्याचा समावेश होत होता.

**प्रस्तर** : लेखनसाहित्यात प्रस्तराचा अग्रक्रम लागेल, याचे कारण त्याचे चिर-स्थायित्व. धातु झिजतात, धातु गंजतात. पण प्रस्तर गंजत नाहीत. धातूच्या मानाने त्याची झीज अत्यंत अल्प असल्यामुळे प्रस्तराची प्राचीनकाळच्या अत्यंत लोकप्रिय लेखनसाहित्यांत गणना होते. दगडावर लेख लिहिण्यापूर्वी तो गुळगुळीत करण्यात येत असे. त्यावर काळ्या शाईने अगर खडूने मजकूर लिहीत असत; त्यानंतर कोरक्या छिन्नीने खोदून लिहीत असे. अशा तऱ्हेने लेखरचना करणारा विद्वान, अक्षरे वळणदार लिहिणारा लेखक आणि लिहिलेला लेख कोरणारा कोरक्या अशी तीन माणसे या कामाला लागत. महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन प्रस्तर-लेख सोपारा येथे सापडलेला अशोकाचा लेख आहे. महाराष्ट्रात गुंफांतून भिंतीवर लेख आढळतात. नागपूरजवळील गुंफेत लेख सापडल्याचे वृत्त नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. देवळामध्ये भिंतीत लेख सांपडलेले आहेत. उदाहरणार्थ, नांदगाव खंडेश्वर येथील यादवकालीन लेख. देवळाच्या तुळवटावरील लेख पंढरपूरला होयसळ राजा सोमेश्वराचा आहे. यादवराजा महादेव याचा अप्तोर्याम यज्ञ केल्याचा उल्लेख असलेला लेख तेथे खांबावर आहे. कित्येक वेळा बौद्धस्तूपाच्या सभोवताली असलेल्या स्तंभांवर लेख आढळतात. हे स्तंभ बौद्ध श्राविकांनी, उपासिकांनी दान दिलेले असतात. अशा स्तंभांना दानस्तंभ म्हणतात. अशा तऱ्हेचे दानस्तंभ नागपूरजवळ पवनी येथील उत्खननात सांपडलेले आहेत. मूर्तीच्या आसनपट्टीवर ज्याने मूर्तीचे दान केले असेल त्याचे, आणि त्या मूर्तीच्या कारागिराचे नाव आढळते. विदर्भातील अकोला जिल्ह्यातील काटा या गावी यादवराजा रामदेवराजाच्या वेळचा मूर्तीलेख आहे.

**ध्वजस्तंभ** : देवळासमोर स्तंभ उभारतात त्यास ध्वजस्तंभ म्हणतात. बेसनगर येथे हेलिओडोरस या ग्रीक राजदूताचा लेख ध्वजस्तंभावर आहे. अशा तऱ्हेचा प्राचीन ध्वज-स्तंभ महाराष्ट्रात नाही.

**जयस्तंभ** : पूर्वीच्या काळी दिग्विजयानंतर राजेलोक कीर्तीस्तंभ उभारीत. अलाहा-बाद येथील स्तंभावर समुद्रगुप्ताच्या दिग्विजयानंतर कोरलेला लेख आहे. अशा तऱ्हेच्या लेखाला प्रशस्ती म्हणतात. अशा तऱ्हेची प्रशस्ती नाशिक येथे सातवाहन सम्राट गौतमी-पुत्र सातकर्णी याची आहे. महाराष्ट्रात अशा तऱ्हेचा जयस्तंभ नाही.

**वीरगळ** : एखाद्या गावातील शूर वीराने ग्रामरक्षणासाठी बलिदान केले तर गावकरी त्याच्या स्मरणार्थ शिळा उभारीत. शिळेवर घोड्यावर स्वार झालेला वीर दाख-विलेला असतो. दोन्ही बाजूला चंद्र–सूर्य दाखविले असून खाली वीराचे नाव, गाव

लिहिलेले असते. महाराष्ट्रात वीरगळ आहेत पण त्याखाली लेख नाहीत. कर्नाटकात लेखयुक्त वीरगळ पुष्कळ आहेत.

पतिनिधनोत्तर सुवासिनी स्त्री सती गेली तर तिच्या नावाने 'सतीचा दगड' उभारीत.

## भूर्जपत्र :

भूर्जपत्राचा लेखनासाठी उपयोग करण्याची कला भारतात फार प्राचीन काळापासून आहे. सिकंदरच्या स्वारीच्या बरोबर असलेल्या कर्टिअस याने भारतीय लोक भूर्जपत्राचा लेखनासाठी उपयोग करीत असल्याचे नमूद केले आहे. हिमालयामध्ये भूर्जवृक्ष विपुल प्रमाणावर आढळतात. भूर्जवृक्षाच्या अंतर्साली काढून त्या घासून गुळगुळीत करण्याची आणि तिला चकाकी आणण्याची कला काश्मिरी पंडितांना अवगत होती. संस्कृत वाङ्मयामध्ये भूर्जपत्राचे कितीतरी उल्लेख आहेत. मध्यआशियातील खोतान येथे दुसऱ्या शतकातील खरोष्ठी लिपीत भूर्जपत्रावर लिहिलेली धम्मपदाची पोथी मिळाली आहे. नवव्या शतकापासून भूर्जपत्रावर लिहिलेल्या पोथ्या ऑक्सफोर्ड, व्हिएन्ना, बर्लीन आणि पुणे येथे भांडारकर इन्स्टिटयूटमध्ये आणि डेक्कन कॉलेजमध्ये आहेत.

**ताडपत्र :** ताडपत्राचा दक्षिण भारतात विशेष उपयोग करीत असत. तक्षशिलेला इ. स. पहिल्या शतकातील ताम्रपट सापडला आहे. त्याचा आकार ताडपत्रासारखा आहे. गौतमबुद्धाच्या मृत्युनंतर लगेच भरलेल्या धर्मपरिषदेत विधिनियम ताडपत्रावर लिहिले होते असे ह्युएनत्संगाने लिहून ठेवले आहे. उपयोगापूर्वी ताडपत्रे वाळवून पुन्हा पाण्यात उकळून काढून पुन्हा वाळवीत. पानाला गुळगुळीतपणा येण्यासाठी शंखाने अगर दगडाने घासून योग्य आकार कातरीत. काश्मीर आणि पंजाबचा काही भाग सोडला तर भारतात इतरत्र लोक ताडपत्राचा लेखनासाठी पुष्कळ उपयोग करीत असत. दक्षिण भारतात ताडपत्रावर लोखंडी अणकुचीदार सुयीने टोचून अक्षरे लिहीत आणि त्यानंतर त्यावर कोळसा अगर शाई लावीत. ताडपत्राच्या पोथीला पानाच्या मध्यभागी गोल भोक पाडीत. त्यामध्ये दोरा ओवून लिहिलेली सर्व पाने एकत्र बांधीत. पानांची लांबी जास्त असेल तर दोन भोके ठेवीत. त्याच आकाराच्या दोन लाकडी पट्टया करून त्यामध्ये पोथी ठेवीत असत. नेपाळमधील ताडपत्राच्या पोथीसंग्रहात सातव्या शतकातील स्कंदपुराण आणि लंकावतार या ग्रंथाच्या ताडपत्राच्या प्राचीन पोथ्या आहेत.

## कातडे :

भारतात कातड्यावर लिहिलेले लेख अद्याप सापडले नाहीत. धार्मिकदृष्टया कातडे निषिद्ध मानल्यामुळे कातड्याचा लेखनासाठी उपयोग करीत नसत. सुबंधूच्या वासवदत्ता नाटकात हरिणाच्या कातड्याचा लेखनासाठी उपयोग करीत असल्याचा उल्लेख आहे.

कातड्यावरील लेख पश्चिम आशिया आणि युरोपमध्ये सापडले आहेत. खरोष्ठीमधील काही लेख उंटाच्या कातड्यावर आढळतात.

## कापड :

इ. स. पू. तिसऱ्या शतकापासून भारतात कापडाचा लेखनासाठी उपयोग केलेला दिसून येतो. गेल्या शतकापर्यंत कर्नाटकातील काही व्यापारी लोक कापडावर लिहीत असत. कापडाला चिंचोक्याची अगर कणकेची पातळ खळ लावून गुळगुळीत करीत व त्यावर खडूने अगर पेन्सिलीने लिहीत असत. अशा तऱ्हेची कापडी पुस्तके शृंगेरीच्या मठांत आहेत. हर्षचरितात कापडावरील लेखांचा उल्लेख आहे. महाराष्ट्रात दासोपंताची पासोडीवरील पोथी आहे.

## कौशेयपट :

सुती कापडाप्रमाणेच रेशमी कापडाचाही लेखनासाठी उपयोग करीत असल्याचे दिसून येते. रेशमी कापडाचा सर्रास उपयोग करीत नसत. जेसलमेर येथे चौदाव्या शतकातील रेशमी कापडावरील लिहिलेली जैनसूत्रांची यादी सापडली आहे.

**फलक :** लाकडाच्या फळ्यावर लिहिण्याचा प्रघात फार प्राचीन काळापासून आहे. महावग्ग ग्रंथात आणि जातकात लाकडी पाटीचा उल्लेख आहे. विनयपिटकांत धर्मसंमत देहत्यागाचे विधिनियम काष्ठफलकावर लिहू नयेत असे सांगितले आहे. ललितविस्तरांत गौतमबुद्धाच्या चंदनाच्या पाटीचा उल्लेख आहे. भाज्याला लाकडी तुळईवर ब्राह्मी लेख आहे.

**सुवर्णपत्र :** प्राचीन काळी श्रीमंत सावकार आपल्या कुलांतील महत्त्वाच्या घटना सुवर्णपत्रावर लिहीत. धार्मिक नीति-नियमही त्यांवर कोरवून घेत. सुवर्ण अतिशय दुर्मिळ असल्यामुळे त्याचे पुरावे अत्यल्प आहेत. तक्षशीलेजवळ गांगु येथील स्तूपांत सोन्याच्या पत्र्यावर खरोष्ठी लिपीत लिहिलेले दानपत्र सापडले आहे.

**रुपे :** सोन्याप्रमाणेच रुपे दुर्मिळ असल्यामुळे रुप्याच्या पत्र्यावरील लेखांचे अवशेष अत्यल्प आहेत. तक्षशीलेला रुप्याच्या पत्र्यावरील लेख सापडला आहे. जैन मंदिरातून चांदीच्या पत्र्यावर यंत्रे आढळून येतात.

**तांबे :** भारतीय प्राचीन लेखन सामुग्रीमध्ये तांब्याचा अग्रक्रम लागेल. राजेलोक, ब्राह्मणांना पर्वकाळी दान देत असत त्यावेळी ताम्रपत्र कोरवून तो ब्राह्मणास समारंभपूर्वक अर्पण करीत. ते दान पिढ्यान्‌पिढ्या असल्यामुळे ते ब्राह्मण जतन करून ठेवीत. महाराष्ट्राच्या इतिहासात वाकाटककालीन ताम्रपट हेच सर्वात प्राचीन ताम्रपट आहेत.

ते तयार करण्याची पद्धत असे. ताम्रशासन तयार करणे, लिहिणे आणि तो प्रत्यक्षतः देणे वगैरेसाठी कोणकोण अधिकारी लागत यासंबंधीची माहिती वेगळी दिली आहे.

**लोखंड :**

लोखंड गंजत असल्यामुळे लोखंडी लेखपत्रे आढळून येत नाहीत. दिल्लीजवळ मेहरौली येथे सापडलेला चंद्र नावाच्या राजाचा लेख आहे तो बहुधा गुप्तवंशाच्या द्वितीय चंद्रगुप्ताच्या वेळचा असावा असा विद्वानांचा तर्क आहे. मराठेशाहीत लोखंडी तोफांवर फारसी लेख आढळून येतात.

**पितळ व कासे :** पितळ, कासे यांचा लेखनासाठी विशेष उपयोग होत नसे. परंतु पितळी घंटांवर देणगीदारांची नावे आढळून येतात.

**ब्रॉन्झ :** ब्रॉन्झ धातूच्या मूर्तींच्या आसनपट्टीवर मूर्तीचे नाव, लेख लिहिलेले आढळतात. माणिक्याल येथे कुशाणकाळातील लिपी असलेला ब्रॉन्झचा लहान करंडक सापडला आहे. सोहगौडा येथे सापडलेला लेख ब्रॉन्झच्या पातळ पत्र्यावर लिहिलेला आहे.

शिलालेख आणि ताम्रपट ही जरी लेखनाची मुख्य साधने असली तरी धातूवर लिहिलेला ऐतिहासिक काळातील मजकूर इतिहासलेखनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असतो.

**शंख :** आंध्रप्रदेशात श्रीकाकुलम् जिल्ह्यातील शालिहुंडम येथे सापडलेल्या बौद्ध अवशेषांत शंखावरील लेख सापडला आहे. हस्तिदंताच्या पट्ट्या, कासवाची पाठ यांचाही लिहिण्यासाठी उपयोग करीत असत.

**मातीच्या विटा :** मातीच्या विटांवर लिहिण्याचा प्रघात फार प्राचीन काळापासून आहे. बौद्ध धारणीसूत्रे विटांवर लिहिलेली आढळून येतात. पहिल्या शतकातील दाममित्र आणि शीलवर्मन् यांनी यज्ञ केल्याचे लेख मातीच्या विटांवर आहेत. दाममित्राच्या लेखाची वीट लखनौ संग्रहालयात आहे. मातीच्या विटांवर लिहिलेले लेख भिंतीमध्ये अगर यज्ञवेदीवर बसवीत असत. मृत्कुंभ ओले असताना कुंभार एकादेवेळी आपले नाव लिही, खूण करी. तक्षशिला, कौशांबी आणि नालंदा येथील उत्खननात मृण्मय मुद्रा सापडलेल्या आहेत. या मुद्रांवर व्यक्तिनामे किंवा बोधशब्द अगर वाक्य असते. मातीच्या विटांवर अगर दानमुद्रांवर त्या ओल्या असताना लिहीत आणि नंतर त्या भाजून काढीत.

**कागद :** चिनी लोकांनी इ. सनाच्या पहिल्या शतकात कागद तयार केला. पुढे चिनी प्रवाशांच्याबरोबर ही कला भारतात आली. परंतु अलेक्झांडरबरोबर हिंदुस्तानात आलेल्या निआर्कसने भारतीय लोक कापूस कुटून कागद तयार करीत असे नमूद केले

आहे. हातकागद करण्याची कला भारतीयांना अवगत होती. या कागदाला तांदुळाची खळ लावून शंखाने घोटीत असत. भोज राजा राज्य करीत असताना माळव्यात कागद तयार करण्याच्या कलेचा प्रसार होता असे संशोधकांचे मत आहे. काश्मीरमध्ये अकराव्या शतकातील आणि गुजराथेत तेराव्या शतकातील कागदावरील हस्तलिखित ग्रंथ सापडले आहेत. मात्र एवढे खरे की मुसलमानी अमदानीपासून भारतात कागदाचा प्रसार जास्त झाला.

**शाई** : लेखनासाठी शाईचा उपयोग फार प्राचीन काळापासून अस्तित्वात होता. पक्की शाई करण्यासाठी पिंपळाच्या डिंकाची बारीक भुकटी पाण्यात मिसळून मडक्यात घालून उकळीत असत. त्यात टाकणखार आणि लोध्र मिसळून फडक्यावरून गाळीत. भूर्जपत्रावरील हस्तलिखित लिहिण्यासाठी बदामाच्या साली जाळून, त्याची वस्त्रगाळ पूड गोमूत्रात उकळून शाई तयार करीत. या शाईने लिहिलेला मजकूर पाण्याने धुतला जात नसे. मोहरीच्या तेलाच्या दिव्याची काजळी धरून काळी शाई तयार करीत. अळित्या-पासून लाल शाई आणि हरताळापासून पिवळी शाई तयार करीत. सोनेरी आणि रुपेरी शाईसाठी सोन्याची आणि रुप्याची भुकटी शाईत मिसळत. पाणिनीच्या अष्टाध्यायी-मध्ये आणि अशोकाच्या लेखात 'लिपी' हा शब्द आलेला आहे. त्यावरून शाईने लिहिण्याची प्रथा फार प्राचीन होती असे म्हणावयास हरकत नाही. अजंठ्याच्या लेण्यांतून इ. २-३ शतकांतील भातुरागांनी लिहिलेले लेख आहेत.

**लेखणी** : लेखणी या शब्दात कोरणी, कुंचला, बोरू या सर्वांचा अंतर्भाव केलेला दिसून येतो. 'ललितविस्तर' या ग्रंथात 'वर्णक' हा शब्द आलेला आहे. राजशेखराच्या काव्यमीमांसेत लोहकंटकाचा, लाकडी फळ्याचा आणि खडूचा उपयोग करीत असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. अजंठ्याच्या लेण्यांत कुंचल्याने अक्षरे लिहिली आहेत.

प्राचीनकाळातील लेखनकला, लेखनकलेचे ऐतिहासिक महत्त्व, लेखनकलेचा अभ्यास, ताम्रपट आणि शिलाशासनांतील ऐतिहासिक दुवे, लेखनसाहित्य, मुद्रा यांचे स्वरूप विशद केल्यानंतर या सर्वांमधून राजकीय, सामाजिक, धार्मिक जीवन कसकसे साकार होत गेले याचे दर्शनही तितकेच किंबहुना जास्त मनोज्ञ आहे.

## राजकीय जीवन

महाराष्ट्रातील राजकीय जीवन कसे होते, त्याचे शासन, शासनाधिकारी कसे होते याची वेगळ्या विभागांत चर्चा झालेली असल्यामुळे येथे केवळ धावते स्वरूपच सांगा-वयाचे आहे. राजकीय इतिहासाचे लेखन करताना कोणते लेख फार उपयोगात आले हेच मुख्यत्वे सांगावयाचे आहे.

महाराष्ट्रात मौर्यकाळातील दोन लेख सापडले आहेत. एक सोपारा येथे सापडलेला अशोकाचा लेख आणि दुसरा चांदा जिल्ह्यातील देवटेक गावी. या लेखात प्राण्याचे बंधन आणि हिंसा करू नये अशी आज्ञा ब्राम्ही लिपीत कोरवली आहे. अशोकाच्या पाचव्या लेखात कोकणचा अपरान्त असा उल्लेख आहे तर तेराव्या लेखात विदर्भातील भोजांचा उल्लेख आहे. यानंतर सातवाहन राजाचे लेख सापडतात. जुन्नरजवळ नाणेघाटात सातवाहन सम्राज्ञी नागणिका हिचा लेख आहे. ती आपला मुलगा वेदिश्री याची प्रतिनिधी म्हणून राज्य करीत होती. या लेखाची भाषा प्राकृत आहे. नाशिक, कार्ले येथे गौतमीपुत्र सातकर्णी आणि पुळुमावी यांचे लेख आहेत. गौतमीपुत्राने क्षहरात वंशाचा उच्छेद केला. शक, यवन, पल्लव यांचे निर्दालन केले. सौराष्ट्र माळव्यापर्यंत आपल्या राज्याच्या मर्यादा नेल्या. रामकृष्णाप्रमाणे असणाऱ्या या वीर पुरुषाने सातवाहनकुलाच्या यशाची प्रतिष्ठापना केली. इ. २५० च्या सुमारास या साम्राज्याचा अस्त झाला. या वंशातील शेवटचा राजा चतुर्थ पुळुमावी याची नाणी अकोला जिल्ह्यातील तऱ्हाळा या गावी सापडली आहेत. सातवाहनानंतर महाराष्ट्रात आभीर राजे उदयास आले. नाशिकला आभीर राजा ईश्वरसेन याचा लेख आहे. हा मोठा पराक्रमी राजा होता. याने आभीर शक चालू केला असा विद्वानांचा तर्क आहे. हाच शक पुढे कलचुरी शक म्हणून ओळखला जाऊ लागला. ख्रिस्तपूर्व पहिले शतक आणि त्यानंतर दोन तीन शतकांच्या काळात पश्चिम महाराष्ट्रात कुडा, महाड, कान्हेरी, नाशिक, जुन्नर, कार्ले, बेडसे येथील लेण्यांमधून प्राकृत लेख आहेत.

आभीरांनंतर उत्तर महाराष्ट्रात वाकाटक आणि दक्षिणेस राष्ट्रकूट असे दोन राजवंश उदयास आले. वाकाटकांचा उदय साधारणपणे इ. स. २५०–२७० च्या सुमारास झाला. या वंशाचा संस्थापक विंध्यशक्ती. वाकाटकांच्या नंदिवर्धन आणि वत्सगुल्म शाखा अशा दोन शाखा होत्या. वत्सगुल्म शाखेच्या द्वितीय विंध्यशक्तीचा वाशीम ताम्रपट इ. स. १९३९ साली सापडला आणि त्यानंतर वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेची माहिती उजेडात आली. नंदिवर्धनशाखेमध्ये एकूण अकरा राजे झाले. पैकी प्रथम प्रवरसेनाचा मुलगा गौतमीपुत्र अल्पायुषी निघाल्यामुळे गादीवर आला नाही. वत्सगुल्म शाखेचे एकूण सहा राजे गादीवर आले. हरिषेण हा या शाखेचा शेवटला राजा झाला. वाकाटकांच्या अमात्यांचे लेख अजंठा आणि घटोत्कच लेण्यांत आहेत. आतापर्यंत वाकाटकांचे सुमारे वीस ताम्रपट सापडले आहेत. शिलालेख मात्र दोन आहेत. देवटेक येथे प्रथम रुद्रसेनाचा लेख आहे आणि दुसरा वत्सगुल्म शाखेचा राजा देवसेन याचा लेख वाशीमपासून नऊ मैलावर हिस्सेबोराळा येथे सापडला. हा शके ३८० म्हणजे इ. स. ४५८ काळातील आहे. शककालाचा उल्लेख असलेला वाकाटकांचा एवढाच शिलालेख आहे. या बराच्याच्या ताम्रपटांवरून आणि शिलालेखांवरून वाकाटककालीन महाराष्ट्राची ओळख डॉ. मिराशी यांनी आपल्या ' वाकाटकनृपती आणि त्यांचा काल ' या पुस्तकात करून दिलीआहे.

वाकाटकांच्या साम्राज्याची विभागणी राष्ट्र, राज्य, मार्ग, मुक्ती, भोग, कट, संगमिका आणि ग्राम अशी झाली होती आणि राज्याधिकृत, सचिव आणि राजुक असे त्यांचे शासनाधिकारी होते.

वाकाटककाळी कुंतल देशावर राष्ट्रकूटांचे साम्राज्य होते. राष्ट्रकूटवंशाचा मूळ पुरुष मानांक याने विदर्भ व अश्मक देश जिंकले होते. परंतु अजिंठ्याच्या लेखावरून वाकाटक-नृपती हरिषेण याने कुंतलाधिपतीचा आणि त्रैकूटकांचा पराभव केल्याचे स्पष्ट होते. नुकत्याच सापडलेल्या त्रैकूटक राजा मध्यमसेन आणि त्याचा मुलगा विक्रमसेन यांच्या ताम्रपटांवरून हरिषेणाच्या अस्तानंतर मध्यमसेनाने आपले साम्राज्य सावरले; परंतु त्याचा मुलगा विक्रमसेन याने कलचुरींचे सार्वभौमत्व स्वीकारल्याचे दिसून येते. वाकाटका-नंतर काही काळ महाराष्ट्रावर विष्णुकुंडी राजा माधववर्मा याची सत्ता होती हे त्याच्या खानापूर ताम्रपटावरून कळते. माधववर्म्याने आंध्र, कोसल, महाराष्ट्र व कर्नाटक आपल्या अधिसत्तेखाली आणले. त्याने दीर्घकाल राज्य केले. त्याच्या अगोदर त्याचे पुत्र वारले. त्याच्या नातवांमध्ये राज्याची वाटणी झाली. द्वितीय माधववर्मा या नातवास महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादी देश मिळाले.

यानंतर दक्षिण महाराष्ट्रात राष्ट्रकूटांनी आपले डोके वर काढले. महाराष्ट्राच्या इतिहासात राष्ट्रकूटांचे स्थान मानाचे आहे. कृष्णानदीच्या खोऱ्यात, पाचव्या शतकात या घराण्याचा उदय झाला. सातारा जिल्ह्यातील माण हे त्यांच्या राजधानीचे ठिकाण. वाकाटक आणि राष्ट्रकूट राज्ये लागून असल्यामुळे त्यांच्यात वैरभाव उत्पन्न झाला होता. परंतु ज्येष्ठ वाकाटक शाखेच्या नरेन्द्रसेन आणि कुंतल राजकन्या अज्झितभट्टारिका यांच्या विवाहामुळे उभय कुलांत मैत्री झाली.

सहाव्या शतकात विदर्भात दुसरे राष्ट्रकूट घराणे उदयास आले. या घराण्याचे एकूण चार ताम्रपट सापडले आहेत. विदर्भातील राष्ट्रकूट वंश प्रथम कलचुरींचा मांडलिक होता. ऐहोळे येथील सुप्रसिद्ध शिलालेखात चालुक्यसम्राट् द्वितीय पुलकेशी तीन महा-राष्ट्रांचा स्वामी झाला असे म्हटले आहे. चालुक्य घराणे आठव्या शतकात लयास गेले आणि मराठवाड्यात राष्ट्रकूट राजे उदयास आले. या घराण्याची प्रारंभीची राजधानी मयूरखंडी ही होती. तिची स्थलनिश्चिती अद्याप झाली नाही. या घराण्यातील पहिला श्रेष्ठ राजा दन्तिदुर्ग याचे शिलालेख व ताम्रपट मराठवाड्यात वेरूळजवळ सापडले. त्यावरून मराठवाडा परिसरातच मयूरखंडी राजधानीचा ठावठिकाणा असण्याची शक्यता आहे. राष्ट्रकूट घराण्यात पराक्रमी राजांची जणू मालिकाच होती. एकापेक्षा एक वरचढ असे अतुल पराक्रमी राजे या वंशात झाले. या घराण्यातील प्रथम कृष्णाने वेरूळचे कैलास लेणे बांधले. ध्रुवराज्याच्यावेळी राष्ट्रकूटसाम्राज्य शिंगेला पोचले होते. या वंशातील तृतीय इंद्र हा अत्यंत पराक्रमी राजा झाला. उत्तरेकडे स्वारी करून त्याने प्रतिहार सम्राट्ची राजधानी कनोज उद्ध्वस्त केली. राष्ट्रकूट वंशातील राजे पराक्रमी, बलाढ्य असून

या वंशाने दक्षिण हिंदुस्तानात दबदबा निर्माण केला. राष्ट्रकूटांच्या ताम्रपटावरून तत्कालीन राजकीय शासनविभागाची कल्पना येते. देश, नाडू, राष्ट्र, विषय, भुक्ति इत्यादी शासनविभागांत त्याच्या साम्राज्याची विभागणी झाली होती. याखेरीज विशेष म्हणजे अंकयुक्त शासनविभाग. उदाहरणार्थ करहाटक ४०००, श्रीनगर २४००. या अंकांचे विवेचन डॉ. अळतेकर यांनी आपल्या ' Rastrakuta and their times ' या पुस्तकात केले आहे. परंतु अजून त्याची निश्चिती झाली नाही. अंक शासनकर निदर्शक अथवा ग्रामनिदर्शक असावेत, असा विद्वानांचा तर्क आहे. राष्ट्रकूटांच्या शासनव्यवस्थेत राष्ट्रकूटांनी अरब प्रशासकांची नेमणूक केली होती. ताजिकवंशी सुगतिपाने संजाण येथील देवीच्या देवालयाला कोलिमहार विषयातील काणाडुक नावाचे गाव दान दिले. शासनव्यवस्थेमध्ये महाजनसभेचे स्थानही महत्त्वाचे होते. लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींची ही सभा होती. या सभेने मनोरच्या ब्रह्मदेवाच्या देवळासाठी श्रीपुरनगर हे गाव दान दिले.

राष्ट्रकूटानंतर दक्षिणेकडे कल्याणी चालुक्य, पश्चिमेकडे शिलाहार व कदंब राजांनी डोके वर काढले. होट्टल शिलालेखात सोमेश्वर आणि त्याची राजधानी कल्याण यांचा उल्लेख आहे. त्याचा नागवर्म हा सेनापती होता. त्याच्या मदतीने त्याने कोकण-दिग्विजय केला. परमारांवर विजय मिळविला आणि सेवूणाधिपतींना चळचळा कापावयास लावले. आहवमल्लाने आपली बहीण आवल्लदेवी भिल्लमाला दिली आणि लग्नसंबंध प्रस्थापित केले. अर्धापूर येथील रट्टकुलातील लेखावरून बल्लालाने मल्लगीस यादवांचे राज्य दृढमूल करण्यास मदत केल्याचे दिसून येते. इ. स. ९७५ च्या सुमारास उत्तर चालुक्यांनी राष्ट्रकूटांचा उच्छेद केल्यावर पश्चिमेस शिलाहारांनी स्वातंत्र्य पुकारले. शिलाहारनृपति अरिकेसरी याने संजाणजवळील प्रदेश मुसलमानांकडून जिंकून आपल्या राज्यास जोडला. या सुमारास गोव्याकडे कदंबांचे प्राबल्य वाढत होते. कदंबराजा जयकेशी यांचा पणजी येथील ( शक ९८१ ) ताम्रपटात कदंबाच्या इतिहासाविषयी आणि त्यांच्या शासनव्यवस्थेबद्दल बरीच माहिती असल्याचे दिसून येते. या ताम्रपटात दान घेणारा च्छडम नौवित्तिक होता. या च्छडमाने कदंबराजा गुहल्ल यास बुडताना वाचविले. जयकेशीने त्यास आपला मुख्यमंत्री नेमले. परकीय लोकांना सहाय्य करण्यात कदंबराजाचा फार मोठा हात होता. शिलाहार व कदंब राजांमध्ये कायम वैरभाव होता याचा फायदा अर्थातच नव्याने प्रस्थापित होऊ पाहणाऱ्या यादवराजांनी घेतला. यादवराजा सिंघण याने शिलाहारनृपति द्वितीय भोज याचा बीमोड करून महाराष्ट्रात आपले बस्तान बसविले.

नवव्या शतकात यादववंशाचा उदय नाशिक जिल्ह्यात झाला. चौदाव्या शतकाच्या मध्यापर्यंत या घराण्यातील राजांनी महाराष्ट्रावर राज्य केले. शके १२३२ मधील पुरुषोत्तमपुरी येथील लेख हा यादव रामदेवाचा शेवटचा लेख आहे. यादवांच्या शिलालेखांतून महाराष्ट्रातील आम्रदेश, कन्हैरीदेश, करहाट २०००, खेटदेश, कोल्हापूरदेश,

कोकणदेश, माणदेश, सेऊणदेश, वज्रकारदेश, वेणुग्रामदेश, वरदातट देश, भांडागार देश, धारोरादेश इत्यादी 'देशांची' नावे आली आहेत. आंबे येथील लेखात यादवांचा सेनापती खोलेश्वराच्या पराक्रमाचे वर्णन आहे यादवांच्या काळात मराठीला राजाश्रय मिळाला. आंबे लेखात ३५ ओळी संस्कृतात असून नंतरच्या ओळी मराठी आहेत. त्यामध्ये पृष्ठमात्रेचा उपयोग आहे. यादवांच्या लेखातून काही वैशिष्ट्ये आढळून येतात. त्याचे हे उदाहरण आहे. मार्डी येथील लेखात 'कुलकर्णी' हा शब्द आला आहे' नेऊरगाव येथील रामचंद्राच्या लेखात नेवाश्याच्या अग्रहाराचा 'निधिवासखंपणक' असा उल्लेख आला आहे. 'खंपणक' हे नाव कर्नाटकात विशेष आढळते.

प्राचीन काळातील राजवटींची माहिती, तत्कालीन शासनव्यवस्था यांचे ज्ञान होण्यास ताम्रपट, शिलालेख ही महत्त्वाची साधने आहेत. नवे शिलालेख, ताम्रपट सापडले म्हणजे कित्येकदा जुन्या कल्पना दुरुस्त होतात. नव्या माहितीची भर पडते आणि म्हणूनच या ऐतिहासिक द्रव्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

## सामाजिक आणि धार्मिक स्वरूप

महाराष्ट्रातील शिलालेख आणि ताम्रपट यावरून प्राचीन ऐतिहासिक कालातील होणारे समाजाचे दर्शन मोठे सुभग आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशीच समाजरचनेची चौकट होती.

सोपाऱ्याच्या अशोकाच्या लेखावरून बौद्धधर्मप्रसाराची साक्ष पटते. सातवाहन-सम्राज्ञी नागणिकेने नानाविध यज्ञ करून ब्राह्मणांना उदंड दक्षिणा दिली. सातवाहनराजे सनातनधर्माचे पुरस्कर्ते होते. गौतमीपुत्रास 'एक-ब्राह्मण' असे नाशिकच्या लेखात म्हटले आहे. वर्णसंकर होऊ न देण्याची दक्षता गौतमीपुत्राने घेतली होती. राजवटीमध्येबदल झाला तरी समाजजीवनात ढवळाढवळ झालेली दिसून येत नाही. कित्येक वेळा धर्म बदलला तरी पूर्वाश्रमीच्या वर्णाची स्मृती नष्ट होत नसे. वर्णव्यवस्थेचा तत्कालीन समाजावर इतका पगडा होता की कुड्याचा एक दानकर्ता बौद्ध उपासक अपितुल स्वतः ब्राह्मण असल्याचे सांगतो. सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट राजे ब्राह्मण असले तरी त्यांनी क्षत्रिय-धर्माचा स्वीकार केलेला दिसतो. वाकाटकांनी आपल्या विष्णुवृद्ध गोत्राचा आवर्जून उल्लेख केला आहे. सातवाहन आणि वाकाटक घराण्यांतील राजांनी राजकीय स्थिरतेसाठी अनुक्रमे क्षत्रप आणि गुप्त घराण्यांशी सोयरीक जोडली होती. महाक्षत्रप रुद्रदामनाच्या मुलीशी गौतमीपुत्राच्या मुलाचा विवाह झाला तर वाकाटकनृपती द्वितीय रुद्रसेन याने द्वितीय चंद्रगुप्ताची कन्या प्रभावतीगुप्ता हिच्याशी विवाह केला. तत्कालीन समाजातील हे अनुलोम विवाहाचे उदाहरण आहे. वत्सगुल्मशाखेचा राजा हरिषेण याचा मंत्री सोम याने क्षत्रियकन्येशी विवाह केला होता. ब्राह्मणांनी क्षत्रियधर्म आचरल्याची

इतिहासांत पुष्कळ उदाहरणे आहेत. राष्ट्रकूट राजा चतुर्थ गोविंद याच्या कळस येथील लेखात रविदास दीक्षित आणि विंशोत्तर दीक्षित या दोन सोमयाजी ब्राह्मण सेनापतींच्या पराक्रमाचे वर्णन आहे. आईच्या गोत्रावरून मुलाच्या नामकरणाची प्रथा सातवाहन कालात फार लोकप्रिय दिसते. उदाहरणार्थ, गौतमीपुत्र, वासिष्ठिपुत्र, कौशिकीपुत्र इत्यादी सातवाहनराजांची नावे आहेत.

शिलालेखांतून क्षत्रियवर्णाच्या महारथी, महाभोज, महासेनापती इत्यादींचा उल्लेख आहे. पश्चिम महाराष्ट्रात झालेल्या बौद्धधर्माच्या प्रसाराची प्रसादचिन्हे अजून अस्तित्वात आहेत. कुडा, जुन्नर, कोंडाणे, कार्ले, भाजे, बेडसे येथील शैलगृहांतून दान-कर्त्यांची नावे आहेत. त्यात समाजातील अनेक थरातील लोकांची नावे आली आहेत. श्रेष्ठी ग्रहपति, सुवर्णकार, मालाकार, गंधिक, लोहवाणिज्य, तिलपिष्टक कुलरिक इत्यादी धंदेवाईक लोकांनी शैलगृहाच्या बांधणीस हातभार लावलेला आहे. या संस्कृतिनिदर्शक कार्यात समाजातील विविध जातींच्या लोकांनी तर भाग घेतलाच परंतु यवनानींही आपला वाटा उचललेला आहे. यवनांना बौद्ध धर्माने जवळ केले. या जवळिकीमुळे या नवागतांना अर्थातच समाजात वेगळे स्थान होते.

समाजाचे श्रेष्ठत्व ठरविण्यास तत्कालीन समाजातील स्त्रियांचा दर्जा कशा प्रकारचा होता हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. महाड, जुन्नर येथील शैलगृहाच्या बांधणीस स्त्रियांनी हातभार लावलेला दिसून येतो. त्यामध्ये उपासिका, श्राविका, हलिका, विधवा स्त्रिया आहेत. समाजातील निरनिराळ्या जातींनी, स्त्रियांनी या कार्यातील आपापला वाटा उचललेला असल्याचे दिसून येते. राजकारणापासूनही स्त्रिया अलिप्त राहिलेल्या नाहीत. सातवाहनसम्राज्ञी नागणिका हिच्या उदाहरणावरून हे स्पष्ट होते. हिने आपला मुलगा वेदिश्री अल्पवयीन असताना राज्यकारभार केला. प्रभावतीगुप्ता हिने वाकाटक-साम्राज्याची धुरा वाहिली. राजमाता सातवाहनसम्राज्ञी नागणिका हिने नानाविध यज्ञ करून अमाप संपत्ती दान केली. गौतमी बलश्री हिने राज्यकारभारात लक्ष दिल्याचा पुरावा नसला तरी तिचा एकूण दबदबा पुष्कळ होता हे मात्र निश्चित.

धर्माचा समाजावर फार मोठा पगडा होता. आपले आसन स्थिर व्हावे यासाठी परकीय राजांनीही धर्मदाने केलेली आहेत. नाशिकच्या नहपानाच्या लेखावरून यासंबंधीची आपणास किती तरी माहिती मिळते. क्षहराज राजा नहपानाने दहा हजार ब्राह्मणांना भोजन दिले. प्रभासतीर्थावर आठ ब्राह्मणांची लग्ने लावून दिली. बौद्धभिक्षूंना गुंफा बांधून दिल्या.

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासात वाकाटक काल 'सुवर्णयुग' गणला होता. वाकाटक राजे सनातन धर्माचे पुरस्कर्ते. 'असोर्याम', 'साद्यस्क', 'राजसूय', 'अश्वमेध' इत्यादी यज्ञ त्यांनी केले. 'महाभैरवभक्त' असे बिरुद त्यांनी घेतले. वाकाटकांचा शेवटचा

राजा हरिषेण याच्या कारकिर्दीमध्ये त्याचा मंत्री वराहदेव याने अजिंठ्यास चैत्यमंदिरे बांधली; त्यास ' सुविथी ' म्हटले आहे. त्या चैत्यमंदिरांत गंगायमुनांचे सुभग शिल्प असून त्यास मंडपरत्न म्हटले आहे. अजिंठा हे महाराष्ट्रांतील पाचव्या शतकातील सांस्कृतिक केन्द्र होते. भारतातील कानाकोपऱ्यांतून तेथे लोक येत असत. मथुरेचा एक विहारस्वामी तेथे आला आणि त्याने बुद्धमूर्तीचे दान केले. दक्षिणेकडून विष्णुकुंडीच्या राज्यांतून एक युगधर नावाचा सूत्रधार आला आणि त्याने आपले नाव कोरून ठेवले.

वाकाटकांनंतर महत्त्वाचा राजवंश म्हणजे ' राष्ट्रकूट ' राजवंश. राष्ट्रकूटांनी बलिचरु वैश्वदेव करण्यासाठी ब्राह्मणांना दाने दिली. प्रथम अमोघवर्ष हा महालक्ष्मीचा भक्त होता. त्याच्या राज्यात साथीचा रोग आला असता ते संकट दूर व्हावे यासाठी त्याने आपल्या करंगळीचे दान दिले होते. महालक्ष्मीचा भक्त असूनसुद्धा त्याने जैनधर्माला राजाश्रय दिला होता. यावरून त्याची धर्मसहिष्णुवृत्तीच दिसून येते यात शंका नाही.

त्यानंतर यादवराजे आले ते वैष्णवभक्त होते. ब्राह्मणांना उदंड दाने त्यांनी दिली. तरीसुद्धा पंढरपूर येथील राजा महादेवाच्या कारकीर्दीत शके ११९२ मध्ये ( इ. स. १२७० ) पंढरपूर येथे यादवाचा सामन्त भानु याने ' असोर्याम ' यज्ञ केला ही गोष्ट विशेष आहे.

## गास येथील मौर्यकालीन लेख

गास हे गाव मुंबईजवळ सोपाऱ्यापासून उत्तरेस दोन मैलांवर आहे. या गास गावाजवळील टेकडीवर ' म ', ' ग ' ही ब्राह्मी अक्षरे असलेल्या किती तरी कापीव शिळा सापडतात. गावाच्या मध्यभागी एक तलाव असून त्याला सभोवताली कठडा बांधलेला आहे. त्या कठड्यात एका शिळेवर मौर्यकालीन लिपीमध्ये केवळ पाच अक्षरे असलेला लेख आहे. सोपाऱ्यास अशोककालीन स्तूप आहे व तेथे राजाच्या आज्ञा असलेले दोन शिलालेख सापडले आहेत हे सर्वांना माहीत आहे. प्रस्तुत लेखात केवळ पाच अक्षरे असून ते एका पुरुषाचे नाव आहे; परंतु हाही एक अतिशय महत्त्वाचा ऐतिहासिक दुवा आहे. सांची, बार्हूट येथील स्तूपबांधणीस सर्वसामान्य लोकांनी हातभार लावलेला होता हे तेथील अवशेषांवरून सर्वज्ञात आहे. महाराष्ट्रात नागपूर-जवळ पवनी येथे स्तूप सापडलेला आहे त्यातही अशा तऱ्हेचे पुरावे सापडलेले आहेत परंतु सोपाऱ्याच्या स्तूपबांधणीस कुणाचा हातभार लागला हे अद्याप माहीत नव्हते. सर्वसाधारणपणे इतर ठिकाणाप्रमाणेच लोकांनी हातभार लावलेला असणार यात शंका नाही परंतु तसा पुरावा अद्याप मिळाला नसल्यामुळे प्रस्तुत नामपट्टिका विशेष महत्त्वाची आहे. या नामपट्टिकेवर मौर्यकालीन लिपीमध्ये ' सातिमितस ' हे नाव आहे. या स्वातिमित्राने स्तुप बांधणीमध्ये नेमके काय केले हे कळावयास मार्ग नाही, तरीसुद्धा तत्कालीन लिपीचा नमुना आणि सोपारा स्तूपबांधणीचा एक दाता या नामपट्टिकेवरून कळतो आणि

म्हणूनच त्या दृष्टीने हा लेख लहान असला तरी अतिशय महत्त्वाचा ठरतो यात शंका नाही.

## पाले येथील ब्राह्मी लेख

पाले हे गाव पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात कामशेतपासून दहा मैलांवर आहे. या गावाजवळील डोंगरावर एका गुंफेत हा लेख आहे. ही गुंफा २२·७५ मीटर लांब, ५·६७ मीटर रुंद, ७·२७ मी. उंच आहे. गुंफेमध्ये एक छोटी खोली असून त्यात दगडात कोरलेले बाक आहे. गुंफेत शिरल्यावर उजव्या हाताला डोळ्याच्या उंचीवर हा लेख आहे. या लेखाखालीच एक पाण्याचे टाके आहे. हे टाके बांधल्याचाच लेखात उल्लेख आहे. लेख लिहिण्यासाठी ५० सेंटिमीटर लांब आणि ४० सें. मी. रुंद अशी जागा गुंफेत तयार केली असून त्यावर हा चार ओळींचा लेख आहे. पहिल्या ओळीत दहा अक्षरे, दुसऱ्या व तिसऱ्या ओळीत अकरा अक्षरे आणि चौथ्या ओळीत दोन अक्षरे आहेत.

**लिपी** :– या लेखातील लिपी ब्राह्मी असून तिचा काळ सर्वसाधारणपणे इ. पूर्व पहिले शतक धरता येईल.

**भाषा** :– या लेखाची भाषा प्राकृत असून तिचे भाजे-बेडसे कुडा कोंडाणे येथील काही लेखांशी साम्य आहे.

**लेखवैशिष्ट्य** :– साधू, उपासक किंवा श्रावक अगर श्राविका यानी पाणपोया, स्तंभ-दान केल्याची महाराष्ट्रातील शैललेखांत पुष्कळ उदाहरणे आहेत; परंतु या लेखाच्या सुरुवातीस मंगलाचरण असलेला एकही प्राचीन लेख महाराष्ट्रात आजवर सापडला नव्हता आणि म्हणूनच हा लेख महत्त्वपूर्ण आहे. इतकेच नव्हे तर जर्मन संशोधक ल्यूडर्स यांनी प्राचीन ब्राह्मी लेखांची जी यादी केलेली आहे, त्यात असणाऱ्या पंधराशे लेखांतही अशा तऱ्हेचे मंगलाचरण नाही. फक्त मथुरेच्या पहिल्या–दुसऱ्या शतकातील लेखात अशा तऱ्हेचे मंगलाचरण सापडते. त्यावरून हा महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन जैनलेख असावा असा कयास करावयास हरकत नाही.

### वाचन

ओळ १ – नमो अरहंतानं कातुन
ओळ २ – द भदंत इदरखितेन लेन
ओळ ३ – कारापित पोढी च साहाकेहि
ओळ ४ – सह

### भाषांतर

अर्हंतास नमस्कार असो. कातूनद (कदाचित हे गावाचे नाव असून इदरखित

आकृती १९



पृ. २५८ ब्राह्मी शिलालेख : पाले

आकृती २०



पृ. १५४

वाकाटक राजा देवसेन याचा शिलालेख : हिस्सेबोराळा

त्या गावचा राहणारा असेल) भदंत इंद्ररक्षिताने आपल्या सोबत्यांसह हे लेणे आणि टाके करविले.

## वाकाटक राजा देवसेन याचा हिस्सेबोराळा येथील शिलालेख

हिस्सेबोराळा हे चारशे वस्तीचे लहान गाव विदर्भातील वाशीम तालुक्यात आहे. हा शिलालेख वत्सगुल्मा या लहानशा नदीच्या काठी सापडला.

हा लेख लांबट चौकोनी दगडावर असून त्याची लांबी १०० से. मी. रुंदी ३५ से.मी. आणि उंची २२½ सें. मी. आहे लेखाची पाचवी ओळ दगडाच्या मध्यभागी चौकटीत लिहिलेली आहे.

लिपी : या लेखाची लिपी पाचव्या शतकातील ब्राह्मीलिपीची दाक्षिणात्य धाटणीची आहे. प्रत्येक अक्षराची उंची २·७५ सें. मि. आहे.

आतापर्यंत पुणे येथील प्रभावतीगुप्तेच्या लेखाखेरीज वाकाटक राजांचे इतर सर्व लेख पेटिकाशीर्षक लिपीमध्ये लिहिलेले आहेत. प्रस्तुत लेख पेटिकाशीर्षक लिपीत लिहिलेला नाही. आतापर्यंत वाकाटकांचे ताम्रपटच सापडले होते. अजंठाच्या भित्तिलेखा-खेरीज दुसरा शिलालेख नव्हता. त्यामुळे प्रस्तुत लेख अतिशय महत्त्वाचा आहे.

भाषा : लेखाची भाषा संस्कृत आहे. पहिल्या दोन ओळी गद्यात असून तिसऱ्या ओळीत 'ताय' या अक्षरानंतर इंद्रवज्रा या वृत्तात दोन्ही ओळी आहेत.

**लेखाचे महत्त्व :** प्रस्तुत लेख ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा आहे. आतापर्यंतच्या वाकाटकाच्या सर्व लेखांत त्यांच्या राज्यकालांचा उल्लेख होता. या शिलालेखात शक ३८० असा स्पष्ट उल्लेख आहे. शके ३८० + ७८ = इ. ४५८ हा त्याचा काल आहे. आतापर्यंत शके ४६५ मधील प्रथम पुलकेशीचा बदामी येथील शिलालेख शककालाचा उल्लेख असलेला सर्वात प्राचीन शिलालेख समजला जाई, परंतु आता हा लेख सर्वात प्राचीन समजता येईल. या लेखामुळे वाकाटक राजवंशातील राजांची वंशावळ व काल ठरविण्यास फार महत्त्वाचा कालोल्लेख उपलब्ध झालेला आहे. पहिल्या ओळीच्या प्रथमार्धात युधिष्ठिर शक दिलेला आहे. तो ३०२७ आहे.

प्रस्तुत लेखावरून वाकाटक राजा देवसेन हा विष्णुभक्त होता हे कळते. त्याचप्रमाणे इ. स. ४५८ मध्ये जुनागढ येथील सुदर्शन तलाव गुप्त राजा स्कंदगुप्त याने दुरुस्त केला. त्याच वर्षी देवसेनाने 'सुदर्शन' नावाचा तलाव बांधला आणि त्यास लेखात 'सत्कीर्तन' असे म्हटले आहे. अग्निपुराणात मंदिरास 'कीर्तन' म्हटले आहे. वेरूळच्या कैलास-लेण्यासही 'कीर्तन' म्हटले आहे. तेराव्या शतकातील सोमेश्वराच्या 'कीर्तिकौमुदी' मध्ये सार्वजनिक बांधकामास 'कीर्तन' म्हटले आहे. 'कीर्तन' हा शब्द येथे एक सत्कृत्य या अर्थाने वापरला आहे.

या लेखात दोन अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. ( १ ) आज्ञाकर ( २ ) कर्म्मोपदेष्टा

## लेखाचे वाचन

ओळ १ –– तस्यत्रिंत्तस ( २० था ) सप्तर्ष्ययूत्तरसवछ ब्द शकानां ३८० वाकाटकानां श्री देवासनस्य.

ओळ २ –– राज्ञः आज्ञाकरेण स्वामिल्लदेवेन आर्येण अस्मिन्काले प्रतिष्ठापितं नाम्ना सुदर्शनं सरः सर्व्वसत्वहि—

ओळ ३ –– ताय चतुर्युगानां परिवर्त्तनानि शशाङ्कसूर्यो प्रिथिवी च यावत्तावममेदं भगवत्प्रसादं सत्कीर्तनं सर्वजनोप.

ओळ ४ –– ………… भोग्यम्.

ओळ ५ –– … बप्यकर्म्मोपदेष्टा.

## भाषांतर

शके ३८० मध्ये वाकाटक राजा देवसेन याच्या आज्ञेनुसार त्याच्या स्वामिल्लदेव नावाच्या अधिकाऱ्याने ' सुदर्शन ' नावाचा तलाव बांधला. चारी युगांच्या अंतापर्यंत पृथ्वी चंद्र, सूर्य यांचे जोपर्यंत अस्तित्व आहे तोपर्यंत या बांधकामाचा सर्व प्राणिमात्रांना उपयोग व्हावा. या बांधकामाचा सल्लागार बप्यक हा होता.

## त्रैकूटक राजा मध्यमसेन याचा माटवण येथील ताम्रपट ( कलचुरी संवत् २५६ )

प्रस्तुत ताम्रपटाच्या शेवटी तेविसाव्या ओळीत ताम्रपटाच्या कालाचा उल्लेख आहे. महाबलाधिकृत महासांधिविग्रहिक कर्काने कार्तिक अमावास्येला प्रस्तुत ताम्रपट लिहिला. त्रैकूटकांच्या इतर तीन ताम्रपटांत कलचुरी संवताचा अवलंब केलेला आहे. तेव्हा या ताम्रपटाचा कालही कलचुरी संवतातच असावा. यात वाराचा उल्लेख नाही. कलचुरी संवत २५६ म्हणजे इ. ५०५ हा काल येतो. जर चालू कलचुरी संवत घेतला तर ८ ऑक्टोबर इ. ५०४ हा काल येईल.

### आशय आणि चर्चा :

ताम्रपटाचे उद्दिष्ट त्यातील नवव्या व तेराव्या ओळीत आले आहे. महाराज मध्यमसेनाने स्वतःच्या आणि आपल्या माता-पित्यांच्या पुण्याभिवृद्धीसाठी हा ताम्रपट कौण्डिण्यगोत्री तैत्तिरीय शाखेच्या शिवस्वामी नावाच्या ब्राह्मणाला दिला होता. तालिकटाहार या विषयातील मंडिकलनि हे गाव ब्राह्मणास बलिचरुवैश्वदेवाग्निहोत्रक्रिया करण्यासाठी दान दिले आहे. लेखांचा प्रारंभ ' स्वस्ति ' या शब्दाने झालेला आहे. नंतरच्या आठ ओळींत मध्यमसेनाची अनेक विशेषणे आहेत. त्रैकूटक राजकुलातील

व्याघ्रसेनाच्या सुरत येथील ताम्रपटातही भगवदपादकर्म्मकर हे बिरुद व्याघ्रसेनाने धारण केलेले आहे. व्याघ्रसेनाच्या नाण्यावर परमवैष्णव ही उपाधी आढळते. या सर्वांवरून त्रैकूटक राजे वैष्णव होते हे निदर्शनास येते.

अपरान्त देशावर आधिपत्य सांगणाऱ्या मध्यमसेनाने हा ताम्रपट अनिरुद्धपुराहून दान दिला आहे. व्याघ्रसेनाचा सुरत ताम्रपट अनिरुद्धपुराहूनच दिलेला आहे. अनिरुद्ध-पूर कदाचित त्रैकूटकांची राजधानी असावी, असा तर्क डॉ. मिराशी यांनी केलेला आहे. सेंद्रकराजा अल्लशक्तीच्या बगुम्रा ताम्रपटात अनिरुद्धपुरीचा उल्लेख आहे. ही दोन्ही गावे भिन्न आहेत का एकच आहेत याविषयीचा अजून तरी निश्चित पुरावा उपलब्ध झाला नाही.

## ताम्रपटाचे महत्त्व :

हा ताम्रपट त्रैकूटकांच्या इतिहासात अतिशय महत्त्वाचा आहे. एक तर त्रैकूटक-वंशातील राजा मध्यमसेन हा इतिहासात नव्याने ज्ञात झाला. कान्हेरी येथे सापडलेला ताम्रपट त्रैकूटकांचा असला तरी त्यात राजाचा उल्लेख नाही. डॉ. मिराशी[२] यांनी व्याघ्र-सेनाच्या नंतरच्या राजाचा असावा असा तर्क केला आहे. त्या ताम्रपटाचा काल कलचुरी संवत २४६ म्हणजे ४९४–४९५ हा आहे. प्रस्तुत ताम्रपट त्यानंतर दहा वर्षांनी दान दिलेला आहे. यातील अक्षरवटिका व्याघ्रसेनाच्या सुरत ताम्रपटातील अक्षरवटिकेशी मिळतीजुळती आहे. त्रैकूटकांच्या इतर दानपत्रांतील मजकूर आणि या ताम्रपटातील मजकूर यामध्ये एकवाक्यता असल्यामुळे मध्यमसेन हा व्याघ्रसेनाचाच मुलगा असावा असा कयास करावयास हरकत नाही. व्याघ्रसेनाच्या सुरत ताम्रपटातील लेखक महासांधि-विग्रहिक कर्क हाच या ताम्रपटातील लेखक आहे. दूतक मात्र शार्दूल आहे.

या ताम्रपटाच्या संशोधनामुळे फार मोठा ऐतिहासिक दुवा उपलब्ध झाला आहे. कान्हेरी ताम्रपटातील राज्यकर्त्याचा अनुल्लेख तत्कालीन अराजकता दर्शवितो यात शंका नाही; परंतु त्यानंतर दहा वर्षांनी मध्यमसेनाचा ताम्रपट उपलब्ध होतो. या घटना मोठ्या अभ्यसनीय आहेत. अजंठ्याच्या सोळाव्या गुंफेतील वाकाटकनृपती हरिषेणाच्या प्रशस्तीमध्ये त्याने त्रिकूट देशाच्या राजाचा पराभव केल्याचा उल्लेख आहे; परंतु त्यात राजाचा उल्लेख नाही. हरिषेणाचा काल सर्वसाधारणपणे पाचव्या शतकाचा शेवट मानला जातो. कान्हेरी ताम्रपटाचा काल त्याच सुमारास आहे. कान्हेरी ताम्रपटातील राजकर्त्याचा अनुल्लेख आणि हरिषेणाच्या अजंठालेखातील त्रिकूटदिग्विजयाचा निर्देश या घटनांची या ताम्रपटामुळे सांगड घालणे शक्य झाले आहे. वाकाटकनृपती हरिषेण याने पराभूत केलेला त्रिकूट देशाचा राजा दुसरा तिसरा कुणी नसून मध्यमसेनच असावा. प्रस्तुत ताम्रपटावरून असे दिसून येते की मध्यमसेनाचे राज्य बळकावल्यानंतर वाकाटकनृपती हरिषेणाची राजवट त्रिकूटदेशावर फार काळ टिकली नाही. लवकरच हरिषेणाचे राज्य

ल्यास गेले. प्रस्तुत ताम्रपटामुळे हरिषेणाचा अंतकाळ ठरविण्यास आणखी नवीन पुरावा उपलब्ध झाला आहे. डॉ. मिराशी यांनी हरिषेणाचा काळ इ. स. ४७५ ते ५०० ठरविला आहे. त्यांच्या विधानास या ताम्रपटातील पुराव्याने पुष्टी मिळते. मध्यमसेनाने आपले राज्य सावरले. कदाचित वाकाटक राजाच्या विरुद्ध उठाव करण्यास त्याने कलचुरींना मदत करून त्याच्या मोबदल्यात आपले स्वातंत्र्य मिळविले असावे; परंतु त्याचा मुलगा विक्रमसेन याने कलचुरीचे वर्चस्व मान्य केले हे त्याच्या नुकत्याच सापडलेल्या कलचुरी संवत् २८४ च्या ताम्रपटावरून स्पष्ट होते.

## त्रैकूटकराजा मध्यमसेन याचा ताम्रपट क. संवत् २५६

ओळ १ स्वस्ति विजयानिरुद्धपुरात्त्रैकूटकानां मातापितृपादानुध्यानतो
भवतत्पादकर्म्मकरः ।
ओळ २ करगतक्रमागतस्फीतापरान्तादिदेशपतिरपरिमितनृपतिनतचरणकमलः ।
ओळ ३ स्वभुजपरिपालनप्रतापाधिगतप्रचुरद्रविणविश्राणनावाप्तसर्व्वदिग्व्यापि
ओळ ४ शुक्लयशाः शारदरजनिकररुचिरवपुरनद्यकालीनपुरुषविशेषसदृशो—
ओळ ५ दारचरितः सुचरितनिदर्शनार्त्थमिवनिर्मितः प्रतिहतसामन्तारातिरन्य—
ओळ ६ नरपतिप्रतिविशिष्टः स्ववंशालङ्कारभूतः प्रभूतप्रवीरसाधनाधिष्ठित—
ओळ ७ दुर्ग्गनगरसागरः सागरगम्भीरगिरिगुरुस्थिरप्रकृतिः प्रकृतिजनम
ओळ ८ नोहरः प्राज्ञसंश्रितगुरुस्वजनसाधुसाधारणधनोभिजनसदृशयन्त्र
ओळ ९ णोपगृहीतस्पृहणीय श्रीः श्रीमहाराजमध्यमसेनः तालिकटाहार
ओळ १० विषयान्तर्ग्गत मण्डिकलनीग्रामप्रतिवासिनोस्समाज्ञापयति विदित
ओळ ११ मस्तु वो यथास्माभिर्मातापित्रोरात्मनश्च पुण्याभिवृद्धये कौण्डिण्य
ओळ १२ सगोत्रतैत्तिरीय ब्राह्मणशिवस्वामिने बलिचरुवैश्वदेवाग्निहोतृक्रियो

पत्रा २

ओळ १३ त्सर्प्पणार्त्थमयं ग्रामोस्स्वेनसीमापरिच्छेदेनैतभ्रातृव्यमुखषष्ठेस्वामिनश्च
ओळ १४ नाङ्गेन सर्व्वदित्यविष्टिपरिहीणो भूमिच्छिद्रन्यायेनाचन्द्रार्क्कार्ण्णवक्षिति
ओळ १५ स्थितिसमकालीन पुत्रपौत्रान्वयभोग्यश्चोरराजापथ्यकारिवर्ज्जमचाट
ओळ १६ भटाप्रावेश्यो ब्रह्मदेयस्थित्या समनुज्ञातस्तदस्मद्वंश्य राजभिरन्यैश्च
ओळ १७ विभवानभावानुबन्धानायुर्व्वियोगानुगतगुणाश्चदीर्घकालानुगुणा
ओळ १८ न्विगणय्य दानं च गुणवतामवदातमपदानमितिप्रमाणीकृत्यशशी
ओळ १९ करशुचिरुचिरचिरायशश्चिचीषुभिरयं ग्रामदायोनुमन्तव्य पाल
ओळ २० यितव्यश्च यस्मादुक्तं भगवता वेदव्यासेन ।। षष्टिवर्षसहस्राणि
ओळ २१ स्वर्ग्गे मोदति भूमिदा आच्छेत्ता चानुमता च तान्येव नरके वसेत ।।
ओळ २२ दूतकशार्दूलः लिखितं महाबलाधिकृत महासान्धिविग्रहिक कर्क्कोणेति
ओळ २३ सं २५६ कार्तिक ब १०५

आकृती २१



त्रैकूटक राजा मध्यमसेन याचा ताम्रपट (१) : माटवण

पृ. १५४-१५५

आकृती २१ अ



त्रैकूटक राजा मध्यमसेन ताम्रपट (२) : माटवण

पृ. १५४-१५५

## त्रैकूटक राजा विक्रमसेन याचा मालवण येथील ताम्रपट

(कलचुरी संवत् २८४)

ताम्रपटाच्या शेवटच्या ओळीत म्हणजे चोविसाव्या ओळीत कालोल्लेख आहे. संवत् २८४ चैत्र वद्य द्वितीया या दिवशी ताम्रपट दान दिलेला आहे. गताब्द पूर्णिमान्त वर्ष असेल तर २७ फेब्रुवारी इ. ५३३, अमान्त असेल तर २९ मार्च इ. ५३३ व चालू वर्षात असेल तर पूर्णिमान्त १० फेब्रुवारी इ. ५३२, अमान्त असेल तर ९ मार्च इ. ५३२.

### आशय आणि चर्चा

प्रस्तुत ताम्रपट त्रैकूटक राजा विक्रमसेन याने नरेन्द्र आणि नारायण माता पिता आणि स्वतःच्या पुण्याभिवृद्धीसाठी दिलेला आहे. बलिचरुवैश्वदेवाग्निहोतृक्रिया करण्यासाठी राजाने हा ताम्रपट कौंडिण्यगोत्राच्या तैत्तिरीय शाखेच्या शिवस्वामी नावाच्या ब्राह्मणाला दान दिला आहे. हा ब्राह्मण कल्लीवन येथे राहणारा होता. अग्रहाराचे नाव महाकटाहार असून फरतटिकनतर्गत पंचामलक हे गाव दान दिलेले आहे.

लेखनाचा प्रारंभ स्वस्ति ह्या शब्दाने झालेला असून त्रैकूटक राजे व्याघ्रसेन आणि मध्यमसेन या राजांप्रमाणेच विक्रमसेनाने भगवदपादकर्म्मकर, प्रभूतप्रवीरसाधनाधिष्ठित-दुर्गनगरसागर ही विशेषणे धारण केली आहेत. अपरान्त देशावर सत्ता सांगणाऱ्या या राजाने हा ताम्रपट अनिरुद्धपुराहून दिला आहे. त्याचबरोबर अनिरुद्धपुरावर कलचुरींची अधिसत्ता असल्याचेही सांगितले आहे. व्याघ्रसेनाचा सुरत ताम्रपट अनिरुद्धपुराहून दिलेला आहे. सेंद्रक राजा अल्लशक्तीच्या बागुम्रा ताम्रपटात अनिरुद्धपुरीचा उल्लेख केलेला आहे. ती अनिरुद्धपुरी व त्रैकूटकांचे अनिरुद्धपुर एकच असावे असा मिराशी यांचा तर्क आहे, अनिरुद्धपुर ही त्रैकूटकांची राजधानी असून ही नगरी सुरत जिल्ह्यातील बार्डोलीजवळच्या तेन या गावाच्या आसपास असावी असेही मिराशी यांनी विधान केले आहे.

या ताम्रपटात उल्लेखिलेली एकूण चार गावे– महाकटाहार, फरतटिका, तिसरे पंचामलक आणि चौथे कल्लिवन. या कल्लिवनाचा उल्लेख शंकरगणाच्या आभोणा ताम्रपटात (क. सं. ६४७, इ. ५९६) आलेला आहे. बाकीच्या गावांबाबत अपुऱ्या माहितीमुळे स्थलनिश्चिती करणे अवघड आहे. महाकटाहार हे कदाचित रत्नागिरी जिल्ह्यातील महाड असावे. कल्लिवन हे नाशिकजवळील कळवण होय. बाकीच्या गावर-सदृश गावे नकाशात आढळून आली नाहीत.

**ताम्रपटाचे महत्त्व :**

कलचुरींचा सर्वांत प्राचीन उल्लेख असलेला ताम्रपट म्हणून या ताम्रपटाची गणना करावी लागेल. आतापर्यंत शंकरगणाचा आभोणा येथील ताम्रपट प्राचीन समजला जात असे. या नव्या ताम्रपटाच्या उपलब्धीमुळे अनेक ऐतिहासिक दुवे हाती आलेले आहेत.

( १ ) ताम्रपटाच्या सुरुवातीसच विजयानिरुद्धपुरात्कटच्चुरीणी असा उल्लेख आहे. हा एक महत्त्वाचा ऐतिहासिक दुवा नव्याने ज्ञात होत आहे. 'अनिरुद्धपुर' ही त्रैकूटकांची राजधानी असावी असा कयास मिराशी यांनी बांधलेलाच आहे. त्रैकूटकांची राजधानी व पर्यायाने त्यांचे राज्य कलचुरींनी काबीज केल्याचे स्पष्ट होते. वरील उल्लेखामुळे त्रैकूटक राजा विक्रमसेनाचे मांडलिकत्व व कलचुरींचे सार्वभौमपद सिद्ध होते.

( २ ) प्रस्तुत ताम्रपटामुळे त्रैकूटकांच्या इतिहासावर पुष्कळच नवा प्रकाश पडला आहे. आतापर्यंत कान्हेरी येथील ताम्रपट हाच त्रैकूटक राजवंशाचा शेवटचा दुवा होता. परंतु त्यातही राजाचे नाव नाही. राजा मध्यमसेनाच्या ( क. सं. २५६ ) ताम्रपटावरून त्यांचे राज्य वाकाटक राजा हरिषेण याने बळकावले असावे. परंतु त्याने इ. ५०५ मध्ये ते सावरले. हे नव्याने इतिहासजमा झाले. प्रस्तुत ताम्रपट मध्यमसेनाच्या ताम्रपटानंतर अठ्ठावीस वर्षांनी दिला आहे. आणि त्याचा दाता आहे विक्रमसेन. तो मध्यमसेनाचा पुत्र असावा हे नव्याने प्रकाशात आले. विक्रमसेनाने स्वतः स्वतःच्या माता-पित्यांच्या पुण्याभिवृद्धीसाठी आणि नरेंद्र आणि नारायण यांच्या पुण्यवर्धनासाठी महाकटाहारातील फरतटिकान्तर्गत पंचामलक हे गाव शिवस्वामीला दान दिले. दोन्ही ताम्रपटांतील दान घेणाऱ्या ब्राह्मणाचे नाव 'शिवस्वामी' असल्यामुळे ताम्रपटाच्या खरेपणाविषयी थोडीशी शंका उत्पन्न होते. परंतु दान दिलेली गावे भिन्न असल्यामुळे ताम्रपट खरा असण्याचीच शक्यता जास्त वाटते. कलचुरींची अधिसत्ता आल्यामुळे शिवस्वामीला विक्रमसेनाने दुसरी गावे दान दिली असावीत.

मध्यमसेनाच्या ताम्रपटातील पहिल्या आठ ओळी आणि या ताम्रपटातील आठ ओळी सहीन् सही सारख्या आहेत. दान घेणारा कौंडिण्यगोत्री शिवस्वामी ब्राह्मण एकच असावा. या ताम्रपटात शिवस्वामीचे वास्तव्य कल्विन असे दिले आहे.

नरेन्द्र आणि नारायण ही बहुधा विक्रमसेनाची अल्पवयीन मुले असावीत. त्रैकूटक राजाच्या नावातील 'सेन' ही उपाधी त्याच्या नावापुढे नाही. या ताम्रपटाच्या उपलब्धीमुळे त्रैकूटक राजा मध्यमसेनाचा पुत्र विक्रमसेन हा राज्यावर आल्यावर कलचुरी राजाची स्वारी झाली व विक्रमसेनाने कलचुरींचे आधिपत्य मान्य केले हे स्पष्ट दिसून येते. वाकाटक राजा हरिषेणाच्या स्वारीनंतर मध्यमसेनाने आपले राज्य सावरले. परंतु त्रैकूटक घराण्याचा शेवटला दुर्दैवी राजा विक्रमसेन–मध्यमसेनाचा पुत्र हाच ठरला हे या ताम्रपटावरून दिसून येते.

त्रैकूटकांचे राज्य बळकावणारा हा विजयी कलचुरी राजा कोणता हे मात्र अजून अज्ञात आहे. कान्हेरी ताम्रपटानंतर काळातील ( क. सं. २४५, इ. ४९४ ) त्रैकूटकांचा इतिहास अज्ञात राहिला आणि त्रैकूटकांचा उच्छेद करणाऱ्या कलचुरी विजयी वीराचेही नाव अज्ञात राहिले. सुनावकाला येथील संगमसिंहाच्या ताम्रपटांतील मजकूर, लिपी व भाषा यांचे त्रैकूटक आणि कलचुरी राजांच्या ताम्रपटांशी पुष्कळ साम्य असल्याचे स्टेन कनो यांनी दाखवून दिले. मिराशी यांनी संगमसिंहाच्या ताम्रपटाचे त्रैकूटक राजा व्याघ्रसेन याच्या सुरत ताम्रपटाशी असलेले साम्य निदर्शनास आणले. या सर्वांवरून संगमसिंहाच्या ताब्यात असलेला भूप्रदेश पूर्वी त्रैकूटकांच्या ताब्यात असावा व संगमसिंहाने कलचुरींचे सार्वभौमत्व मान्य केले असावे हे स्पष्ट होते. प्रस्तुत ताम्रपटाच्या पहिल्या सात ओळी व्याघ्रसेनाच्या सुरत ताम्रपटांतील ओळींप्रमाणे व मध्यमसेनाच्या माटवण ताम्रपटाबरहुकुम आहेत.

आजमितीस कलचुरींचा सर्वांत प्राचीन ताम्रपट म्हणून शंकरगणाच्या आमोणा ताम्रपटाची गणना होते. ( क. सं. ३४७, इ. ५९६ ) चालुक्य राजा मंगलेश याच्या महाकूट येथील लेखावरून शंकरगणाचा पुत्र बुधराज याचा मंगलेशाने पराभव केल्याचे दिसून येते. या पुराव्याच्या आधारावर डॉ. मिराशी यांनी शंकरगणाचा काळ इ. ५७५ ते इ. ६०० असावा व त्याचा पिता कृष्णराज याच काळ इ. ५०० ते इ. ५७५ असावा. संगमसिंहाने ( क. सं. २९२, इ. ५४१ ) दिलेल्या ताम्रपटावरून तो कृष्णराजाच्या पित्याचा सामंत असावा असा तर्क मिराशी यांनी केला. प्रस्तुत ताम्रपट प्रकाशात आल्यामुळे केवळ तर्करूप असलेल्या गोष्टी खऱ्या झाल्या आहेत. कृष्णराजाच्या पित्याने भडोचजवळील अंतरनर्मदाविषय काबीज करून संगमसिंह या सामंताची नेमणूक केली. सुनावकाला ताम्रपटाचा काल क. सं. २९२ म्हणजे या ताम्रपटाच्या नंतर आठ वर्षे आहे. परंतु हा ताम्रपट नव्याने सापडल्यामुळे क. सं. २८४ म्हणजे इ. ५३३ मध्येच त्रैकूटकांचा बीमोड करून कलचुरी साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवण्याचे श्रेय कृष्णराजाच्या पित्याला मिळाले. दुर्दैवाने त्याचे नाव इतिहासात ज्ञात नाही आणि प्रस्तुत ताम्रपटातही त्याचे नाव नाही. एवढे मात्र खरे की त्याचा काल इ. ५२५ ते ५५० हा असावा हे या ताम्रपटामुळे नव्याने सिद्ध होत आहे.

## त्रैकूटक राजा विक्रमसेन याचा ताम्रपट

ओळ १ स्वस्ति विजयानिरुद्धपुरात्कटच्चुरीणां मातापितृपादानुध्यातो भगवत्पा

ओळ २ दकर्म्मकरम्करगतक्रमागतस्फीतापरान्तादिदेश पतिरपरिमितनृपति

ओळ ३ नतचरणकमलस्वभुजपरिपालन प्रतापाधिगतप्रचुरद्रविणविश्राणना

ओळ ४ वाप्तसर्व्वदिग्व्यापिशुवलयशाशारदरजनिकर रुक्चिररबपुरनद्य कालीनपुरुष

ओळ ५ विशेषसदृशोदारचरितसुचरितनिदर्शनार्थमिवनिर्म्मित × प्रतिहतसामन्ता

ओळ ६ रातिरन्यनरपति प्रतिविशिष्टस्वव शालङ्कारभूत × प्रभूतप्रवीरसाधनाधि
ओळ ७ ष्ठितदुर्गनगरसागरगम्भीरगिरिगुरुस्थिरप्रकृति × प्रकृतिजनमनो
ओळ ८ हरप्राज्ञसंश्रितगुरुस्वजनसाधुसाधारण धनोमिजनसद्दशयन्त्रणोप स्सागर
ओळ ९ गृहीतस्पृहणीयश्रीरश्री महाराजविक्रमसेन ( : ) महाकटाहार फरतटिका
ओळ १० न्तर्गत पञ्चामलक ग्रामनिवासिनस्समाज्ञापयति विदितमस्तु वो यथास्माभिन्न
ओळ ११ रैन्द्रनारायणयोर्मातापित्रोरात्मनाश्च पुण्याभिवृद्धये बलिचरुवै
ओळ १२ श्वदेवाग्निहोतृक्रियोत्सप्पणर्त्थमाचन्द्रार्कार्णवाक्षितिस्थितिसमकालीन
ओळ १३ × पुत्रपौत्रान्वयभोग्यश्चोरराजापथ्यकारिवर्ज्जमचाटभट प्राविश्यसर्व्वादित्यवि
ओळ १४ ष्टिपरिहीणोभुमिच्छिद्रन्यायेन कौण्डिण्यसगोत्र तैत्तिरीयक कल्लिवनवास्तव्य
ओळ १५ ब्राह्मण शिवस्वामिनेयं ग्रामोतिसृष्टोयतोस्मद्वं श्यराजरन्यैश्च विभवानभवानुबन्धा
ओळ १६ नासुव्वियोगानुगतं गुणाश्चदीर्वकालानुगुणान्विगणया दान चागुणवताभवदान
ओळ १७ मपदानमितिप्रमाणिकृत्यशशिकरश्शुचिरुचिरंचिराययशश्चिचिषुभिरियं भूमिद
ओळ १८ योनुमन्तव्य पालयितव्यश्च ॥ यस्मादुक्तं भगवता वेदव्यासेन व्यासेन
ओळ १९ षष्टिवर्षसहस्राणि स्वर्गे मोदति भूमिदः आच्छेत्ताचानुमन्त च तान्येव नरके वसेत
ओळ २० बहुभिर्व्वसुधा भुक्ता राजभिस्सगरादिभिः यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फलम् ।
ओळ २१ पूर्व्वदत्तान्त द्विजातिभ्यो यत्नाद्रक्ष युधिष्ठिर महीमहिमनांश्रेष्ठ दानाच्छेयानु- पालन
ओळ २२ विन्ध्याटवीषु वोरायु शुष्ककोटरवासिनः कृष्णाह्यो हि जायन्ते भूमिदायं ह
ओळ २३ रन्ति ये दूतकश्चाग्रणीरुद्धः लिखित चैतत्सान्धिविग्रहिक स्वामिकेनेति
ओळ २४ सं. २८४ चैत्र व. २

## पन्हाळे येथील शिलाहार राजा अपरादित्य ( प्रथम ) आणि विक्रमादित्य यांचा ताम्रपट

या ताम्रपटाचे एकूण तीन पत्रे आहेत. पहिल्या पत्र्यावर आणि तिसऱ्या पत्र्यावर फक्त एका बाजूवर लिहिले असून मधल्या पत्र्याबर दोन्ही बाजूला लिहिलेले आहे. अक्षरे ठाशीव असली तरी पत्र्याच्या विरुद्ध बाजूला दिसून येत नाहीत. पत्र्याची लांबी २९.५० सें. मी., रुंदी १९.५० सें. मी. असून १।२ सें. मी. जाड आहे. पत्र्याच्या कडा कडेला उचललेल्या असल्यामुळे पत्रे एकमेकाला घासत नाहीत त्यामुळे आपोआपच पत्र्यावरील मजकूर सुरक्षित राहिला आहे. प्रत्येक पत्र्याच्या वरच्या बाजूला चार सेंटिमीटरचा चौकोन मोकळा सोडलेला आहे. त्याला छिद्र असून त्यातून ९ सेंटि- मीटर व्यासाची कडी गोवली असून कडीची दोन्ही टोके एकत्र आणून त्यावर पाच

सेंटीमीटर व्यासाची गरुडाची मुद्रा आहे. मुद्रेवर कोणतीही अक्षरे नाहीत. ताम्रपटावरील अक्षरे ठसठशीत आहेत आणि सर्व सुस्थितीमध्ये आहेत. सर्व पत्र्याचे वजन ६·१।४ किलो आहे.

ताम्रपटात एकूण ९५ ओळी असून, पंचवीस ओळी पहिल्या पत्र्यावर, बावीस ओळी मधल्या पत्र्यावर असून एकवीस ओळी तिसऱ्या पत्र्यावर आहेत. अक्षरवटिका १० व्या ११ व्या शतकातील शिलाहारांचा ताम्रपटातील अक्षरवटिकांप्रमाणे आहे. लेखनामध्ये चुका आहेत. सर्वत्र पृष्ठमात्रेचा उपयोग आहे.

ताम्रपटाची भाषा संस्कृत असून काही मजकूर पद्यात व काही गद्यात आहे.

ताम्रपटाचा काल ६३–६४ या दोन ओळींत असून शके १०६१ सिद्धार्थ, आश्विन शुद्ध १५ सोमवार ही तिथी, ९ ऑक्टोबर ११३९ ला तंतोतंत जुळते.

ताम्रपटाची सुरुवात 'ओम'ने असून गणपती व शिव यांचे स्तवन आहे.

२–३ ओळींमध्ये जीमूतकेतूचा पुत्र जीमूतवाहन याचा वंशाचा संस्थापक म्हणून उल्लेख असून चवथ्या ओळीत 'शिलार' हे वंशाचे नामाभिधान आहे.

४–२६ ओळींमध्ये घराण्याची वंशावळ आलेली आहे. ही वंशावळ इतरही शिलाहारांच्या लेखांतून आलेली आहे. प्रथम कपर्दी, पुलशक्ती, दुसरा कपर्दी, बप्पुवन, झंझ, त्याचा धाकटा भाऊ गोग्गी, त्याचा पुत्र वज्जड, अपराजित, त्याचे दोन मुलगे, दुसरा वज्जड, अरिकेसरिन, दुसऱ्या वज्जडाचा मुलगा छित्तराज, छित्तराजाचे दोन भाऊ नागार्जुन आणि मुम्मुणी, नंतर नागार्जुनाचा मुलगा अनंतपाल आणि त्यानंतर अनंतपालाचा मुलगा अपरादित्य आणि त्याचा मुलगा विक्रमादित्यदेव. या वर्णनातील काही भाग अपरादित्याच्या वडवली ताम्रपटात (श. १०४१) आलेला आहे. त्याचप्रमाणे छित्तराजाच्या भांडुप ताम्रपटात आणि मुम्मुणीच्या ताम्रपटातही आलेला आहे.

२८–३६ या ओळींमध्ये अपरादित्याचे वर्णन आहे. त्याचा सर्व खजिना रिकामा झाला. त्याच्याजवळ फक्त एक घोडा, दोन बाहू आणि तलवार शिल्लक राहिली. त्याच्या जोरावर त्याने छित्तुक नावाच्या आसुराचा नाश केला. 'छित्तुक' हा किताब कदंब राजांनी घेतलेला होता. यावरून अपरादित्याने कदंबराजा जयकेशी याचा पराभव केला असा कयास करावयास हरकत नाही.

३९–४२ ओळींत अपरादित्याचे वर्णन आहे. त्यामध्ये 'अभिमानमहोदधी, पश्चिमसमुद्राधिपती, शरणागतवज्रपंजर महामंडलेश्वर' ही राजाची बिरुदे आहेत. जीमूतवाहनाच्या कुळात त्याचा जन्म झाला. तगरपुराचा अधिपती असून समस्त कोकणही त्याच्या आधिपत्याखाली होते, असे वर्णन आहे. गरुडलांछनयुक्त ध्वजचिन्ह या राजाला होते.

४३–४४ या ओळींमध्ये महामात्य श्रीठक्कुर, महाप्रधान श्रीशंकरमाधव यांचा उल्लेख आहे. श्रीशंकरमाधव हा प्रणालकराज्याचा महामात्य होता. महाप्रधान श्रीलक्ष्मण-प्रभू होता. श्रीकरण आणि सांधिविग्रहिक यांचे नावाचे जागी जागा रिकामी सोडलेली आहे. शक १०६० या कालातील चांजे येथील अपरादित्याच्या लेखामध्ये श्रीकरण आणि सांधिविग्रहिक यांच्या नावाच्या जागी ‘ अमुक ’ शब्द वापरला आहे. मराठीत अमुक, तमुक ज्या अर्थाने उपयोगिले जातात त्याच अर्थाने शतपथब्राह्मणामध्ये आणि वाजसनेयीसंहितेमध्ये ‘ अमुक ’ शब्द वापरला आहे. यावरून असे दिसून येते की सांधिविग्रहिक आणि श्रीकरण ह्या दोन्ही अधिकारस्थानी दोन वर्षेपर्यंत कुणाची नेमणूक झाली नव्हती. अंतर्गत राजकीय अशांततेमुळे अगर योग्य व्यक्तीच्या अभावी ही दोन्ही अधिकारस्थाने रिकामी राहिली असावीत.

विक्रमसंवत ११७६ मधील सोमनाथ येथील शिलालेख (इ. स. ११११) वडवली ताम्रपट (शके १०४९), चांजे येथील शके १०६० मधील शिलालेखात महाप्रधान श्रीलक्ष्मणप्रभू यांचा उल्लेख आहे. यावरून त्यांनी जवळजवळ किमान वीस वर्षे प्रधानपद भूषविले असावे. त्यांच्या नंतर त्यांचा सुपुत्र अनंत हा महाप्रधान झाला हे मल्लिकार्जुनाच्या लेखावरून स्पष्ट होते.[४]

६२ ते ७३ ओळींमध्ये चंद्रग्रहणाच्या पर्वकाळी अपरादित्याने मरुत्तक्षेत्री पश्चिम-समुद्राच्या खाडीमध्ये स्नान केले. मसुदीश्वर या शिवाची पूजा केली आणि राजपुत्र विक्रमादित्यदेवाच्या पुण्याभिवृद्धीसाठी ब्राह्मणाला सुपारीची बाग आणि प्रणालकविषया-मधील खेरडी हे गाव दान दिले. या ब्राह्मणाचे नाव सोमयाज्ञिक श्रीरुद्रभट्ट. रुद्रभटाच्या पित्याचे नाव केशव आणि विद्याधर हे त्यांचे पितामह. वाराणसीचे ते रहिवासी. गंगा-स्नानाने त्यांचे शरीर आणि मन पवित्र झाले होते. त्यांना वैश्वदेव अग्निहोत्र सांभाळण्या-साठी आणि स्वपरिवारपोषणासाठी खेरडी गाव अपरादित्याने आणि त्याचा पुत्र विक्रमादित्यदेवाने दान दिले.

८३–९१ या ओळींमध्ये शापाशीर्वादात्मक श्लोक आहेत. ताम्रपटाचा लेखक नागस्वामी पंडितांचा मुलगा लक्ष्मीधर पंडित आहे.

**ताम्रपटाचे महत्त्व :** या ताम्रपटात अपरादित्याचा मुलगा विक्रमादित्यदेव याचे नाव प्रथमच आलेले आहे. आतापर्यंत अपरादित्यानंतर हरपालदेव गादीवर आला हे इतिहासाला ज्ञात होते. परंतु त्यांचा नातेसंबंध काय होता हे अद्यापिही अज्ञातच आहे. ताम्रपटातील वर्णनावरून विक्रमादित्यदेव हा गादीचा वारस असावा असे वाटते, परंतु तो गादीवर का आला नाही हे अद्याप गूढ आहे. कदाचित विक्रमादित्य अकाली मृत्यू पावला असेल किंवा हरपालदेवाने गादी बळकावली असेल. परंतु यापेक्षा भक्कम पुरावा हाती आल्याशिवाय काही निश्चित विधान करता येत नाही. अपरादित्य आणि विक्रमा-

दित्य या दोघांनी मिळून ताम्रपट दान केला आहे. शेवटी विक्रमादित्याच्या नावाने ताम्रपटाचा शेवट आहे. युवराजाने दान दिलेले ताम्रपट इतिहासात थोडे आहेत. एक उदाहरण म्हणजे मायिदओलू ताम्रपटाचे व दुसरे म्हणजे युवराज राजेंद्रवर्मन् यांचे. या ताम्रपटातील नावे महत्त्वाची आहेत. ज्या प्रणालक विषय म्हणजे पन्हाळेकाजी या ठिकाणी ताम्रपट सापडला त्या गावाचे प्रणालक हे नाव ताम्रपटात आहे. अजूनही तेथे जुन्या किल्ल्याचे अवशेष आहेत. प्रणालक विषय हा शासकीय विभाग तेथील भौगोलिक परिस्थिती सूचित करतो. समुद्राच्या खाड्या आत आलेला हा प्रदेश म्हणजे सावित्री आणि वासिष्ठी या दोन नद्यांमधील ३०–४० मैलांचा परिसर असावा.

प्रणालक देशाचा उल्लेख शक १०७८ मधील शिलाहार राजा मल्लिकार्जुनाच्या मराठी शिलालेखात आलेला आहे. मोरेश्वर गंगाधर दीक्षित यांनी प्रणालक म्हणजे कोल्हापूरजवळील पन्हाळा होय असे विधान केले. परंतु शिलालेखात दंडाधिपती सूपया यास अधिकारसूत्रे दिल्याचा उल्लेख आहे. उत्तर शिलाहार राजा मल्लिकार्जुन कोल्हापूरच्या राज्यात अधिपती कशासाठी नेमील म्हणून 'प्रणालक' म्हणजे पनवेल असावे असे तुळपुळे यांनी सूचित केले. प्रस्तुत ताम्रपटाच्या संशोधनामुळे प्रणालक म्हणजे पन्हाळे–काजी आणि त्याचा परिसर हे निश्चित झाले आहे.

ताम्रपटात उल्लेखिलेले करजवी आणि तालसूर ही गावे त्याच नावाने अस्तित्वात आहेत. बाकीची दोन उच्कुप आणि हडवत्थर म्हणजे खेरडीजवळील डशिपखोरे होज्वाडी ही खेडी. मुरुडजवळ एक शिवालय आहे व कुंड आहे अशी माहिती श्री. शिरगावकरांनी दिली कदाचित तेही ममुदीश्वराचे देऊळ असणे शक्य आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या ताम्रपटाच्या शोधामुळे व त्यातील गावांच्या उल्लेखामुळे उत्तर शिलाहार राजा अपरादित्य याचे राज्य मुरुडपर्यंत होते असा कयास बांधावयास हरकत नाही. कदंबराजा दुसरा जयकेशी याचा पराभव करून हा प्रदेश त्याने आपल्या राज्यास जोडला असावा. कोकणावर अधिपत्य सांगणाऱ्या जयकेशीच्या शक १०४९ नंतरच्या लेखात कोकणाचा उल्लेख टाळलेला आहे.

## प्रथम अपरादित्य याचा पन्हाळे ताम्रपट

ओळ १ ओं लभते सर्व्वकार्येषु पूजायां गणनायक: । विघ्नं विघ्नं स व: पायादपायादगणनायक: । स व : पातु सि( शि )वो नित्यं यन्मौलौ भाति जान्हवी

ओळ २ सुमेरुशिखरोद्गच्छदच्छचन्द्रकलोपमा । जीमूतकेतुतनयो नियतं दयालुर्जीमूतवाहन अिति तृ( त्रि )जगत्प्रसिद्ध : । देहंनिज( जं )तृणमिवा

ओळ ३ कलयन्परार्थं यो रक्षति स्म गरुडा( डो ) खलु शंखचूडं ॥ तस्यान्वये निखिल भूपति मौलिलग्नरत्नद्युतिरित निर्मलपादपी

ओळ ४ ठ: । श्रीसाहसांक अिव साहसिक : कपर्दी शीलारवंश तिलकोनृपतिर्बभुव । तस्मादभूच्च तनय : पुलशक्तिनामा सीमासम : सुर

ओळ ५ गुरूदितराजनीते : निर्जित्य संगरसुखेऽखिलवैरिवर्गं निष्कंटकं जगति राज्यमकारि येन । ततश्च समभूत्सुतो नृपशिरोविभूषामणिः शितः शिणि

ओळ ६ रिवपरोऽ रिकरिणं कपर्दि लघु : । यदीययशसा जगत्यतिशयेन शुक्लीकृते न भाति सुरवारणो न च शशांक दुग्धांबुधे । तस्मादप्य

ओळ ७ द्भिभूपतिपदवीपात्रं पवित्रीकृताऽशेषक्ष्मावलयोमहीपति (ति)लकः श्रीवप्पुवन्नः सुतः । संग्रामांगणरंगिणा ऽ सिलतया

ओळ ८ लूनैकदन्ता हठात्सर्व्वे येन विनायका विरचिता विद्वेषिणां दंतिन : तस्माज्जा– तस्तनूजोरजनिकर अिवानंदिताशेषलोक : इला

ओळ ९ घ्यः श्रीझंझराजो दिवसकर अिव ध्वस्तनिः शेष दोषः शंमोर्यो दाद्शापि व्यरचयदचिरात्कीर्तनानि स्वनाम्ना सोपानानी ।

ओळ १० व मन्ये प्रणततनुभृतां स्वर्गमार्गोद्यतानां ॥ भ्राता तस्य ततस्त्वनूज्वल यशोराशिः प्रकाशीकृताशेषक्ष्मावलयो व(ब)लीबल्लवतां श्री गो ।

ओळ ११ ग्गीराजः भवत् । चापाकर्षण कर्मणिप्रगुणतां तस्मिन्गतेभूपतौ भीष्म- द्रोणपृथा सुतप्रभृतयः सर्व्वे चमत्कारिता : ॥ तस्माद्विस्मयकारि ।

ओळ १२ हारिचरितप्रख्यातकीर्त्तिसुतः श्रीमानुज्जडदेवभूपतिरभूद्भूचक्रचूडामणिः ॥ दोर्दंडैकबलस्य यस्य सहसा संग्रामरंगांगणे रा ।

ओळ १३ ज्यश्री स्वयमेत्य वक्षसि रतिं चक्रे मुरारेरिव । जयन्त अिव वृत्रारेः पुरारेरिव षण्मुखः । ततः श्रीमानभूत्पुत्र सत्प्रतापोऽपराजितः ॥ क

ओळ १४ र्णस्त्यागेनय प्रख्यातः सत्येन च युधिष्ठिर : । प्रतापाद्दीप्तिमार्तण्डः कालदंड- श्चयौद्विषां । शरणागतसामन्ताऽपरेपि हि जगति

ओळ १५ रक्षिता येन स जयति यथार्थनामा शरणागतवज्रपंजरो देवः । श्रीमान- भूत्तदनुवज्जडदेवनामा भूपालमस्तकमणिस्तन

ओळ १६ यो नयज्ञः अद्यापि यस्य चरितानि जनाः स्मरा (न्त) सा (स्ता) द्रोमांच- कंचुकितगात्र लराभ्नुवन्ति । तदभ्राताथ नतो रिकेसरिनृपोजातःस

ओळ १७ तां सम्मतो द्दमाराति कुलांचलैकदलनैदम्भोलि कीर्त्तं दधत् । गत्वा शैशव अेव सैन्य सहितो दृष्ट्वा च सोमेश्वरं । तस्याग्रेपित्

ओळ १८ राज्ञया जगदलं यः कीलयित्वा ग । तद्भ्रातृजोवज्जडदेवसुनुः श्रीछीत्तराजो- नृपति र्बभूवो शीलारवंशः शिशुनापि येन नीतः प

ओळ १९ रामुन्नतिमुन्नतेन । लंबालकाविकुचतयेपकंठ प्रभृष्टहारलतिकानिनिरंजनानि उत्खात तीक्ष्ण करवालविदारितस्य

ओळ २० योऽ न्तःपुराणिपरिपंथिजनस्य तस्यचक्रोहतारितारी नेत्रांतः सेवसंवर्द्धनादेव ब्रह्माण्डमंडपं यस्य कीर्ति वर्ण्णविभाहतिः।

ओळ २१ दृप्तारातिषु कोपकालदहनः सौभाग्यनारायणो। वारस्त्रीषु ततोनुजः समभवन्नागार्जुन क्ष्मापतिः। यस्यामानुष मूर्जितं भुजबलं दूरान्निरा।

ओळ २२ न्य द्विषां निद्रातीव रणांगणव्यसनिनी दोर्दंडकंडूलता। तदनु तदनुजन्मा मूर्त्तिमान्मीनकेतुः क्षतरिपुविभवो भूत्मुमु।

ओळ २३ णिः क्षोणिपालः। विवृतच( ध )नुषि यस्मिन्वाजिनीराजनान्ते ( च ) वलभिदपि बलीयान्वार्षिकं चाप मोज्झत् तस्मिनृपेप्रव

ओळ २४ र कीर्तिशरीरभाजि नागार्जुनस्य तनयो नयचक्रवर्ति। भूपोभवत्परमधर्म विशुद्ध देहः। शीलार गोत्रनृपरत्नम।

ओळ २५ नऽपाल। चिन्तामणौप्रणयिनांनयनाभिरामे कामेकुरंगकदृशांजगदेकवीर्ये निर्वीरवैरमवनी वलयंविधाय।

पत्रा २

ओळ २६ धर्मेण पालयति तत्र नरेन्द्रचंद्रे श्री नागार्जुन राजसुनुतनयो जित्वा ततो भूतलं स श्रीमानपराकर्कदेवनृप

ओळ २७ तिः पातुं समर्थो भवत्। पुण्यरुल्लासितं श्रिया विकसितं तेजोभिरुज्जृभितं शौर्येणोदितमुत्थितं गुणगणै

ओळ २८ र्यस्मिन्महींशसति शत्रुन्संहारति श्रियंवितनुते शौर्ये समालंबते धत्तेधैर्यभरं परं रणरसातणासे पुरोधा

ओळ २९ वति स्तोकंवा वहवानवेत्ति तुरगारूढो दृढं प्रौढीमान्सा। हायथंतदपेक्ष तेन सततं कस्यापि तत्रान्तरे आसीत्कोप्यसु

ओळ ३० रो जगद्दलयितुं छित्तुंकगामोधकः स्तस्यैव समस्तमेव मिलितं सामन्तचक्रं ततः ध्वस्ते धर्मवने गतेषु गुरुषु क्लष्टे

ओळ ३१ वि( शिष्टाश्रये ) शीर्णे जीर्णपुरप्रजापरिजने नष्टेच राष्ट्रोदये एकश्चैकतुरंग-मश्चमुजयोर्द्वंद्वंच खङ्गंस्वतं द्रकुष्टवा क ( ठि ) टरे ( ने ) रणे

ओळ ३२ सरभसंतंसंमुखं धाविनः ( तः ) नोयोद्धंमलायितुं किमपि वाञ्शतं च तेन स्पुटं संग्रामे परिहत्य यस्य च मिया म्लेच्छाश्रये संछ्रितः।

ओळ ३३ संतः संतिसुखेन गर्ज्जति गुणिग्रामः प्रमाणंभवत्येतद्धर्म्मविनिर्मितं परिचिताभंगं जगद्वर्णति। येन स्वेत बलेन हंतं निहते त

ओळ ३४ स्मि न्निरौताः। पुनर्नंदंति प्रियपुत्रबांधवसुहृत्संसर्गसज्जा प्रजाः सोयंपुण्यमयः समधृतनयः वयस्याश्रयः सत्यान्नप्रतिप

ओळ ३५ त्तिरन्यसमयः संबुद्धशुद्धाशयः संग्रामांगणमध्य दुर्धरयः कांताकृत प्रशयस्तं- वैदग्ध विवेकसारनिश्चयः स्फूर्ज्जत् प्रतापोद

ओळ ३६ यः यः सत्यस्य समासयैक भवनं यं वीरवृत्तिश्रिता धैर्येयेनधृतंप्रजा प्रतिदिनं यस्मैददत्याशिषः। यस्मात्प्राहरतद्वि।

ओळ ३७ लासविषयस्त्यागश्चयस्योर्जितो यत्र श्रीशचसरस्वतीच विशदा कीर्तिश्च- लोकोत्तरा। तस्यापत्यं विक्रमादित्यदेवः।

ओळ ३८ न्येष प्राप्य राज्यंप्रणालंदुग्धांभोधौ रत्न जाते यथा सावेकोजातः कौस्तुभ श्रीसहायः अथ स्वकीय पुण्योद

ओळ ३९ यात्समधिगतपंचमहाशब्देः श्रीविद्याध(र) चक्रवर्तीतगरपुरः परमेश्वरः श्रीशिलाहारनरेंद्रजीमूतवाहनान्वये प्रसूत।

ओळ ४० सुवर्णगरुडध्वजः अभिमानमहोदधित्यागजगज्झंप परचक्र प्रकंपझंपदाचार्यराय पितामह पश्चिमसमुद्राधिप

ओळ ४१ ति शरणागतवज्रपंजरेत्यादि समस्तराजावलिविराजमानमहामंडलेश्वराधिपति श्रीमदपरादित्यदेवराज।

ओळ ४२ नि निजभुजोपार्ज्जितानेकमंडलसमेतपुरीप्रमुखचतुर्दशग्रामशतीसमन्वितसमस्त कोंकणभुवं समनुशासति।

ओळ ४३ तथैतत्प्रसादात्समस्तराज्यचिंताभारंसमुद्रहति महामात्य श्रीश्वेतमठक्कुरे तथा प्रणालकराज्यभारं समुद्रहा (ह)

ओळ ४४ ति महाप्रधानश्रीशंकरमाधवो तथा महासांधिविग्रहिक श्री तथा श्रीकरण भाण्डागारे प्रथमच्छेपाटी महाप्र

ओळ ४५ धान श्रीलक्ष्मणैदप्रभोः द्वितीयच्छेपाटी श्री — इत्यादी श्रीकरणे सत्ये तस्मिन्कार्ये प्रवर्तमाने सचमहाम

ओळ ४६ लंडलेश्वराधिपति श्रीमदपरादित्यदेवराजः सर्वान्येव स्वसंबध्यमान कानन्यान- पिसमागामिराजपुत्रमंत्रीपुरो

ओळ ४७ हितामात्यप्रधानाप्रधाननियोगिकांस्तथा राष्ट्रपतिविषयपति नगच(र)पतिग्राम- पति नियुक्तानियुक्तराजपु

ओळ ४८ रुषजनपदांस्तथा हंजमननगरपौरत्रि वर्ग (ग) प्रभृतींश्च प्रणतिपूजा सत्कार- समादेशैः संदिशत्यस्तु वः संविदि

ओळ ४९ तंथा । चलाविभूतिक्षणभंगि यौवनंकृतांतदंतांतर्वर्ति जीवितं तथाप्यवज्ञां परलोकसाधने नृणामहो

ओळ ५० विस्मकारिष्टितं । तथाचोक्तं भगवता व्यासेन समागमाः सापगमाः सर्वमुत्पादिभंगुरं कायः संनिहिता

ओळ ५१ पायः सपदः पदमापदां उच्छ्वा सावधयः प्राणा सचोच्छ्वासः समीरणः समीरणान्चलन्नास्तिय ( यो ) जीवति

पत्रा ३

ओळ ५२ तदद्भुतं । दानंविचादनंतं श्रीकीर्तीधर्मो तथायुषः परोपकरणं कायादसारात्सार मुद्धरेत् । अतिदानं

ओळ ५३ तु सर्वेषां भूमिदानमिहोच्यते अचलाह्यक्षया भूमिः सर्व्वान्कामान्प्रयच्छति भूमिदः स्वर्गमारुह्य शाश्वतीरे व

ओळ ५४ तेसमः पुनश्चजन्मसंप्राप्य भवेद्भूमिपतिर्ध्रुवं यत्किंचित्कुरुते पापंपुरुषोवृत्ति कर्शितः अपि गोचर्ममात्रे ।

ओळ ५५ ण भूमिदानेन शुध्यति आस्फोट्यन्ति पितरः प्रवल्गंति पितामहाः भूमिदोस्मत्कुलेजातः सोस्मान्संतारयिष्य

ओळ ५६ ति तथाचांतर्लीनजराराक्षसीप्रारब्धग्रासयौवनं स्वर्गवासान्तरकपात समभिष्टसमागमवियोगदुःखकद

ओळ ५७ लीगर्तवदसारः सभारः सहजजरामरणसाधारणं शरीरं पवनचलितकमलिनी दलगतजललवतरलत

ओळ ५८ रे धनायुषी इतिमत्वा दृढतरविरक्ति वुध्दा संग्रह्ये दानश्च फलं न तथा सफलाविद्या न तथा सफलं तथः

ओळ ५९ यथात्रमनुयः प्राहुर्दानमेकं कलौयुगे अग्नेरपत्यं प्रथमं सुवर्ण्णे सूर्वैष्णवी सूर्यसुताश्चगावः लोकास्त्रयः

ओळ ६० स्तेन भवन्ति दत्ता यः कांचनं गांच महीं च दद्यात् सर्वेषामेव दानानामेकजन्मानुगं फलं हाटक क्षितिगौ

ओळ ६१ रीणाँ सप्तजन्मानुगं फळं इतिधर्माधर्मविचारचतुर चिरंतनमुनिवचनान्यवधार्यसकलराज्यगुण

ओळ ६२ गणालंकृतस्वतनयकुमारश्रीविक्रमादित्यदेवराय श्रेयसे महामंडलेश्वराधिपति श्रीमदपदपरादित्य

ओळ ६३ देवेन शकनृपकालातीत संवत्सरशतेषुदशसु एकषष्ट्यधिकेष्वयत्ताङ्कतोंद्रसेतोपिशक संवत् १०६१

ओळ ६४ सिद्धार्थसंवत्सरांतर्गता श्वयुजशुद्धपंचदश्यां सोमे महासोम पर्वणिचूडामणो सर्वग्रहे मरुत्पात्री

ओळ ६५ गान्तवर्तिनि पश्चिमसमुद्रे स्नात्वा सोमाय सुगंधि कुसुमस्लाघ्यंमर्घंदत्वा सकलभुवनाधिपति मसुदी

ओळ ६६ द्वरउमापति कुंकुमचंदनसुरभिकुसुमेरभ्यंर्च्यंयजनयाजनादिषटकर्मनिरताय क्रतुक्रियाकां

ओळ ६७ डशौंडा परब्रह्मविदेपरमब्राह्मणाय स्त्रीमद्वाराणसीनिवासिने गंगावलोकनाव गाहनापान

ओळ ६८ पवित्रीकृतसरीरमानसाय आंगिरसबार्हस्पत्यभारद्वाजगोत्राय तैतिरीयक शाखिने श्री रुद्र

ओळ ६९ भट्टोपाध्यार्थाय सोमयाजिकेशव द्विवेदिभट्टोपाध्याय पुत्राय विद्याधर भट्टोपाध्यायपोत्रायष

ओळ ७० ट्कर्मकरणार्थंबलिचरुकवैस्वदेवाग्निहोत्रक्रतुक्रियादि निर्माणाय आगता भ्यागता वि

ओळ ७१ ष्टिसंवाहनार्थं स्वपरिवारपोषणायच प्रणालक विषयांतः पातीखैरडीग्रामः पूगद्रुमा

ओळ ७२ रामसहितः गृहद्रम्भदम्भीत्यादिसमस्त राजभोग्य समन्वितो दापितः श्री विक्रमादि

ओळ ७३ त्य देवेन च मतिमता परम भक्तेन मातापित्रोरात्मनरच श्रेयसे दत्तः य

पत्रा ४

ओळ ७४ स्थचाषाटनानि ॥ पूर्वतः करजणिग्रामसीमा । तत्था केल नदीतीरे केलवृक्षो मर्यादा :

ओळ ७५ दक्षिणतः तालसुरग्रामसीमा । तथा निर्झरनिकटे करंबवृक्षो मर्यादा पश्चिमत

ओळ ७६ : । हडवत्थर सीमयांनदी मर्यादा उत्तरतः उच्कुयग्राम सीमा । तथा नदीकेत

ओळ ७७ तकीनिकटे तडागः मर्यादा ॥ एवंचतुराघाटनोपलक्षितं: ससीमापर्यंतः

ओळ ७८ सतृणकाष्ठोदकोपेतंः सदण्डसमस्तोत्पत्ति संयुक्तः । पूर्व्वदत्तदेवदाय ब्रह्मदाय-वर्जितः अ ।

ओळ ७९ चाटभट्टप्रवेशः उदकातिसर्गेण मत्तया नमस्थवृतेशासनेन प्रतिपादितः ततेषां सान्वयबंधूनां भू

ओळ ८० नतां भोजयतां वा न केनापि परिपंथकरणीया यत उक्तं महामुनिभिः। बहुभिर्वसुधामु

ओळ ८१ क्ता राजभिः सागरादिभिः । यस्य यस्य यदा भुमिस्तस्य तस्य तदा फलं । सहद्योदानं निरायासं साय

ओळ ८२ सम संदीर्घपालनं । अतएवर्षयः प्राहुर्दानात्क्रेयोनुपालनं ।

ओळ ८३ यानीह दत्तानि पुरा नरेंद्रानिदानानिधर्मा

ओळ ८४ र्थ यशस्कराणि निर्माल्यवंत प्रतिमानितानि को नाम
साधुः पुनराददीत दत्वा भूमिं भाविना पार्थिवे
ओळ ८५ द्रान् भूयोभूयो याचते रामभद्रः सामान्योयं
धर्मसेतुर्नृपाणां काले काले पालनीयो भवद्भिः ।

इति धर्माधर्म

ओळ ८६ विचार चतुर चिरंतन मुनिवचना न्यवधार्य सवेरपि
समागाभिरस्मद्वंशजरन्यैर्वाभूपालैः पालनधर्म
ओळ ८७ फललोभएवकरणीयः न पुनस्तल्लोपनपापकलंकाग्रेसरेण केनापि भवितव्यं ।
यस्त्वेवभभ्यर्च्चितोपि लो
ओळ ८८ भादज्ञानतिमिरपटलांवृतगतिराच्छिद्याच्छिद्यमानमनुमोदेनवा स पंचभिरपि
पातकैरूपपातकैश्च ।
ओळ ८९ लिप्तो रौरवमहारौरवांधतामिस्रा नरकांश्चिरंमनुभविष्यतीति । यथोक्तं भगवता
व्यासेन । स्वदत्तां
ओळ ९० परदत्तां वा यो हरेत वसुंधराश्वश्वविष्ठायां कृमिस्त्वा पितृभिः सह
पच्यते विंध्याटवी तोयासुशुष्ककोटर
ओळ ९१ वासिन कृष्णसर्पोभिजायंते भूमिदानं हरंति यो वा
यथा चैतदेवं तथा शासनं दाता लेखक हस्तेन स्वम
ओळ ९२ तमारोपयति । तद्यथा मतं मम महामंडलेश्वराभिपति सी
मद्विक्रमादित्यदेवस्य श्रीमदपरादित्य
ओळ ९३ देवसूनोर्यदत्रशासने लिखितं ।। लिखितं चैतन्मयाराजभिपुवतेन संधिविग्रहि-
कानुमत्या ।
ओळ ९४ विप्रलक्ष्मीधर पंडितेन श्री नागस्वामी पंडित सुतेन यदत्रो
नाक्षरमधिरंकांक्षरवात
ओळ ९५ त्प्रमाणमिति मंगलमहाश्री भवतु ।

## यादवराजा महादेव याचा पंढरपूर येथील शिलालेख– शक ११९२

पंढरपूरच्या पोलिसचौकीमध्ये भिंतीमध्ये एका आडव्या खांबावर हा लेख कोरलेला आहे. विठोबाच्या देवळापासून पोलिसचौकी अगदी जवळच आहे.

या खांबावरील लेख कोरलेला भाग. ६७·५ सें. मी. लांब, ३७·२ सें. मी. रुंद आहे. प्रत्येक अक्षराची उंची १·२५ सें. मी. व अक्षरे खोल नाहीत. लेखाचा बराचसा भाग झिजून गेलेला आहे.

यादवराजा महादेव राज्य करीत असताना त्याचा मांडलिक भानु याने ' आप्तोर्याम ' यज्ञ केला. लेखाच्या पहिल्या ओळीत कालोल्लेख आहे. रविवार, ज्येष्ठ शु. ११, प्रमोद संवत्सर शके ११९२. यादवराजा महादेव याच्या कारकीर्दीतील हा शेवटचा लेख आहे. या लेखाचा काळ ज्येष्ठ शु. ११ शक ११९२ ( १५ जून १२७० ) रामचंद्राच्या पैठण ताम्रपटाचा काळ माघ शु. १२ शक ११९३ हा आहे. यावरून महादेवाचा पुत्र आमण याने केवळ आठ महिने राज्य केले असे दिसून येते.

**ताम्रपटाचा आशय :** श्लोक १-२– ब्रह्मदेवाची स्तुती केलेली आहे. श्लोक ५–६– सामंत भानुच्या शार्ङ्गी ह्या पूर्वजाचे नाव असून कुटुंबाचे नाव ' सितवाडक ' होते. केशव हे भानूच्या वडिलांचे नाव असून त्याच्या सामंतपदाचा उल्लेख आहे.

श्लोक ६ ते १२– या श्लोकांतून केशवाची स्तुती आहे.

श्लोक १३–१४– भानूला वडिलांप्रमाणेच सामंतपद असल्याचा उल्लेख आहे.

अडतिसाव्या ओळीत भानूने आप्तोर्याम यज्ञ केल्याचा उल्लेख आहे.

श्लोक १५-१७– यज्ञाचे वर्णन आहे.

एकोणचाळीसाव्या ओळीमध्ये यज्ञामध्ये पौरोहित्य करणाऱ्या श्रीशर्मयज्ञाचे नाव आहे.

श्लोक १९– यात भीमरथी नदी, पांडुरंगपुर आणि विठ्ठलाचा उल्लेख आहे.

प्रस्तुत ताम्रपटात खालील महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

( १ ) शिलालेख व ताम्रपट यातील ' विठ्ठल ' या नावाची प्राचीनता ठरविण्यात मदत होते.

( २ ) पांडुरंगपुर आणि विठ्ठल यांची जवळिक प्रस्तुत लेखाने सिद्ध केली आहे.

( ३ ) भानू या यादव सामन्ताचा उल्लेख या लेखात आहे.

( ४ ) एकादशी ह्या विठ्ठलाच्या पर्वकाळी भानूने ' आप्तोर्याम ' यज्ञ केला. ही महत्त्वाची गोष्ट या लेखात उल्लेखिलेली आहे.

यादवकाळात भक्तिसंप्रदायाला राजाश्रय मिळाला. पंढरपुरातील शिवसंप्रदाय नाहीसा होऊन त्याजागी वैष्णव संप्रदाय आला. याबाबत भांडारकर यांनी विवेचन केले आहे. त्यात त्यांनी वारकरी लोक पंढरपुरास अजूनही विठोबाचे दर्शन घेण्यापूर्वी पुंडलिकाच्या समाधीवरील शिवलिंगाचे दर्शन घेतात. यावरून पंढरपुरास शिवमहात्म्य जास्त होते आणि शिवनामावरून पंढरपूरचे नाव ' पांडुरंगपूर ' असे झाले. विठ्ठलाचा आणि पांडुरंगपुराचा नावाशी काही संबंध नाही. हेमचंद्राच्या ' देशीनाममाला ' या ग्रंथात

पांडुरंग आणि रुद्र हे समानार्थी शब्द असल्याचे सांगितले आहे. यादवकाळात वैष्णव-संप्रदायास राजाश्रय मिळाला. विष्णूने शिवाची जागा घेतली, इतकेच नव्हे तर शिवाचे नावही भक्तांनी विष्णूस समर्पण केले, आणि पांडुरंग हे नाव विठोबाला दिले. पंढर-पुरास ' पौंडरीकक्षेत्र ' हे संस्कृत नावही आहे.

प्रस्तुत शिलालेखात पंढरपूर प्रदेशावर राज्य करणाऱ्या यादवांचा सामंत केशवपुत्र भानूचा उल्लेख आहे; आणि हा नवीन आहे.

या लेखाचा दुसरा विशेष म्हणजे ज्येष्ठ महिन्यातील निर्जला एकादशीला भानू या सामंताने आप्तोर्याम यज्ञ केला. पंढरपूर भक्तिसंप्रदायाचे केन्द्र परंतु तेथे ' आप्तोर्याम ' यज्ञ यादवकाळात समारंभपूर्वक एकादशीला साजरा झाला ही गोष्ट महत्त्वाची आहे. यज्ञसंस्थेचा जनमानसावर एवढा पगडा होता की बाराव्या शतकात भक्तिसंप्रदायाच्या केन्द्रस्थानी यज्ञसमारंभ साजरा झाला हा एक यज्ञसंस्थेच्या इतिहासातील फार महत्त्वाचा दुवा आहे.

## लेखाचे वाचन

श्लोक — २.३.१३ अनुष्टुभ

श्लोक — १.४.५.१२.१९ शार्दूलविक्रीडित

श्लोक — ९.१७ वसंततिलका

श्लोक — १० मंदाक्रांता

श्लोक — १५ शिखरिणी

ओळ १ सिद्धम् स्वस्ति श्री शकु ११९२ प्रमोद संवत्स ( रे ज्ये )
ओळ २ ष्ठ सुद्ध ११ सो । अद्येहं श्रीमत्प्रौढप्रतापचक्र ( वर्ति )
ओळ ३ महादेव विजयराज्योदये । येन त्रीणि जगंति जन्म धि भ – – ˇ
ओळ ४ निवक्त्रादिभिर्भाश्चद्वक्त्रसरोरुहाणिवहतस्तेजांसि यस्या ˇ –
ओळ ५ वेदानां हि करंडक ( त्रि ) मुनयो ध्यायन्ति यं नित्यशो ब्रह्मांभोज ( स )
ओळ ६ मुद्भवो विजयते देवः स वा ( णी ) पतिः ॥ १ ॥ श्रीमद्वाणीमनोन्मेष वे ( रै : )
ओळ ७ विजयते विभु । उद्यदुग्धनिधिश्लिष्टा सुधाकरकरोपमं ॥ २ ॥
ओळ ८ तेन मानसजन्मानो ब्रह्मणो जनिता नव । आत्मनो दीप्तमूर्तेन
ओळ ९ गुणाबुद्धयादयो यथा ॥ ३ ॥ तत्रासीज्जनकः सुरासुरकुलश्रेणेः सु
ओळ १० धा संश्रितः प्रारूढा सुदृढं मुदा मुखखानान्या सधायं सुधी किं
ओळ ११ श्चेव मदांधमहितरिपुं ॥ विष्णुर्विजिष्णु यथा । श्रिगारं भुवि ˇ ˇ

ओळ १२ सैषु यदि वा सेतुः स्वतां कश्यपः ॥ ४ ॥ वंशेतस्यशशिप्र
ओळ १३ काश विशदे संसेविते संततं शीलाद्यैरमलैर्गुणैरिह ब ( भौ )
ओळ १४ श्रीशार्ङ्गनामा कि ऽ ऽ ती वेदः सोदितमादरेण भवने
ओळ १५ श यं कर्मणा देहं प्रापकिलेवसादितरजाः जानन्य ( था )
ओळ १६ ध्रुव ॥ ५ ॥ तत्सुनु सितवाडकान्वयभवोभूभारभंगाय – –
ओळ १७ क्षात्रिणक्षत शत्रुक्षितितत्नसार्ध स्फुरत्तेजसा । दोर्जनापि
ओळ १८ निजेनरंजिततनु श्री जामदग्न्यो यथा कीर्तेः साहसिक मंडलीक
ओळ १९ प्राभूत् यः केशवः ॥ ६ ॥ अपि च । रणे वितरणे वा पि यद्दोर्भारवदा
ओळ २० अभिभूयेव भवनं कांचनैश्कांचनैरपि ॥ ७ ॥ अलंकुर्वन्ति कर्णातंपू –
ओळ २१ ने वा परांगनाः मार्गणामार्गणायश्च कंकणैष्कंकणैरपि ॥ ८ ॥
ओळ २२ यद्वैरिवर्गवनिताकुचमंडलानि यस्वीक्रीतेधनजितानन कालिः
ओळ २३ ने । मुक्तानि मिल्लनिकरैरपि लज्जयेव नाथोऽद दुःखित गुण निपतंति
ओळ २४ सद्य ॥ ९ ॥ यदानार्णो जनिततरवो य ( ) ग्रावगंडा यर्‌भोगे
ओळ २५ तरु च यो गोगणामार्गणानां द्युस्छानानामभिमत न
ओळ २६ वर्तये रवोयं मर्त्यैरगणितगुणः केशवः कथ्यते किं ॥ १० ॥
ओळ २७ न गैर्वकार्मुकंनसन्मौर्वि झांकार
ओळ २८ ग भवैसिक्तासुरक्ताद्रि । रेजे छंनशिसश्वेनांम्रितुमती
ओळ २९ प्रयातमृणां नयनांबुभिश्चत्रसुमै...... राजि क्षितिः ।
ओळ ३० प्यद्संभुगराहतपुरिव्रातांगनानांकचान्वक्त्राव्यवुरुहाणि
ओळ ३१ रुतुमतिबालव्रजान्लापर्यंश दावाग्नि क्षपयेनिर्वौनतरां ( भा ) तं ग
ओळ ३२ भा कुचानोष्ठान्मंजुलपल्लवान्विजयते यद्विक्रमो दुर्धरः ॥ १२ ॥
ओळ ३३ गंधर्व कितद्वेस्वीतस्य भावनायान्वितः । मतं कुमारिलस्येव सुनु भा ( नु )
ओळ ३४ ( प्र ) शास्ति गां ॥ १३ ॥ यद्वैरिवक्षक्षतजार्द्रवीर क्षिति प्रविष्टा सु
ओळ ३५ विपोता । भास्वप्रकाश व्रतत प्रभूते यशांसि भास्वति......
ओळ ३६ ॥१४॥ यदाख्य द्राक्षव्रतति वितते मंटपवरे गुरश्रीवेतः सह –
ओळ ३७ हरिदुर्वीरुहक्रिते । चिते नानाताराफलततिभिराक्रांत गगने
ओळ ३८ विरेजे...... धवल घटशंका पट भिते ॥ १५ ॥ कौशिकः
ओळ ३९ कौशिकायेव आप्तोर्याम सवार्थिने । वसिष्ठा ये व
ओळ ४० श्रीमत् श्रीशर्मे यच्छति । यस्यव्रतं विसर्ग
ओळ ४१ दातप्रतिग्रतादिवभीतभीता । नाकं सुरा परिविहाय मनुष्य ( लो )
ओळ ४२ के मापु स यथा काक्ष यशाः ॥ १७ ॥ द्वैपायनापादित

ओळ ४३ द वेद शालफलायेत पुनर्द्विजानां । ऐ चकारापजहारता

ओळ ४४ यक्षी चतुर्वेदिपिमहोर्ण ॥ १८ ॥ सो यं भीमरथीगुणेन

ओळ ४५ … … सोरच्छले भास्वत्कीत्तिमहामणि प्रतिनिभे श्रीपांडुरंगे

ओळ ४६ पुरे । अत्रेर्यमिमहेछिकाचितियुतं श्रीशर्मयज्ञाकरोऽद्या

ओळ ४७ प्रीतिमवापलोकनिवहै देवैरसौ विठ्ठलः ॥ १९ ॥ मंगलम् ॥

□ □

म.रा.सा.सं.मं. ग्रंथालय
ग्रंथालय

[ वरील लेखात निर्देशिलेल्या लेखांची छायाचित्रे आकृती १८, १९, २० व २१ मध्ये दिलेली आहेत. ]

# महाराष्ट्रातील प्राचीन नाणी

म. के. ढवळीकर

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्राचीन नाणी सापडली आहेत. उत्खननात जी नाणी सापडली आहेत, ती संख्येने फारशी नाहीत. याचे मुख्य कारण असे की माणूस घरदार सोडून जाताना मौल्यवान वस्तू अर्थातच आपल्या बरोबर घेऊन जातो. अशा वस्तूमध्ये नाणी अर्थातच आली. त्या मानाने उत्खननाव्यतिरिक्त इतर ठिकाणी अकस्मातरीत्या सापडलेले जे निधिनिक्षेप ( Treasure trove ) सापडले त्यात फार मोठ्या संख्येने नाणी मिळाली. महाराष्ट्रातील सर्वात मोठा नाणेनिधी नाशिक जिल्ह्यातील जोगळटेंबी या गावी सापडला. त्यात शातवाहन राजांची सुमारे तेरा हजारांहून अधिक नाणी होती. तऱ्हाळा ( जिल्हा अकोला ), बहाळ ( जिल्हा धुळे ) इत्यादी ठिकाणी सापडलेल्या निधिनिक्षेपांत सुमारे दीड हजार नाणी होती. पवनार ( जिल्हा वर्धा ) येथील निधीत जरी तीनशे नाणी सापडली तरी ती विष्णुकुंडिन् राजांची असल्यामुळे अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

तथापि महाराष्ट्रात आजवर सापडलेल्या नाणेनिधींचा विचार केल्यास असे आढळून येईल की उत्तर भारतात सापडलेल्या नाण्यांच्या तुलनेने ती फारच थोडी आहेत. याची अनेक कारणे आहेत. इतिहासकाळात महाराष्ट्रात सर्वत्र वस्ती होण्यास सुमारे इ. स. पू. तिसरे शतक उजाडले. पुरातत्त्वीय पुराव्याच्या आधारे असे दिसून येते की येथे शातवाहनांची राजवट सुरू होण्यापूर्वी तुरळक वस्ती झालेली होती. त्यामुळे भारतातील प्राचीन नाणी–आहत नाणी–येथे फार उशीरा म्हणजे मौर्यकाळात ( इ. स. पू. तिसरे शतक ) व्यवहारात आली असावीत. त्यानंतरच्या काळातील शातवाहनांची नाणी सर्व महाराष्ट्रभर सापडतात. गुप्तकाळ ( इ. स. ४ थे व ५ वे शतक ) हे भारताच्या इतिहासातील सुवर्णयुग समजले जाते. ह्यांची अत्युत्कृष्ट कलापूर्ण अशी सोन्याची नाणी त्यांच्या साम्राज्यात–प्रामुख्याने उत्तर भारतात–मोठ्या प्रमाणावर सापडली आहेत. या काळात महाराष्ट्रात वाकाटकांचे राज्य होते. त्यांच्या कारकीर्दीत अजिंठ्यांची भव्य लेणी

कोरली गेली परंतु त्यांनी नाणी मात्र पाडली नाहीत याचे आश्चर्य वाटते. त्यांचे गुप्तांशी नात्याचे संबंध असल्यामुळे बहुधा गुप्तांची नाणी आपल्याकडे प्रचलित होती असे अनुमान केले जाते. परंतु गुप्तांची नाणी महाराष्ट्रात एखाददुसरा अपवाद सोडल्यास फारशी सापडली नाहीत. त्यांच्यानंतर जे चालुक्य आणि राष्ट्रकूट राजे होऊन गेले त्यांचीही नाणी सापडलेली नाहीत. याप्रमाणे इ. स. सुमारे २३० ते १००० या सुमारे ७५० वर्षांच्या कालखंडातील नाणी महाराष्ट्रात आढळत नाहीत. परंतु काही छोट्या राजकुलांची नाणी क्वचित सापडतात. त्रैकूटकांची इ. स. चवथ्या-पाचव्या शतकातील काही चांदीची नाणी सापडली आहेत. गढैया नाणी महाराष्ट्रात सापडतात. ती जाड आणि ओबडधोबड असून चांदीची आहेत. त्यांच्या दर्शनी बाजूवर राजाचा अर्धपुतळा किंवा घोडेस्वाराचे चित्र व मागील बाजूवर वेदी आहेत. नाण्यांवरील ही चित्रे अत्यंत बेढब व कलाहीन असून त्यावर कोणत्याही प्रकारचा लेख नाही. ही नाणी इ. स. सातव्या–आठव्या शतकात प्रचलित होती. यानंतरच्या काळातील यादव आणि शिलाहार राजांची नाणी महाराष्ट्रात सापडली आहेत.

## आहत नाणी

महाराष्ट्रात काही ठिकाणी आहत नाणी सापडली आहेत. त्यापैकी वाई ( जिल्हा सातारा ) येथे मिळालेल्या नाण्यांची अतिप्राचीन आहत नाण्यांत गणना केली जाते. ही नाणी तांब्याची असून गोलाकार व जाड आहेत. त्यांच्या दर्शनी बाजूवर मध्यभागी असलेल्या एका बिंदूतून विरुद्ध दिशेस जाणारी दोन लंबवर्तुळे आहेत. हे चिन्ह ठसा ठोकून उमटविलेले आहे. नाण्याची मागील बाजू कोरी आहे. नाणकशास्त्रज्ञांच्या मते सुरुवातीला आहत नाण्यांवर फक्त दर्शनी भागी आणि कालांतराने मागील बाजूवरही चिन्हे उमटविण्यात आली. आहत नाण्यांचा एक मोठा निधी बहाळ ( जिल्हा जळगाव ) येथे १९४३ मध्ये सापडला. या निधीत एकूण ६८५ नाणी होती. ती सर्व चांदीची नाणी आहेत. त्यावरील चिन्हांचा अभ्यास करून या नाण्यांची त्यांच्या आकारानुसार तीन गटांत विभागणी केली आहे. नाण्यांच्या दर्शनी बाजूवर सर्वसाधारणपणे एकूण पाच चिन्हे आढळतात. त्यापैकी ठराविक चार चिन्हे ही प्रत्येक गटातील नाण्यांवर असून पाचवे चिन्ह मात्र निराळ्या प्रकारचे आहे. ही नाणी इ. स. पू. चौथ्या शतकातील असावीत असे वाटते. कोकणातही काही आहत नाणी सापडली होती. अक्कलकोट ( जिल्हा सोलापूर ) येथे सापडलेली आहत नाणी हल्ली मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियममध्ये आहेत.

## शातवाहनांची नाणी

सम्राट अशोकाच्या निधनानंतर मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासास सुरुवात झाली. त्यावेळी इ. स. पू. २३० च्या सुमारास महाराष्ट्रात शातवाहनांचे राजकुल उदयास

आले. या राजांनी महाराष्ट्रावर सुमारे साडेचारशे वर्षे राज्य केले. त्यांची राजधानी प्रतिष्ठान ( पैठण, जिल्हा औरंगाबाद ) येथे होती. शातवाहनांची नाणी सर्व महाराष्ट्रभर मोठ्या प्रमाणात सापडली आहेत. तऱ्हाळा ( जिल्हा अकोला ) आणि जोगळटेंबी ( जिल्हा नाशिक ) येथे शातवाहन नाण्यांचे फार मोठे निधी सापडले. ही नाणी प्रामुख्याने तांब्याची व शिश्याची आहेत. पोटीनची नाणीही अनेक आहेत. परंतु फार थोड्या राजांनी चांदीची नाणी पाडली. शातवाहनांनी सोन्याची नाणी पाडली नव्हती. त्यांचे साम्राज्य फार मोठ्या प्रमाणावर पसरलेले असल्यामुळे निरनिराळ्या प्रदेशांसाठी निरनिराळ्या छापांची नाणी शातवाहनांनी काढली होती असे दिसते.

शातवाहनांची अतिप्राचीन नाणी नेवासे ( जि. अहमदनगर ) येथील उत्खननात सापडली. ती बैल, घोडा, हत्ती छापाची असून त्यावरील लेखात 'सातवाहन' हे नाव आढळते, परंतु शातवाहन घराण्यात या नावाचा कोणीही राजा होऊन गेल्याचा पुरावा आजवर मिळालेला नव्हता. नाण्यावरील लेखाच्या अक्षरवटिकेवरून ही नाणी इ. स. पू. तिसऱ्या शतकाच्या अखेरची किंवा दुसऱ्या शतकाच्या सुरुवातीची असावीत असे उत्खनकांचे मत आहे. त्यावरून हा सातवाहन राजा त्यांच्या घराण्याचा मूळ पुरुष असावा असे अनुमान करता येईल. बहुधा त्याच्या कर्तृत्वामुळे घराण्याला शातवाहन हे नाव प्राप्त झाले.

सातकर्णी हे नाव लेखात असलेली शातवाहनांची अनेक नाणी आजवर मिळाली आहेत. या नाण्यांवर हत्ती, घोडा, बैल इत्यादी प्राणी व नंदीपाद वेदिकेतील वृक्ष, स्वस्तिक, श्रीवत्स इत्यादी प्रकारची चिन्हे आढळतात. यातील ठराविक चिन्ह नाण्याच्या ठराविक बाजूवर असेल असे निश्चित सांगता येत नाही. तसेच काही नाणी आकाराने गोल तर काही चौरस किंवा चौकोनी आहेत. त्यांच्या वजनातही खूप फरक आढळतो. तांबे, शिसे आणि पोटीन या निरनिराळ्या धातूंची ही नाणी आहेत. यामुळे शातवाहन नाण्यांचे वर्गीकरण केवळ अशक्यप्राय आहे. नाण्यावरील लेखाच्या अक्षरवटिकेचाही त्यांचा कालक्रम ठरविण्यास फारसा उपयोग होत नाही. या नाण्यांवर सर्वसाधारणपणे 'रणो सिरी सातकणीस' असा लेख असतो. सातकर्णी नावाचे तीन किंवा चार राजे होऊन गेले. तथापि यापैकी कोणती नाणी कोणत्या सातकर्णींची आहेत याचा निश्चित अंदाज बांधण्याचा प्रयत्न नाणकशास्त्रज्ञांनी केला आहे.

तऱ्हाळा ( जिल्हा अकोला ) येथे १९३९ साली सापडलेल्या शातवाहन नाणे-निधीत एकूण १६०० नाणी होती. ही सर्व नाणी आकाराने गोल असून पोटीनची आहेत. त्यांच्या दर्शनी बाजूवर सर्वसाधारणपणे सोंड वर केलेल्या हत्तीचे चित्र असून राजाच्या नावाचा लेख आहे आणि मागील बाजूवर उज्जैन चिन्ह आहे. गौतमीपुत्र शातकर्णीपासून सुमारे अकरा राजांची नाणी या निधीत सापडली. त्यात शातकर्णी पुळुमावी, शिवश्री पुळुमावी, स्कंद शातकर्णी, यज्ञ शातकर्णी, विजय शातकर्णी, कुंभ

शातकर्णी, कर्ण शातकर्णी, आणि शक शातकर्णी इत्यादी राजांची नाणी आहेत. त्यांपैकी शेवटचे तीन राजे केवळ या निधीतील नाण्यांमुळे आपल्याला ज्ञात झाले.

जोगळटेंबी ( जिल्हा नाशिक ) येथील नाणेनिधीत सुमारे १४००० नाणी होती. ही सर्व नाणी गुजरातेत राज्य करणारा शकक्षत्रप, नहपान याची होती. ती सर्व चांदीची असून त्यांतील ९२७० नाण्यांवर गौतमीपुत्र शातकर्णीने आपल्या नावाचे ठसे उमटविलेले होते. यावरून गौतमीपुत्राने नहपानाचा पराभव करून त्याची नाणी आपल्या नावाचा ठसा मारून प्रचलित केली हे दिसून येते. ही चांदीची नाणी म्हणजे प्राचीन साहित्यात आणि कोरीव लेखांत उल्लेखिलेले 'कार्षापण' होत. कार्षापणाच्या दानाचा उल्लेख नाशिक आणि कान्हेरी ( मुंबई ) येथील बौद्ध लेण्यांतील कोरीव लेखांत आहे. गौतमीपुत्रानंतर वासिष्ठिपुत्र पुळुमावी आणि यज्ञश्री शातकर्णी यांनी चांदीची नाणी पाडली होती. गौतमीपुत्राच्या एका शिशाच्या नाण्यावर दोन शिडांच्या जहाजाचे चित्र आहे. याचा उल्लेख अगत्याने केला पाहिजे. तसेच आग्नेय आशियातील भारतीयांच्या अनेक वसाहती याच काळात झाल्या. शातवाहनकाळात महाराष्ट्राचा रोमन साम्राज्याशी फार मोठ्या प्रमाणावर व्यापार होता हे या संदर्भात ध्यानात ठेवले पाहिजे. त्यामुळे रोमन सोन्याची नाणी भारतात येऊ लागली. ही नाणी अत्यंत कलापूर्ण असल्यामुळे त्यांची माळ करून गळ्यात घालीत. तिचा 'दिनारमाला' असा प्राचीन वाङ्मयात उल्लेख आहे. मराठेशाहीतील पुतळ्यांची माळ या दिनारमालेपासूनच तयार झाली.

इ. स. ५ व्या शतकात पश्चिम महाराष्ट्रात त्रैकूटकांचे राज्य होते. त्रैकूटकांच्या नाण्यांचा एक निधी पुण्याजवळ काझड या गावी १९०५ मध्ये सापडला. त्यांच्या नाण्यांवर सर्वसाधारणपणे दर्शनी बाजूवर राजाचा अर्धपुतळा व मागील बाजूवर चैत्य किंवा तारा असून राजाचे नाव असलेला लेख असतो. या नाण्यांवर गुजरातेतील शकक्षत्रपांच्या नाण्यांचा विलक्षण प्रभाव आहे. इ. स. ६ व्या शतकात वऱ्हाडच्या काही भागात विष्णुकुंडिन् राजांचा अंमल होता. त्यांच्या नाण्यांचा एक निधी पवनार ( जिल्हा वर्धा ) येथे सापडला. या नाण्यांच्या दर्शनी बाजूवर सर्वसाधारणपणे सिंहाचे चित्र असून मागील बाजूवर चक्र, दीप, किंवा शंख असे चिन्ह असते. परंतु त्यावर कुठल्याही प्रकारचे लेख नसून फक्त क्वचित 'म' हे अक्षर आढळते. त्यावरून ही नाणी माधववर्मन या राजाची असावीत असे नाणकशास्त्रज्ञांचे मत आहे. त्यानंतरच्या काळात म्हणजे इ. स. ७ व्या शतकापासून ते १० व्या शतकापर्यंत महाराष्ट्रातील राजांनी नाणी काढली नव्हती असे वाटते. त्या काळात येथे इंडो-ससानियन नाणी व्यवहारात होती. ही नाणी प्रामुख्याने चांदीची असून त्यांच्या दर्शनी भागी राजाचे शीर्ष व मागील बाजूवर वेदी असे. कलात्मक दृष्ट्या ही नाणी अत्यंत निकृष्ट दर्जाची असून ओबडधोबड आहेत. त्यावर कुठलाही लेख नाही. त्यांना गढैया नाणी म्हणतात. ही नाणी पश्चिम भारतभर सर्वत्र सापडतात.

देवगिरीच्या ( हल्लीचे दौलताबाद, जिल्हा औरंगाबाद ) यादव राजांची नाणी महाराष्ट्रात काही ठिकाणी सापडली आहेत. त्यांचा पहिला राजा पाचवा भिल्लम ( ११८५–११९३ ) याच्या नाण्यावर सिंह आणि शंख ही चिन्हे आणि श्री भिल्लमदेव ही नागरी लिपीतील अक्षरे आहेत. सिंघणाच्या ( १२००–१२४७ ) नाण्यावर नृत्य करणाऱ्या कृष्णाचे चित्र आहे. तसेच त्यावर शंख हे चिन्ह असून, ' श्री सिंघण ' असा लेख आहे. त्याच्या काही नाण्यांवर कमळ आहे. याच प्रकारची नाणी कृष्ण ( १२४७–१२६१ ), महादेव ( १२६१–१२७१ ) आणि रामचंद्र ( १२७१–१३१० ) यांनी काढली. या नाण्यांना पद्मटंक अशी संज्ञा आहे. नाण्याच्या मध्यभागी चिन्हाचा ठसा जोराने उमटविल्यामुळे ही नाणी खोलगट झाली आहेत. नाण्यांची मागील बाजू कोरी आहे. रामचंद्रदेव यादवाने गरूड छापाची नाणीही काढली होती. गद्याण हे एक सोन्याचे नाणे होते. त्याचा उल्लेख यादवांच्या कोरीव लेखात आढळतो.

शिलाहार राजांची काही सोन्याची नाणी कोल्हापूर येथील उत्खननात सापडली होती. त्यांच्या दर्शनी बाजूवर त्रिशूळ व चंद्र–सूर्य असून मागील बाजूवर गरूडाचे चित्र आहे. परंतु नाण्यावर कोणताही लेख नाही. या नंतरच्या काळातील म्हणजे मोगल-मराठा काळातील नाणी महाराष्ट्रात मोठ्या संख्येने सापडली आहेत.

□ □

# महाराष्ट्रातील पुराण अवशेषांचे जतन

ग. गं मुजुमदार

## प्रास्ताविक

भारताच्या थोर व प्राचीन परंपरेचा वारसा दाखवणाऱ्या अनेक वास्तू भारतात ठिकठिकाणी विखुरलेल्या आढळतात. त्या सगळ्या सुस्थितीत नाहीत. त्यांच्या वयोमाना–प्रमाणे व इतर नैसर्गिक किंवा मानवी कारणांमुळे त्या कमी-जास्त धड अवस्थेत असलेल्या दिसतात. अशा जुन्या पडझड झालेल्या वास्तू परत पूर्वस्थितीला आणून नव्या पिढीसाठी त्या उपयोगात आणण्याची कल्पना भारतात फार पुरातन काळापासून रूढ आहे. देवळे व इतर धार्मिक वास्तूंचा जीर्णोद्धार ठिकठिकाणी व वेळोवेळी झालेला आहे. हा जीर्णो-द्धाराचा प्रयत्न अर्थातच फार थोड्या प्रमाणावर झाला असल्याने अनेक ठिकाणी धार्मिक व ऐतिहासिक वास्तू नष्ट झाल्या आहेत व काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

अशा वास्तूंमध्ये खालील प्रकारांचा समावेश होतो. बौद्धकालीन स्तूप निरनिराळ्या काळाची व रचनेची देवळे, मशिदी, थडगी, समाधी, भुईकोट व डोंगरी किल्ले, डोंगरात कोरलेल्या वास्तू, उत्खननात उजेडात आलेल्या अवशिष्ट वास्तू, रंगीत भित्ती-चित्रे वगैरे. महाराष्ट्राचा आजचा भौगोलिक विस्तार ध्यानात घेतला तर अशा प्राचीन वास्तूंच्या बाबतीत महाराष्ट्र बराच समृद्ध आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील अजंठा, वेरूळ येथील लेणी, पुणे जिल्ह्यातील कार्ले, भाजे, भेडसा व जुन्नर येथील लेणी, अंबरनाथ येथील देवळासारखी अनेक ठिकाणी आढळून येणारी कोरीव काम असलेली देवळे, सह्याद्री-मध्ये ठिकठिकाणी आढळून येणारे डोंगरी किल्ले वगैरे अनेक मौल्यवान सांस्कृतिक वास्तू महाराष्ट्रात आहेत.

वर सांगितल्याप्रमाणे भारतीय समाजामध्ये महत्त्वाच्या सांस्कृतिक स्थळांच्या जीर्णोद्धाराची कल्पना तर रूढ होतीच पण लोकांच्या साधनसंपत्तीची मर्यादा लक्षात घेता हा प्रयत्न अत्यंत तोकडा, स्थानिक स्वरूपाचा होता. या बाबतीत आधुनिक दृष्टीने

विचार करून राष्ट्रीय पातळीवर अशा प्रयत्नांची सुरुवात इ. स. १८६१ पासून कनिंगहॅम यांनी सुरू केलेल्या प्राचीन वास्तुशिल्पाच्या नोंदणीत व पाहणीत आढळते. यानंतर वीस वर्षांनी म्हणजे इ. स. १८८१ च्या सुमारास कोल यांची "वास्तुतंत्रज्ञ" म्हणून सरकारी नेमणूक झाली व हीच भारताच्या प्राचीन वास्तूंच्या जतनाची राजमान्य सुरुवात. कोल यांनी या बाबतीत भारताच्या ज्या अनेक भागांत सुरुवात केली, त्यांत महाराष्ट्रात अहमदनगर येथील ऐतिहासिक वास्तू व कार्ले येथील लेणी यांचा समावेश होता. यानंतर सन १९०१ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी केलेल्या घोषणेप्रमाणे इ. स. १९०४ मध्ये "प्राचीन वास्तुजतन कायदा" अस्तित्वात आला व जतनाला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

या बाबतीत उभारलेल्या यंत्रणेचे स्वरूप थोडक्यात खालीलप्रमाणे : डायरेक्टर जनरल, भारतीय पुरातन खाते यांचे हाताखाली ९ विभागीय प्रमुख व प्रत्येक प्रमुखाच्या हाताखाली जतनासाठी नेमलेला नोकरवर्ग आहे. याखेरीज पुरातत्त्वीय रसायनतज्ज्ञाच्या हाताखाली शास्त्रीय पाहणी व उपाययोजनेसाठी नेमलेला वैज्ञानिक नोकरवर्ग. पडझड झालेल्या वास्तूंचे पाया, भिंती, छप्परे अगर कळस, रस्ते, जिने, दरवाजे, खिडक्या वगैरे दुरुस्तीच्या बाबतीत स्थापत्यशास्त्रज्ञ लक्ष घालतात व जेथे रासायनिक अगर अन्य शास्त्रीय कारणामुळे झालेली असेल व होत असेल अशी नुकसानी दुरुस्त करण्यासाठी व पुन्हा अशी नुकसानी होऊ नये, निदान एवढ्या प्रमाणावर होऊ नये याची पुरातत्त्वीय रसायनतज्ज्ञ जबाबदारी पेलतात. महाराष्ट्रातील पुरातन वास्तूंच्या जतनाचे काम औरंगाबाद येथील विभागीय कार्यालय व डेहराडून येथील प्रमुख रसायनतज्ज्ञ यांचेतर्फे चालते.

## प्राचीन वास्तू व वस्तू यांच्या पडझडीची–खराबीची कारणे :

प्राचीन वास्तू व वस्तू यांच्या नाशाच्या कारणांची मीमांसा केली असता त्यांची विभागणी मुख्यत्वेकरून दोन विभागांत करता येईल : १. नैसर्गिक आणि २. मानवनिर्मित. **१. नैसर्गिक कारणे :** भारत हा उष्ण कटिबंधातला देश असल्यामुळे व मान्सून हवामानामुळे भारताच्या बऱ्याच भागात पाऊस मोठ्या प्रमाणावर पडत असल्यामुळे वृक्ष, वनस्पती, शेवाळे यांची बेसुमार वाढ होते. प्राचीन वास्तूंच्या परिसरात अशा वाढीचा हानिकारक परिणाम आढळून येतो. बांधकामाचा पाया, भिंती, छप्परे वगैरे अनेक भागांत उगवणाऱ्या वनस्पती, त्यांच्या वाढणाऱ्या मुळ्या त्या त्या भागांची बांधणी बिघडवून ते मोडकळीला आणतात. याच्या जोडीला पाऊस व जमिनीतील ओल, बांधकामातील चुन्याचा अगर मातीचा भाग खिळखिळा करते व मूळ बांधकामाच्या पडझडीस फार मोठ्या प्रमाणावर कारणीभूत होतो. याखेरीज समुद्राच्या काठाशी असलेल्या वास्तूवर, समुद्रावरून येणाऱ्या क्षारयुक्त वाऱ्यांचा, मुख्यत्वेकरून त्यातील विद्राव्य क्षारांचा, फारच नुकसानकारक परिणाम होतो व विशेषतः दगडी बांधकाम, शिल्पे,

कलाकुसरीची कामे यांचा पृष्ठभाग धुपून जाण्यास हे क्षार कारणीभूत होतात. महाराष्ट्रात मुख्यत्वेकरून कोकण भागात जास्त पावसाचे हानिकारक परिणाम अशा प्राचीन वास्तूंवर झालेले आढळतात. देशावर पाऊस जरी फार नसला तरी पावसाळ्यात उगवणारे वृक्ष व इतर वनस्पती यांचा वेळीच नाश न केल्यामुळे नैसर्गिक विघटकांना मानवी दुर्लक्षाचे अप्रत्यक्ष सहाय्य मिळते व नुकसानी झालेली आढळते.

निसर्गाच्या जोडीला किंबहुना जास्त प्रमाणावर झालेली प्राचीन वास्तूंची नुकसानी मानवनिर्मित अगर मानवदुर्लक्षित कारणामुळेच झालेली आहे. धार्मिक द्वेष व तज्जन्य हेतुपूर्वक नुकसानी, प्राचीन वास्तूंच्या विटा, दगड, माती यांची चोरी, मौलिक वास्तूवर अनधिकृत बांधकाम, अर्धवट पडलेली वास्तू पूर्ण पाडून जागा शेतीच्या उपयोगात आणणे व दीर्घकाळ दुर्लक्ष अगर औदासिन्य या कारणांनी मानवाने निसर्गावरही आघाडी मारलेली आढळते. या सर्वांचा परिणाम म्हणजे प्राचीन इतिहास व संस्कृती यांचा अभ्यास करण्याची ही महत्त्वाची साधने नष्ट अगर नष्टप्राय होण्यात झाला आहे. वरील दोन्ही प्रकारांनी पुरातन वास्तूंना नुकसान अगर धोका पोहोचून त्या नष्ट होण्याच्या मार्गास लागल्याची अनेक उदाहरणे महाराष्ट्रात व भारतामध्ये इतरत्रही पुष्कळ जागी आढळतात.

**जतनपद्धतीची मुख्य तत्त्वे** : प्राचीन वास्तू जतन करण्याच्या पद्धतीत शक्यतोवर नवीन बांधकामाचा वापर न करता अवशिष्ट भाग शक्य तितक्या चांगल्या स्थितीत जसाच्या तसा ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु परिस्थितीनुसार जरूर तेथे नवीन बांधकामाची जोड अगर वेळप्रसंगी ऊन, पाऊस यापासून संरक्षणासाठी आच्छादन बांधणे अपरिहार्य होते. अशा दोन्ही प्रसंगी मूळ बांधकामाची पद्धती व शैली ध्यानात घेऊन त्याच्याशी सुसंगत अशीच बांधकामाची अगर जोडकामाची योजना करावी लागते. मात्र अशा ठिकाणी नवीन बांधकाम स्पष्टपणे वेगळे दिसावे अशी योजना करतात. वेळप्रसंगी अर्धवट अगर पूर्ण गाडली गेलेली वास्तू उजेडात आणण्यासाठी व तिला शक्य तितक्या पूर्वस्थितीला आणण्यासाठी उत्खनन करणेही जरूर पडते. स्थापत्यदृष्ट्या पडिक वास्तूंची पाहाणी केल्यानंतर पडझडीच्या कारणाचे निराकरण करणे जरूर पडते. उदाहरणार्थ, वास्तूची मूळची कच्ची बांधणी पुनर्रचनेच्या रूपाने व वाढण्यापासून होणाऱ्या उपद्रवासाठी सर्व वृक्ष व मुळ्या उपटून काढणे, पावसाचे पाणी बांधकामात पाझरून नुकसान होत असल्यास पाणी पाझरणाऱ्या चिरा, भोके सच्छिद्र स्तर यांचा बंदोबस्त करणे वगैरे. नवीन बांधकाम साहित्य वापरणे झाल्यास त्याचा युक्तीने वापर करून मूळ बांधकामाचा अवशिष्ट भागापासून नवीन बांधकाम न ओळखू येण्याजोगते करणे. स्थापत्यशास्त्रानुसार करण्यात येणाऱ्या जतन पद्धतीत मुख्यतः गवंडीकाम, मग ते मातीचे, चुन्याचे सीमेंटचे अगर कॉंक्रीटचे असो, महत्त्वाचे आहे. वेळप्रसंगी सुतारकाम व दगडकाम यांचीही जोड द्यावी लागते. पडझड झालेली वास्तू एकदाच दुरुस्त करून

शक्यतो मूळ स्वरूपात आणणे एवढ्याने काम संपत नाही. पुढेही त्या वास्तूंची खराबी होऊ नये म्हणून त्यांची सतत देखभाल करणे तितकेच आवश्यक ठरते.

**जतनाच्या मुख्य पद्धती :** स्थापत्यदृष्ट्या जतन करताना खालील पद्धतीचा वापर करावा लागतो.

( १ ) दगड, वीट इत्यादिकांमधील जोडकाम स्वच्छ करून चुना, वाळू वापरून चिरेबंदी करणे व वर सीमेंटने मूळ बांधकामाशी सुसंगत गोलाई करणे.

( २ ) भिंतीच्या माथ्याचा भाग पाणी पाझरण्यापासून सुरक्षित करणे.

( ३ ) गुण्यांत नसणारे व लवकरच पडण्याजोगे गवंडीकाम उतरवून घेऊन पुन्हा मुळाबरहुकूम बांधकाम करणे.

( ४ ) आधारहीन भागांना आधार देण्याची व्यवस्था करणे.

( ५ ) भेगा, तूटफूट, पोकळ्या वगैरे योग्य पदार्थांनी भरून काढणे.

( ६ ) समुद्रजन्य पडझड व नुकसानीपासून संरक्षणासाठी भिंत उभारणे इत्यादी.

रासायनिक जतनाच्या बाबतीत असे म्हणता येईल की जेथे वास्तूंचे जतनात सर्वसामान्य बांधकाम साहित्य उपयोगी पडत नाही, तेथे रासायनिक पदार्थ व प्रक्रिया वापरण्यात येतात. उदाहरणार्थ, भिंतीवरील खराब झालेली व मोडकळीस आलेली प्राचीन रंगीत चित्रे व शिल्पकामावर निरनिराळ्या कारणांनी भरलेले डाग व आवरणे व रासायनिक अगर कीटक, जंतू, बुरशी यांच्या क्रियेमुळे झालेले दृश्य अगर अदृश्य परिणाम या सर्वांचा शास्त्रीय परीक्षणाने अभ्यास करून त्यांची कारणपरंपरा शोधणे व हा झालेला हानिकारक परिणाम शक्य तितका दूर राहण्यासाठी योग्य रसायने व रासायनिक पद्धती वापरून खराब झालेली वस्तू शक्य तितक्या चांगल्या स्थितीत आणल्या जातात म्हणजेच थोडक्यात खराब वास्तूंचे पुरातत्त्वीय महत्त्व शक्य तितके टिकवून साफ करणे, तूटफूट झालेल्या वस्तू जोडून पूर्वीच्या आकारात आणण्याचा प्रयत्न करणे व एकदा स्वच्छ केलेल्या वस्तू पुन्हा खराब होऊ नये म्हणून त्यावर संरक्षक द्रव्याचे आवरण देणे ही महत्त्वाची कामगिरी रसायनतज्ज्ञ निरनिराळ्या रासायनिक क्रिया व रासायनिक पदार्थ यांचा योग्य वापर करून बजावतो.

महाराष्ट्रातील जतन केलेल्या काही महत्त्वाच्या वास्तू—

वर दर्शविल्याप्रमाणे जतनाच्या मुख्य तत्त्वांना धरून व जतनाच्या वेगवेगळ्या पद्धतींचा वापर करून भारतीय पुरातत्त्व खात्याच्या जतन विभागाने व रासायनिक विभागाने महाराष्ट्रात जी अनेक स्थळे जतन केलेली आहेत, त्यापैकी काही थोड्या परंतु महत्त्वाच्या अशा वास्तूंच्या जतनाचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे देता येईल.

## घारापुरी येथील दगडी कोरीव लेणी

मुंबई बंदराजवळच समुद्रात असलेल्या या लेण्यांच्या जतनाच्या बाबतीत विशेष प्रकारच्या अडचणींवर मात करावी लागली. त्यापैकी मुख्य म्हणजे समुद्राच्या पाण्यात असणाऱ्या व हवेमध्ये विद्राव्य क्षारांचा कोरीव कामावर होणारा रासायनिक विघटक परिणाम. याचेच प्रतीक म्हणजे इ. स. १९३५ मध्ये त्रिमूर्तीची ३ मोठी छकले निखळून पडली. या बाबतीत नेमलेल्या तज्ज्ञांच्या अहवालानुसार येथे सर्वंकष उपाययोजना अंमलात आणली. प्रथम सर्व प्रकारची पडिक माती व वाढलेल्या वृक्षादी वनस्पती मुळापासून बाजूला केल्या. दगडी बांधकामातील सर्व दृश्य भेगा बंद करून सर्व दगडी पृष्ठभाग पाण्यापासून सुरक्षित केला. कच्च्या झालेल्या दगडी बांधकामाला आधार म्हणून सुमारे २ इंच व्यासाची व ३०–४० फूट खोलीची अनेक भोके दगडात पाडून त्यांत सीमेंट काँक्रीट भरून बांधकामाला जोर दिला. पाण्यापासून रक्षणासाठी सभोवती योग्य ठिकाणी खड्डे किंवा पन्हाळी काढून त्यावर योग्य त्या जलविरोधक रासायनिक पदार्थांचे लेपन करण्यात आले. काही ठिकाणी आधारासाठी खांब दिले गेले. दगडी कोरीव मूर्तींच्या सुट्या होऊ घातलेल्या भागांना न गंजणाऱ्या धातूशी जोडण्यात आले. या सर्व दुरुस्त्यांवर व बांधकामावर मूळ दगडाशी सुसंगत अशी रंगसफेती देण्यात आली. भविष्यकालीन पडझडीवर अगर हानिकारक परिणामावर कायम नजर राखण्यासाठी यंत्रणा उभी करण्यात आली.

## वेरूळ व अजंठा येथील कोरीव लेणी व रंगीत चित्रे

या जगप्रसिद्ध गुंफा सुमारे ४० वर्षांपूर्वी उजेडात आल्या. तेव्हापासून निजाम सरकारच्या पुरातत्त्व खात्यामार्फत त्यांची देखभाल होत होती. हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाल्यावर त्याची व्यवस्था भारतीय पुरातत्त्व खात्याकडे आली. या दोन्ही ठिकाणच्या जतनासाठी १९५३ सालापर्यंत सात लाख रुपयांपेक्षाही जास्त पैसे निजाम सरकारने खर्ची घातले. यावरून या सर्व व्यापाची कल्पना येईल. येथील दुरुस्त्या मुख्यत्वे खालीलप्रमाणे होत.

लेण्यामधील आधार सुटलेल्या भागास आधार खांब देणे, बांधकामाच्या व शिल्पकामाच्या दगडामधील पाणी झिरपणाऱ्या भेगा भरून काढणे, कुजलेला दगडाचा भाग खरडून त्याजागी योग्य व मजबूत पदार्थाचे भरण व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या लेण्यांच्या माथ्यावरच्या दगडामध्ये योग्य तऱ्हेने पन्हाळी काढून पावसाच्या व इतर पाण्याला वेगळा रस्ता काढून देणे व अशा तऱ्हेने लेण्याच्या अंतर्भागात पाणी पाझरण्यापासून थांबवणे हे होय. कारण साचलेले व पाझरणारे पाणी हे दखलनच्या दगडाच्या स्थैर्याचे महत्त्वाचे शत्रूच होत.

